# “क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास”

## ( सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात )

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत
**‘राज्यशास्त्र’** विषयातील **विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)**
पदवीसाठी सादर करण्यात आलेला **शोध प्रबंध**


**● संशोधक ●**

**श्री. राजू कलमेश सावंत**

**● मार्गदर्शक ●**

**प्राचार्य डॉ. दिनकर पाटील**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख**
**भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर.**


**राज्यशास्त्र विभाग**

**ऑक्टोबर, २०१२**

# प्रतिज्ञापत्र

मी **श्री. राजू कलमेश सावंत** प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्या शाखांतर्गत **राज्यशास्त्र** या विषयातील **विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)** अभ्यासक्रमासाठी सादर केलेला **''क्रांतिवीर डॉ.नागनाथआण्णा नायकवडी यांच्या नेतृत्त्वाचा चिकित्सक अभ्यास'' (सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात)** शोधप्रबंध मी स्वत: संशोधित केला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

स्थळ – सांगली

दिनांक – ऑक्टोबर, २०१२

संशोधक विद्यार्थी

**श्री. राजू कलमेश सावंत**

# प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत **राज्यशास्त्र** या विषयातील **विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)** या पदवीसाठी **श्री. राजू कलमेश सावंत** यांनी **''क्रांतिवीर डॉ.नागनाथआण्णा नायकवडी यांच्या नेतृत्त्वाचा चिकित्सक अभ्यास'' (सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात)** या विषयावरील शोध-प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

स्थळ - कोल्हापूर

दिनांक - ऑक्टोबर, २०१२ मार्गदर्शक

**प्राचार्य डॉ. दिनकर पाटील**

एम्.ए.,एम्.फिल.,पीएच्.डी.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

भोगावती महाविद्यालय, कुरुकली,

ता. करवीर, जि. कोल्हापूर.

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत पीएच्.डी. पदवीसाठी मी निवडलेल्या शोधप्रबंधाचा विषय ''क्रांतिवीर डॉ.नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या नेतृत्त्वाचा चिकित्सक अभ्यास'' (सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात) असा असून यामध्ये सांगली, सातारा जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभागी असणारे क्रांतिवीर डॉ. नागनाथ नायकवडी यांचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील केलेल्या कार्याचे योगदान यांचा अभ्यास केला आहे.

वरील विषयावरील सदरचा प्रबंध सादर करीत असताना संशोधनाच्या प्रारंभापासून प्रबंध पूर्ण होईपर्यंत ज्या सर्वांनी मौलिक सहकार्य केले, त्यांचा उल्लेख करणे मी माझे परम कर्तव्य समजतो.

मला संशोधक म्हणून स्वीकारुन प्रबंधाच्या विषय निश्चितीपासून ते संशोधन पूर्ण होईपर्यंत अत्यंत मौलिक मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. दिनकर पाटील यांच्या ऋणात राहणे मी पसंत करतो. त्यांनी दिलेल्या बहुमोल सूचना, सहकार्यामुळेच व वेळोवेळी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांमुळेच माझ्याकडून हे संशोधनाचे काम पूर्ण होऊ शकले. प्रा.वैजनाथ महाजन, प्रा.गौतमीपुत्र कांबळे, डॉ. व्ही.बी. कोडग, प्राचार्य डॉ.दिपक देशपांडे, प्रा.अरुण आठवले, प्रा. चंदनशिवे, प्रा.कर्णिक, प्रा.दाभाडे, प्रा.ढाले, प्रा.डॉ.अमर पांडे, प्रा. शिरटीकर, प्रा.डॉ. संजय चोपडे,प्रा.डॉ. भरत नाईक, प्रा.डॉ.सौ.नंदा पाटील, प्रा.सौ. भंगरे, प्रा.सौ. देसाई, प्रा.सौ. व्ही.व्ही. कुरडे, प्रा.तंबाके, प्रा.वरेकर, प्रा.खंडागळे, सुरेश कांबळे, प्रा.सुभाष दगडे, प्रा.अशोक भटकर, प्रा.अशोक राजोबा, ज्ञानदेव कांबळे, मा.श्री. सावळाराम साळुंखे, प्रा.आर.जी. मुळीक, श्री. दिलीप जाधव, प्रा.सौ. कमलताई तंबाके, सौ. कल्पना पाटील, प्रा.सौ. माळगे यांनीही वेळोवेळी सर्व प्रकारचे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

वैभव (काका) नायकवडी, प्रा.डॉ. बाबूराव गुरव, ज.वि.अहिर, खंडू सखाराम शेळके, दत्तात्रय शेळके, शिवाजी शंकर पाटील यांनी संशोधनासाठी कागदपत्रे, फोटो जमा करण्यासाठी वेळोवेळी मदत केली. तसेच क्रांतिवीर नागनाथ अण्णा

नायकवडींचे सहकारी व त्यांचे कार्यकर्ते यांनीही मला वेळ दिला, मुलाखती दिल्या. केवळ त्यांच्यामुळेच संशोधनाचे काम लवकर पूर्ण झाले. म्हणून त्यांचेही मी अंत:करणपूर्वक आभार मानतो.

संशोधनाचे काम पूर्ण करत असताना मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे माझे गुरू प्रा.डॉ. विजय पाटील यांचाही मी सदैव ऋणी आहे.

हा शोधप्रबंध पूर्ण करण्याच्या कामी आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन मिळाले ते माझी आई सौ. कमल सावंत, वडील श्री. कलमेश सावंत, भाऊ बबन सावंत, विजय सावंत, माझी पत्नी सौ. सुनिता सावंत, माझी मुलगी कु. रुचिरा व मुलगा ऋषिकेश, तसेच घरातील व घराबाहेरील नातेवाईकांच्या प्रोत्साहनामुळेच मी हे संशोधनाचे काम पूर्ण करू शकलो. या सर्वांचा मी आभारी आहे.

ज्यांच्या कार्यामुळे सांगली जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दिशा मिळाली, चळवळ वेगाने वाढली, ते या जिल्ह्यातील क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांनीही खूप सहकार्य केले, वेळ दिला, चर्चाही केली. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. तसेच तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.विजय कारेकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. माणिक सोनवणे व सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील सर्व प्राध्यापक, पीएच्.डी. विभागातील सौ. वाते मॅडम यांचाही मी आभारी आहे.

तसेच प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम वेळेवर पूर्ण करुन देणारे श्रीकांत कॉम्प्यूटर्स, राजारामपूरी, कोल्हापूर यांचाही मी आभारी आहे.

या शोधप्रबंधाच्या कार्यात ज्यांची मला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत झाली, त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

धन्यवाद !

स्थळ : सांगली

दिनांक: ऑक्टोबर, २०१२ ( श्री. राजू कलमेश सावंत )

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र<br>प्रमाणपत्र<br>ऋणनिर्देश<br>अनुक्रमणिका | I<br>II<br>III - IV<br>V |
| प्रकरण १ | प्रस्तावना | १ – २२ |
| प्रकरण २ | सांगली जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्याची चळवळ | २३ – ६० |
| प्रकरण ३ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान | ६१ –११९ |
| प्रकरण ४ | स्वातंत्र्योत्तर भारतातील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे कार्य | १२०–२३९ |
| प्रकरण ५ | उपसंहार | २४०–२५६ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २५७–२६४ |
| परिशिष्ट | १. नकाशा – सांगली जिल्हा<br>२. सांगली जिल्ह्यातील हुतात्म्यांची यादी<br>३. स्वातंत्र्यपूर्व काळातील क्रांतीवीर नागनाथ अण्णांच्या नांवे इंग्रजांनी काढलेली विविध पत्रके<br>४. छायाचित्रे | |

# प्रकरण १ ले

## प्रस्तावना

**प्रस्तावना :**

ब्रिटिश वासाहतिक काळात भारतीय समाज जीवनात राजकीय जागृती झाली. आधुनिक शिक्षण आणि भारतातील बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत यांच्या प्रबोधनाचा परिणाम राजकीय जागृतीमध्ये झाला. परिणामी ब्रिटिश सत्ता झुगारून देवून देश परकीय गुलामगिरीतून मुक्त केला पाहिजे. या जाणीवेतून भारतीय स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात स्वातंत्र्य कोणत्या मार्गाने मिळवायचे याबद्दल मतभेद ही झाले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले. त्याच्या जोडीला तिसरा गट हा क्रांतिकारकांचा होता. प्रामुख्याने फकीरांच्या बंडापासून ते आदिवासी, भिल्लांच्या उठावापर्यंत आणि १८५७ च्या शिपायांच्या उठावापासून ते १९४७ पर्यंतचा भारतीय इतिहास हा क्रांतिकारकांच्या क्रांतिकारी चळवळीने व्यापलेला आहे. मार्ग वेगवेगळे होते. परंतु मुख्य उद्देश देशाला स्वातंत्र्य करण्याचा होता. या पार्श्वभूमीवर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, उमाजी नाईक, नागनाथ अण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड, नाना पाटील असे अनेक क्रांतिकारक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर क्रांतिकारी कार्यात गुंतलेले होते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सातारा, सांगली हा भाग प्रशासनाच्या सोईसाठी एकत्र होता. साताऱ्याचे नाना पाटील आणि सांगलीमधून नागनाथ अण्णा नायकवडी तसेच जी. डी. बापू लाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वातंत्र्य ज्या क्रांतिकारी चळवणी उभ्या केल्या त्या महत्त्वाच्या होत्या. आजही भारतातीलअनेक क्रांतिकारकांबद्दल लोक अनभिज्ञ आहेत. किंबहुना अनेक क्रांतिकारक इतिहासाच्या नोंदीपासून वंचित राहिलेले आहेत. नागनाथ अण्णा नायकवडी बद्दल बरेच लिहिले गेले. परंतु त्यांच्या बद्दलचे साहित्य सर्वत्र विस्कळीत स्वरूपात आहे. त्याचबरोबर त्यांच्याबद्दल जे वैचारिक लेख उपलब्ध आहेत. त्यामध्ये बऱ्याच गोष्टींची नोंद घेतली गेलेली नाही. त्यामुळे अशा दुर्लक्षित क्रांतिकारकांवर संशोधन होणे गरजेचे होते.

प्रस्तुत शोधप्रबंधामधून नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कार्याच्या नेतृत्वाच्या संदर्भात अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे आणि या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याची चिकित्सा आणि मूल्यमापनाच्या संदर्भात काही निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**संशोधनाची गरज :**

महाराष्ट्रात पुरोगामी विचारांची प्रदीर्घ परंपरा आहे. त्याचबरोबर क्रांतिवीरांची परंपरासुद्धा आहे. असे असले तरी, या परंपरेचे शास्त्रशुद्ध, तपशिलपूर्वक आणि वस्तूनिष्ठ संशोधन अद्याप परिपूर्ण झालेले नाही. या वैचारिक व क्रांतिकारी परंपरेची नोंद घेणे आवश्यक असून महाराष्ट्रातील क्रांतिकारकांच्या अभ्यासातील उणीवा दूर करणाऱ्या विविध प्रयत्नांपैकी हा एक प्रयत्न आहे.

नागनाथ नायकवडी यांच्यावर संपादित केलेला डॉ. भारत पाटणकर यांचा 'एक दृष्टीक्षेपात नागनाथ नायकवडी' हा ग्रंथ वाचनात आला. यामध्ये त्यांची वैचारिक, नेतृत्वगुण, परिपक्वता, प्रामाणिकपणा, मुत्सद्देगिरी यांचा संबंध म. फुले, महर्षी शिंदे, छत्रपती शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या तत्त्वांशी याची असणारी निष्ठा जाणवली. यांच्या वैचारिक भाषणांत समाजशास्त्रीय व राज्यशास्त्रीय आशय जाणवले आणि एक संशोधनाचा विषय म्हणून राज्यशास्त्राचा विद्यार्थी या नात्याने प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याची जाणीव निर्माण झाली. तसेच नागनाथ नायकवडी यांच्या क्रांतिकारक जीवनातील घटनाचे मूल्यांकन करणे आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. नायनाथ अण्णा नायकवडी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये त्यांनी राजकारण आणि सहकार क्षेत्रात समाज उपयोगी कार्य केले. त्यांनी समाजकारणासाठी राजकारण केले. त्याचबरोबर समाजामध्ये निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांना घेऊन लोक आंदोलने केलीत. त्यामुळे नागनाथ अण्णा नायकवडी या नेतृत्वाचा १९४२ ते २०१० पर्यंतच्या कालखंडात ज्या

चळवळी, आंदोलने केली त्या सर्व चळवळींचा अभ्यास, त्यांचे नेतृत्व कशाप्रकारे घडत होते हे पाहणेआवश्यक आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

नागनाथ नायकवडी यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाजासाठी कार्य केले आहे. ते सामाजिक मूल्याची जपणूक करणारे तर आहेच शिवाय त्यांचे तत्त्वज्ञान व ध्येय हा समाजाला प्रेरणा देणारा तसेच मार्गदर्शक आहे. आज अशा प्रकारची जीवनमूल्य वर्तमानकाळातील सामाजिक व्यवहारात उपयुक्त व मार्गदर्शक ठरताना दिसतात.

अशा व्यक्तीमुळे समाज जीवन परिपूर्ण होत असते. अशा सामाजिक मूल्यांचे संवर्धन व संशोधन मार्गदर्शन आणि प्रेरक ठरू शकेल. या अभ्यास विषयाचे ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टीकोनातून अनन्य साधारण महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक इतिहासात नागनाथ नायकवडी उपेक्षित व दुर्लक्षित राहिलेले आहेत. दुर्लक्षित या अर्थाने की त्यांच्या कार्याची सर्वांगीण नोंद किंवा अभ्यास झालेला नाही. त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची एक तत्त्वचिंतक व विचारवंत म्हणून नोंद होणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या वैचारिक नवनिर्माण कार्याच्या नोंदीने हा इतिहास परिपूण होण्यास मदत निश्चित होईल. तसेच नायकवडी यांनी सामाजिक, राजकीय कार्य जीवन मूल्य प्रवाहित ठेवण्याच्या व बहुजन समाज सुधारणेच्या सामाजिक परिवर्तनास भक्कम स्वरूपाचे मार्गदर्शन केलेले आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेस अनुसरून विवेकपूर्ण, चांगल्या संस्कृतीचे पुनर्जिवीन आणि वर्तमान व भविष्यकाळात अशा विचारांची जोपासणी करण्यासाठी आणि राजकीय व सांस्कृतिक जीवनातील आपली वैशिष्ट्ये कायमपणे टिकवून ठेवण्यासाठी हे संशोधन कार्य सहाय्यभूत ठरू शकते. सामाजिक शास्त्रांच्या संशोधनात जास्तीत जास्त वस्तुनिष्ठता तर्कशुद्धता राखण्यासाठी संशोधन हा स्पर्धामुक्त अनाग्रही व सामुहिक स्वरूपाचाच प्रयत्न आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकासाठी, विचारवंतांसाठी

नागनाथ नायकवडी यांच्या विचारांची व कार्याची ओळख होण्याच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

सामाजिक कल्याणासाठी व समाज व्यवस्थेत असणारे दोष दूर करण्यासाठी सामाजिक परिवर्तन घडवून कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी धडपडणारे नागनाथ नायकवडी यांची आंदोलने आणि त्यातून निघालेले मार्ग कोणत्या पद्धतीने होते हे महत्त्वाचे आहे. सामाजिक कार्याच्या दृष्टीने त्यांचे कार्य समाजप्रबोधन व समाज परिवर्तनाची उत्तम कलाकृती आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील क्रांतिकारक परंपरेत त्यांच्या कार्याची नोंद करण्याच्या दृष्टीने हे संशोधन कार्य महत्त्वाचे ठरेल. क्रांतिकारक ते समाजसुधारक असे व्यक्तिमत्त्व असणारे, नागनाथ नायकवडी हे महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता त्यांची ओळख भारतीय समाज जीवनात होण्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे.

**संशोधन समस्या**

‘‘क्रांतिवीर डॉ. नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास’’ (सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात)

**कार्यात्मक व्याख्या :**

**नेतृत्व म्हणजे काय ?**

नेतृत्वाच्या संदर्भात प्रामुख्याने हा शब्द कसा निर्माण झाला हे महत्त्वाचे आहे. संस्कृत धातू नि पासून नेता हा शब्द निर्माण झाला. नेता या शब्दातून नेतृत्व हा शब्द अस्तित्वात आला. (संदर्भ – मराठी विश्वकोष खंड ०८)

**राज्यशास्त्र कोश**

‘‘एखाद्या गटाचे ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नाचे संघटन व दिग्दर्शनकरण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वर्तन म्हणजे नेतृत्व’’.

सेक्लर हडन यांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. ''एखाद्या उद्योगाच्या प्रयोजनाच्या प्राप्ती करता समान प्रयत्नाद्वारा व्यक्तिंना प्रेरित आणि प्रभावित करणे म्हणजे नेतृत्व''.

नेतृत्व उदयास येण्यास त्या व्यक्तिमध्ये नेतृत्व करण्याची क्षमता व गुण असावे लागतात. फक्त व्यक्तिमध्ये हे गुण नुसते असून चालत नाही तर त्या व्यक्तिच्या गुणांची कदर करणारा, आज्ञा मानणारा एकूणच त्या व्यक्तिचे पुढारीपण मान्य करणारे अनुयायी लागतात आणि अनुयायी बरोबर विशिष्ट परिस्थिती निर्माण व्हावी लागते. बरेच नेतृत्व हे परिस्थितीचे अपत्यसुद्धा असतात. अर्थात एखादी परिस्थिती निर्माण व्हावी, किंवा समस्या निर्माण व्हावी आणि ती दूर करण्यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यावा आणि त्या पुढाकार घेणाऱ्याचे नेतृत्व सर्वांनी मान्य करावे. त्यातून नेतृत्वाची निर्मिती व्हावी.

**राज्यशास्त्राशी प्रस्तुत विषयाचा संबंध कसा आहे**

नागनाथ नायकवडी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. प्रस्तुत विषयाचा संबंध निश्चितपणे राज्यशास्त्राशी आहे. कारण आपण ज्यावेळी एखाद्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा अथवा त्या स्वातंत्र्य चळवळीतील एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करतो तेव्हा त्या व्यक्ती अथवा व्यक्ती समूहाच्या राजकीय, सामाजिक अशा सर्व पैलूंचा आढावा घेत असतो. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ ही संपूर्ण समाजाने स्वातंत्र्यासाठी लढवलेली प्रदीर्घ चळवळ होती. चळवळ, आंदोलन, लढा या सर्व गोष्टी राज्यशास्त्राच्या कक्षेत येतात. यामधील दुसरी गोष्ट अशी आहे की, नेतृत्वाची नायकवडी यांचे नेतृत्व जनसामान्यांमध्ये लोकप्रियतेचे वलय असणारे होते. कोणते ही आंदोलन चळवळ करताना संघटन नेतृत्व या राज्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण संकल्पना शिवाय यशस्वी होत नाहीत. प्रस्तुत विषयाच्या अभ्यासामध्ये नायकवडी यांचे नेतृत्व मग ते स्वातंत्र्य चळवळीतील असो, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील असो अथवा विविध सामाजिक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील असो

या सर्व बाबी राज्यशास्त्राच्या कक्षेत येतात म्हणून प्रस्तुत विषय राज्यशास्त्राच्या कक्षेत येणारा आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

प्रस्तुत संशोधनासाठी जी उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत ती पुढीलप्रमाणे :

१. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्वाचा अभ्यास करणे.

२. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या क्रांतिकारी कार्याला जाणून घेणे.

३. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या स्वातंत्र्योत्तर सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

४. स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्राच्या राजकारणातील नागनाथ अण्णांच्या योगदानाचा आढावा घेणे.

५. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे सहकार क्षेत्रातील कार्याची नोंद घेणे.

६. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या एकूण कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या कार्याची चिकित्सा करणे.

**संशोधनाची गृहितके**

१. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत नागनाथ अण्णा नायकवडी यांनी यशस्वी योगदान दिले.

२. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सांगली व सातारा परिसरातील क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व नागनाथ अण्णा यांनी यशस्वीपणे केले.

३. नागनाथ अण्णा नायकवडी यांनी स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये जे नेतृत्व विशेषत: महाराष्ट्रामधून दिले ते महत्त्वाचे होते.

४. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे राजकारण बहुजन समाजाच्या आणि वंचित, शोषित घटकांच्या हिताचे होते.

५. नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सहकार क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

६. स्वातंत्र्योत्तर कालखंडात नागनाथ अण्णा नायकवडी यांनी लोककल्याण आणि सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी जी आंदोलने, लढे दिले ते भारतीय समाज जीवनाला दिशादर्शक आहेत.

**विषयाची सैधांतिक पार्श्वभूमी :**

आपल्या देशात इंग्रज हे व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. देश पारतंत्र्यात गेला. पण सर्वसामान्य जनतेस याची जाणीव होण्यास देखील बराच काळ लोटला गेला. पारतंत्र्यांची जाणीव करून देण्याचे कार्य महाराष्ट्रापुरतेच म्हटले तर १९ व्या शतकात निर्माण झालेल्या विविध समाज प्रबोधनपर पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीने तर केलेच परंतु त्यांच्या सोबत काही क्रांतिवीरांनीसुद्धा केले आहे. म्हणजेच या सर्व चळवळीचे मूलभूत तात्त्विक अधिष्ठान हे मुख्यत: राजनैतिक असल्याचे इतिहासावरून स्पष्ट होते. प्रामुख्याने १९ व्या शतकातील नागनाथ नायकवडी यांचे विचार मुख्यत: स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या वैचारिक स्वरूपाच्या कार्यास सामाजिक तसेच राजनैतिक विचारांचे मूलभूत असे तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर नागनाथ नायकवडी यांनी समाज सुधारक व सुधारणाविषयी चळवळी यांच्या माध्यमातून त्यांची विचारधारा पुढच्या पिढीला पोहोचविणे हे महत्त्वाचे कार्य आहे. त्याचे वेळोवेळीचे शेतकऱ्यांसाठी मोर्चे, धरणग्रस्त, कामगारांच्या चळवळी, मंडल आयोगाचे समर्थन, जातीय निर्मूलन, बहुजन समाज यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते.

नागनाथ नायकवडी यांच्या विचारात कार्याचा महत्त्वपूर्ण आशय आहे. त्यांनी महात्मा फुले, महर्षी शिंदे व क्रांतिसिंह नाना पाटील यांना गुरूस्थानी मानले आहे. त्यांच्या वर्तनात मूलगामी संशोधक वृत्ती आहे. वस्तुनिष्ठता ही त्यांच्या जीवनातील वैशिष्ट्ये आहे. त्यांच्या सर्वांगीण जीवनास समाजशास्त्रीय, राज्यशास्त्रीय व राजनैतिक मूल्यांचे अधिष्ठान लाभलेले

पहावयास मिळते आणि याच हेतूने त्यांच्या समग्र कार्याची व जीवनाची आणि विचारांची चिकित्सा करणे हा संशोधनाचा हेतू आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत प्रबंधातील नागनाथ नायकवडी यांचे कार्य प्रति सरकार काळातील असून सातारा, सांगली जिल्हा व पश्चिम महाराष्ट्र पुरता आहे. नायकवडी यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व आंदोलने वाळवा, सांगली, विटा, मायणी, आटपाडी, जत तालुक्यात व जिल्ह्यात कार्यरत आहेत.

स्वातंत्र्यपूर्ण सामाजिक परिवर्तन ही व्यापक प्रक्रिया अहे. क्रांती व स्वराज्य आंदोलन चळवळ आणि प्रति सरकार या घटकामध्ये याचे विभाजन झालेले आढळून येते. त्यामुळे नागनाथ नायकवडी यांचे कार्य वाळवा व सातारा पैकी सांगली जिल्ह्यात अधिक विकसित झालेले आढळते. त्यामुळे त्यांच्या चळवळीच्या व कार्याच्या पुराव्यांचा अभ्यास करून या प्रबंधाला प्रादेशिकतेची मर्यादा प्राप्त झालेली आहे.

पूर्वीच्या अखंड सातारा जिल्ह्यात सातारा, वाई, कराड, पाटण, कोरेगाव, खटाव, जावळी, वाळवे, श्वानापूर, तासगाव, माण हे अकरा तालुके व शिराळा व खंडाळा आणि महाबळेश्वर हे तीन पेठे किंवा महाल होते. या शिवाय आजचा फलटण तालुका व जत तालुका ही पूर्वी स्वतंत्र संस्थाने म्हणून इतिहासात याची नोंद आहे. आटपाडी ही औध संस्थानाचा तालुका व कवठेमहाकाळ तालुका सांगली संस्थानाचा भाग होता. सांगली संस्थानाची मिरज तासगाव तालुक्याच्या समाविष्ट होतो. कुरुंदवाड संस्थानचे वाटेगाव, वाळवे तालुक्याच्या तर अक्कलकोट संस्थानचे कुर्ले (राजाचे) गाव खटाव तालुक्याचा समाविष्ट होते. शिवाय सांगली, मिरज, बुधगाव, इचलकरंजी आदी संस्थाने व जहागिरीची गावे दक्षिण दिशेला विखरून होती. अशा या दोन्ही प्रदेशचे १ ऑगस्ट १९४९ रोजी पूर्वीचे वाळवा, तासगाव, खानापूर तालुके व शिराळा पेटा भाग व मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ संस्थांनी मुलुखाचे तालुके एकत्र आणून नवा दक्षिण सातारा (सांगली) जिल्हा बनविण्यात

आला. या सर्व ठिकाणी नागनाथ नायकवडी यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात चळवळीचे कार्य झाले आहे.

**संशोधन पद्धत :**

''क्रांतिवीर डॉ. नागनाथ (आण्णा) नायकवडी यांच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास'' (सामाजिक व राजकीय योगदान या संदर्भात) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उपयोजित अभ्यास पद्धती म्हणून ऐतिहासिक पद्धती, वर्णनात्मक पद्धती व सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे. नागनाथ नायकवडी यांचेवर लिखित स्वरूपात ग्रंथ उपलब्ध असून संशोधनासाठी मुख्य स्त्रोत व प्राथमिक साधनसामुग्री आधार म्हणून उपयोगात आणली आहे. त्याचबरोबर ग्रंथालयीन अभ्यास पद्धतीचा उपयोग केला आहे.

नागनाथ नायकवडी यांच्या बरोबरीने स्वातंत्र्य संग्रामात व स्वातंत्र्यानंतर त्यांच्या चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आणि विचारवंत यांच्याशी प्रश्नावलीच्या व मुलाखत तंत्राच्या सहाय्याने पत्राद्वारे माहितीच्या आधारे नायकवडी यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा व कार्याचे विश्लेषण केले आहे.

**संशोधनाची साधने :**

नागनाथ नायकवडी यांच्या कार्यावर अनेक गौरव ग्रंथांची निर्मिती झालेली असून, अलिकडेच महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, पुणे यांनी संपादित केलेल्या ग्रंथरूपाने व्यक्तित्त्व व त्यांचे कर्तृत्त्व प्रसिद्ध झालेले आहे.

प्राथमिक सामुग्री म्हणून प्रश्नावली मुलाखत तंत्र साधने, क्षेत्रीय अभ्यास, छायाचित्रे यांचा उपयोग करून संशोधनास बळकटी देण्याचा प्रयत्न केला आहे. नियतकालिके, सरकारी परिपथके व प्राचार्य पी. बी. पाटील, जयवंत अहिर, डॉ. भरत पाटणकर, भालचंद्र विष्णुपंत धर्माधिकारी, डॉ. बाबुराव गुव, डॉ. जयसिंग पवार, प्राचार्य डॉ. दिनकर पाटील यांच्या मुलाखतीद्वारे कार्यावर व चळवळीवर प्रकाश टाकलेला आहे.

नागनाथ नायकवडी यांचेवर प्रकाशित झालेली मासिके, त्रैमासिके व त्रैमासिकामधून प्रकाशित झालेले कार्याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये राष्ट्रवीर (बेळगाव), संग्राम (कल्याण), पवनेचा प्रवाह (पिंपरी-चिंचवड), दै. कोल्हापूर न्यूज (कोल्हापूर), अमर हुतात्मा (वाळवा, जि. सांगली), क्रांतिवीर गौरव समिती अंक अग्रदूत (नागनाथ नयकवडी ८० व्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख, सांगली), दीनबंधू (पुणे), विजयी मराठा (कोल्हापूर), साधना (पुणे), नवभारत (वाई), समाज प्रबोधन पत्रिका (पुणे), लोकराज्य (मुंबई), पुरुषार्थ (गुजरात पारडी), अस्मितादर्शन (औरंगाबाद) यांचा समावेश होतो.

त्याचबरोबर महाराष्ट्र टाइम्स (मुंबई), दै. लोकसत्ता (मुंबई), दै. केसरी व प्रभात (पुणे), दै. विशाल सह्याद्री (पुणे), दै. तरूण भारत (बेळगाव व सांगली), दै. समाज (कोल्हापूर) यासारख्या दैनिकांमधून त्यांच्यावर विविध रूपात लेख प्रसिद्ध झालेले आहेत. अशा विविध साधनांचा आधार प्रस्तुत संशोधनासाठी केलेला आहे.

**संशोधन संबंधित साहित्याचा आढावा :**

कोणत्याही संशोधनामध्ये त्या संशोधनास संबंधित अशा साहित्याचा आढावा घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. संदर्भ साहित्य व संशोधनाचा अभ्यास संशोधकाला महत्त्वाचा आहे. कोणत्याही विषयातील संशोधन करण्यासाठी त्या विषयाशी निगडित असलेल्या गोष्टींची पूर्वतयारी करावी लागते व संबंधित संशोधनाचे वेगळेपण नमूद करणे हा प्रमुख उद्देश असतो.

प्रस्तुत संशोधनात संबंधित साहित्याचा आढावा घेणेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर व पुणे विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालयाचा आढावा घेतलेला आहे.

**संबंधित साहित्याच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे :**


अ) निवडलेल्या विषयाशी संबंधित अशा पूर्ण झघलेल्या संशोधनाचा परिचय करून घेऊन पूर्वी झालेल्या संशोधनाची पुनरावृत्ती टाळणे.

ब) निवडलेल्या विषयासंबंधी संशोधन पद्धती संशोधन, साधने या बाबत माहिती मिळविणे.

क) संशोधन विषयाशी संबंधित इतर साहित्यांची माहिती करून घेणे.

ड) संशोधन विषयांची उद्दिष्टे व गृहितके यांच्या मांडणीबद्दल निश्चित माहिती करून घेणे.

**संदर्भ साहित्याची मांडणी –**




१. **''क्रांतिवीर नागनाथ (आण्णा) नायकवडी यांचे राजकीय सामाजिक योगदान'' – एक अभ्यास**

संशोधक : दिलीप शामराव जाधव (सन २०००)

एम. फिल. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. नागनाथ (आण्णा) नायकवडी यांच्यावर सामाजिक राजकीय वातावरणाचा परिणाम कसा झाला पाहणे.

२. भारतीय स्वातंत्र्यासाठी हुतात्मा झालेल्या वीरांच्या ध्येयांना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य क्रांतिवीरांनी कसे केले ते पाहणे.

३. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कर्तृत्व पाहणे.

**निष्कर्ष :**

या पार्श्वभूमीवर दिलीप जाधव यांनी पुढील निष्कर्ष काढले होते.

१. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या व्यक्तिमत्त्वावर सामाजिक व राजकीय परिणाम झालेला आढळून येतो. त्यामुळे त्यांनी क्रांतिसारखे शस्त्र इंग्रजा विरोध उचललेले आहे.

२. नागनाथ नायकवडी यांनी स्वातंत्र्यवीरासाठी मोठे कार्य केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात क्रांतिवीर नागनाथ नायकवडी धडाडीचे कार्यकर्ते होते.

२. **''हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना मर्यादित वाळवे यांची वैशिष्ट्य अभ्यास''** शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. (अर्थशास्त्र) या पदवीसाठी सादर केलेला प्रबंध – १९९१,

संशोधक : प्रा. श्रीमती राजमती बापूसाहेब हंजे

मार्गदर्शक : प्रा. ना. शं. आंबर्डेकर, अर्थशास्त्र–विभाग प्रमुख, विलिग्डन कॉलेज, सांगली.

उद्देश : श्रीमती राजमती हंजे यांना पुढील उद्देश ठरविले होते.

१. वाळवे येथील हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने मागील सलग ४–५ वर्षांमध्ये भारतामध्ये साखर उताऱ्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याची प्रगती तपासणे.

२. साखर उतारा वाढीसाठी हा कारखाना काय प्रयत्न करतो ते पाहणे.

३. कारखान्यातील नियोजन कशा पद्धतीने असते याचा अभ्यास करणे.

४. कारखान्यातील कामगार भरती विषयी अभ्यास करणे.

५. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात १५ गावे येतात. या गावांचा औद्योगिक, सामाजिक सर्वांगीण विकास कसा होतो त पाहणे.

**निष्कर्ष :**

त्यानुसार श्रीमती हंजे यांनी पुढील निष्कर्ष काढली आहेत.

१. या कारखान्यामध्ये २२ वर्षांखालील एक ही कामगार नाही. बहुसंख्य कामगार २२ ते ४० वयोगटातील आहेत.

२. कामगार भरती आणि निवड याबाबत हुतात्मा कारखाना दक्ष आहे.

३. कामगार भरती कारखान्याच्या धोरणानुसार गावात गावसभा घेऊन लोकांच्या मतानुसार गावपातळीवर १०० शेअर्सला १ कामगार भरती केली आहे.

४. प्रशिक्षित कामगार भरतीवर जोर आहे.

५. कामगारांना निवास सेवा, अपघात आणि सुरक्षितता उपाय योजना अंमलात आणल्या आहेत.

६. कामगारांना सेवानिवृत्तीचे फायदे दिले जातात.

७. कारखान्यामुळे परिसरातील गावांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

हंजे यांच्या संशोधन आर्थिक दृष्टिकोनातून झालेला आहे.

**३. पुस्तके :**

१. **क्रांतिवीर (चरित्र)** : भालचंद्र विष्णुपंत धर्माधिकारी, गौरव समिती प्रकाशन-वाळवा, जुलै २००७

प्रस्तुत पुस्तक हे अण्णांच्या चरित्राचा पूर्वार्ध आहे. स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंतचे संघर्षात्मक चरित्र यामध्ये आलेले आहे. नागनाथ अण्णा नायकवडी हे नाव जरी प्रथमदर्शनी एक व्यक्तीचे असले तरी ते प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवरून पाहता अण्णा हे महाराष्ट्रातील अनेक परिवर्तनवादी चळवळीच्या आधार स्तंभाचे द्योतक आहेत. नागनाथ अण्णांनी १९४२ च्या लढ्यात सर्वस्वाचा त्याग करून उडी घेतली. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या खांद्याला खांदा लावून जीवावर बेतणारी अनेक कामे केली. ती करतअसताना अविस्तरणीय अशा घटनांचा व

प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. त्या सत्य घटनेवर एक चांगले पुस्तक लिखाण केले आहे. लिखाणातून तरुण पिढील स्फूर्ती मिळेल अशी अपेक्षा आहे.

१. प्रस्तुत पुस्तकात नागनाथ नायकवडी यांचा इतिहास आहे.

२. त्यांच्या तोंडून ऐकलेले प्रसंग लेखकाने रेखाटले आहेत.

३. नागनाथ अण्णांचे गुरु क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावरील प्रसंगांची चर्चा केली आहे.

**४. क्रांतिसागर :**

प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील शांतिनिकेत प्रकाशन, सांगली – २००४

स्वातंत्र्य संग्रामातील भूमिगत प्रतिसरकारच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कादंबरी आहे. यातील बहुतेक पात्रे आणि एकदोन अपवाद वगळता सर्व घटनाक्रम विस्कळीत रेखाटला आहे. यामध्ये नागनाथ नायकवडी, क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड या क्रांतिवीरांच्या कथांचा विस्तारपूर्वक चर्चा केली आहे.

**५. पेटलेला पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य :**

''क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड समाज प्रबोधिनी संस्था कुंडल (जि. सांगली) ९ ऑगस्ट १९८६''

या पुस्तकात १८५७ च्या बंडापासून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंदी सेना व १९४२ च्या लढ्यातील विविध कार्य केलेले तसेच भूमिगत असलेले क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड, नागनाथ नायकवडी, नाथाजी लाड, बा. सी. पाटील, बळवंत बिरनाळे, राजूताई, आप्पा पाटील, किसन पाटील (गोंदी), हुतात्मा किसन अहिर, एस. बी. पाटील, आप्पा पाटील साखराळे, रामचंद्र पवार (कुंडल), भगवानराव मोरे आदींच्या कार्याची सविस्तर इतिहास प्रस्तुत केला आहे.

**६. क्रांतिपर्व :**

''डॉ. उत्तमराव पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मंत्रालय, मुंबई – ३२ मे १९८७''

पत्री सरकारवर असलेले आक्षेप त्यांची कार्यपद्धती १९४३ ते १९४६ या चार वर्षांतील सातारा जिल्ह्यातील कारभार ८ ऑगस्ट १९४२ चे भारत छोडो आंदोलन, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारने दोनशे खेड्यांवर ग्रामसरकारे एकत्र सुसंघटित करून राज्य केले. खालील लढ्याविषयीच्या इतिहास प्रस्तुत पुस्तकामध्ये दिलेला आहे.

**७. दोन दिव्य तारे :**

''विलंबी चामुंडराय, जयवंत अहिर, हुतात्मा किसन अहिर स्मारक समिती वाळवे, जि. सांगली – २५ फेब्रुवारी १९७१''

प्रस्तुत पुस्तकत नागनाथ नायकवडी यांच्या इस्लामपुरातील उठावातील माहिती दिली आहे. सांगावच्या आऊट पोस्टची लूट, आझाद हिंद सेनेचे दोन जवानांची निवड नागनाथ नायकवडी यांनी कशी केली व त्यांनी या १९४२ च्या लढ्यात कसे आणले याविषयी या पुस्तकात माहिती दिली आहे. थोडक्यात नागनाथ नायकवडींच्या इंग्रजांशी झालेला संग्राम चित्रित केला आहे.

**८. उजळती प्रकाश रेखा :**

डॉ. बाबुराव गुरव, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंत वाडिये – १९९९

प्रस्तुत पुस्तकात नागनाथ नायकवडी यांच्या जीवनातील ठराविक प्रसंगांवर भाष्य केले आहे. हे पुस्तक म्हणजे नागनाथ अण्णांच्या १९४२ च्या उठावातील काही प्रसंगाचे वर्णन होय.

**९. क्रांतिसिंह नाना पाटील :**

''प्रा. विलास पाटील, क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ, हणमंत वाणिये, ता. खानापूर, जि. सांगली''

प्रस्तुत पुस्तकात क्रांतिसिंह नाना पाटील यांचे अल्पचरित्र दिले आहे. त्यामध्ये त्यांचे सरकारी नोकरी, सत्यशोधक समाज कार्यातील सहभाग, काँग्रेस कार्याला कसा प्रारंभ केला, काँग्रेसची चले जाव चळवळ व सातारा जिल्ह्यात त्यांनी प्रति सरकारची स्थापना केली.

त्यानंतर काँग्रेस पक्षाचा त्याग करुन शेतकरी कामगार पक्षाची स्थापना कशी केली, कम्युनिस्ट पक्षात ते कसे गेले, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी झाले, श्रमजीवी चळवळीतील त्यांचा सहभाग यामध्ये त्यांचे विश्वास सहकारी म्हणून नागनाथ नायकवडी व जी. डी. बापू लाड या क्रांतिवीरांचा समावेश कसा झाला याचेही वर्णन आहे.

**१०. क्रांतिवीर इंदूताई पाटणकर :**

''डॉ. बाबूराव गुरव, निर्मिती विचारमंच नेर्ली–तामगाव रोड, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर''

१९४२ च्या लढ्यामध्ये विशेषत: साताऱ्याकडील प्रति सरकार यांनी सहभाग घेतला यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रति सरकारमधील कॅप्टन म्हणून इंदूबाई पाटणकर, नागनाथ नायकवडी खांद्याला खांदा लावून लढले. त्यांच्या जीवनातील हे समग्र चरित्र आहे.

**११. असे घडले क्रांतिवीर : (नाथाजी लाड) ले. प्राचार्य डी. बी. पाटील**

प्रयत्न प्रकाशन, सांगली – २००६

१९४२ च्या क्रांतिलढ्याच्या काळात पणुंब्रे, ता. शिराळा भूमिगत होते. यामध्ये चळवळीचे हे डिक्टेटर यांचे चरित्र आहे.

**१२. असे घडले क्रांतिवीर : प्राचार्य डी. बी. पाटील**

१. धोंडीराम (बापू) माळी

२. जयराम कुष्टे

३. वसंतदादा पाटील

४. बर्डे गुरुजी

५. राजमती बिरनाळे

१९४२ च्या क्रांतिमधील क्रांतिवीरांचे चरित्र आहे. यामध्ये नागनाथ नायकवडी हे या सर्वांचे नेते होते. त्यांचा उल्लेख सदर पुस्तकात आहे.

**१३. क्रांति अग्रणी :**

पर्व दिवाळी अंक

संस्थापक : जी. डी. बापू लाड, अंक २२ ऑक्टोबर,

क्रांतिकारक यांच्यावरील टीका टिप्पणी करणारा दिवाळी अंक

**१४. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवे**

२८ वा वार्षिक अहवाल

नागनाथ नायकवडी यांच्या सहकारी कारखान्याचे आर्थिक वेळापत्रक माहिती

**१५. हुतात्मा बझार :**

१४ वा वार्षिक अहवाल सन १९१०-११ मधील

यामध्ये सहकारी तत्त्वावरील बझारचा वृत्तांत आहे. सहकारामुळे समृद्ध झालेले शेतकरी व लोकांचे नागनाथ नायकवडी यांचेबद्दल गौरव उद्गार आहेत.

**प्रस्तुत प्रबंध यापेक्षा कसा वेगळा आहे :**

प्रस्तुत प्रबंध पीएच.डी. साठी प्रस्तुत केलेला असून वरील सर्व समग्र साहित्य पेक्षा वेगळा आहे. प्रस्तुत प्रबंधामध्ये नागनाथ नायकवडी यांचे स्वातंत्र्यपूर्ण व स्वातंत्र्यानंतरचे कार्य कसे होते, त्यांनी सहकारी तत्त्वावर उभारलेले कारखाने, बँका, दूध संस्था, शैक्षणिक संस्था, बझार हा कसा आदर्शवादी आहे याचा अभ्यास निरीक्षण पूर्व केले आहे. त्यांची राजकीय कारकीर्द कशी होती याचा अभ्यास करून निष्कर्ष काढले आहेत. तसेच नागनाथ नायकवडी यांनी आपल्या राजकीय जीवनात कोणत्याही पक्षाकडे न जाता सामान्य लोकांसाठी केलेले सत्याग्रह आंदोलन हे कसे इतर राजकीय नेत्यांपेक्षा वेगळे होते हे प्रस्तुत प्रबंधात अभ्यासलेले आहे.

त्यामुळे सदरच्या प्रबंधाचा विषय इतर साहित्यापेक्षा वेगळा आहे.

**प्रकरण योजना :**

प्रस्तुत शोधप्रबंध पुढील पाच प्रकरणांमध्ये विभागलेला आहे.

प्रकरण १ ले : प्रस्तावना

प्रकरण २ रे : सांगली जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्याची चळवळ

प्रकरण ३ रे : भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान

प्रकरण ४ थे : स्वातंत्र्योत्तर काळातील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे कार्य

अ) राजकीय कार्य, ब) सामाजिक कार्य,

क) सहकारी क्षेत्रातील कार्य, ड) वैचारिक भूमिका

प्रकरण ५ वे : उपसंहार

वरील नियोजित प्रकरणाच्या आधारे शोधप्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे. याआधारे प्रकरण निहाय सागांश पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**प्रकरण १ ले : प्रस्तावना :**

प्रकरण एक मध्ये प्रामुख्याने शोधप्रबंधाचा एकूण सारांश घेतलेला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रकरणामध्ये ज्या घटकांवर प्रकाश टाकलेला आहे. या सर्व बाबींवर थोडक्यात सारांश मांडलेला आहे. त्याचबरोबर प्रस्तुत शोधप्रबंधासाठी ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे त्याचा परामर्श घेतला गेलेला आहे. प्रामुख्याने त्यामध्ये विषयाचे महत्त्व काय आहे, संशोधनाची गरज काय आहे? या पार्श्वभूमीवर भेडसावणाऱ्या समस्यांचे विवेचनही प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेले आहे, कार्यात्मक व्याख्या सुद्धा दिलेली आहे. तसेच संबंधित साहित्याचा आढवा घेतलेला आहे. कोणतेही संशोधन करण्यासाठी काही निश्चित उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवावी लागतात. त्याशिवाय संशोधन करणे अशक्य आहे. उद्दिष्टांबरोबरच काही गृहितके ही बांधावी लागतात. अर्थात या गृहितकांचे संशोधनाअंती परीक्षण केले जाते. या सर्व घटकांबरोबरच विषयाला काही काल मर्यादाही घालावी लागते.

कालमर्यादा ठरविल्याने त्या विषयाचा आवाका किंबहुना व्याप्ती, मर्यादा निश्चित करता येते. तसेच संशोधन विषयाची सैद्धान्तिक पार्श्वभूमी सांगितली आहे. या पार्श्वभूमीवर प्रकरण क्रमांक एक प्रस्तावना या परिप्रेक्षात विषय प्रवेशाच्या संदर्भात वरील सर्व घटकांचा परामर्श घेतला गेलेला आहे. तसेच प्रस्तुत शोध प्रबंधाचे कार्य इतर संशोधनापेक्षा कसे वेगळे आहे याचाही उल्लेख करण्यात आलेला आहे.

**प्रकरण २ रे : सांगल जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्याची चळवळ**

सांगली जिल्हा भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील क्रांतिकारी चळवळ करणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणामधून सांगली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, ऐतिहासिक महत्त्व विषद केलेले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणातून नागनाथ अण्णा नायकवडी यांच्यापूर्वी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याबद्दल सांगली आणि साताऱ्यातील चळवळीची काय स्थिती होती याचाही आढावा घेतला गेला आहे. पारतंत्र्याच्या काळात सांगली आणि सातारा हे प्रदेश एकत्र होते. तसेच सांगली जिल्ह्याचे विवेचन करीत असताना साताऱ्यातील क्रांतिकारी चळवळीचीही नोंद घेण्यात आलेली आहे.

१८५७ च्या उठावाच्या कालखंडात सांगली, सातारा परिसरातील स्वातंत्र्य लढ्याचे केंद्र वाळवा होते. प्रामुख्याने १८५३ साली रंगो बापूजी गुप्तेंचे कार्य महत्त्वाचे होते. १८५७ च्या उठावात त्यांचा सहभाग होता. त्यांनी केलेल्या कार्याची नोंद ही प्रस्तुत प्रकरणात केली आहे. याबरोबर नाना रामोशी, सखाराम शेट्ये, नारायण पावसकर, केशव चित्रे अशा अनेक क्रांतिकारकांबद्दल विवेचन केलेले आहे. १९२० च्या गांधींनी जी स्वराज्याची चळवळ उभी केली त्यामध्ये सांगली मधील ज्यांनी सहभाग दिला, त्याची नोंद घेतली गेलेली आहे. १९३० चा मिठाचा सत्याग्रह, १९४२ ची चलेजाव चळवळ, साताऱ्यातील प्रति सरकार, सांगलीमधील औंध संस्थानातील स्वातंत्र्यपूर्व कालखंडात औंध संस्थानामधून बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी लोकशाहीचा अभिनव प्रयोग केला तो महत्त्वाचा होता. बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी क्रांतिकारकांना सहाय्य केले होते. त्याचबरोबर प्रति सरकारच्या कार्याची नोंद

घेण्यात आलेली आहे. अर्थात प्रस्तुत प्रकरणात सांगली व सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्याच्या चळवळीचा आढावा घेतला गेलेला आहे. यामधून नागनाथ अण्णासारखे क्रांतिकारी नेतृत्व उदयास येत होते.

**प्रकरण ३ रे : भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान:**

प्रस्तुत प्रकरणात नागनाथ अण्ण नायकवडी यांच्या भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्यांच्याबरोबर इतर क्रांतिकारक ही होते. त्यांचीही नोंद घेण्यात आलेली आहे. प्रामुख्याने या प्रकरणात १९४२च्या चळवळीमध्ये त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी जे योगदान दिले यांची नोंद घेतली गेलेली आहे. नागनाथ आण्णा यांनी ब्रिटिशांची महसूल घेऊन जाणारी पे ट्रेन लुटण्याचे काम १९४३ साली केले. ज्याचा उपयोग स्वातंत्र्य चळवळीत करण्यात आला. या घटनेची वस्तुनिष्ठ मांडणी करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर कुंडल बँकेची केलेली लूट, धुळे खजिना लुटीचे कार्य, याच काळात अण्णांना अटकही झाली. साताऱ्यामध्ये जेल फोडून नागनाथ अण्णांनी पलायन केले. त्यानंतर अण्णांनी गोव्यातून शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी यशस्वी कार्य केले. ज्या शस्त्रांचा उपयोग क्रांतिकारी कार्यासाठी करण्यात आला. नागनाथ आण्णा यांनी इंग्रज अधिकारी गिल्बर्ट याला चुकवून शिताफीने ते पळून जाण्यात यशस्वी ठरले. क्रांतिकारकांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी दिल्लीहून आझाद हिंद सेनेचे मार्गदर्शक, प्रशिक्षक आणण्याचे कार्य केले. फौजी शिक्षण क्रांतिकारकांना देण्याची सोय केली. १९४६ साली मणदूरच्या परिसरातील ब्रिटिशांनी वेढा दिला. याप्रसंगी अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रखर लढा दिला. त्यानंतर शेणोलीची लूट करण्यात आली. नंतरच्या काळात अण्णा यांना ब्रिटिशांनी अटक केली. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी त्यांनी पैसे जमविले अशा विविध घटकांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणांची वस्तुनिष्ठ मांडणी करून स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नागनाथ अण्णा नायकवडी यांनी ज्या क्रांतिकारी कारवाया करून स्वातंत्र्याचा लढा केला याची वस्तुनिष्ठ नोंद घेतली गेलेली आहे.

## प्रकरण ४ थे : स्वातंत्र्योत्तर भारतातील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे कार्य

अ) राजकीय कार्य, ब) सामाजिक कार्य,

क) सहकारातील कार्य, ड) वैचारिक भूमिका

क्रांतिकारक आणि लाखो भारतीयांच्या लढ्याने १९४७ साली देश स्वतंत्र झाला. परंतु देश स्वतंत्र झाला तरीही नागनाथ अण्णा यांनी देशकार्याच्या प्रक्रियेला बंद केले नाही. प्रामुख्याने त्यांनी स्वातंत्र्यानंतर विविध आंदोलने केली. लोकांचे अनेक प्रश्न हाती घेऊन लढे उभे केले. त्यांनी भूकंपग्रस्त लोकांना मदत केली. त्यांचे पुनर्वसन केले. शेतकऱ्यांसाठी व त्याच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा म्हणून आंदोलने उभी केली. पाणीपुरवठा,सौर ऊर्जेवर वीज, पाण्याचे समान वाटप, टेंबू पाणी योजना विजेचे दर कमी करणे असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या हितासाठी हाती घेतले. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी रिपब्लिकन पक्षालाही सहाय्य केले. विविध साहित्य संमेलनात भाग घेतला. अस्पृश्यता निवारण, महारवतन, गुलामगिरी संपविण्यासाठी त्यांनी काम केले. त्यांनी बहुजन समाजातील लोक शिकावे आणि त्यांनी देशाची सर्वांगीन प्रगती व्हावी यासाठी शैक्षणिक संस्था, कॉलेज काढले. त्यांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालय काढले. कृषी व तांत्रिक विद्यालय, जिजामाता विद्यालय, हुतात्मा नानकसिंग वस्तीगृह, हुतात्मा किसन अहिर उच्च माध्यमिक विद्यालय, सोनवडे तांत्रिक शिक्षण विभाग काढले, त्यांनी क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय स्थापन केले.

ते राजकारणात ही सक्रिय राहिले. ते विधानसभा निवडणूक लढविले ज्यामध्ये ते निवडून आले. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात त्याकाळी सक्रिय सहभाग दिला. त्यामुळे त्यांचे राजकीय कार्यही महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणातून त्यांच्या राजकीय कार्यबरोबर सहकार क्षेत्रातील कार्याचीही नोंद घेण्यात आलेली आहे. प्रामुख्याने त्यांनी हुतात्मा सहकारी बँक काढली. बँकेच्या माध्यमाने अनेक योजना आखल्या. हुतात्मा दूध उत्पादन संघ त्यांनी काढला. त्या माध्यमातून, पशुखाद्य योजना, हुतात्मा पशुसंवर्धन योजना, हुतात्मा म्हैस व गाय

खरेदी योजना, हुतात्मा शुद्ध दूध उत्पादन मोहिम आखली तसेच प्रस्तुत प्रकरणातून नागनाथअण्णा नायकवडी यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचीही नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांच्या विचारात भारतीय राष्ट्रवाद, स्वराज्यवाद, रामराज्य, समाजवाद, लोकशाही धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता न्याय इ. घटक प्रामुख्याने दिसतात. या वैचारिक बांधिलकीतून त्यांनी राजकीय, सामाजिक आणि सहकाराचे योगदान स्वातंत्र्योत्तर काळात दिलेले आहे. ते महत्त्वाचे होते. या सर्व घटकांची नोंद व परामर्श प्रस्तुत प्रकरणातून घेतलेला आहे.

**प्रकरण ५ वे : उपसहांर**

प्रस्तुत प्रकरणात नागनाथअण्णांच्या एकूण नेतृत्वाबद्दल त्यांच्या कार्याबद्दल निष्कर्षाची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच पुढील संशोधनासाठी विषय इत्यादींचा समावेश केलेला आहे. तसेच संदर्भ ग्रंथाची यादी दिलेली आहे.

**परिशिष्ट:**

यामध्ये प्रामुख्याने विविध पकड वॉरंट, छायाचित्रे व कागदपत्रे जोडलेली आहेत.

## प्रकरण दुसरे

## सांगली जिल्ह्यातील भारतीय स्वातंत्र्याची चळवळ

सातारा, सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्याची चळवळ अभ्यासण्यापूर्वी ज्या चळवळीच्या प्रभावातून नागनाथ आण्णा सारखे राजकीय सामाजिक नेतृत्त्व उदयास आले. या पार्श्वभूमीवर नेतृत्त्व आणि क्रांतीकारक या दोन संकल्पनाची सैद्धांतिक मांडणी करणे गरजेचे आहे.

### २. नेतृत्व म्हणजे काय ?

नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्त्वही आपल्याला स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्व म्हणजे काय? या प्रश्नाचे सोपे सूटसुटीत व सर्व समावेशक उत्तर थोडक्यात देणे मात्र खूपच कठीण जाते. चांगल्या नेत्याच्या अंगी इथॉस, पॅथॉस आणि लॉगॉस असे गुण असणे आवश्यक असते असे ॲरिस्टॉटल म्हणला होता. त्या संज्ञाचे मराठी पर्याय पुढीलप्रमाणे देता येतील. सामाजिक भावनिष्ठा इथॉस, कारुण्य- पॅथॉस आणि शब्दशक्ती लॉगॉस. सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता यातून त्याला मिळते. कारुण्याच्या आधारे नेता लोकांच्या भावनांना हात घालू शकतो व त्यांना प्रेरणा देऊ शकतो. लॉगॉसचा अर्थ जगाच्या उत्पत्तीपूर्वी व उत्पतीनंतर जगाविषयी ईश्वराच्या मनात असलेला विचार व्यक्त करणारा शब्द असा होतो. नेत्याच्या संदर्भात शब्दशक्ती (लॉगॉस) म्हणजे स्वत:ला कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण समर्थन करण्याची आणि त्याआधारे लोकांना बौध्दिक पातळीवर प्रेरित करण्याची नेत्याची क्षमता असा अर्थ घेता येतो. नेतृत्व व्यक्तिगत असते. व्यक्ती-व्यक्तीमधील जवळीक हा तिचा आधार असतो. त्यांच्या आपआपसातील क्रिया-प्रतिक्रिया परस्परांविषयीच्या भावना व अभिवृत्ती नेतृत्वाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. नेतृत्व क्रियाशीलतेतून व्यक्त होते. याचा अर्थ असा की नेतृत्व ही गतिशील संकल्पना आहे. अशा

पध्दतीचे नेतृत्व उदयाला येते. आपल्या देशाने लोकशाहीचा पुरस्कार केला असल्यामुळे अनेक प्रकारचे नेतृत्व उदयाला आले आहे.

नेतृत्वाच्या संदर्भात मानसशास्त्रीय व्याख्येतून असे दिसून येते की, सामान्य, अनुवंशिक हक्क रुढी व साहित्य, कला क्षेत्रातील यश याआधारे नेतृत्वामध्ये स्थान मिळवणाऱ्या लोकांना वगळ्यात येते. अर्थात त्याकाळी ''मॅकिव्हली, कार्लाअल यासारख्या विद्वानांनी एकोणिसाव्या शतकात लिहिलेल्या नेतृत्वावरील प्रबंधात नेतृत्वाच्या कल्पित क्षमतेवर व गुण विशेषांवर भर दिलेला आढळतो.''[१] पारंपारिक दृष्टिकोनाचा प्रभाव सैनिकी क्षेत्रात अजूनही टिकून असल्याचे दिसते. तथापि आधुनिक मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यास नेतृत्त्वातील व्यक्तिच्या व परिस्थितीच्या परस्पर संबंधावर भर देण्यात येतो. नेतृत्वाच्या अभ्यासात पुढील गोष्टीचा विचार सामान्यपणे करण्यात येतो. नेता त्याची योग्यता, व्यक्तिमत्व व अधिकार, अनुयायी किंवा त्याची योग्यता, अधिकार ज्या संदर्भात नेता व कार्यकर्ते संबंध निर्माण होतात. यामध्ये गटाची उद्दिष्टे व सामुहिक उद्दिष्टे यापेक्षा नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असते. नेतृत्वाला आपल्या गटात (समूहात) एकजूट राखणे, सुस्थिर ठेवणे, समुहाच्या प्रयोजनास पोषक अशी कार्य विभागणी करणे, सर्वांच्यामध्ये सुसंवाद साधून सर्वांचे समाधान करणे ही जबाबदारी नेतृत्वावर असते. कधी कधी समूहावर बिकट प्रसंग आला त्यावर उपाय योजना करणे, समुहातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन, त्यांची एकजूट शक्ती कार्यान्वित करणे व अनेक लोकांच्या आकांक्षाच्या मूलभूत प्रयोजनांशी मेळ घालून समुहाच्या रचनाबंधामध्ये समायोजनात्मक परिवर्तन घडविण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते असे दिसून येते. हीच गोष्ट व्यापक समाजाला ही लागू आहे. लोकप्रतिनिधीनी किंवा नेतृत्व करणाऱ्याने काय करावे या संदर्भात असे विचार सांगतात कि, ''रुढी व परंपरा यामुळे काही समाजाची रचना सुबध्द व सुस्थिर असते. अशा समाजामध्ये व्यवसाय, धार्मिक श्रध्दा व समजूती तसेच आचार, नैतिकमूल्ये, भाषा इत्यादीबाबत पोट समाज असतात. त्यांचे संबंध

सलोख्याचे, परस्परांना हितकारक व एकंदर समाजाच्या एकात्मतेस पोषक राहतील हे पाहण्याचे कार्य समाजात मान्यता पावलेला वर्ग किंवा त्या वर्गाचे प्रतिनिधी करीत असतात.''[२] अर्थात ज्यावेळी परिस्थितीजन्य कारणामुळे समाजवर्गामध्ये किंवा वर्गाच्या बदलत्या आकांक्षा, परकिय आक्रमण वा वर्तन यामुळे समाजाची पूर्वावार रचना असमाधानकारक ठरू पाहते त्यावेळी बदलत्या परिस्थितीत अनुरुप असे परिवर्तन घडवून समाज एकसंघ राखण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते. असा नेता समाजास उद्दिष्टापर्यंत व उत्कर्षापर्यंत घेवून जाणारा असावा असे जाणकार तज्ञांना वाटते परंतु वर्तमान काळामध्ये नेतृत्व या संकल्पनेला वेगळे अर्थ प्राप्त होताना दिसतात. ''आजचे राजकीय पुढारी विशिष्ट स्तरातून निर्माण होत नसतात कारण राज्याची शक्ती, राज्याचे संविधान आणि विधिनियम यानुसार संघटित होते. कोणत्याही व्यक्तिला आपल्या इच्छेनुसार सत्ता गाजविता येत नाही. तसेच कोणतेही राजकीय पद व्यक्तीला जन्मानुसार प्राप्त होत नाही. आपले व्यक्तित्व आणि गुण, कर्तृत्व या आधारावरच निवडणूक जिंकून राजकीय पद प्राप्त करणे हीच नेतृत्वाची कल्पना आज मान्य झाली आहे.''[३] याचाच अर्थ नेता व नेतृत्व हे जन्मजात निर्माण होत नसते. ते त्याकाळातील परिस्थिती व काळानुसार तयार होत असते.

यातून नेतृत्वासाठी स्पर्धा सुरु झाल्या. यातून आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी राजकीय पक्ष, तत्त्व, ध्येय धोरणे इ. गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले. ''स्थानिक राजकारणात सत्ताकेंद्र महत्त्वाची होती कारण त्या केद्रांच्या सहाय्याने प्रत्येक नेता आपला राजकीय प्रभाव जास्तीत जास्त वाढवत होता. राज्यस्तरीय नेतृत्व अशा प्रकारच्या गटबाजीस प्रोत्साहन देत होते. कारण या गटाच्या सहाय्याने राजकारणाच्या सर्व क्षेत्रात प्रवेश करावयास वाव, गटबाजीमुळे राज्यस्तरावरील नेतृत्वास वाव मिळतो''[४] असा उद्देश ठेवून आज कालची मंडळी राजकारणात येताना दिसतात. महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकारणाचा विचार करता विशेषत: महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून अशा प्रकारचे नेतृत्व पुढे येताना दिसून येते.

१)  सहकारी राज्य संस्थामधून पुढे आलेले नेतृत्व

२)  पंचायत राज्य संस्थामधून पुढे आलेले नेतृत्व

३)  प्रत्यक्ष राज्याच्या राजकारणातून पुढे आलेले नेतृत्व

४)  देश स्वातंत्र्यासाठी जिवावर प्राण घेवून पुढे आलेले नेतृत्व

भारतातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा महाराष्ट्राचे भौगोलिक व राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून वेगळे अस्तित्व आहे. भौगोलिक वैशिष्ट्यांच्या आधारे या प्रदेशाने आपले स्वातंत्र्य प्रदीर्घ काळ टिकवण्याचा प्रयत्न केल्याचा इतिहास आहे. आज महाराष्ट्र हे अखंड भारतातील एक महत्त्वपूर्ण घटकराज्य आहे. विशेषत: आर्थिक स्वायत्तता, शैक्षणिक गुणवता, तंत्रज्ञान, क्रांतिकारक, राहणीमान, वैचारिक मंथन अशा अनेक बाबतीत इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र अग्रेसर आहे. हरितक्रांतीचा स्वीकार आणि सहकारी संस्थांचा विकास यामुळे  महाराष्ट्रास हे वैभव प्राप्त झालेले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतही इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने अधिक महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याचे दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन काळात भारतीय जनतेत ब्रिटीश सत्तेविषयी असंतोष निर्माण करणे, पारतंत्र्याविषयीची जाणीव निर्माण करणे, स्वातंत्र्याविषयीची ओढ उत्पन्न करणे, भारतीय जनतेत देशप्रेम व देशाभिमान निर्माण करणे, परकीय सत्ता उलथून टाकण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे अशा अनेक हेतूने वैचारिक जागृती करण्याचे कार्य महाराष्ट्राने केली. त्यातूनच येथे स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून आणि सामाजिक जागृतीतून परिवर्तन घडविण्याच्या उद्देश्याने ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज अशा विविध समाज प्रबोधनपर चळवळी उदयास आल्या. त्या चळवळीच्या आश्रयाने अनेक सामाजिक आणि राजकीय विचारवंत महाराष्ट्रास पर्यायाने देशास लाभले. यामध्ये महात्मा फुले, न्यायमूर्ती महादेव रानडे, आगरकर, पंडिता रमाबाई डोंगरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव

पाटील इ.चे विचार व कार्य भविष्यकाळात ही आशादायक ठरेल असेच आहे. त्यांच्या वैचारिक जनजागृतीच्या आणि समाज प्रबोधन कार्याची परिनिती म्हणूनच १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय सुधारक व विचारवंत यांनी दिलेल्या योगदानातून त्यांनी मांडलेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक कार्याची जोपासना करण्याची परंपरा सातत्याने महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक क्षेत्रात व विचावंत त्यांच्या अनुयायीनी कार्यकर्त्यांनी, तत्त्वचिंतकांनी चालविली आहे. विदर्भ मराठावाड्यामध्ये काका दळवी, प्राचार्य बोराडे, दिनकराव जवळकर, बाबुराव यादव, पंढरीनाथ पाटील, तात्यासाहेब केळकर, माधवराव आपटे, दि.गो. वैद्य, केशवचंद्र सेन, धनंजय कीर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, केशवराव जेधे, कोल्हापूरातून भास्कराव जाधव, भाई माधवराव बागल, नागनाथ अण्णा नायकवडी या सारख्या तत्त्वचिंतकांनी वैचारिक बैठक दिलेली आहे.

विशेषत: नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या सारखी जी माणसे नि:स्वार्थी वृत्तीने, सातत्याने संपूर्ण समाजाची वैचारिक जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले. हा बहुजनांच्या दृष्टीने एक अनमोल ठेवा आहे. अशा माणसांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कार्याचे ओळख करून देणे महत्त्वाचे आहे. नागनाथ अण्णा नायकवडीनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सर्वस्वाचा त्याग करून भाग घेतला. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून जिवावर बेतणारी अनेक कामे केली. क्रांतिकारी कामे करताना जिवघेण्या अशा घटनांना व प्रसंगाना तोंड द्यावे लागले म्हणून क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आणि त्यांच्या बहुसंख्य सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या या विराट लोकलढ्यातून एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र निर्माण झाले. पण अजूनही आर्धी लढाई आपुरी आहे. आपल्या राजघटनेच्या सरनाम्यातील संपूर्ण स्वातंत्र्य लोकांचे सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, समाजवादी लोकशाही समाजरचना व संघराज्यीय एकात्मता ही मूल्ये आपणास स्थापित करावयाची

आहेत ही ध्येये बाळगणाऱ्या क्रांतिवीरांचा परिचय व अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कांही घटनांचा संदर्भ आणि घटना भारतीय समाजाच्या तनामनात आज सुद्धा तशाच आहेत. क्रांतिकारक चळवळीने इंग्रजांना 'हैराण' करुन सोडले होते. अशा अनेक क्रांतिकारकांची ओळख समाजापर्यंत आजही झालेली नाही. सांगली, सातारा जिल्ह्यातील, क्रांतिवीरांनी जी क्रांतीची ज्योत पेटवली ती आज सुद्धा सर्वांच्या स्मरणात तेवत आहे. सांगली व त्यांच्या जोडीला साताऱ्यातील भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा अभ्यास करण्यापूर्वी सांगली जिल्ह्याचा पर्यायाने सातारा जिल्ह्याचा इतिहास पाहणे क्रमप्राप्त ठरते. कारण स्वातंत्र्यापूर्वी हे दोन्ही प्रदेश एकत्र होते.

**सांगली जिल्ह्याचा पूर्व इतिहास :**

सांगली जिल्हा हा महाराष्ट्र-कर्नाटकचा सीमावर्ती जिल्हा आहे. कर्नाटकचा बेळगांव जिल्हा हा सांगली जिल्ह्यास लागून आहे. सांगली जिल्ह्यातील विलीन झालेला पूर्वीच्या संस्थानचा काही मुलूख कर्नाटकमध्ये गेला आहे. ही मूळ गावे सांगली जिल्ह्यामध्ये असल्याने त्याचे वळण अद्यापि सांगली जिल्ह्याचे आहे. महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटक राज्यातील नेत्यांचा प्रभाव दोन्ही प्रदेशात दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे दोन्ही राज्याच्या गावांमध्ये स्वातंत्र्यपूर्व चळवळीचा परिणाम झालेला दिसून येतो.

**सांगली जिल्ह्याची भौगोलिक रचना :**

दक्षिण संस्थानी राजवटीतील मुलूख व सध्याच्या सांगली जिल्ह्याची भौगोलिक रचना इतिहासाच्या प्रारंभी समजून घेणे इष्ट ठरेल, तर नवीन पिढीतील जाणकारांना स्वातंत्र्य चळवळीतील सुसुत्रता समजून घेता येईल. अन्यथा हे कठिण आहे. कारण सध्याच्या जिल्ह्याची रचना ही आपल्या सोयीनुसार आणि भौगोलिकता लक्षात घेवून तयार करण्यात आलेली आहे. पण पूर्वीच्या संस्थानी राजवटीमध्ये परंपरागत सत्तेनुसार व वहिवाटीप्रमाणे राजेबंधुंच्या वाटणीप्रमाणे इस्टेट वेगवेगळ्या जागी विखुरलेल्या होत्या. ''उदा. तासगाव

तालुक्यातील मणेराजुरी हे इचलकरंजी जहागिरीतील होते, बेळगावच्या पलीकडचे शहापूर हे सांगली संस्थानामध्ये होते.''[५] सध्या हे शहापूर बेळगावचेच उपनगर वाटते. अशा रितीने सांगली जिल्ह्याची भौगोलिक व्याप्ती पहावयास मिळते.

**इंग्रजांविरूद्ध सशस्त्र चळवळीत सांगली-साताऱ्याचा सहभाग :**

ब्रिटीशांच्या काळात साताऱ्याचा कारभार पुण्यात चालत होता. नंतर ''पेशवाई १८०२ मध्ये डबघाईस आली. तेव्हा त्यांनी इंग्रजांबरोबर तह केला.''[६] साताराच्या राजाला इंग्रजांनी १८१८ मध्ये बाहुले केल्याबद्दल अनेकांनी संताप व्यक्त केला. ''सन १८२१ मध्ये गोपाळ हरी पटवर्धन, आण्णाजी शेंडे, विठूजी कुंडलकर व संतू घाटगे यांनी इंग्रजांविरोधी उठाव केला.''[७] परंतु या सर्वांनी ब्रिटिश विरोधी उठाव केल्याबद्दल ३० ऑक्टोबर, १८२१ रोजी पुणे येथे कर्नल रॉर्बसने त्यांना अटक केली. त्यानंतर इंग्रजांच्या विरोधी उठाव आपल्याला कराड तालुक्यात सुरु झालेला आढळून येतो. ''१८४० च्या एप्रिल महिन्यात कोळे या गावाचे धारवराव पवारांनी कऱ्हाड ते प्रचीतगड या भागातील मे १८४० अखेर इंग्रजी राजवट नष्ट केली.''[८] परंतु धारवराव पवारांच्या १३० साथीदारांना सातारा तुरुंगात डांबून ठेवले. अखेरपर्यंत पवार सापडले नाहीत. १८४८ साली याच भागातील सुभाना निकम व राघो जनार्दन सामानगडचा आश्रय घेवून इंग्रजी टपाल व्यवस्था नष्ट करण्यात यशस्वी झाले. १८४५ साली याची चौकशी करीता आलेला इंग्रजी लष्करी अधिकारी ओव्हन्स सैन्यासोबत आलेला असताना त्याला कासेगाव येथे उठाववाल्यांनी पकडून पन्हाळा किल्ल्यावर बंदोबस्तात ठेवले. पुढे इस्ट इंडिया कंपनीने उठाव करणाऱ्या क्रांतिवीरांना पकडून ठार मारले व ओव्हन्स या लष्करी अधिकाऱ्यास सोडविले. पुढे इंग्रजांनी उठाववाल्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी ''१५ एप्रिल १८४५ ला इस्लामपुर येथे १०० घोडेस्वारांचा लष्करी तळ बसविला.''[९] इस्लामपूरच्या उठावामध्ये विठ्ठल शिरगांवकर हा प्रमुख होता. अर्थात वाळवा, इस्लामपूर, कराड, सातारा, सांगली, शिराळा व पन्हाळा, कोल्हापूर या प्रदेशात इंग्रजांविरोधी सशस्त्र छोटे-मोठे लढे

झालेले आपणास आढळून येतात. पुढे १८५७ च्या उठावाचे पडसाद सांगलीमध्ये सुद्धा उमटले.

**सातारा जिल्ह्याचा पूर्व इतिहास :**

राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने ''१ ऑगस्ट १९४९ रोजी साताऱ्याच्या भूप्रदेशातून सांगली वेगळा केला गेला आहे.''[१०] छ. शिवरायांनी सातारा हे राजधानीचे केंद्र मानले आणि स्वराज्याची स्थापना केली. त्यानंतर ''छत्रपती संभाजी राजांकडून १६८८ साली मोघलांनी रायगड ही राजधानी जिंकून घेतली व त्यांना हाल हाल करुन मारले.''[११] छ. राजाराम महाराजांनी स्वत:स राज्याभिषेक करून घेवून शिवसत्तेच्या दृष्टिने दुर्गम भागातील किल्ला राजधानीसाठी निवडण्याऐवजी सपाट प्रदेशातील आणि डोंगरखोऱ्याच्या बाजूस असलेला अजिंक्यतारा हा मजबूत किल्ला सातारा राजधानीसाठी निवडला.

अर्थात १९८९ सालीच सातारा या भूप्रदेशाची निश्चिती व स्थापना झालेली आपणास आढळून येते. पुढे इंग्रजांनी या प्रदेशातील खालसा करून घेतलेल्या भागाचा सातारा जिल्हा बनवून सातारा हे जिल्हा केंद्र बनविले. साताऱ्याला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व आहे. ''साताराचे थोरले शाहू छत्रपति व महाराणी ताराबाई यांच्यात मतभेद, कटकटी होत असत. हा वाद कायमचा मिटवण्यासाठी तडजोड होऊन ताराबाईंना वारणा नदीचे दक्षिणेकडील मुलूख (कोल्हापूर प्रदेश) देऊन सातारा प्रदेश कायमचा निश्चित करून देण्यात आला.''[१२] परंतु या ऐतिहासिक बाबीत व वादात जेव्हा इंग्रजांच्या राज्यास सुरुवात झाली तेव्हा त्यांनी सातारच्या भू प्रदेशाचे लचके तोडले. औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्याकडे ठेवलेल्या नोंदीत असे म्हटलेले आहे की ''इंग्रजांनी सातारचे राज्यच खालसा करुन छत्रपतींना पेन्शन व काही खाजगी शेऱ्या दिल्या.''[१३] त्यानंतर मात्र इंग्रजांच्या कलेक्टरचा अंमल इथे सुरु झाला.

साताऱ्याचे भौगोलिक स्थान महत्त्वाचे आहे. उत्तरेला नीरा नदी व दक्षिणेला वारणा या सह्याद्री पर्वतात उगम पावलेल्या व वर्षातील आठ–नऊ महिने सतत दुथडी भरुन

वाहणाऱ्या नद्या होत्या. पश्चिमेला सह्याद्रीचा खडा अभेद्य अजिंक्य पहाड, अशा तऱ्हेने सातारा संस्थानास तीन दिशा भक्कम आहेत. साताऱ्याच्या पूर्व दिशेला मात्र सताड उघडा माळ आहे. कोल्हापूर जिल्हा याच्या पूर्वेस आहे. या संदर्भात ''या चार हद्दी १६८९ पासून १७०९ ते १७१० साली कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य झाले तरी कायम राहिल्या. त्या १९४९ पर्यंत तशाच होत्या.''[१४]

सांगली साताऱ्यामध्ये विविध प्रकारची जंगल संपत्ती आहे. अनेक नद्यांना जन्म देणारा सह्याद्रीचा पर्वत पश्चिमेस उभा आहे. उत्तर सरहद्दीवरील नीरा व दक्षिणेची वारणा या नद्यांची अपार जलसंपत्ती या प्रदेशास आर्थिक सुबत्ता निर्माण करण्यास कारणीभूत ठरली आहे. नीरा नदीच्या खोऱ्यातील ब्रिटिशकालीन भाटघर येथील प्रचंड जलाशय, त्यावर होणारी विद्युत निर्मिती, वीरधरण, डावे व उजवे कालवे, पुणे दक्षिण, सातारा उत्तर, तसेच सोलापूर जिल्हा सुजलाम् सुफलाम् बनलेला आहे. वारणेचे चांदोली धरण, वाळवे, शिराळे, मिरज, कवठेमहांकाळ ते थेट जत तालुक्या-पर्यंतची दुष्काळग्रस्त जमीन सुपीक बनविण्यास कारणीभूत जलसाठे उपलब्ध आहेत. कोयना धरण, वीज निर्मिती, पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांना होणारा विद्युत पुरवठा, मुंबईच्या औद्योगिक वाढीसाठी विद्युत पुरवठा, कृष्णा नदीवरील खोडशी धरण, नवे धोम धरण, आरफळ योजना, वेण्णा नदीवरील कण्हेर धरण, वेरळा नदीवरील नेर व येरळवाडी धरणे, माण नदीवरील राजेवाडी तलाव, तसेच इतर नद्या व ओढ्यांवरील लहान-मोठी धरणे, पाझर तलाव यामुळे या दोन्ही प्रदेशात आर्थिक सुबत्ता नांदत आहे. त्यांच्या जोडीला सहकार क्षेत्राची इथे क्रांती झालेली आहे.

**सातारा व सांगली जिल्ह्यातील साखर कारखाने :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सातारा जिल्ह्यात रेठरे बुद्रुक, मरळी, शिरवडे, भुईंज येथे; तर सांगली जिल्ह्यात सांगली, शिराळा, कवठेमहांकाळ, खानापूर (नागेवाडी), आटपाडी, आष्टा, वाळवे, इस्लामपूर असे अनेक कारखाने सुरु झाले आहेत.

**व्याप्ती :**

पूर्वीच्या अखंड सातारा जिल्ह्यात (१) सातारा, (२) वाई, (३) कराड, (४) पाटण, (५) कोरेगांव, (६) खटाव, (७) जावळी, (८) वाळवे, (९) खानापूर, (१०) तासगांव, (११) माण हे अकरा तालुके व (१) शिराळा, (२) खंडाळा, आणि (३) महाबळेश्वर हे तीन पेटे किंवा महाल होते. ''या शिवाय आजचा फलटण तालुका व जत तालुका ही पूर्वी स्वतंत्र संस्थाने म्हणून इतिहासात याची नोंद आहे. आटपाडी हा औंध संस्थानचा तालुका व कवठेमहांकाळ तालुका सांगली संस्थानचा भाग होता. औंध संस्थानची कराड, खानापूर, तासगाव तालुक्याच्या पोटात फुटकळ गावे होती. सांगली संस्थानची मिरज, तासगाव तालुक्याच्या पोटात होती. कुरुंदवाड संस्थानचे वाटेगाव, वाळवे तालुक्याच्या तर अक्कलकोट संस्थानचे कुर्ले (राजाचे) गाव खटाव तालुक्याच्या पोटात होते. शिवाय सांगली, मिरज, बुधगांव, इचलकरंजी आदि संस्थाने व जहागिरीची गावे दक्षिण दिशेला विखरून होती.''[१५] अशा या दोन्ही प्रदेशाचे १ ऑगस्ट १९४९ रोजी पूर्वीचे वाळवा, तासगांव, खानापूर तालुके व शिराळा पेटा भाग व मिरज, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ संस्थानी मुलुखाचे तालुके एकत्र आणून नवा दक्षिण सातारा (सांगली) जिल्हा बनविण्यात आला.

**१८५७ चा स्वातंत्र्यलढा आणि वाळवा केंद्रप्रमुख :**

सन १८५३ साली रंगो बापूजी गुप्ते सातारच्या राणीस भेटण्यास उत्तर हिंदुस्थानात गेले. तेथे त्यांना १८५७ च्या लढ्याची चाहूल लागली. नंतर ते सर्व भारतभर गुप्त रितीने फिरले. ''१८५६ साली ५०० माणसांची कुमक त्यांनी नानासाहेब पेशव्यांकडे पाठविली. नंतर ते सैन्याची भरती करण्यासाठी पुणे ते बेळगांव फिरत राहिले.''[१६] या उठावाला मदत करुन इंग्रजांना या देशातून हाकलण्याचे व सातारच्या गादीवर पुन्हा वंशजास बसवायचे असा त्यांचा विचार होता. ''कोल्हापूर भागाशी संबंध ठेवण्याकरीता त्यांनी वाळवे हे एक केंद्र तयार केले होते.''[१७] या ठिकाणाहून बऱ्याच हालचाली झालेल्या आपणास आढळून येतात. या कटाचा

इंग्रजांना सुगावा लागताच यात सामील असणारे ''नारायण पावसकर, केशव चित्रे, शिवराम मोरेश्वर, विठ्ठल कोंडी व सिताराम रंगो गुप्ते (रंगो गुप्तेंचा मुलगा) या सर्वांना गेंड्याच्या माळावर फाशी दिली. याच बरोबर मुनाजी बाबर, सखाराम शेट्ये, बाबू गायकवाड, येसू गायकवाड, गणेश कारखानीस, नाना रामोशी या सर्वांना इंग्रजांनी तोफेच्या तोंडी दिले.''[१८] इतर सहा लोकांना गोळ्या घातल्या. सर्वांच्या इस्टेटी जप्त केल्या. याचबरोबर या लढ्यात तासगाव तालुक्यातील चोरे गावचे राधो व्यंकटेश कुलकर्णी व कुंडलचे नाना रामोशा सामील होते. या लढ्यानंतर काही वीर वाळवे तालुक्यात व शिराळा पेट्यात बैराग्याच्या वेशात हिंडत होते. त्यांचा बराच काळ या भागात तळ होता, पण त्यांना कोणी ओळखले नाही अगर पकडून दिले नाही.

सांगली येथील संस्थानिक पटवर्धन हे १८५७ च्या उठावात मदत करतील म्हणून इंग्रजांची एक फलटण सांगली येथे ठेवण्यात आली होती. १८७९ सालच्या आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या लढ्यात तासगाव, विसापूर, शिगावचे काही रामोशी सामील होते. अर्थात १८५७ च्या या बंडात सातारा सांगली जिल्ह्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते.

**सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्याच्या चळवळीचे स्वरूप :**

सांगली जिल्हा, दक्षिण संस्थानापैकी सांगली संस्थान, मिरज, जत, बुधगाव, औंधचा थोडा भाग, इचलकरंजी जहागिरीचा भाग आणि सातारा जिल्ह्यातील शिराळा, वाळवा, तासगांव, खानापूर हे चार तालुके असा मिळून बनला आहे. या सर्व विभागातील स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी योगदान दिलेल्या अनेक क्रांतिकारकांचा सहभाग व घटनांचा संक्षिप्त इतिहास पाहणे गरजेचे आहे.

**स्वराज्याची चळवळ :**

१ ऑगस्ट, १९२० ला टिळकांच्या निधनानंतर गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ तीव्र केली, गांधीजींनी असहकारतेचे आंदोलन सुरु केले. गांधीजींच्या कृतीशील त्यागी व

सर्वव्यापी आणि अहिंसक तत्त्वज्ञानाने जनता खडबडून जागी झाली. गांधीजींनी खिलाफत आंदोलनाला पाठींबा दिला. त्यामुळे मुस्लिम स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. चळवळीच्या मैदानावर हजारो लाखो खेडूत, श्रमजीवी लोक लाठ्या-काठ्या झेलण्यासाठी पुढे आले. ''गांधीजींनी १९२७ साली खादीच्या प्रचारासाठी दौरा केला. या दौऱ्यात खादी ही स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक होते.''[१९] त्या काळी खादी वापरणे अगर प्रचार करणे गुन्हा मानला जात होता. या पार्श्वभूमीवर सांगली, दुधगाव, आष्टा, मिरज, इस्लामपूर येथील अनेक कार्यकर्ते काँग्रेसचे सभासद झालेले आढळतात. पुढे १९३० नंतर मिठाच्या सत्यागृहात सांगली साताऱ्यातील अनेक लोक सहभागी झाले.

**१९३० चा मिठाचा सत्यागृह आणि सांगली व सातारा परिसर :**

१९३० चा मीठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, कायदेभंग अशा सर्वव्यापी संग्रामात महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे नेते महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, केशवराव बागडे आदी नेत्यांनी तुरुंगवास पत्करला. ''इकडे पूर्वीच्या अखंड सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील, येडे निपाणीचे पांडूरंग मास्तर, बर्डे गुरुजी, किसनवीर अहिर, बाबुराव चरणकर, आत्माराम पाटील, इतर अनेक नेते, शेकडो कार्यकर्ते या लढ्यात उतरले.''[२०] विशेषत: बिळाशीचा जंगल सत्याग्रह, बिळाशीचे बंड महाराष्ट्रात नव्हे तर भारतभर गाजले. ''क्रांतिसिंह नाना पाटील यांनी म. गांधींच्या नावे जयजयकार करुन नारळ फोडला.''[२१] त्याचबरोबर जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांनी इंग्रजांची सत्ता झुगारल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या इ. भागाप्रमाणे चळवळीचे लोण खेड्यापाड्यात पोचविण्यात वरील नेत्यांचे महत्त्वपूर्ण योगदान दिसून येते. पुढच्या कालखंडात १९४२ चा लढा स्वातंत्र्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा होता.

**१९४२ च्या लढ्यातील सांगली सातारा जिल्ह्याची कामगिरी :**

१९४२ च्या लढ्यात सातारा, सांगली परिसरातून मोठा प्रतिसाद मिळाला हा लढा १९४२ मध्ये तिव्र स्वरूपात पुढे आला. महाराष्ट्रातील सातारा व सांगली जिल्ह्याला काही विशिष्ट स्थान आहे. याच जिल्ह्याने महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात नेतृत्व प्रदान केलेले दिसून येते. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात इंग्रजांना 'चले जाव' चा इशारा देवून स्वातंत्र्य संग्रामाचे रणशिंग फुंकले. मुंबई येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले होते. गांधीजींना अटक करण्यात आली होती. 'करेंगे या मरेंगे' घोषणेनुसार सुरुवातीला अनेक विध्वंसक कामे, जाळपोळ, गोळीबार, रक्तपात वगैरे घडल्यानंतर चळवळीचा जोर हळूहळू ओसरु लागला होता. ''४ मार्च १९४४ ला गांधीजींची ब्रिटिश सरकारने मुक्तता केल्यावर लढा मागे घेण्याची घोषणा करुन भूमिगत राहून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांना पत्ते कळवून तुरुंगात जाण्याचा आदेश दिला.''[२२] इतर राज्याप्रमाणे हा आदेश महाराष्ट्राने पाळला, परंतु सातारा हा एकमेव जिल्हा असा निघाला की त्याने चळवळ थांबवून तुरुंगात जाण्याचा आदेश तर धाब्यावर बसविलाच पण उलट त्याच सुमारास एप्रिल १९४४ मध्ये सातारा जिल्ह्यात 'प्रतिसरकार' स्थापन केल्याची घोषणा करुन आपल्या जहाल क्रांतिकारक वृत्तीचे दर्शन घडविले.

**साताऱ्याचे प्रतिसरकार : एक अभिनव प्रयोग**

साताऱ्याचे क्रांतिकारी प्रतिसरकार म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदान होते. कारण ज्या इंग्रजी साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही अशी वल्गना करणाऱ्या व पाच खंडात साम्राज्य करणाऱ्या इंग्रजांना प्रतिसरकारने हैराण करुन सोडले. जगातील अनेक शेकडो वृत्तपत्र प्रतिनिधींनी सातारच्या प्रतिसरकारचा प्रयोग अनुभवण्यासाठी खेड्यापाड्यात फिरुन लोकांच्या मुलाखती घेऊ लागले. ''सातारा जिल्ह्यात नाना पाटील नावाच्या राजाने बंड करुन राज्य स्थापन केले आहे, त्याचे काय?''[२३] असा प्रश्न

ब्रिटनमधील विरोधी पक्ष नेते ब्रिटनच्या पंतप्रधानांना विचारत असे. कारण गांधीजींचा आदेश न मानता सातारच्या शेकडो भूमिगत कार्यकर्त्यांनी एकत्र येवून प्रतिसरकार स्थापण्याचा निर्णय घेतलेला होता. ही घटना अखंड भारतीय स्वातंत्र्य चळवळीस, क्रांतिला नवे स्फुरण देणारी होती.

**प्रतिसरकारची स्थापना– स्वातंत्र्याची चाहूल :**

स्वातंत्र्य चळवळीत कांतीकारकांना वेळेवर जेवण मिळत नसे. गनिमी काव्याने सशस्त्र पोलिस दलाशी सामने देताना डोंगरदऱ्यात रहावे लागे. कार्यकर्त्यांवर हजारोंची सरकार तर्फे बक्षिसे जाहीर केलेली होती. पैशाच्या लालसेने अनेक इंग्रजांचे हस्तक बनत होते. अशा लोकांना पहिल्यांदा शिक्षा करणे गरजेचे होते. गावगुंडांच्या मदतीने सावकारांनी जमिनी बळकावल्या होत्या. त्यांचा बंदोबस्त होणे अत्यंत महत्त्वाचे होते. क्रांतिकारकांनी असह्य छळ सोसला, त्यांच्या कुटुंबियांचे पोलिसांनी हाल हाल केले. चळवळ नेस्तनाबूत करण्यासाठी दडपशाही केली.

३ जून १९४३ रोजी कामेरी येथे भूमिगतांच्या मध्यवर्ती कमिटीची बैठक झाली. त्यामध्ये यावर चर्चा झाली आणि आंदोलन न थांबविता प्रतिसरकार स्थापन करण्याचा नवा टप्पा स्वीकारावा व ते पुढे चालवावे असे ठरले. जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यात व विभाग कमिट्यांत चर्चा चालू झाली. सुमारे दोन महिने हे मंथन चालले आणि ३ ऑगस्ट १९४२ रोजी पणंब्रे येथे सर्व भूमिगतांची विस्तारित सभा भरली व तिला दोन हजाराहून अधिक कार्यकर्ते हजर होते. त्यामध्ये आंदोलन पुढे चालवून प्रतिसरकार स्थापून ते चालविण्याचा निर्णय बहुमताने घेण्यात आला. यशवंतरावाची भूमिका मानणारे त्यांच्यासह ११ कार्यकर्ते सरकारच्या स्वाधीन झाले. जिल्ह्याचे नऊ विभाग करून त्यामध्ये भूमिगत व प्रतिसरकारचे कार्यकर्ते विभागून त्यांच्याकडे मुलूख व कामे सोपविण्यात आली. हा निर्णय आम जनतेला व ब्रिटिशांना कळावा म्हणून आणि प्रतिसरकारची एकवाक्यता, एक शिस्त याचा प्रत्यय

दाखविण्यासाठी ‘‘२० ऑगस्ट १९४३ रोजी एकाच रात्रीत कोल्हापूर जिल्ह्याच्या टोप या सरहद्दीवरील गावापासून नीरा नदीपर्यंत पुणे–बेंगलोर रस्त्यावर चाळीस ठिकाणी ९००० तारा तोडण्याचा कार्यक्रम आखून तो फत्ते करुन दाखविला.’’[२४] हा कार्यक्रम म्हणजे स्वातंत्र्य क्रांतीची नांदीच ठरली. प्रामुख्याने ‘‘साताऱ्यातील भूमिगत आंदोलनाला व प्रतिसरकारला प्रत्यक्ष लोकांचा पाठिंबा किती आहे हे आजमावण्यासाठी केंद्रीय भूमिगत आंदोलन समितीने भाई अच्युतराव पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. ग.बा. नेवाळकर यांना पाठविले. त्यांनी ३ ऑगस्टची सभा पाहिली. त्यात भाग घेतला आणि पुढे तीन दिवस जिल्हाभर पाहणी दौरा केला आणि सातारा क्रांतिकारकांचा निर्णय योग्य असल्याचा व त्यांना प्रचंड पाठिंबा असल्याचा निर्वाळा देणारा अहवाल पाठविला.’’[२५] १९४३ सालापासून सातारा प्रतिसरकार साकारु लागले होते. लवकरच त्यास स्वत:ची शासन व्यवस्था निर्माण करण्याची क्षमता प्राप्त झाली. मिदनापूर (बंगाल), भागलपूर (बिहार), बाकिया (उत्तर प्रदेश), सातारा (महाराष्ट्र) इ. ठिकाणी हिंदुस्थानात प्रतिसरकार स्थापन करण्यात आले, पण नंतर ते शांतही झाले. परंतू सातारच्या या प्रतिसरकारच्या उठावाचे रूप शांत न होता तो उठाव दिवसेंदिवस प्रखर होत गेला.

सातारा जिल्ह्याच्या एका लहानशा भागात सुमारे सहाशे (६००) खेड्यात ब्रिटिशांचे साम्राज्य नष्ट होऊन स्वकीयांचे स्वराज्य स्थापले होते, ही घटना मोठी अभूतपूर्व होती. खुद्द श्री. नाना पाटील यांनी प्रतिसरकारची व्याख्या ‘‘इंग्रजांची गुलामगिरी फेकून स्वतंत्र म्हणून वावरणाऱ्या भारतीयांचे सरकार’’[२६] अशी केली आहे. प्रतिसरकारचा कारभार विशेषत: खानापूर, तासगाव, वाळवा या तालुक्यात व सांगली, मिरज, बुधगाव भागातून सन १९४३ ते १९४६ अखेर पर्यंत चालू होता. कुंडल हे गाव प्रतिसरकारची राजधानी होती आणि तेथून सर्व शासन कारभार चालत असे. तेथील व्यायाम शाळेत तरुण जवानांना लष्करी पद्धतीचे शिक्षण दिले जात असे आणि तेथूनच शिक्षण, संरक्षण, न्याय आणि अंमलबजावणी इ. सर्व बाबीचे

सूत्र संचालन केले जात असे. सेनापती जी.डी. लाड यांचेकडे नियोजन व अंमलबजावणी हे खाते असून न्याय खात्याची धुरा आप्पासाहेब लाड उर्फ गुरुजी यांनी सांभाळली होती. ‘‘कोणतीही कृती करण्याच्या अगोदर नाना पाटलांचा विचार घेतला जात असे आणि सर्व कारभार एकमेकांचे विचाराने लोकशाही पद्धतीने चाललेला असे. हुकूमशाही विचारांचा नुसता लवलेशही प्रतिसरकारमध्ये नव्हता. नाथाजी लाड, रामभाऊ पवार, बाबुराव लाड इत्यादी मंडळी त्यांना सहाय्य करीत होती.’’[२७] म्हणून क्रांतिसिंह नाना पाटलांनी एप्रिल १९४४ ला प्रतिसरकारची चळवळ अंमलात आणली. ब्रिटीश सत्तेची पाळेमुळे गावागावात होती. तीच प्रथम तोडण्यास सुरुवात केली. ‘‘सातारा जिल्ह्याच्या वाई, पाटण, वाळवे, खटाव, कोरेगाव, कराड, खानापूर, तासगांव, शिराळे भूमिगत कार्यकर्ते अज्ञातवासातून बाहेर येवून लोकांना एकत्र जमा करु लागले व त्यांच्या तक्रारी ऐकू लागले आणि दोषींना ‘तुफानी सैनिकांच्या’ मदतीने शासन करु लागले.’’[२८] प्रतिसरकार स्थापन झालेनंतर महत्त्वपूर्ण कार्याला सुरवात झाली.

**प्रतिसरकारचे विधायक कार्ये :**

या चळवळीच्या माध्यमातून ब्रिटिश शासन कालीन प्रदेशातील लोकांच्या तक्रारी ऐकून घेणे व गुन्हेगार लोकांना शासन करणे एवढे कार्य न करता ग्राम संघटना, तरुण संघटना, शेतकरी संघटना, साक्षरता प्रसार, शाळा-हायस्कूलमध्ये मुला-मुलींना पाठविणे, व्यसनमुक्ति, काटकसरीत लग्ने लावणे, सामुदायिक समारंभ घडवून आणणे, कोर्ट कचेरीत न जाता तडजोडीने दावे मिटविणे, अशी अनेक कार्ये हाती घेतली व पूर्ण करू लागली. त्यामुळे प्रतिसरकार चळवळीत लोकमानसातून अधिक मदत मिळत गेली. अशा भूमिगतांची खोलात जावून पोलिस चौकशी न करता वर वर करत १९४७ ला महात्मा गांधी पाचगणीला विश्रांतीसाठी आले असताना क्रांतिसिंह नाना पाटील यांनी त्यांची भेट घेतली. त्यावेळी महात्मा गांधी म्हणतात, ‘‘नाना पाटील, तुमची चळवळ माझ्या तत्त्वात बसते न बसते यापेक्षा

४२ची स्वातंत्र्य चळवळ जिवंत ठेवली. साताऱ्याने या चळवळीचे नाव राखले, हे महत्त्वाचे होय. तुम्ही बहाद्दूर आहात, भ्याडांच्या अहिंसेपेक्षा शूराची हिंसा परवडेल असे मानणारा मी आहे.''[२९] अर्थात् यावरून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकार चळवळीची दखल त्यावेळी राष्ट्रीय पातळीवर नेत्यांनी घेतलेली दिसून येते.

नाना पाटील यांनी विविध गावातील लोकांना वेगवेगळी पदे देऊन प्रतिसरकारची संघटनात्मक बांधणी केली. या संघटनेत डिक्टेटर म्हणून कुंडलचे नाथा लाड यांची निवड करण्यात आली. दर दोन महिन्यांनी अहवाल देवघेव होत असे. ''विविध शाखांना माहिती पुरविण्यासाठी 'स्वतंत्र भारत' नावाचे पत्रक काढले जाई. निरोप पोहचविण्याकरीता वेगवान धावपटू या चळवळीत होते. वाटेगावचे टूरिंग पाटील हे यातील एक धावपटू होय.''[३०] गावोगावी क्रांतिकारकांना संघटित करुन, केलेली संघटनात्मक बांधणी भारतीय स्वातंत्र्य चळवळीसाठी महत्त्वाचे होते, आणि यामध्ये प्रमुख, उपप्रमुख असे पदसोपान करुन कार्याचे केलेले विभाजन हे निश्चित साध्याकडे यशस्वी वाटचालीचे द्योतक होते.

या प्रतिसरकार चळवळीचे प्रणेते नाना पाटील अतिशय हुशार व जाणकार होते. ते शेवटपर्यंत भूमिगत राहिलेने भूमिगत यंत्रणा व प्रतिसरकार चळवळीचे काम शेवटपर्यंत चालू राहिले. ते सूत्रसंचालन करीत. 'तुफान सेने'चे गावोगावी तरुण आठरा ते वीस वयाचे तरुण या सेनेचे सैनिक. त्यांना गणवेश नसे. महिन्याचे प्रशिक्षण कॅप्टनला कुंडल येथे दिले जाई. आदेश येताच रात्री एकत्र जमून बोलविल्या ठिकाणी जाणे व सांगितलेली कामगिरी पुरी करून पहाटे घरी जाणे व आपआपल्या कामाला लागणे असे नियोजन क्रांतिसिंह नाना पाटील करत असे. गनिमी काव्याने ब्रिटिश सरकारला घाईला आणले होते. प्रतिसरकार चळवळीने सरकारी मालमत्ता, रेल्वे स्टेशन, पोस्ट, बँकांना आपले लक्ष करुन ब्रिटिश सरकारला देश सोडण्यास भाग पाडलेले दिसून येते. ''तुफान सेनामध्ये बहिर्जी पथकात दोनशे पन्नास हेड कॅप्टन व ५००० सैनिकांचा समावेश होता. या ४० महिन्याच्या कालावधीत प्रतिसरकारने एक हजार

निवाडे केले. शंभर रुपयांपर्यंत दिवाणी तंटे गाव पातळीवर सोडविले.''[३१] नानांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेची बातमी ब्रिटिश वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजताच ते खडबडून जागे झाले. नानांच्याकडे याची सूत्रे म्हटलेवर इंग्रज सरकार अधिकच बेचैन झाले. नाना जिवंत अगर मृत पकडण्यासाठी हुकूम सुटले, बक्षिसे जाहिर झाली, परंतू नाना काही कोणालाही सापडले नाहीत. क्रांतिसिंह नानांचे निष्ठावंत दोन भक्त होते. एक नागनाथ अण्णा नायकवडी व नाथाजी लाड या दोघांची क्रांतिसिंह नानांची शेवटपर्यंत काळजी घेतली.

**समाज व्यवस्थेला वळण :**

क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे स्वत: जहाल क्रांतिकारक होते. वाळवा परिसरामध्ये आझाद हिंद सेनेची शाखा स्थापन करण्याचे स्वप्न बाळगून होते. पंजाबचे नानकसिंग व मनसासिंग या आझाद हिंद सेनेच्या दोन सैनिकांना वाळवा येथे आणून आझाद हिंद सेनेची शाखा स्थापन केली. ते प्रतिसरकारमध्ये सर्वात जहाल व काटक क्रांतिकारक म्हणून प्रसिद्ध होते. शिराळा, वाळवा हा भाग क्रांतिकारकांच्या शौर्याने दिपवून टाकला होता. 'झटपट दावा झटपट न्याय' यामुळे जनता खुश होऊ लागली. क्रांतिकारकांनी नाशिकच्या मिलिटरी कॅम्पमधून काडतुसे आणली. ''दिनांक २० ऑगस्ट १९४३ रोजी कोल्हापूर जिल्ह्याच्या टोप गावापासून नीरा नदीपर्यंत एका रात्रीत पुणे बेंगलोर रस्त्यावरील चाळीस ठिकाणी दोन हजार तारा तोडण्यात आल्या.''[३२] या कामाबरोबर वाचनालय उघडणे, शाळा चालू करणे, दारुबंदी करणे, तमाशाबंदी (ज्या तमाशातून अनैतिक कृत्यांना चालना दिली जात होती असे तमाशे), लैंगिक स्वैराचार, मानपान न घेता लग्न लावणे, गुन्हेगार दादा, सावकारी, भुरटे चोर, दरोडेखोर अशा सर्व घटकांवर पायबंद प्रतिसरकार मार्फत घातला गेला.

**साताराचे प्रतिसरकार :**

पोलिस दडपशाहीचा व डावपेचांचा उपयोग होत नाही हे लक्षात आल्याने सरकार बेचैन झाले होते. देशभराची आंदोलनाची लाटही ओसरत चालली होती. अशा वेळी सातारा

जिल्ह्यावर लष्कर दडपशाही करुन भूमिगत चळवळ आकार घेवू लागलेले प्रतिसरकार नेस्तनाबूत करण्याचे विचार सरकारी गोट्यात चालू होते. त्याचा सुगावा भूमिगत नेत्यांना लागला होता. या नव्या परिस्थितिचा मुकाबला कसा करावयाचा यासंबंधी विचारमंथन जोरात सुरू झाले. लष्करी दडपशाहीमुळे लोकांना फार त्रास होईल आणि एकट्या साताऱ्यात आंदोलन तडीला जाणार नाही, म्हणून ते मागे घ्यावे व भूमिगतांनी सरकारच्या स्वाधीन व्हावे, असा एक विचारप्रवाह होता. श्री यशवंतराव चव्हाण व त्यांचे काही सहकारी या प्रवाहाचे प्रवक्ते होते, किसनवीर, बर्डे मास्तर, नाना पाटील, जी.डी. लाड, नागनाथ नायकवडी, डी.जी. देशपांडे, शेख काका यासारखे नवे जुने नेते आंदोलन पुढे चालवावे व प्रतिसरकार स्थापावे या विचार प्रवाहाचे प्रतिनिधित्व करीत होते.

भूमिगतांची सरकार विरोधी कृत्ये चालू असताना त्यांच्यासमोर एक नवेच संकट उभे राहिले. सातारा जिल्ह्यात दरोडेखोरांच्या अनेक टोळ्या त्या काळात कार्यरत होत्या. त्यांचा बंदोबस्त सरकारलाही करता आला नव्हता. या दरोडेखोरांनी आता 'म. गांधी की जय, नाना पाटील की जय' अशा घोषणा देऊन राजरोस दरोडे घालण्यास सुरुवात केली. रोज १० ते २० दरोडे पडू लागले. स्वातंत्र्याची चळवळ व तेथे नेते नाना पाटील बदनाम होऊ लागले. जनसामान्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली. दरोड्यांनी त्रस्त झालेल्या जनतेने पोलिसांकडे जावे तर त्यांनी उलट उत्तर द्यावे, 'जा की आता तुमच्या पांढऱ्या टोपीवाल्याकडे'. लोक असहाय्य बनले होते. दरोडेखोरांनी 'कामेरी कोर्ट' व 'वाघोली कोर्ट' अशी कोर्ट स्थापून जनतेकडून राजरोस खंडण्या वसूल करण्याचा सपाटा लावला. दिवसाढवळ्या खून पडत होते. स्त्रियांच्या अब्रूवर घाला घातला जात होता. दरोडेखोर हे एक आव्हान होते. नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ते स्वीकारले. जनतेच्या पाठींब्यावर स्वातंत्र्याचा लढा द्यायचा तर सर्व जनतेचा पाठींबा हवा. तो मिळविण्यासाठी जनमानसातले आपले स्थान भक्कम हवे, निर्मळ

हवे. जनतेला तिच्या जीवित-वित्ताची हमी दिली पाहिजे. या विधायक भावनेतून प्रतिसरकार आकार घेवू लागले.

''सातारा जिल्ह्यातील या भूमिगत चळवळीचा अखिल भारतीय आंदोलनाशी श्री. अच्युतराव पटवर्धन यांचेमार्फत संपर्क व संबंध होता. अच्युतरावांच्या पुढेही प्रश्न मांडण्यात आला. त्यांनी जर लोकांचा पुरेसा पाठींबा असेल तर आंदोलन पुढे चालू ठेवावे, नसेल तर थांबवावे असा सल्ला दिला.''[३३]

**प्रतिसरकारची ध्येय धोरणे :**

प्रतिसरकारच्या कारभाराची धोरणे व मर्यादा आणि कक्षा निश्चित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मुख्यत: जमीन मालकी हक्काच्या प्रस्थापित संबंधांना धक्का न लावता इतर प्रश्नासंबंधी न्याय-निवाडा करणे, अन्नधान्य, बाजारव्यवस्था, पुरवठा कामे, वाहतूक वगैरेच्या बाबतीत खाजगी व्यापारी वा सरकारी संस्था यांना पूर्ण मुभा ठेवणे. त्यांना संरक्षण व प्रोत्साहन देणे, सावकारी जबर व्याज व कर्जफेडीचे जुलूम, देण्याघेण्याचे व्यवहार, फौजदारी स्वरुपाचे गुन्हे, स्त्री विषयक गुन्हे व अन्याय इ. बाबी न्यायदानात समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

**औंध संस्थानाच्या प्रयोगाचा प्रभाव :**

प्रतिसरकारचे मुख्य कार्य म्हणजे लोकांचे दरोडेखोरांपासून व सरकारच्या हस्तकांपासून संरक्षण करणे, लोकांतील परस्परातील वाद व तंटे सोडविणे आणि गांधी विचारांच्या आधारावर लोकसत्ताक ग्रामराज्य स्थापन करणे हे होते. सातारा जिल्ह्यातील औंध संस्थानात त्या संस्थानचे प्रमुख बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी १९३७ साली लोकराज्य स्थापन केले होते. औंध संस्थान छोटे होते, तरी 'चले जाव' चळवळ आपआपल्या परीने चालू ठेवणाऱ्या मंडळींना औंधचे संरक्षण असे. स्वराज्य- दानाच्या प्रयोगात अत्यंत उत्साहाने आणि आत्मीयतेने आप्पासाहेब पंत प्रतिनिधी सहभागी झालेले होते. नव्या व्यवस्थेस औंधला

आप्पासाहेब पंतप्रतिनिधी मुख्यमंत्री म्हणून निवडून आलेले होते. औंधमधील स्वातंत्र्य पूर्व लोकशाहीचा प्रयोग हा एक यशस्वी प्रयोग होय. ‘‘औंध संस्थानच्या सत्तर गावातून साकार झालेल्या अल्पायुषी ग्राम स्वराज्याच्या प्रयोगाने समकालीन समाज जीवनावर एक उदात्त संस्कार घडविला.’’[३४] असे गौरवोद्‌गार थोर क्रांतिकारक भाई अच्यूतराव पटवर्धन यांनी काढलेले आहेत. ‘‘औंध स्वराज्य प्रयोगात खेडेगावातल्या पंचायतींनी नुसता सारा गोळा करणे, शिक्षण खाते सांभाळणे, एवढेच करावयाचे नसून त्यांच्याकडे पोलिस खातेही सोपविले होते. पोलिसांची निष्ठा राजाकडून प्रजाकडे एकदम वळवणे सोपे नव्हते.’’[३५] ‘‘औंधच्या घटनेमध्ये न्यायदान स्वस्तात व घरपोच व्हावे अशी योजना होती. त्याकरीता न्यायदान वर्ग योग्य मिळाला होता. बदलापूरचे नानासाहेब चाफेकर, सातारचे आण्णासाहेब बखले व नानासाहेब जोशी वगैरे तर किर्लोस्करवाडीत शंकरराव किर्लोस्कर यांनी चांगली मदत केली. औंध संस्थानच्या शेतकऱ्यांना नव्या जीवनाची वाटचाल किंवा नवे जीवन उपलब्ध करुन देणे गरजेचे होते.’’[३६] औंध छोट्या संस्थानात ग्रामस्वराज्याचा जो प्रयोग बाळासाहेब पंत प्रतिनिधी आणि बॅ. आप्पासाहेब पंत यांनी केला त्याचा सातारच्या चळवळीवर परिणाम झाला. कारण औंध राजे व युवराज यांचा चळवळीस मनापासून पाठिंबा होता.

**प्रतिसरकारची रचना :**

सातारा प्रतिसरकारची रचना भूमिगत क्रांतिकारकांनी केली. औंधच्या प्रयोगात काही सुधारणा करुन प्रतिसरकार मुख्यत: तीन भागात विभागलेले होते. हे तीन भाग म्हणजे – (१) तुफान सेना, (२) लोकराज्य, (३) न्याय व्यवस्था.

**साताऱ्यातील तुफान सेनेची कार्ये :**

प्रतिसरकारची तुफान सेना खालील प्रकारचे काम करीत असे –

१. गाव संरक्षण,

२. गाव स्वच्छता,

३. आझाद वीरांचे रक्षण,

४. स्वातंत्र्य लढ्यात कामास आलेल्या व तुरुंगात गेलेल्या वीरांच्या घराची देखरेख,

५. दूरजनांचा नायनाट,

६. पंचायतीने निर्माण केलेले लढे लढणे - (अ) कर्ज निवारण, (ब) शेती विभाजन (खंड पद्धतीने),

७. दारु बंदी,

८. स्वावलंबन,

९. साक्षरता,

१०. अस्पृश्यता निवारण.

तुफान सेनेने विविध कामे केली. सैनिक संघटनेचा उगम सेवा दलातून होई. प्रथम प्रत्येक गावी सेवादल स्थापित, प्रत्येक गावी एक जबाबदार सैनिक अधिकारी (कप्तान) असे. अशा अधिकाऱ्यावर अधिकारी असे आणि सर्व संघटनेवर 'सेनापती' असे. सेवादलातून वेचून सैनिक घेतले जात. त्यांना लढ्याचे प्रत्यक्ष शिक्षण दिले जाई. छापा घालणे, ठिकाण ताब्यात घेणे, हत्यारे काढून घेणे, बंदूक चालविणे, वगैरे प्रशिक्षण दिले जाई. हे सैनिक आपल्या पंचायतीचा हुकूम पाळत. पंचायत यांच्या समितीवर आधारलेली असे. तुफान सेनेच्या सैनिकावर कडक नैतिक बंधने असत. ते ती बंधने नवीन पिढीला लागू करीत. म्हणजे नवी पिढी सुसंस्कृत करण्याचा तो प्रयत्न करीत असत.''[३७] तुफान सेनेबरोबरच न्यायदान करणारे जनता कोर्टही होते. तुफान सेनादलाने 'प्रतिसरकार'चे कार्य यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तुफान सेना म्हणजे प्रतिसरकारची खरी ताकत होती. कुंडल येथील व्यायामशाळेत शेकडो तरुणांना राष्ट्रसेवा दलाच्या नावाखाली कवायतीचे शिक्षण, शस्त्रास्त्रे चालविण्याचे शिक्षण दिले जात असे. याशिवाय या तरुणांसमोर सर्वश्री नाना पाटील, आप्पासाहेब लाड, जी.डी. लाड यांची बौद्धिके होत होती. त्याचबरोबर नामवंत

विचारवंतांच्या भेटीगाठी, भाषणे आयोजित केली जात असत. सानेगुरुजी, अच्युतराव पटवर्धन, एस.एस.जोशी, आचार्य प्र.के.अत्रे इत्यादींच्या भेटीगाठी आयोजित केल्या जात. त्यामुळे मोलाचे मार्गदर्शन तरुणांना मिळत असे. या तुफान सेना दलातील सैनिकांना हातबॉम्ब, स्फोटक द्रव्ये पुरविण्याचे काम कुंडलचे क्रांतिवीर लक्ष्मणरावजी ठोंबरे उर्फ दलितमित्र तांबट काका करीत होते. तसेच इंग्रजांची पळवून आणलेली हत्यारे, बंदुका यांचाही वापर हे सैनिक करीत होते. तुफान सेनादल हे प्रामुख्याने कुंडल भागात स्थापन झाले होते.

**दरोडेखोरीला आळा घातला :**

सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांनी सरकारविरूद्ध लढा तीव्र करण्याच्या उद्देशाने आपली चळवळ अधिक संघटीत व शिस्तबद्ध बनविण्याचा जो प्रयत्न केला त्याचेच मूर्त स्वरूप म्हणजे 'प्रतिसरकार' होय. भूमिगत चळवळीच्या पहिल्या अवस्थेत पोलिस व सरकारी हस्तक यांनी ग्रामीण भागात धुमाकूळ घातला होता. सामान्य जनतेची पिळवणूक होत होती. पोलिसांनी गुन्हेगार फरारींना हाताशी धरुन काँग्रेस चळवळ बदनाम करण्याचा डाव टाकला होता. हे फरारी महात्मा गांधी की जय, नाना पाटील की जय असे म्हणत दरोडा घालू लागले. कामेरी, वाघोली, राजापूर, बोरगांव, तांदूळवाडी, सावळज, पारे, कार्वे, तुरची, पिपरी इत्यादी गावचे काही दरोडेखोर जनतेला सळो की पळो करुन सोडीत होते. त्यांना तुफान सेनेने दहशत बसवली.

**कवठे एकंदमधील भूदानाचा निर्णय :**

तुफान सेनेचे सरसेनापती जी.डी.लाड यांच्या नेतृत्वाखाली ठिकठिकाणच्या दरोडेखोरांचा बंदोबस्त केला. कवठेएकंदच्या भाऊबंदकीच्या वैमनस्याचा फायदा घेवून कोणाचा जोंधळा खोडणे, मिरच्या व तंबाखू उपटून टाका, असे प्रकार समाजकंटक सुपाऱ्या घेऊन करीत असत. दरोडेखोरी वाढली होती. जी.डी. लाड व त्यांचे सहकारी यांनी कवठेएकंदच्या गुन्हेगारांना गाठले. 'गुन्हे करावयाचे बंद करा' असे सांगितले. जगण्यासाठी

काहीतरी द्या, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे जमीन ''कवठे-एकंद येथील बुधगावकर सरकारांची बावन एकर त्या गावचे चार शेतकरी खंडाने करीत होते. ती जमीन त्यांच्याकडून दरोडेखोरांना कसण्यासाठी दिली. तेथील न्यायदान मंडळामार्फत रामोशी समाजाच्या २९ कुटुंबांना ती जमीन वाटून देण्यात आली आणि परस्पर दिलजमाईने प्रतिसरकारच्या कारभारात 'भूमीदान यज्ञ' शांततेने पार पडला आणि ती गुन्हेगार कुटुंबे सन्मार्गाला लागली.''[३८] भूमीदानाचा हा प्रयोग म्हणून आजही प्रेरणादायी आहे. ही एक प्रकारे भूदान चळवळ होती.

**बाज्या-बैज्याचे पाय तोडले :**

पारे, ता. खानापूर येथील बाज्या-बैज्या नावाचे दरोडेखोर भूमिगतांच्या बातम्या देणे, लूटमार करणे, स्त्रियांना त्रास देणे असे उद्योग करीत होते. त्यामुळे भूमिगत क्रांतिकारक व बाज्या-बैज्यामध्ये धुसपुस होती. पारे गावच्या शिवारात या दोघांची व भूमिगत क्रांतिकारक श्री. भगवानराव सूर्यवंशी आणि महादेव मिरगे यांची भेट झाली. शाब्दीक चकमकीतून भांडण वाढले. यातून बाज्या बैज्याचे कुऱ्हाडीने दोन पाय तोडले आणि लोकांनी नि:श्वास सोडला. पारे गावावर सामुहीक ५ हजार दंड बसविला.

**लोकराज्याची संकल्पना :**

प्रतिसरकारने गावोगावी ग्रामराज्ये स्थापन केली. ग्रामराज्य हे चळवळीचे मुख्य वैशिष्ट्य होते. आपल्या प्रदेशातून इंग्रजांची सत्ता नष्ट करावयाची असेल तर आपली सत्ता निर्माण व्हायला हवी. आपले शासन निर्माण व्हायला हवे. या भूमिकेतूनच प्रतिसरकारची स्थापना झाली होती. गावोगावी यापूर्वीच राष्ट्र सेवादले तयार झाली होती. जेथे नव्हती, तेथे ती सुरू केली गेली. शेकडो तरुण हाताशी धरुन प्रत्येक गावी न्यायदान कमिट्या स्थापन करण्यात आल्या आणि त्यांच्या मदतीने ग्रामराज्याचा प्रयोग राबविण्यात आला. गुंड, पोलिसांचे खबरे, जुलमी वतनदार व सरंजामदार, दरोडेखोर यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रतिसरकारची तुफान सेना निर्माण केली गेली. गावगुंडांना व पोलिस खबऱ्यांच्या पायांना पत्र्या मारण्यात आल्या,

जुलमी सावकारांच्या गाढवावरुन धिंड काढली, ब्रिटीश सरकार धार्जिण्या मंडळींच्या मनात तुफान सेनेने दहशत निर्माण केली. पण ग्रामराज्यातील सामान्य माणूस दरोडेखोर व गुंड यांच्या भीतीपासून मुक्त केला. जनतेला हे प्रतिसरकार प्रतिशासन देणारे आपले सरकार वाटू लागले. गुंडांना पत्र्या लावणारे सरकार जनमानसात 'पत्रिसरकार' म्हणून प्रसिद्ध झाले. ग्रामराज्याच्या चौकटीत गावोगावी स्थापन झालेल्या न्यायदान कमिट्यांचे कार्य उल्लेखनीय ठरले. या कमिट्यांना अनेक गरीब, नडलेल्या शेतकऱ्यावरील अन्यायाचे निवारण करुन न्याय दिला. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना जबर शासन दिले. दारु गाळण्याचे व विक्रीचे उद्योग बंद पाडले. याशिवाय ग्रामराज्याने अनेक विधायक कार्यक्रम हाती घेतले. ग्रामसफाई, खादी प्रसार, साक्षरता प्रसार, दारुबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधीवादी विवाह पद्धतीचा प्रसार, अस्पृश्यता निवारण इत्यादी विधायक कार्यक्रमांनी ग्रामराज्य केवळ 'स्वराज्य' न राहता सुराज्य बनले होते. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या जोडीला सांगलीतून नागनाथ आण्णा होते.

**नाना पाटील यांचे प्रतिसरकार संबंधी भूमिका :**

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी चळवळीच्या प्रक्रियेत निर्माण झालेले प्रतिसरकारचे महत्त्व व ग्रामराज्याचे महत्त्व जाणले होते. त्यांच्या मते साताऱ्याच्या जागृत जनतेने स्वयंपूर्ण जो स्वावलंबाचा यत्न पत्करला त्यातून ग्रामराज्याच्या स्थापनेचा एक राजकीय सिद्धांत हस्तगत झाला आहे. हा सिद्धांत देशाच्या मालकीचा झाला आहे. त्याची सुधारणा जोपासना जी करावयाची ती काँग्रेस नेत्यांनी आवश्य करावी. सातारच्या चळवळीने देशाची इभ्रत शंभर पटीनी वाढविली. सर्व नेते तुरुंगात गेलेले असताना काहीच नाही अशा समजुतीने जनता स्वस्थ बसली नाही. तिने दिडशे वर्षाच्या गुलामगिरीने अगोदर आणलेले मानसिक दौर्बल्य आणि न्यूनगंड मागे टाकले आणि स्वयंस्फूर्तीने उठाव केला. या लढ्याने स्वातंत्र्याच्या मार्गावर

आपण निश्चितच चार पावले देशाला पुढे नेले आहे. जनतेत आत्मविश्वास निर्माण झाला. देशाभिमान जतन झाला. या संग्रामाने देशाचा आत्मा सुरक्षित ठेवला.

प्रतिसरकार स्थापन करुन आपण काँग्रेसची सेवाच केली. या लढ्याच्या महान आंदोलनातून ग्रामराज्याचे स्थळ निर्माण केल्याबद्दल सर्व हिंदुस्थानात साताऱ्याला धन्यवाद देत आहेत. ग्रामराज्याचा प्रयोग कितीही अभिनव असला तरी तो अपूर्ण आहे. तो सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रतिकुल परिस्थितीतील अभिनव प्रयोग आहे. त्यातून आजचे खरेखुरे स्वराज्य प्राप्त होणार नाही.

नवे स्वराज्य कशा प्रकारचे असावे, याबाबत नाना आपले विचार व्यक्त करतात. त्यांच्या मते, ''साम्राज्यशाहीच्या बुडत्या काळात हिंदुस्थानात भांडवलशाहीचे राज्य होणार की शेतकऱ्याचे राज्य होणार हा महत्त्वाचा प्रश्न कार्यकर्त्यांपुढे उभा आहे. 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व महात्माजींनी मान्य केल्यामुळे शेतकरी राज्याचा पाया घालणेचे कार्य नक्की हातात घेतले आहे. परंतु या गोष्टी तितक्याशा सोप्या नाहीत. आपल्या हिंदुस्थानातील निरक्षर शेतकरी समाज पाहिला की 'या भोळ्या देवाची लक्ष्मी हिरावून नेणार नाही ना?' अशी शंका येते. शेतकरी राज्याची मुहुर्तमेढ ज्या दिवशी रोवली जाईल त्याच दिवशी कामकरी राज्यही निर्माण होणार यावर सर्वांनी विश्वास ठेवावा. शेतकरी कामकरी राज्य म्हणजे ग्रामराज्य, लोकराज्य अशी मी व्याख्या करतो आणि या भावी स्वराज्यामध्ये हिंदु-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य हे सर्व भेद मावळून जातील याची मला खात्री आहे.''[३९]

नानांच्या हिंदुस्थान व शेतकरी, कष्टकरी मजूर, दलित, मुसलमान जनतेच्या विषयी अनेक अपेक्षा असून त्या पूर्ण होण्यासाठी ते शेवटपर्यंत कार्यरत राहिले. पुढील भाषणात, पुढील म्हणजे भविष्यकाळात उभा राहणाऱ्या आव्हाना संदर्भात म्हणतात – ''भावी काळात तुम्ही शेतकरी असाल तर शेतकऱ्यांची सेवा करुन त्यांच्या पोलादी संघटना करा, नोकर, विद्यार्थी, कामगार यांच्याही संघटना बांधाव्यात, ग्रामराज्याच्या पालकांनो, तुम्ही

प्रत्येक खेड्यातील रस्ते सुधारा, साक्षरता वाढवा, शेतीची पद्धतशीर लागवड करा, कापड व धान्याच्या बाबतीत प्रत्येक गाव स्वावलंबी झाला पाहिजे. उकिरड्यावर बसलेली खेडी ग्रामराज्यातील नंदनवने बनली पाहिजेत.''[४०]

अशा रितीने नाना पाटील यांची आत्मीयता, तळमळ व स्वातंत्र्यानंतर ग्रामजीवनाची कल्पना दिसून येते.

थोडक्यात सांगली सातारा हा जिल्हा महाराष्ट्राच्या प्रमुख ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार तर आहेच, त्यापेक्षा क्रांतिकारक आणि परिणामकारक कृती करण्यावर भर देणारा प्रदेश आहे. क्रांतिची चळवळ व लोकांना स्वातंत्र्याची उपजत जाण असणारा हा प्रदेश आहे म्हणून उमाजी नाईक पासून क्रांतिसिंह नाना पाटील पर्यंत या प्रदेशाने आपली खासियत महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात आणि देशाबाहेर राखली आहे. क्रांतिसिंह नाना पाटलांचे आणि नागनाथ आण्णांचे कार्य महत्त्वाचे होते.

**प्रतिसरकारचे न्यायालयीन कार्य :**

प्रतिसरकारने जे ग्रामराज्य स्थापन केले त्या ग्रामराज्याने न्यायदानाच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र न्यायदान मंडळे स्थापन केली होती. निरनिराळ्या विभागासाठी स्वतंत्र न्यायमंडळे होती. कुंडल गटाचे जे न्यायदान मंडळ होते त्याच्या व्यवस्थेसाठी नाना पाटील यांनी बाबुराव लाड यांची नेमणूक केली होती. सातारा गटात बाबुराव घोरपडे हे न्यायाधीश म्हणून काम पाहत होते. या न्यायदान कमिटीच्या जमिनीसंबंधीचे वाद, चोऱ्या, मारामारी, बलात्काराचे गुन्हे, दारुचे गुत्ते, ज्या बायांना नांदविले जात नाही अशा विविध प्रकरणी न्याय देण्याचे काम करीत. गावोगावची सावकर मंडळी, पाटील मंडळी, कुलकर्णी हे गरीबांच्या जमिनी बळकावित. तसेच गरीबांच्या बायकांची छेड काढीत. तेव्हा अशा घटनांचा खटला या न्यायदान मंडळापुढे चालत असे. गुन्हेगाराला दंड करुन पत्री मारण्याची शिक्षा न्यायमंडळ देत असे. या न्यायदान मंडळाने भराभर अनेक खटल्यांचे निकाल दिले. त्यामुळे गुन्हेगारीला

पायबंद बसला, दारुचे गुत्ते, जुगार, व्यभिचार, भ्रष्टाचार इत्यादीचा नायनाट झाला. गरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळू लागला. न्यायदानाचे काम नि:पक्षपातीपणे आणि सुरळीत चालत असे. त्यामुळे हे ग्रामराज्य अल्पकाळात लोकांच्यात प्रिय झाले. ग्रामराज्याची उभारणी स्वयंपूर्ण व्हावी यासाठी योजना आखली. ग्रामराज्याकडे दाद मागणाऱ्या इसमाने प्रत्येक अर्जाला पन्नास पैसे म्हणजेच आठ आणे फी द्यावी असा नियम होता. अपील करण्यास अधिक किंमत, वाद असल्यास जादा फी घेतली जात असे. ग्रामराज्याच्या घटनेनुसार तडजोड कमिटीची व्यवस्था करण्यात आली होती. ही न्याय व्यवस्था त्रिस्तरीय होती – १. जनता कोर्ट, २. न्यायमंडळ, ३. सर्वोच्च न्यायमंडळ.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देत असतानाच प्रतिसरकारने लोकांचे रक्षण करण्याचे व त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याची बांधिलकी स्वीकारली होती. म्हणून लोकांच्या कल्याणासाठी स्वस्त, नि:पक्षपाती व झटपट न्याय मिळावा म्हणून प्रतिसरकारने गावोगावी न्यायदान मंडळे तसेच गटन्यायदान मंडळे, फिरती न्यायमंडळे आणि जनता न्यायमंडळे स्थापन केली. प्रतिसरकारची ही न्यायव्यवस्था सोपान क्रमित स्वरुपाची होती. अगदी वरती अत्युच्च न्यायमंडळ होते. त्याच्या खाली जनता न्यायमंडळ व गट न्यायमंडळे देण्याचे काम एकटा पंच किंवा गटनायक, सुपरवायझर करीत असे. प्रत्येक न्याय मंडळामध्ये पंच असत आणि ते एकत्र बहुमताने न्यायनिवाडा करीत. न्यायदान मंडळे ही स्थानिक होती, तर इतर न्यायमंडळे ही तशी फिरती होती.

**न्यायदान मंडळ :**

न्यायदान मंडळाला ग्रामपंचायत व गाव कमिटी म्हणूनही संबोधण्यात येत असे. न्यायदान मंडळाच्या सदस्यांची म्हणजेच पंचांची दोन पद्धतीने निवड केली जात असे. लोक त्यांची निवड करीत किंवा लोक जर त्यांची निवड करु शकले नाहीत तर गटनायक आणि सुपरवायझर त्यांची नेमणूक करीत. अशा तऱ्हेची निवड करीत असताना पंचांची कुवत,

शहाणपणा, नि:पक्षपातीपणा, प्रामाणिकपणा, प्रतिष्ठा आणि निर्णय घेण्याची स्वतंत्र बुद्धी या सर्व गोष्टी विचारात घेतल्या जात. सरपंचांची निवड पंच एकमताने करीत असत आणि हा सरपंच सेक्रेटरी म्हणूनही ओळखला जात असे. पदग्रहण करण्यापूर्वी सर्व पंच आपण गावातील तंटे नि:पक्षपातीपणाने मिटवू अशी शपथ घेत. पंचाचे हे पद त्यांच्या चांगल्या वागणुकीवर अवलंबून राही. वागणुकीत बिघाड झाल्याबरोबर सुपरवायझरच्या शिफारशीवरुन प्रतिसरकारची कार्यकारिणी या पदावरुन काढून टाकीत. याशिवाय 'बहिर्जी पथक' न्यायमंडळाच्या कामकाजाविषयी आपला गोपनीय अहवाल सरळ कार्यकारिणीकडे सादर करीत असे. पंच म्हणून कार्य करणाऱ्या गृहस्थांना वेतन किंवा मानधन दिले जात नसे. न्यायदान मंडळाला १८२६ पूर्वीचे खटले निवाड्यासाठी स्वीकारण्याचा अधिकार नव्हता. तसेच काही महत्त्वाच्या बाबी दिवाणी आणि फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार न्यायमंडळाला होता. गावातील ज्या माणसावर अन्याय झाला असेल तो सरळ न्यायमंडळाकडे अन्याय निवारण्यासाठी अर्ज करीत असे. अशा अर्जाची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात येत असे. आठवड्यातील एका ठरलेल्या दिवशी न्यायदान मंडळाची बैठक होत असे. या बैठकीचे अध्यक्ष सरपंच असत आणि ते खटल्यातील दोन्ही बाजूच्या मंडळींना व त्यांच्या पाठीराख्यांना आपले म्हणणे मनमोकळेपणे मांडू दिले जात असे. पंच आणि गावातील इतरांना उघडपणे खटल्यातील दोन्ही बाजूंच्या मंडळींची तपासणी व उलट तपासणी घेण्याची संधी मिळत असे. आणि तसेच ज्याने चूक केली आहे त्याच्या विरूद्ध साक्षही देत असत. याकामकाजामध्ये भाग घेणारे आपली मते निर्भिडपणे मांडत. कारण त्यांच्या पाठीमागे प्रतिसरकारच्या संघटनेचा दबदबा असे. शेवटी सत्य बाहेर येत असे आणि गुन्हेगाराला शिक्षा केली जात असे.

न्याय नि:पक्षपातीपणे दिला पाहिजे आणि निर्णय एकतर्फी दिला जाणार नाही अशी काळजी घेण्यात येई. दिलेल्या निवाड्यापैकी ६० ते ८०% निवाड्यांची आपोआप

अंमलबजावणी केली जात असे. 'उरलेल्या निवाड्याची अंमलबजावणी सामाजिक बहिष्काराने किंवा दहशतवादीच्या दडपणाने होत असे.' दिलेल्या निवाड्याची नावे रजिस्टरमध्ये नोंद करण्यात येत असत आणि खटल्यातील दोन्ही पक्ष निवाडा मान्य आहे म्हणून सही करत किंवा अंगठे उठवित. दिवाणी, फौजदारी बाबीसंबंधी न्याय मंडळाने दिलेल्या निवाड्याविरुद्ध पंधरा दिवसाच्या आत गट न्याय मंडळाकडे अपील करण्याचा अधिकार असे या अपिलाचा काळ संपल्यावरच निवाड्यांची अंमलबजावणी होत असे. सरपंचामार्फत गट न्याय मंडळाच्या अध्यक्षाकडे अपील गुदरण्यात येत असे. गट न्याय मंडळाने निर्णय देईपर्यंत न्याय मंडळाने दिलेल्या निवाड्याची अंमलबजावणी होत नसे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला न्यायमंडळ आपला अहवाल सुपरवायझरला सादर करी आणि सुपरवायझर प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला इन्स्पेक्टरला आपला अहवाल देत असे. याशिवाय न्यायमंडळ स्वातंत्र्य सैनिकांना, गट नायकांना आणि सुपरवायझरना ब्रिटिश शासन विरुद्धच्या लढ्यात मदत करीत. तसेच ब्रिटिश सरकारच्या पाठीराख्यांविरुद्ध आणि समाजद्रोही व्यक्ती विरूद्धही मदत करीत. न्यायमंडळ खेड्यात बरेच रचनात्मक काम करीत असे. या न्याय देण्याच्या पद्धतीमुळे खेड्यातील जीवन आणि मालमत्ता सुरक्षित राहिली होती.

**गट न्यायमंडळाचे कार्य :**

'गट न्याय मंडळात सात ते तेरा सरपंच असतात. गट न्याय मंडळाच्या अध्यक्षाची निवड हे सरपंच सदस्य करीत. अध्यक्षांना सचिव किंवा सेक्रेटरी असेही म्हटले जात असे. गट न्याय मंडळाची बैठक महिन्यातून कमीत कमी दोन वेळा होत असे. बैठकीसाठी आवश्यक कोरम सदस्य सरपंचांचा असे. काही महत्त्वाच्या अपिलांचा विचार करण्यासाठी गट न्याय मंडळ इतर गट मंडळाच्या अध्यक्षांनाही बोलवित असे. गट न्याय मंडळाला अपील चालविण्याचा जसा अधिकार होता, तसाच दिवाणी आणि फौजदारी गुन्हे चालविण्याचा मूलगामी अधिकार होता. गट न्याय मंडळ संबंधित गावाला भेट देत असे आणि

निवाड्यासाठी केलेल्या अपिलाची माहिती त्या त्या गावातील न्यायमंडळाच्या पंचाकडून गावातील प्रमुख मंडळीकडून, सुपरवायझर तसेच खटल्यातील दोन्ही बाजूच्या मंडळीकडून घेत असत. सादर केलेला सर्व पुरावा विचारात घेतल्यानंतर गट न्यायमंडळाकडे अध्यक्ष आपला निर्णय देत.' गट न्याय मंडळाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्याय मंडळाकडे अपील करण्याचा कोणताही अडसर नव्हता. तथापि, दाव्यातील मालमत्तेची किंवा मिळकतीची किंमत पाचशे रुपये पेक्षा कमी असल्यास संबंधितांना अपील करण्याचा अधिकार नव्हता. अपील करण्याची मुदत पंधरा दिवसांची होती आणि अपील हे गट न्याय मंडळाच्या अध्यक्षामार्फत सर्वोच्च  न्याय मंडळाकडे करावे लागे. जनता न्यायमंडळाइतके गट न्यायमंडळ हे लोकात लोकप्रिय नव्हते.

**जनता कोर्ट :**

फिरते न्यायमंडळ किंवा जनता कोर्ट यांचे प्रमुख सुपरवायझर आणि गटनायक असत. स्वातंत्र्यसैनिक आणि राष्ट्र सेवादलाचे सैनिक हे या न्यायमंडळाला मदत करीत असत. लोकांना दिवाणी व फौजदारी खटले सरळ जनता कोर्टाकडे नेण्याची मुभा होती. जनता कोर्टाच्या निवाड्याविरुद्ध सर्वोच्च न्यायमंडळाकडे अपील करण्याचा  अधिकार होता. असे अपील निर्णय दिल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सुपरवायझरच्या द्वारा पाठवावे लागत असे. स्वातंत्र्य सैनिकांना आपल्या कार्यक्षेत्रातील गावांचा दौरा करुन तक्रारी अर्ज गोळा करण्याचे आदेश दिले जात असत. सर्व अर्ज एकत्र वाचल्यावर असे दिसते की, जिल्ह्यात काँग्रेसच्या नावाने प्रतिसरकार काम करीत होते आणि सर्व न्यायमंडळे ही प्रतिसरकारने स्थापन केलेली होती. तसेच दिलेल्या निवाड्यांची अंमलबजावणी ही दम देवून किंवा प्रत्यक्ष हिंसात्मक कार्य तसेच दंडात्मक कार्यवाही करुन करण्यात येत असे. ज्या माणसांनी या न्याय मंडळाकडे तक्रारी अर्ज केले होते, त्यांनी आपले खटले मिटविण्यासाठी प्रतिसरकारची मदत मागितली होती. स्वातंत्र्य सैनिकांद्वारे तक्रारी अर्ज गोळा केल्यावर फिरते न्यायमंडळ किंवा

जनता कोर्ट गावोगावांना रात्री-अपरात्री भेटी देत आणि खटले निकाली काढत. या न्यायमंडळाच्या सदस्यांबरोबर प्राणघातक स्वरुपाची शस्त्रे असत. न्यायमंडळ संबंधित गावी पोहोचल्याबरोबर न्यायदान मंडळाच्या पंचांना पोलीस पाटलांना गावातील प्रमुख कार्यकर्त्यांना राष्ट्रसेवा दल सैनिकांना आणि खटल्यातील दोन्ही बाजूकडच्या मंडळींना बोलावित. जनता कोर्टाची बैठक गावातील देवळात किंवा चावडीत भरत असे. कोर्टाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी काही वेळा रिव्हॉल्वर व बंदुका दाखविल्या जात. क्वचित हवेत बारही काढण्यात येत. दोन्ही बाजूकडील मंडळींचे व इतरांचे म्हणणे ऐकल्यावर त्याच जागेवर निर्णय देण्यात येत असे आणि दिलेला निर्णय हिंसात्मक रितीने किंवा भिती दाखवून मान्य करण्यास भाग पाडीत. दिलेले निर्णय मान्य झाले म्हणून तक्रारी अर्जावर खटल्याच्या दोन्ही बाजूच्या मंडळींच्या सह्या किंवा अंगठ्याचे ठसे घेतले जात असत. खटल्याच्या दोन्ही बाजूच्या मंडळीकडून खटला चालविण्याची फी घेतली जात असे. काही वेळा काही काँग्रेस कार्यकर्ते जनता कोर्टाला पाचारण करुन आपल्या बाजूने न्याय मिळवत असत. अशी उदाहरणे अपवादात्मक स्वरुपाची होती. तो काही नियम नव्हता. शिवाय सर्वोच्च न्यायमंडळाकडे अन्याय झाल्यावर अपील करण्याचा अधिकार होता. न्यायदान मंडळे आणि गट न्यायमंडळे यापेक्षा फिरती न्यायमंडळे लोकांच्यात अधिक प्रिय होती, त्याचे कारण या न्यायमंडळात प्रति सरकारच्या कार्यकारिणीतील काही मंडळी असत आणि अन्याय झालेल्या लोकांना ताबडतोब योग्य आणि स्वस्त न्याय मिळे.

**सर्वोच्च न्यायमंडळ :**

सर्वोच्च न्यायमंडळात प्रतिसरकारच्या कार्यकारिणीचे सदस्य असत आणि त्यांचे कार्यक्षेत्र जिल्हाभर असे. त्यांची सत्ता इतर न्याय मंडळापेक्षा व्यापक असे. सर्वोच्च न्याय मंडळाकडे वर निर्देश केलेल्या न्याय मंडळाने निवाड्याविरूद्ध अपील हे गट न्याय मंडळाच्या अध्यक्षामार्फत सर्वोच्च न्यायमंडळाकडे करावे लागे. जनता न्यायमंडळाइतके गट न्यायमंडळ

हे लोकात प्रिय नव्हते. फिरते न्याय मंडळ किंवा जनता कोर्ट यांचे प्रमुख सुपरवायझर आणि गटनायक असत. लोकांना दिवाणी व फौजदारी खटले सरळ जनता कोर्टाकडे नेण्याची मुभा होती. जनता कोर्टाच्या निवाड्या विरूद्ध सर्वोच्च न्यायमंडळाकडे अपील करण्याचा अधिकार होता. असे अपील निर्णय दिल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सुपरवायझरच्या द्वारा पाठवावे लागत असे. स्वातंत्र्य सैनिकांना आपल्या कार्यक्षेत्रातील गावांचा दौरा करुन तक्रारी अर्ज गोळा करण्याचे आदेश दिले जात. असे सर्व तक्रारी अर्ज एकत्र वाचण्यावर भर असे. जिल्ह्यात काँग्रेसच्या नावाने प्रतिसरकार काम करीत होते. सर्व न्याय मंडळे ही प्रतिसरकारने स्थापन केलेली होती. तसेच दिलेल्या निवाड्याची अंमलबजावणी करण्यात येत असे. ज्या माणसांनी न्यायमंडळाकडे तक्रारी अर्ज केले होते, त्यांनी आपले खटले मिटविण्यासाठी प्रतिसरकारची मदत मागितली होती.

सर्वोच्च न्याय मंडळाच्या खाली इतर न्याय मंडळे काम करीत आणि त्यांनी वेळोवेळी जाहीर केलेले सर्व नियम सर्व न्याय मंडळावर बंधनकारक असत. प्रतिसरकारच्या प्रमुखांना 'डिक्टेटर' असे म्हटले जात असे. ते सर्वोच्च न्याय मंडळाच्या सभेचे अध्यक्ष म्हणूनच कामकाज पाहत. या बैठकीला प्रतिसरकारच्या कार्यकारिणीचे सदस्य ज्या न्याय मंडळाच्या निवाड्याविरोधी अपील करण्यात आले त्या न्यायमंडळाचे सदस्य आणि खटल्यातील दोन्ही बाजूतील मंडळींना आपले म्हणणे स्वत:च किंवा आपल्या प्रतिनिधींना मांडण्याचा अधिकार होता. समोर सादर केलेले म्हणजे खालच्या न्याय मंडळाचे मत या दोन्हीचा विचार करुन सर्वोच्च न्याय मंडळ आपला निकाल देत असे. सामान्यत: त्याने दिलेला निर्णय अंतिम असे. परंतू जर काही नवीन पुरावा सापडला गेला किंवा एखाद्या मुद्यावर चर्चा अनावधानाने राहिली असे निदर्शनास आणल्यावर संबंधित खटल्याचे कामकाज पुन्हा सुरु करण्यात येई. यानंतर दिलेला निर्णय हा अंतिम असे. वर निर्देश केलेल्या न्याय मंडळाच्या चौकशीच्या अहवालावरुन आणि न्यायमंडळे चालवित असताना पकडलेल्या लोकांच्याकडून

पोलिसांनी बराच पुरावा गोळा केला. त्या आधारे असे मत तयार करण्यात आले की, अशा तऱ्हेची न्याय मंडळे चालविणे होय. न्याय देण्याचा अधिकार हा वैदिक दृष्ट्या ब्रिटिश राजाचा असल्यामुळे अशा न्याय मंडळाची स्थापना करणे म्हणजे राज्याचे सार्वभौमत्व हिरावून घेण्याचा हा एक प्रयत्न असे समजण्यात आले. भारतीय दंड विधानाच्या १२१'अ' या तरतुदीनुसार या न्यायमंडळाच्या पदाधिकाऱ्यांविरोधी खटले भरावेत असा विचार काही काळ साताऱ्यातील ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांच्या मनात घोळत होता. परंतू वस्तुस्थिती अशी होती की, 'न्याय मंडळाकडे सादर केलेल्या तक्रारी अर्जाचे स्वरूप हे न्यायमंडळांनी न्यायमंडळांना तक्रारीचे निवारण करण्याचे केवळ नियंत्रण होते. त्यामुळे संबंधित कायद्यातील कोणत्याही तरतुदीचा भंग होत नव्हता.' ब्रिटिश कोर्टात न जाता गावातील तंटे सोडविण्याचा अधिकार हा काँग्रेस कार्यकर्त्याला होता. अशा तऱ्हेने चालविलेली न्याय मंडळे म्हणजे ग्राम राज्य चालविणे असाही अर्थ जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी घेतला. ही वस्तुस्थिती होती. सातारा जिल्ह्यात या न्याय मंडळाद्वारे ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी झाला होता.

**लोकशाही कारभार :**

प्रतिसरकारच्या कारभाराची धोरणे व मर्यादा आणि कक्षा ठरविण्यात आल्या होत्या. पूर्णपणे लोकशाही कारभार चोखपणे चालवून दाखवित न्यायनिवाडा करणे, अन्नधान्य, बाजार व्यवस्था, पुरवठा करणे, वाहतूक वगैरेच्या बाबतीत खाजगी व्यापारी वा सरकारी संस्था यांना पूर्ण मुभा ठेवणे, त्यांना संरक्षण व प्रोत्साहन देणे, सावकारी जबर व्याज व कर्ज फेडीचे जुलूम देण्या-घेण्याचे व्यवहार, फौजदारी स्वरुपाचे गुन्हे, स्त्रियांविषयक गुन्हे वा अन्याय इत्यादी बाबी न्यायदानात समाविष्ट करण्यात आल्या होत्या. त्यांची योग्य माहिती मिळविणे, तपास करणे, खबर मिळविणे या कामासाठी केंद्राने 'बहिर्जी पथक' व 'तुफान सेना' या संघटनांची निर्मिती केली होती. त्यांनी लोकांच्यात फिरुन तक्रारी, गाऱ्हाणी या संबंधीच्या माहितीची छाननी करुन स्थानिक कमिटीला वारंवार अहवाल द्यावेत आणि त्या

आधारे स्थानिक सार्वत्रिक सभा व वरिष्ठ पातळीवर विरोधी अपील व्यासपीठ अशी रचना करण्यात आली होती. 'सातारा प्रतिसरकारने पूर्णपणे लोकशाही कारभार लोकांना दिला. त्यामुळे ते ग्रामराज्य झाले.' प्रतिसरकारच्या लोकराज्यामध्ये 'तुफान सेना' तडजोड समिती आणि न्याय मंडळे संरक्षणाचे तंटे मिटविण्याचे व सुधारणा करण्याचे आणि न्याय देण्याचे कार्य करीत होते. परंतु शासनाच्या या तिन्ही घटकांच्यामध्ये अगदी काटेकोर सत्ता विभागणी झालेली नव्हती. शिवाय एकच मनुष्य दोन-दोन ते तीन-तीन वेळा मंडळाचा सभासद असे. त्यामुळे कधी-कधी 'तुफान सेना' न्यायदानाचे काम करताना दिसते. १९४६-१९४७ पर्यंत साताराचे प्रतिसरकार होते आणि प्रतिसरकारला नष्ट करणे इंग्रजांना शक्य झाले नाही. १९४७ साली भूमीगत नाना पाटील प्रकट झाले. त्यांनी त्यानंतर केलेल्या वेगवेगळ्या भाषणांतून प्रतिसरकारचे महत्त्व स्पष्ट होते. नाना पाटील प्रकट झाल्यानंतर स्वातंत्र्याचे सेवक बना असे एका सभेत म्हणाले. "...गुंडांपासून व दरोडेखोरांपासून त्रास झालेल्या आम जनतेचे आशीर्वाद आमच्या ग्रामराज्याच्या स्थापनेला कारणीभूत झाले आहेत. हे मी या ठिकाणी सर्व जगाला सांगू इच्छितो. ब्रिटनचे हात युद्धात गुंतले होते. म्हणूनच नव्हे तर नेहमीच दरोडेखोरापासून व गुंडांपासून जनतेचा बचाव नोकरशाहीला करता आला नाही. विशेषत: युद्धाच्या विजयाकडे नोकरशाहीचे लक्ष लागल्यानंतर दरोडेखोरांनी जनतेवर नाहक अनन्वित अत्याचार केले, म्हणून आम्हांस कमरा बांधाव्या लागल्या."[४१] अशा रितीने स्वातंत्र्य संग्रामाच्या रणशिंगात ते आपले छोटेसे कार्याची दखल लोकांना करुन देतात.

**संदर्भ :**


१. जोशी लक्ष्मणशास्त्री : संपा. मराठी विश्वकोश, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, खंड ८, पृष्ठ ८८८

२. उपरोक्त, पृ. ८८८

३. तिजारे रा. अ. व घांगेरकर चि. ग. (१९९९) : राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, पृष्ठ – १५०

४. उपरोक्त, पृ. १५३

५. कोगनोळे विजय (१९९२) स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप, पृष्ठ–७

६. पाटील रा. तु. – सांगली साताऱ्याचे राजकारण, पृष्ठ – ५

७. कोगनोळे विजय (१९९२) सांगली जिल्ह्याचा पूर्वेतिहास, पृष्ठ – ५

८. माटे गो. रा. – असा घडला सातारा जिल्हा, पृष्ठ – ५

९. कोगनोळे विजय (१९९२) सांगली जिह्यातील स्वातंत्र्यलढा, पृष्ठ – ६

१०. उपरोक्त, पृष्ठ – ६

११. उपरोक्त, पृष्ठ – ८३

१२. कोगनोळे विजय (१९९२) सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, पृष्ठ –६

१३. पाटील रा. तु. (१९९०) सांगली साताऱ्याचे राजकारण, पृष्ठ – ४

१४. गरूड अण्णासाहेब व सावंत (२०००) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, पृष्ठ – ९२

१५. कोगनोळे विजय (१९९२) सांगली साताऱ्याचे भौगोलिक महत्त्व, पृष्ठ – ६

१६. कोगनोळे विजय (१९९२) सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, पृष्ठ –६

१७. उपरोक्त, पृष्ठ – २६

१८. पाटील रा. तु. (१९९३) पेशवाईची सातारा आवृत्ती, पृष्ठ – १९

१९. कोगनोळे विजय (१९९२) स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप, पृष्ठ – ११

२०. पाटील डी. बी. (२००२) – असे लढले क्रांतिवीर, प्रसाद वितरण दालन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – ३

२१. पाटील उत्तमराव (१९८७) : क्रांतिपर्व, लोकमानस प्रकाशन धुळे, पृष्ठ – ३०७

२२. लाड जी. डी. (१९८६) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – १००

२३. गेल ऑमव्हेट  सातारचे प्रतिसरकार, पृष्ठ – २२४

२४. कोगनोळे विजय (१९९६) सांगली सातारा विजय लढा, पृष्ठ – २२

२५. गेल ऑमव्हेट – १९४२ चा लढा आणि साताऱ्याचे प्रतिसरकार, पृष्ठ – २४०

२६. लाड जी. डी. (१९८६) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – १८५

२७. पाटील विलास (१९८६) : क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ, हनमंत वडिये, सांगली, पृष्ठ – १३८, १३९

२८. पाटील उत्तमराव (१९८७) : क्रांतिपर्व, लोकमानस प्रकाशन, धुळे, पृष्ठ – ३०७

२९. पाटील नाना, पृष्ठ – २२७

३०. ठोके मो. नि. (१९८५) श्रमिकांचा कैवारी, पृष्ठ – ४२

३१. कारेकर म. सु. (१९७७) : वि. सा. नवलकर प्रकाशन, पुणे, पृष्ठ – २४०

३२. केळकर श्रीपाद (१९८३) : छोडो भारत १९४२, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृष्ठ – २५

३३. शिवणीकर राघव (२००२) : सातारचा सिंह, एस. एस. आधारे, द विजय हौसिंग सोसायटी पुणे, पृष्ठ – २४६

३४. उक्त पृ. क्र. ३१६, ३१७

३५. उपरोक्त पृष्ठ – २२७, २२८

३६. प्रधान ग. प्र. (१९८६) स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, पृष्ठ – २२९

३७. पाटील विलास (१९८६) : क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ, सांगली, प्र. आ., पृष्ठ – १७६

३८. शिवणीकर राघव (२००२) : सातारचा सिंह, एस.एस. आधारे, द विजय हौसिंग सो. पुणे, पृष्ठ – ३३६, ३३७

३९. पाटील उत्तमराव व लाड आप्पासाहेब (१९८७) : क्रांतिवीर नाना पाटील, लोकमानस, धुळे, पृष्ठ – १५६

४०. पाटील दिनकर (डॉ. प्राचार्य) (१९८९) मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील, किर्ती प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ – ४१

४१. पवार जयसिंह – हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृष्ठ – १९३

## प्रकरण तिसरे

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान

सांगली जिल्ह्यातील क्रांतीकारी नेतृत्वासंदर्भात विचार करावयाचा झाला तर स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सांगली हा जिल्हा नव्हता. त्यावेळी सातारा, सांगली मिळून सातारा अस्तित्वात होता. शिरवळपासून जत, उमदीपर्यंत एकच जिल्हा होता. सांगली विभागाला दक्षिण सातारा जिल्हा मानले जायचे. त्याकाळी सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारची चळवळ १९४३ ते १९४६ या काळात चालविली गेली. या चळवळीतूनच प्रामुख्याने ग्रामीण नेतृत्वाचा उदय झाला. १९२८ ला भारतभर झालेल्या 'सायमन गो बॅक' चळवळीतून भारतभर ग्रामीण विभागातून बहुजन समाजातून नेतृत्वाचा उदय झाला. तत्कालीन सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील, पांडु मास्तर, बर्डे गुरुजी, किसनवीर गणपतराव पाटील (बिळाशीकर), बाबुराव घोरपडे, सातारचे गांधी बाबा, पांडुरंग पुजारी, रामानंद भारती, आर.पी. पाटील, दिनकरराव निकम, वि.स. पागे, महादेवराव बटाणे, रामचंद्र मारुती तथा ज्ञानुबुवा गुरव, दादा भोकरे असे १९३० च्या चळवळीतून पुढे आलेले ज्येष्ठ नेते.

१९४२ च्या चळवळीत उदय पावलेले वसंतराव दादा पाटील, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, हुतात्मा बाबुजी पाटणकर, क्रांतिवीर भगवानराव बाप्पा मोरे, वाय.सी.पाटील, कॉ.रावसाहेब कळके, धोंडीराम बापू माळी, भाई गणपतराव कोळी, बबनराव जाधव, ईश्वरबुवा गुरव असे कितीतरी नेते कार्यकर्ते स्वातंत्र्योत्तर काळात राजकारण, समाजकारण, सहकार, अर्थकारण, शिक्षण, संस्कृति, कामगार चळवळ अशा विविध क्षेत्रात कार्यरत राहिले. स्वातंत्र्य चळवळीतून उभा राहिलेले एकूणच नेतृत्व, मग ते कोणत्याही पक्ष, संघटनेत असो, कमालीचे निर्भय होते. लढावू, कष्टाळू, आशावादी हाते. ''भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही जगातील मानव वंशाला दीर्घकाळ मार्गदर्शन करणारी चळवळ

आहे. मानव वंशाच्या इतिहासातील ही 'उजळती प्रकाश रेषा' आहे. या चळवळीतून देशाला आणि जगाला नेतृत्व देणारे नेते पुढे आले. गांधी, नेहरु, सुभाषचंद्र बोस, जयप्रकाश नारायण, एम.एन.रॉय, कॉ.एस.ए. डांगे, कॅप्टन लक्ष्मी, अरुणा असफअली, राम मनोहर लोहिया, एम.ई.एस. नंबुद्रीपाद, व्ही.के.कृष्ण मेनन, बसवपुत्रया, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण अशी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरची नावे घेता येतील.''[१]

८ ऑगस्ट १९४२ साली नागनाथ अण्णा कोल्हापूरमध्ये शिक्षण घेत होते. स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार सर्व देशभर झाला होता. देशामध्ये दोन गटांत स्वातंत्र्य चळवळ विभागलेली होती. यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधींना अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवायचे असा विचाराचा एक गट आणि सुभाषचंद्र बोस यांचा ठोशास ठोसा देण्याच्या विचाराचा दुसरा गट निर्माण झाला. या दरम्यान महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली चलेजाव चळवळ संघटित झाली. तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सेना स्थापना केली होती, त्यावेळी नागनाथ (अण्णा) नायकवडी आणि त्यांच्याबरोबर असणाऱ्या सहकाऱ्यांनी भारत स्वातंत्र्य संग्रामात आपले मित्रांसमवेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या तत्त्वाप्रमाणे ठोशास ठेसा द्यायचा चंग बांधला.

अशा नेतृत्वाच्या सहकार्याने क्रांतीवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी हे स्वातंत्र्य भावनेने भारावून गेले. क्रांतीवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी याचवेळी क्रांतीकारक मार्गाने वाटचाल करावयाचे असे ठरवले. अशा पद्धतीने त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. येडेमच्छिंद्र गावचे क्रांतीसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, कुंडलचे जी. डी. (बापू) लाड, सांगलीहून वसंतराव (दादा) पाटील, वाईहून किसनवीर, बर्डेमास्तर, जोशीकाका, नाथाजी लाड, डॉ. उत्तमराव पाटील, पांडूतात्या, बापूजी पाटणकर,शेख काका, बुवा म्हावशीकर, कासेगावकर, वैद्य, अच्युतराव पटवर्धन, हिंदुराव पाटील, रंगोबा रायते, बाबुराव चरणकर, गणपतराव पाटील,अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, शिरूभाऊ लिमये, बी. एस.

गायकवाड, सखाराम मगदूम, बिरनाळे, व्ही. एस. पाटील, ईश्वरबुवा गुरव, रानूताई बिरनाळे इत्यादी नेत्यांनी भूमीगत होऊन समांतर असे प्रतिसरकार निर्माण करण्यासाठी रेठरे बुद्रुक गावी एक व्यापक बैठक होऊन स्वयंशासन स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये क्रांतीवीर नागनाथ अण्णांचाही सहभाग होता.

अण्णांनी या लढ्यात सहभागी होवून इंग्रजांना दहशत बसवली. या कार्यात अण्णा उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. त्यांनी शिक्षण घेत असतानाच सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते गोळा केले होते. देशाला स्वतंत्र करण्यासाठी अण्णांनी आपले घरदार सोडून सहभागी झाले. यावेळी अण्णांचे वडील रामचंद्र नायकवडी यांनी जबरदस्त विरोध केला. अण्णांच्या मातोश्री व त्यांना शारीरिक मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यांच्या आईच्या प्रेरणेने दि. ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईला होणाऱ्या काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनाची बातमी वाचली. काही झाले तरी या महत्त्वाच्या अधिवेशनाला जायचेच असा निर्धार करुन नेत्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांसह जायचे ठरवले होते. विद्यार्थी दशेत असणाऱ्या अण्णांना अधिवेशनाचे निमंत्रण असणे शक्यच नव्हते. अधिवेशनाची जागा बंदिस्त होती. अशा परिस्थितीत आत कसे जायचे असा प्रश्न तयार झाला. भिंतीच्या बाहेर एक झाड होते त्या झाडावर चढून त्यांनी अधिवेशन परिसरात उडी घेतली. खादीधारी स्वयंसेवकाचा वेश असलेले नागनाथ नायकवडी स्वयंसेवकांमध्ये मिसळून गेले. ‘छोडो भारत’ करेंगे या मरेंगे या घोषणा पंडित जवाहरलाल नेहरुंच्या भावनाप्रधान आणि जोषपूर्ण भाषणांमधून त्यांनी ऐकल्या. सर्व नेत्यांना अटक झाल्यावर मुंबईला उसळलेल्या असंतोषाचा जनसागराचा दर्या खवळलेला पाहिला. देशभर उफाळून आलेल्या चळवळीच्या बातम्या वाचल्या आणि अण्णा एक ठाम निर्णय घेऊन आपल्या भागामध्ये परत आले.

**नागनाथ (अण्णा) नायकवडी यांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग :**

स्वातंत्र्याचा लढा हा कष्टप्रद होता. त्यातही सुसंघटित आधुनिक शस्त्रांनी सज्ज आणि कवायती प्रशिक्षण घेतलेल्या सैन्याचा मोठा ताफा ब्रिटीशांकडे होता. परंतु असे असताना या साम्राज्याच्या मुळाशी वर्मी घाव घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतीय क्रांतीकारकांनी केलेला होता. त्यामध्ये सांगली व सातारा परिसरातील ज्या क्रांतीकारी कारवाया होत. त्यामध्ये नागनाथअण्णांचा सिंहाचा वाटा होता. छ. शिवरायांवर ज्याप्रमाणे जिजामातेचा प्रभाव होता तसाच प्रभाव अण्णांवर आपल्या आईचा होता. प्रामुख्याने ''ज्याप्रमाणे जिजामाताने बाल शिवाला स्वराज्याचे तोरण बांधण्यासाठी प्रेरणा, प्रोत्साहन दिले त्याप्रमाणे लक्ष्मीबाईंनी बाल नागनाथला भूमीगत चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा दिली.''[२] १९४२ मध्ये वाळवा गटामध्ये सर्वश्री नागनाथ (अण्णा) कामेरीचे एस.बी. पाटील, वाळव्याचे रामचंद्र कृष्णाजी विभूते, अंकलखोपचे बळवंतराव जीवलग सहकारी किसन अहिर, शिगावचे रंगराव पाटील, आष्ट्याचे साहेबजी बाळा सनदे, वाळव्याचे तुकाराम कृष्णा नायकवडी,शंकर हरी परुळेकर इत्यादी सहकारी जमवले होते त्याचबरोबर कुंडलचे जी. डी. (बापू) लाड, बाबुराव चरणकर, यशवंतराव चव्हाण, परम स्नेही वसंतराव पाटील (परमाळे) वाईचे किसनवीर, गोटखिंडीचे गणपतराव (गुरुजी) पाटील, वाटेगावचे बर्डे (गुरुजी), लक्ष्मणराव धन्वंतरी ऊर्फ कासेगावकर वैद्य, कामेरीचे के. डी. पाटील असा असंख्य प्रमुख सहकाऱ्यांचा समावेश होता. त्याचमध्ये जीवाला जीव देणारे कामेरीचे वाय. सी. पाटील यांनाही हाताशी धरले. त्याचबरोबर अण्णांचे कुंडल येथील लाड घराण्याशी स्नेहाचे संबंध होते.

**अण्णांचे कुंडलच्या लाड घराण्यासी स्नेहबंध :**

नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्याबरोबर कुंडलचे लाड घराणे व त्यांचे सहकारी भूमीगत चळवळीत सहभागी झाले. महत्वाचे म्हणजे कुंडल गटाचे प्रमुख सर्वश्री नाना

पाटील हे भूमीगताचे मुख्य सूत्रधार होते. नाना पाटील यांच्या मार्गदर्शनाने अण्णांनी कुंडल परिवाराशी व कार्यकर्त्यांशी आपले कार्य सिद्धीस जाण्यासाठी ऐक्य साधले. ज्याप्रमाणे राजकारण आणि सत्ता यांचा स्नेहसंबंध असतो त्याप्रमाणे अण्णा आणि कुंडल परिवार यांच्याशी स्नेहबंध होता शेवटपर्यंत त्यांनी तो ठेवला. ''कुंडल गटामध्ये १९४२-४३ साली जी. डी. ऊर्फ बापूसाहेब लाड क्रांतीअग्रणी होते.''[३] त्यांच्या सोबत स्वामी रामचंद्र भारती, वाय. सी. पाटील, भगवानराव पाटील, बाबुराव गोविंद लाड, रामचंद्र श्रीमती लाड, अप्पा चंदू लाड, आर. बी. लाड, शंकर लाड, आप्पासाहेब लाड, नाथाजी लाड, रामभाऊ पवार (मामा) निवृत्ती कळके, ज्ञानोबा जाधव (ताकारी), कॅप्टन कृष्णराव कुऱ्हाडे व आदाम पैलवान (पलूस), शामराव लाड, आकाराम पवार, आकाराम एडके, निवृत्ती लाड (पैलवान), हंबीरराव धनदडे, धोंडिराम मास्तर, आत्माराम यादव (अळवणी), श्रीधर पिंपरीकर तसेच तासगाव कवठे महांकाळ, जत, कराड इत्यादी तालुक्यातील असंख्य मंडळी या भूमीगत चळवळीत कुंडल परिवाराशी संबंधित होती. ''त्याच बरोबर तासगांव, तालुक्यातील चिंचणीचे दिनकर (आबा) पाटील यांनी स्वा. सैनिक म्हणून या चळवळीत भाग घेतला.''[४] होता हे सुद्धा आपल्याला दिसून येते. अण्णांनी ब्रिटीशांची पे ट्रेन लुटण्याचे धाडस करण्याचे ठरविले, कारण ब्रिटीशांशी लढा देण्यासाठी पैशाची गरज होती.

**पे ट्रेन लुटण्याचे कार्य :**

या भूमीगत चळवळीमध्ये नागनाथ नायकवडी कुंडल परिवाराशी मैत्री करून प्रमुख नेत्यांसह भूमीगत चळवळीमध्ये सहभागी झालेले आढळून येते. त्यांची चळवळी संदर्भात भूमिका स्पष्ट होती. ''१९४३ च्या पहिल्या आठवड्यात विद्यमान परिस्थितीवर विचार करण्यासाठी नाना पाटील व त्यांचे भूमीगत सहकारी एकत्र आले. नागनाथ (अण्णा) नायकवडी आणि जी. डी. (लाड) या दोन भूमीगतांनी या बैठकीमध्ये गनिमी काव्याने युद्ध करण्यासाठी शस्त्रास्त्रे व दारुगोळा मिळवण्यासाठी परवानगी मिळवली.''[५] या दरम्यान

भूमीगतांना पकडून देणाऱ्यास ब्रिटिश सरकारने बक्षीस जाहीर केले. परंतु कोणत्याही भारतीय नागरिकाने बक्षिसाच्या मोहाने दगलबाजी केली नाही. परंतु ''यशवंतराव चव्हाण यांना फलटण येथे दि. १७ मे १९४३ रोजी व वसंतदादा पाटील यांना सांगली येथे १२ जून १९४३ रोजी पकडण्यात आले होते.''[६] वसंतदादा पाटील यांनी १३ जणांसह दि. २४ जुलै १९४३ रोजी सांगलीचे तुरुंग फोडले. आपली ओळख लपवण्यासाठी भूमीगतांनी पडनावे स्वीकारली होती. प्रामुख्याने नागनाथ अण्णा नायकवडी यांनी शस्त्रास्त्रे गोळा करण्यासाठी फौजी संघटना उभारण्याच्या कार्याला सुरवात केली. त्यासाठी आर्थिक मदत आवश्यक होती.

अण्णांनी आपल्या सहकाऱ्यांसह रेल्वे लुटण्याचा निर्णय घेतला होता. रेल्वे लुटीतून जो पैसा येत होता तो सर्व फौजी संघटनेला प्रशिक्षण, त्यांचे जेवण, कपडे, शस्त्रास्त्रे यांसाठी खर्च करीत. अशा पद्धतीने कार्यकर्त्यांसमवेत भूमीगत अवस्थेत राहून सामाजिक कार्याचीही धुरा अण्णांनी सांभाळली. ट्रेन लुटीचे नियोजन करण्यासाठी जी. डी. (बापू) लाड, नाथाजी लाड आणि नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी कुंडल येथे स्वत:च्या घरी भूमीगताची बैठक घेतली त्यामध्ये पे स्पेशल ट्रेन दि. ६ जून १९४३ रोजी लुटण्याचा ठराव करण्यात आला. ''पे स्पेशल ट्रेन लुटण्याचे आयोजन नागनाथ (अण्णा) नायकवडी, जी. डी. (बापू) लाड, नाथाजी लाड यांनी प्रत्यक्ष केले. प्रत्यक्ष लुटीत ज्ञानू संतू जाधव ऊर्फ चौकीवाला ऊर्फ वस्ताद, शंकर बहिरू पाटील, एस. बी. शिंदे, बंडू दाजी लाड, महादेव दौलता जगदाळे, गोपाळ पाटील, रामू तात्या, शामराव जाधव, किसन साखर, आप्पा गणू पाटील व इतरांचे सहकार्य मिळाले.''[७]

गाडी लुटण्याची निवडलेली जागा मोठी जोखमेची होती. ती म्हणजे रेल्वे गाडीचे ये-जा करण्यासाठी मैल मे १५२-८-९ या नंबरात दोन्ही टेकड्यांच्या मध्ये खोदलेला एक बोळ होता. हा बोळ कुठूनही दिसत नव्हता. मध्यरात्री कुंडलहून निघालेले साधारण ४५ ते ५० भूमीगत दि. ७ जून १९४३ रोजी सूर्योदयापूर्वी नियोजित ठिकाणी पोहोचले. पोहोचल्यावर परत

एकदा जागेची पाहणी करण्यात आली. काम पद्धतशीरपणे उरकण्यासाठी नियोजनकर्त्यांनी चार तुकड्या करण्यात आल्या. एक तुकडी नाल्यात, दुसरी मोरीच्या खाली, तिसरी कॅच वॉटर ड्रेनमध्ये हे कॅचवॉटर ड्रेन वळणावर बोळाच्या मध्यावर दहा फूट उंचावर होते. तेथून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या स्पष्ट दिसत होत्या. चौथी तुकडी गस्त घालणाऱ्यांना बंदोबस्त करण्यासाठी पाठवली. दि. ७ जून १९४३ रोजी पे स्पेशल ट्रेन मिरजच्या स्टेशनवरुन सुटली. कोरेगाव स्टेशनकडे अधीरतेने पळू लागली. पुढे 'बिचूद' स्टेशनात पोहोचली. नंतर शेणोली स्टेशनकडे धावत होती. बोळाच्या माथ्यावरुन पे स्पेशल ट्रेन नियोजित ठिकाणाकडे येताना पाहिल्या बरोबर सर्वांना आपली कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाच गस्तवाल्या पोलिसांना साधारण दोन फर्लांग अंतरावर अटक करण्यात आले. त्यांना केवळ बघ्याची भूमिका करावी लागली. बोळाच्या पलीकडील बाजूस रुळावर मोठमोठ्या दगडांचा गराडा रचण्यात आला. असे करण्याचा एक महत्वाचा हेतू म्हणजे गाडी बोळातच थांबवायची होती.

चालकाने दगडाचा ढिगारा पाहून गाडी थांबवली. गाडी बोळात थांबल्या बरोबर मोरीत लपून बसलेले सुमारे १५ भूमीगत उड्या टाकून वर आले. त्यातील तिघे वर चढून इंजिनमध्ये आले. त्या तिघांनी ड्रायव्हरला व जाळण्यांना असा हुकूम दिला. बाकीच्या बारा भूमीगतांनी गाडीला वेढा घातला. त्यापैकी प्रमुख भूमीगतांनी ड्रायव्हर व जाळव्याला आज्ञा करताच बाजूला गेले. त्याच्यावर दोन भूमीगत कार्यकर्त्यांनी पाळत ठेवली. त्यातील एक भूमीगत हे करा ते करा असे आदेश देत होता. एवढ्यात गाडीतील चार ट्रॉलीमन गाडीतून उतरून तो दगडांचा ढिगारा दूर करण्यासाठी गेले. त्याचक्षणी नाल्यामध्ये दबा धरून बसलेले भूमीगत झेपा टाकीत त्यांच्याजवळ गेले. त्यांनी त्या चौघा ट्रॉलीमनना 'परत आपल्या डब्यात जा. डब्याची दारे खिडक्या बंद करून गुमान डब्यात बसा' असा आदेश दिला.

यानंतर काही प्रमुख भूमीगत पे क्लार्कच्या डब्यात घुसले. दबाव आणून पैशाच्या पेट्यांच्या किल्ल्यांची मागणी केली. परंतु पे क्लार्कने नकार दिला तेव्हा भूमीगतानी त्याला

चांगला मार देवून डब्याबाहेर ढकलून दिले. ‘‘भूमीगतांनी १९१७५ रुपये ११ आणेची रक्कम हस्तगत केली. ही रक्कम १०० रुपयेंच्या व दहा रुपये किमतीपेक्षा खालच्या नोटात होती. आणखी काही नाणी त्यात होती. याशिवाय पे क्लार्क व त्यांच्या शिपायांची पंचेचाळीस रुपये किमतीची मालमत्ता लांबविण्यात आली. त्यात पस्तीस रुपये रोख, एक धोतर, बॅटरी यांचा समावेश होता. गमतीची बाब म्हणजे ७६३३ रुपये १० आणे असलेली पैशांची पेटी भूमीगतांच्या लक्षात आली नाही. त्यामुळे ती तशीच डब्यात राहिली.’’[८] गाडीच्या उजव्या बाजूला चाललेला प्रकार पाहू नये म्हणून बंदुकीच्या तीन गोळ्या झाडण्यात आल्या. भूमीगत फक्त इंजिन व पे क्लार्कच्या डब्यात शिरले बाकीच्या कोणत्याही डब्यात त्यांनी प्रवेश केला नव्हता. सर्व भूमीगत तरुण दिसत होते. त्यांच्या पैकी काहींनी गांधी टोप्या घातल्या काही जणांनी आपले चेहरे झाकून घेतले. एक दोघे इंग्रजीत बोलत होते. गाडी केवळ दहा मिनिटांत लुटण्यात आली. पैसे हस्तगत केल्यावर तीस पस्तीस भूमीगत वर निर्देश केलेल्या नाल्यातून एकत्र आले. गस्त घालणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अंदाजे दोन फर्लांग दूर गेलेले भूमीगत त्यांना येथे येवून मिळाले. भूमीगत पूर्व दिशेला जवळ असलेल्या टेकडीवर चढून दिसेनासे झाले. या पद्धतीने सरकारी पैसा लुटण्याचा बेत क्रांतीकारी नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी आखल्यापासून तो प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत अण्णा आपल्या सहकाऱ्यांबरोबर मार्गदर्शकांची भूमिका वठवत होते. ज्याप्रमाणे या क्रांतीवीराने इंग्रजांच्या ताब्यातील खजिना लुटून आझाद हिंद फौजेची स्थापना केली त्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य चालू होते. परंतु पैसा कमी पडू नये म्हणून नवीन योजना त्यांना सुचवत व त्यावर प्रत्यक्ष अंमल करत होते. कुंडल बँक लुटीचे कार्य त्या नवीन योजनेचा भाग म्हणावा लागेल.

**कुंडल बँक लुटीचे कार्य :**

‘‘दि. २६ एप्रिल १९४६ रोजी कुंडल बँकेवर, भूमीगतांनी धाड टाकण्याचे ठरवले. यामध्ये प्रामुख्याने नागनाथ (अण्णा) नायकवडी, जी. डी. (बापू) लाड, गडपती

लाड, तुकाराम कृष्णा नायकवडी, ए. बी. पाटील, शंकर हरी परुळेकर या तगड्या जवानांबरोबर कुंडल बँक लुटण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.''[९] भूमीगतांची चळवळ देश स्वातंत्र्यासाठी पुढे चालू ठेवण्यासाठी कुंडल बँक लुटण्याचा निर्णय पक्का केला. त्याप्रमाणे ह्या सर्व भूमीगतांनी सकाळी आकरा वाजता अचानक बँकेत प्रवेश केला. ''यातील सर्वजण सशस्त्र असल्यामुळे बँक मॅनेजर व कॅशियर हादरले. सर्व प्रथम मॅनेजर व कॅशियरच्या डोळ्यात चटणी टाकून खजिन्यास हात घातला. एक दोघांनी बँकेतील इतर नोकरांच्या छातीस पिस्तुल लावली आणि पाच मिनिटांचे आत बँकेतील सुमारे ५,००० रुपये ऐवज लंपास केला.''[१०] दिवसा ढवळ्या केलेल्या या लुटीमुळे भूमीगतांचा वचक बसला आणि आर्थिक प्राप्तीमुळे भूमीगत चळवळीचा वेग वाढला. भूमीगतांनी साचलेल्या संपत्तीचे गरजेपोटी वाटप केले. त्यांनी केलेली बँकेची लूट योग्य की अयोग्य ते ठरविण्यात त्यांना वेळच नव्हता. येनकेन प्रकारे इंग्रजांना सतत शह देऊन आपल्या देशातून हद्दपार करण्याचा भूमीगतांचा मानस होता. ''वास्तविक भूमीगतांना या मार्गाने गेल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. तेव्हा त्यांच्यावर काही लोकांनी आरोप केले असले तरी त्यांना न जुमानता धैर्याने तोंड दिले. देशाला स्वातंत्र्य करून भारतीय संसदीय लोकशाही शासन व्यवस्था अस्तित्वात आणावयाची होती.''[११] यामुळे अण्णा अशा प्रकारचे कार्य करुन देश स्वतंत्र करण्यासाठी धडपडताना दिसून येतात. त्यातून धुळे खजिना लुटिचा कट आकारास आला.

**स्वातंत्र्यासाठी धुळे खजिन्याची लूट :**

वास्तविक नागनाथ नायकवडी यांनी सर्व घरदार सोडून स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्वत:ला पूर्णपणे झोकून दिल्याचे आढळून येते. सुरुवातीस काही भूमीगतांनी स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करून भूमीगत चळवळी चालवित. तसेच आपल्या जवळच्या नातेवाईकांकडून पैसे उसने घेत. काहीवेळा वर्गणी जमा करण्यात येई. श्रीमंत, सावकार, लघू भांडवलदारांनी सुरुवातीस पैसे दिले. या कामासाठी या भूमीगतांनी एक समिती नेमली.

काही प्रमाणात काँग्रेस समाजवाद्यांनी अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, एस. एम. जोशी आदींनी आर्थिक मदत केली. त्याशिवाय लूटितून काही पैसा जमला होता. प्रतिसरकारने न्यायदानाचे काम सुरू केल्यावर न्याय-निवाडे केल्यावर संबंधित पक्षाकडून शूल्क, दंड वसूल करण्यात येत असे. गावोगावी त्रास देणाऱ्या गाव गुंडाकडून पैसे गोळा करण्यात येत असत. ही रक्कम पुढे कमी पडू लागली. महत्त्वाचा प्रश्न पैशाचा होता. तो सोडवला पाहिजे. तो सोडविण्यासाठी एप्रिल १९४४ च्या पहिल्या आठवड्यात विविध भागातील भूमीगत कार्यकर्त्यांनी एकमताने धुळे खजिना लुटीचा निर्णय घेतला. त्यामध्ये प्रामुख्याने आटपाडीला खादी कार्यालयामध्ये कार्यालयाचे ठाकरे, कापड्याचे काँग्रेसचे कार्यकर्ते यांनी निर्णय घेण्यासाठी भूमीगतांना एकत्र केले. त्यामध्ये प्रामुख्याने विष्णु सिताराम पाटील, नागनाथ नायकवडी, जी. डी. बापू, ज्ञानू संत जाधव ऊर्फ चौकीवाला, नाथाजी लाड व इतर भूमीगत कार्यकर्ते यांचा जवळ जवळचा संबंध आला. त्यामुळे धुळे खजिन्याच्या लुटीसंबंधी निर्णय घेतले.

सातारा खानदेश जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती संबंधी चर्चा करीत असताना पैशाच्या बाबतीत चर्चा चालत. या चर्चेतून एक मताने निर्णय घेण्यात आला. विष्णु पाटील आणि शंकर पांडू माळी यांनी धुळे येथे कोणत्या मार्गाने जायचे हे ठरवून ते आटपाडीतून धुळ्याला पुढे गेले. ‘‘कुंडलचे जी. डी. लाड, वाळव्याचे नागनाथ (अण्णा) नायकवडी, बाळू पाटील, कुंडलचे अण्णा रामा येडेकर, रघुनाथ रावळ, घोंगावचे दत्तू जाधव, दह्यारीचे ज्ञानू संत जाधव, बोगावचे राम ऊर्फ बाळ जोशी, कुपवाडचे धोंडिराम माळी आणि धुळे येथे एप्रिल १९४४ च्या पहिल्या आठवड्यात पोहोचले.’’[१२] तेथे पोहोचल्यावर या भूमीगतांनी दोन गट पाडले. प्रत्येकाला जबाबदारी वाटून देण्यात आली. महत्त्वाची बातमी या भूमीगतांना भाऊराव पाटील यांनी तेथील सरकारी खजिन्यात दीड लाख रुपये आहेत अशी माहिती डॉ. उत्तमराव पाटील यांना दिली. अशी माहिती मिळाल्यामुळे भूमीगतांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

त्याबरोबर दोन गटात भूमीगतांची विभागणी केली. दुसऱ्या गटात नागनाथ (अण्णा) नायकवडी, शंकर माळी, रावसाहेब कळके, किसन मास्तर, धोंडिराम माळी असे चौघे भूमीगत होते. या भूमीगतांनी निर्णय घण्यासाठी धुळे जिल्ह्याच्या हद्दीजवळ थांबले.

''नागनाथ (अण्णा) नायकवडी, जी. डी. (बापू) लाड व विष्णू पाटील यांनी साक्रि या छोट्या शहराची साकरीहून डोंगर गावाला डोंगरगावाहून बोरकुंडला जाणाऱ्या मार्गाची पाहणी तसेच या मार्गावरील पोलीस ठाण्यांची दोन वेळा टेहाळणी केली.''[१३] यावरुन त्यांना नियोजित कामातील आत्मविश्वास वाढला. या विश्वासामुळे खजिन्याची लूट करण्यातील बारीक सारीक तपशील ठविण्यात आला. यामध्ये एकूण सोळा भूमीगतांना होते त्यांच्या तीन तुकड्या केल्या. त्यामधील बारा भूमिगरांनी आपला मुक्काम पांजरपोळ येथील जनावरांच्या गोठ्यात हलवला. येथे धुळे खजिना लुटण्याचा निर्णय पक्का झाला. दयाराम पाटील यांनी या भूमीगत चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांना निरोप पाठविल्याशिवाय त्यांना तारीख व वेळ निश्चित करता आली नाही. या सर्व कार्यक्रम नियोजनात जाण्याचा मार्ग, लुटीचे ठिकाणी, प्रत्यक्ष करायच्या लुटीची पद्धत शेवटच्या क्षणी बदलण्यात आली. एकच गोष्ट बदलली नाही व ती म्हणजे धुळ्याचा खजिना लुटण्याचा निर्धार सर्वांनी नाही तर थोड्या जणांनी प्रत्येक गोष्ट वेळ पडेल तशी व जमेल तशी करावयाची ठरले. या कालावधीमध्ये अनेक अडथळे येत. हे अडथळे पार करीत या भूमीगतांचा कार्यक्रम चालला. पहाटे साडेतीन वाजता टांगा बैलगाडी धुळे येथील गोलचावडी पोलीस स्टेशन जवळ येताच टांगेवाल्याला व गाडीवाल्याला आपली वाहने भरधाव हाका म्हणजे पोलीस आपल्याला अडविणार नाहीत असे सांगण्यात आले. साहजिकच वाहने भरधाव सुटली. वाहने पोलीस चौकीवर न थांबवल्यामुळे ड्युटीवर असणारा कॉन्स्टेबल गार्ड ओरडला, 'वाहने थांबवा.' परंतु त्याच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. परंतु हा पोलीस कॉन्स्टेबल दुप्पट वेगाने एका पुलावर यांना गाठले. आपला हुकून न पाळल्यामुळे कॉन्स्टेबल चिडला. आपल्या पोलिसी आवाजात

त्याने टांग्यात बसलेल्या सर्वांना खाली उतरा असा आदेश दिला. त्यावेळी प्रथम डॉ. उत्तमराव पाटील खाली उतरले. त्यानंतर नागनाथ (अण्णा) नायकवडी जी. डी. लाड, (बापू) आणि आप्पा गणू पाटील हे तिघे ही टांग्यातून उतरले. कॉन्स्टेबल टांग्यात काय आहे अशी चौकशी करू लागला. डॉ. उत्तमराव पाटील यांनी त्याला आम्हाला पुढे जाण्यास परवानगी असावी अशी विनंती केली. परंतु त्याने ऐकून घेतले नाही. त्यावळी भूमीगतांजवळ पिशवीमध्ये रिव्हॉल्व्हर वगैरे शस्त्रे होती. कॉन्स्टेबलने या पिशव्यांची झडती घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा हे क्रांतीकारक भूमीगत चांगलेच गडबडून गेले. तेव्हा आपली सुटका होण्यासाठी डॉ. उत्तमराव पाटील यांनी आपली सोन्याची अंगठी व पैशाचे पाकीट त्यांच्यापुढे धरले. पण कॉन्स्टेबलने हात झिडकारला. सामोपचाराने सांगून कॉन्स्टेबल ऐकेना व अमिषाला बळीही पडेना. तेव्हा उत्तमराव पाटील यांनी आपल्या साथीदारांना इशारा केला.

''त्यावेळी लगेच आप्पा गणू पाटील यांनी कॉन्स्टेबलची शिट्टी हिसकावून घेतली. लगेच नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी त्याला एकदम उचलून हवेत उंच धरले व दणकन खाली आपटले. जी. डी. (बापू) लाड यांनी आपल्या रुमालाचा बोळा त्याच्या तोंडात कोंबला व पुलाच्या दुसऱ्या टोकाला त्याला फरफटत नेले. आपल्याला खरपूस मार बसणार या भीतीने कॉन्स्टेबल नरम आला व आपल्यावर दया करावी म्हणून गयावया करू लागला शेवटी त्याला सोडून देण्यात आले. तो जाण्यापूर्वी त्याला सोन्याची अंगठी व पैशाचे पाकिट देण्यात आले. तसेच आमचा विश्वासघात करू नकोस अशी सक्त ताकीद दिली.''[१४] असे विविध अडथळे पार करताना सात भूमीगत धुळ्यापर्यंत जाईपर्यंत वाटेतच मागे राहिले. याचा विचार न करता जे पुढे होते ते पुढेच गेले. पुढे गेलेले आठ भूमीगत शेजारच्या नदीकाठी गेले व कार्यक्रम कसा पार पाडायचा, याचा निर्णय त्यांनी घेतला. मुळात चिमठाणे येथे खजिन्याची लूट करण्याचे ठरले. आता ती जागा बदलण्यात आली. ही नवीन जागा साळवे गावच्या हद्दीत चिमठाण्यापासून दोन मैल होती. हा चढ डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. कारण याच

चढाला गाडीचा वेग कमी येणार, तसेच आजूबाजूला जंगल होते. त्याचा फायदा हा केलेली लूट लपविण्यासाठी झाला. या आठ भूमीगत कार्यकर्त्यांनी दोन गट केले. वास्तविक पहिल्या गटात नागनाथ (अण्णा) नायकवडी, जी.डी. (बापू) लाड, किसन मास्तर, शंकर माळी इत्यादी होते. या गटातील माणसांनी दोन मैलाचे अंतर चालत जायचे व खजिना घेऊन येणारी गाडी चढावर थांबविण्यासाठी खोटी मारामारी, लुटुपुटुची मारामारी करायची, असे ठरले. तर दुसऱ्या गटात धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, आप्पा गणू पाटील व डॉ. उत्तमराव पाटील यांचा समावेश होता. या दुसऱ्या गटाने चिमठाण्यापासून पुढचा प्रवास करुन धुळ्याच्या खजिन्याची सर्व इत्यंभूत माहिती मिळवायची जबाबदारी सोपविली.

''त्याप्रमाणे दुसऱ्या गटाने पाहिजे ती माहिती मिळविली. त्यामध्ये प्रामुख्याने मामलेदाराने दि. १० एप्रिल १९४४ रोजी ट्रेझरी ऑफिसला पत्र पाठविले की, त्यांना धान्य खरेदीसाठी ५,५०,००० रुपयांच्या नोटांचा व १,००० रुपयाच्या नाण्यांचा पुरवठा करावा. ही रक्कम घेण्यासाठी मामलेदार रामदास गोविंद वाणी नावाच्या स्टाफ क्लार्कला बँकेत पाठविणार, असे समजले. ट्रेझरी ऑफिसरने दि. १३ एप्रिल रोजी बँकेला लिहिले की वर निर्देश केलेल्या क्लार्कला ५,५०,००० रुपयांच्या निरनिराळ्या किमतीच्या नोटा व १००० रुपयांची नाणी दिली.''[१५] अशा स्वरुपाची माहिती मिळाल्यावर खजिन्याची बस कोणत्या मार्गाने जाते त्यामध्ये किती ऑफिसर, क्लार्क, गार्ड असतात यांची ही माहिती मिळवली. ज्या ठिकाणी हे भूमीगत कार्यकर्ते रस्त्यामध्ये थांबले. तेथे रस्त्याला चढ होता. खजिन्याची बस दिसल्यावर मारामारी करायची असे ठरले. खजिन्याची बस चढावर आल्याबरोबर ड्रायव्हरने रस्त्यामध्ये दोघे भांडत असलेले पाहिले. त्यांच्याबरोबर इतरही होते. जी. डी. लाड व नागनाथ (अण्णा) नायकवडी हे दोघे भांडत होते. किसन मास्तर, शंकर माळी यांनी रस्त्यावर मारामारी सुरू केली. तेव्हा ड्रायव्हर बाजूला व्हा असे म्हणत ओरडला पण ते बाजूला झाले नाहीत.

उलट ते मारामारी करत राहिले. त्यावेळी आपल्या पिशवीत ठेवलेले रिव्हॉल्वर धोंडिराम माळींनी बाहेर काढले आणि हवेत दोन गोळ्या झाडल्या.

ड्रायव्हरला बस थांबविण्याची ताकीद दिली. ड्रायव्हरने याकडे दुर्लक्ष करुन गाडीचा वेग वाढवला आणि रस्त्यावर मारामारी करणाऱ्या चौघांना ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. यांमुळे धोंडिराम माळी यांना संताप आला. त्यांनी ड्रायव्हरच्या मानेवर गोळी मारली. ''यावेळी रस्त्यावर मारामारी करत असलेले नागनाथ (अण्णा) नायकवडी बसच्या बाजूला आले. नागनाथ नायकवडी यांनी फ्रंट सीटवर बसलेल्या प्रवाशाला बाजूला होण्यास आदेश दिला. तो बाजूला झाला आणि स्टेअरिंग व्हीलच्या दिशेने गोळी झाडली. ती गोळी ड्रायव्हरच्या हाताला लागली. ड्रायव्हरला दोन ठिकाणी जखमा झाल्यामुळे बसवरील त्याचा ताबा सुटला. बस सेकंड गिअरमध्ये असल्यामुळे आपोआपच थांबली.''[१६] दरम्यान कॉन्स्टेबल आणि हेडकॉन्स्टेबल आपले मस्केट उचलून धोंडिराम माळी यांना गोळी मारण्यापूर्वीच धोंडिराम माळी यांनी त्यांच्या पाठीत गोळी घातली. ती गोळी त्यांच्या छातीतून निघून पुढे पडली. त्यांनी मारलेली दुसरी गोळी बसच्या आयर्न बारवर आपटून परत फिरली आणि रावसाहेब कळके यांच्या हाताच्या पोटरीत जाऊन घुसली. रस्त्यावर खोटी मारामारी करणारे चौघे भूमीगत बसमध्ये आले आणि आत असणाऱ्या तिघांना मिळाले. यावेळी या बसमधून प्रवास करणारे प्रवासी अतिशय घाबरले. माराच्या भीतीने जीव वाचविण्यासाठी काही पळून गेले. कॉन्स्टेबलसह काही प्रवाशांना सक्त ताकीद देवून तेथे लिंबाच्या झाडाजवळ बसलेल्या प्रवाशांबरोबर त्यांना बसण्याचा हुकूम दिला. तेव्हा आप्पा गणू पाटील व शंकर माळी हे दोघे हातात पिस्तूल घेऊन या सर्वांवर टेहळणी करीत होते. बसमधील पाच भूमीगतांनी आपला मोर्चा त्यावेळी खजिना घेवून जाणारा रामदास दुल्लभ याच्याकडे वळवला. परंतु त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने 'माझ्याकडे चावी नाही' म्हणाला. नंतर भूमीगतांनी रामदास वाण्याकडे चौकशी केली. त्याने आपले खिसे उलटे करून दाखवले.

त्यांनी 'किल्ल्या नाहीत' असे सांगितल्यावर ताबडतोब भूमीगतांनी मैलाच्या दगडाचा वापर करुन पैशांच्या पेट्या फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु पेट्या फुटल्या नाहीत. त्यावेळी रावसाहेब कळक्यांना एक युक्ती सुचली. त्यांनी बायोनेटच्या सहाय्याने पेट्यांची सिले मोडून काढली आणि बायोमेटचा स्क्रू ड्रायव्हर म्हणून उपयोग करून सर्व पेट्या उघडल्या. त्याचवेळी चिमठाण्याच्या दिशेने शामराव सपडू चालवित असलेला ट्रक तेथे आला. यामध्ये प्रामुख्याने दुसऱ्या गटातील भूमीगत कार्यकर्ते आले. त्यामध्ये डॉ. उत्तमराव पाटील त्यांचे सहकारी सुद्धा होते.

डॉ. उत्तमराव पाटील यांना घडलेला प्रकार लक्षात आला. हेड कॉन्स्टेबल आणि ड्रायव्हर जखमी झाल्याचे पाहून त्याच्या जखमेवर मलम पट्टी बांधण्यात आली. त्यांना पाणी देण्यात आले. डॉ. उत्तमराव पाटील पेट्या फोडत असलेल्या सहकाऱ्याकडे गेले. सर्व पेट्या उघडून त्यातील नोटांच्या थप्प्या वर उचलून काढल्या. आठ भूमीगतांपैकी चौघांनी खाकी हाफ पँटवर नेसलेली धोतरे सोडली आणि नोटा बांधल्या. भूमीगतांनी उरलेली काही नाणी रस्त्यावर टाकली. लिंबाच्या झाडाखाली बसलेल्या प्रवाशांना तुम्ही ती घेऊन जा असे आवाहन केले. ड्रायव्हरला ते म्हणाले, ''आमच्या आदेशाचे पालन केले असतेस तर आम्ही तुला गोळी मारली नसती. शेवटी नोटांची चार गाठोडी उचलत असताना महात्मा गांधी की जय अशी घोषणा सर्व भूमीगतांनी केली आणि ते पश्चिमेकडे निघून गेले.''[१७] हा सर्व पराक्रम केवळ वीस मिनिटांत पार पडला. धुळे खजिना लुटीची बातमी लगेच दुसऱ्या दिवशी सिदखेड पोलिसांना कळली. ''दि. १५ एप्रिल १९४४ रोजी डीएसपींच्या हुकूमावरून या घटनेची शहानिशा लावण्यासाठी धुळे येथील एल. डी. सावंत नावाच्या डिव्हिजनल इन्स्पेक्टरने चौकशीची सूत्रे स्वत:कडे घेवून या भूमीगतांचा पाठलाग केला.''[१८] त्यावेळी या भूमीगत कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणापासून तीन चार मैल प्रवास केला. विश्रांती घेवून पुन्हा प्रवासाला सुरुवात केली. डॉ. उत्तमराव पाटील यांना काही अंतरावर आपल्या पाठीमागून पोलीस येत

असल्याचा अंदाज आला. तेव्हा त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना इशारा करताच जवळ जवळ नऊ मैल पोलीस व भूमीगत पाठलागाचा संघर्ष चालला. यामध्ये एकमेकांच्या विरुद्ध गोळीबारही करीत. शेवटी अंधार पडल्याने दोन्ही बाजूंनी गोळीबार थांबविण्यात आला. अशा अनेक संकटांना सामोरे जात शेवटी भूमीगतांनी नोटांच्या चार गाठोड्यांची दोन गाठोडी केली आणि त्यांनी आपले दोन गट केले. प्रत्येक गटाला नोटांचे एक एक गाठोडे देण्यात आले. अनेक संकटांना तोंड देत भूमीगत आपापल्या भागात आले. तो दिवस होता, दि. १६ एप्रिल १९४४. अशा रितीने ते आपल्या घरी पोहोचले.

या ठिकाणी नाथाजी लाड, राजमती पाटील (सध्याच्या बिरनाळे ताई), व्यंकट धोबी व इतर सहा भूमीगत एकत्र भेटले. सातारच्या भूमीगतांनी रात्री बोरकुंड सोडले. आणि बैलगाडीने पहाटे नाशिक जिल्ह्यातील साकोऱ्याला पोहोचले. १७ एप्रिल १९४४ ला सातारचे भूमीगत साताऱ्याला निघाले. साकोरा सोडण्यापूर्वी खानदेशामध्ये कार्य करण्यासाठी डॉ. उत्तमराव पाटील व विष्णू पाटील यांना एक लाख रुपये दिले आणि उरलेली रक्कम सातारच्या भूमीगतांनी आपल्याबरोबर आणली. अशा रितीने नागनाथ अण्णांनी धुळे खजिना लुटीत आपले कर्तव्य सिद्ध केले असल्याचे आढळून येते. त्यांनी आणलेली रक्कम सर्वांनी समान वाटून घेतली. ''मा. क्रांतीवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी ही रक्कम नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेप्रमाणे स्वत:ची सैनिकी फौजेची उभारणी करण्यासाठी या लुटीचा वापर केला.''[१९] आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय जनता सुखी होणार नाही. भारतातील ब्रिटिश शासनाची कीड दूर केली पाहिजे. त्यांच्याकडून सत्ता काढून घेतली पाहिजे या विचाराने नागनाथ (अण्णा) कार्याला लागले.

**बेसावध अवस्थेत नागनाथ नायकवडी यांना अटक :**

नागनाथ नायकवडी यांनी धुळे खजिना लुटीनंतर १९४४ साली फौजी संघटनेच्या उभारणीसाठी शस्त्रास्त्रे गोळा करण्यास सुरुवात केली. एक दिवस आईला भेटण्यासाठी

वाळव्यास जिवलग मित्रासह रात्री आले. त्या रात्री आईची विचारपूस करून वेडाचे सोंग कशासाठी घेतले होते असे विचारले. तेव्हा लक्ष्मीबाईंना तुरुंगातील हकीकत सांगितली व आपली सुटका करुन घेण्यासाठी वेडाचे सोंग केले असे लक्ष्मीबाईंनी सांगितले. ही खात्री झाल्यावर मळीकाठी अण्णा झोपण्यास गेले. तसेच त्यांचे साथीदार आपल्या आप्तेष्टांना भेटण्यास अण्णांच्या परवानगीने गेले. ''रामू नावाच्या साथीदार मित्रांना भेटण्यास जातो म्हणून सांगून गेला. त्याला नागनाथ अण्णांचे नेतृत्व व कार्य आवडले नव्हते. त्याने दुष्ट हेतूने आपट्याच्या पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. मनात अण्णांबद्दल दुष्ट भावनेने कोणताही विचार न करता फौजदार साहेबांना भेटून नागनाथ वाळव्यात मळीकाठी झोपले असल्याची बातमी दिली.''[२०] सशस्त्र पोलिसांची लॉरी भरून तयारीनिशी रामूला बरोबर घेवून वाळव्याच्या कृष्णा नदीकाठी मळीच्या मळ्यात अण्णा झोपलेल्या ठिकाणी आले. अण्णा गाढ झोपेत होते. फौजदाराने त्यांच्या छातीला पिस्तुलाचा स्पर्श करताक्षणीच नैसर्गिकरित्या त्यांचा हात उशाखाली ठेवलेल्या पिस्तुलाकडे वळला. फौजदाराबरोबर त्यांचे सशस्त्र पोलिसही होते. अण्णांनी हे ओळखले. त्यावेळी ते म्हणतात, ''अरे मी बेसावध असून असे अडचणीत (खिंडीत) पकडतोस काय? घे पिस्तूल आणि घाल बेड्या.''[२१] दि. २९ जुलै १९४४ नागनाथ नायकवडी यांना घरच्या भेदीपणामुळे भारतीय पोलीस अधिकाऱ्यांनी पकडले. लॉरीत बसवले आणि इस्लामपूरच्या लॉकअपमध्ये ठेवले. नंतर सातारा जेलमध्ये ठेवण्यात आले. परंतु स्वातंत्र्य वृत्तीच्या नागनाथ आण्णा तुरुंगात जास्त काळ राहिले नाहीत.

**नागनाथ आण्णांचे साताऱ्याचे अति अवघड जेल फोडण्याचे कार्य :**

अण्णांनी ब्रिटीशांचा हा दुष्ट डाव ओळखला आणि त्यांनी पुढील कार्याला सुरुवात केली. वास्तविक कामेरीचे एस. बी. पाटील यांनी त्यांना अटक झाल्यानंतर सुटकेसाठी खूप प्रयत्न केले. अण्णांना अटक झालेली आहे अशी बातमी सातारा जिल्हाभर वेगात पसरली. सातारा जिल्ह्यातील असंख्य भूमीगत मोठया सावधगिरीने वागू लागले.

सातारच्या जेलमध्ये दोन-तीन दिवस सर्व राजकीय कैद्यांशी मैत्री जमवली. अण्णांचा स्वभावच मन मिळावू संघटना करण्यात तरबेज होता. अण्णांना राहून राहून वाटू लागले की, जेलमध्ये देशकार्य, स्वातंत्र्याची संघटना चळवळ बरोबर संग्राम करता येत नाही. तुरुंगात व्यर्थ जीवन घालवणे त्यांना पसंत नव्हते. त्यांना एकच ध्यास लागला की देशाला स्वतंत्र करणे. नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी एका रात्री अचानक आपल्या मित्रांना आपल्या मनातील जेल फोडण्याचा विचार बोलून दाखवला. काही ज्येष्ठ भूमीगतांना व कामेरीचे एस. बी. पाटील यांना ही अण्णांची योजना सत्वर पटली. तुरुंग फोडताना जर यदाकदाचित सापडलो तर जीवदान द्यावे लागणार हे नागनाथ अण्णांनी जाणले होते. या सर्व अर्थ अनर्थाचा विचार करुन रात्रीची जेल फोडण्याची योजना आखण्यात आली. त्याचप्रमाणे काही साथीदारांची तयारी करुन ठेवली. ‘‘त्यामध्ये प्रामुख्याने कणेरीचे एस. बी. पाटील, बर्डे गुरुजी हे होते.’’[२२] दि. १० सप्टेंबर १९४४ चा दिवस पहाटे चार वाजता ठरल्याप्रमाणे अण्णांनी आपल्या सहकाऱ्यांना प्रार्थविधी कार्य करण्याच्या निमित्ताने जेलमधील तटाचे कोने निरीक्षण करीत कोठून उडी खाली टाकायची, कोणी कोठे थांबायचे हे सर्व ठरले. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी सशस्त्र चार पैलवान या कार्यासाठी घेतले. पैलवानांच्या मदतीने आणि एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाने नागनाथ अण्णा ज्या बाजूला पलीकडे उडी मारणार होते तो भाग नैसर्गिक उंचीचा होता. शंभर दोनशे मिटर अंतरावर पोलिसांची घरे सुद्धा होती. अण्णांनी पाहिले की कदाचित कोणत्याही पोलिसाच्या घराचे दार उघडलेले नाही, परंतु उडी मारल्यावर कदाचित आवाजामुळे एखादा जागा होऊन दार उघडेल तर मात्र आपली धडगत नाही. म्हणून त्यांनी तटावर क्षणाचाही विलंब न लावता पटकन खाली उडी मारली आणि तिथेच बसून बारीक हाराटी उपटू लागले. कुणी पाहिले तर एखाद्याला शंका आलीच तर हा माणूस गणपतीसाठी दुर्वा उपटत आहे असे वाटावे. त्यावेळी गौरी-गणपतीचा सण होता. यावरून अण्णा हे किती समयसूचक आहेत हे दिसून येते. त्यावेळी अण्णांना जखमा झाल्या होत्या,

परंतु मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मातृभूतीचे मलम चोळून रक्त थांबवले. साताऱ्यात कोणाच्या घरी जावे असा विचार मनात आला. लगेच अण्णा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या घरी गेले आणि तेथे थोडी विश्रांती घेतली. अशा रितीने अण्णांनी सातारचा जेल फोडून घुमजाव केले. लगेच १० सप्टेंबर १९४४ रोजी वर्तमान पत्रात ठळक अक्षरात बातमी जाहीर झाली की सातारचा अति अवघड असा जेल वाळव्याच्या नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी फोडला व फरारी झाले.''[२३] नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी साताऱ्याचा जेल फोडल्यानंतर इंग्रज सरकारला व भारतीय पोलिसांना जबरदस्त धडकी भरली. स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केलेली व्यक्ती काय करेल या गोष्टीचे ज्ञान नव्हते. ब्रिटिश पोलीस खात्याने या वीराला पकडण्यासाठी पोलीस कॉन्स्टेबलची नेमणूक करण्यात आली. पण नागनाथ अण्णांनी अशा कार्यवाहीला न घाबरता आपला उद्देश साध्य करण्याच्या कार्याला सुरुवात केली.

**नागनाथ अण्णांचे गोव्यातून हत्यारे मिळविण्याचे कार्य :**

नागनाथ नायकवडी यांनी धुळ्याच्या खजिना लुटीतील रकमेचा वापर शस्त्रास्त्रे, दारुगोळा, बंदुका, पिस्तुली इत्यादी शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी केला. गोव्यातून शस्त्रास्त्रे आणित असताना अडथळा येवू नये यासाठी अण्णांनी योग्य ती खबरदारी घेतली. त्याचबरोबर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी म्हैसूरचे समाजकल्याण मंत्री वसंतराव पाटील यांच्याशी संधान बांधले. त्यांच्याकडे काही शस्त्रांची मागणी केली. त्यांनी बेळगावच्या मिलिटरीच्या लोकांशी संधान बांधून दोन गन नागनाथ नायकवडी यांच्याकडे रवाना केल्या. अण्णांनी गोव्यातून शस्त्रे आणताना तंबोऱ्याचा वापर केला. यावेळी अण्णांनी आपल्या स्वभावातील शांत गुण वापरला. गोव्याहून आणलेली शस्त्रास्त्रे फौजी संघटनेला पुरवली. तेव्हा सुद्धा ब्रिटिशांची त्यांच्यावर पाळत होती. अशा रितीने अण्णांनी गोव्याहून शस्त्रे आणण्यात यश मिळविलेले दिसून येते.

**इंग्रज अधिकारी गिल्बर्टच्या हातावर तुरी :**

दि. २६ जानेवारी १९४५ साली ऐतवडे गावी स्वामी रामनंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांचा मेळावा भरला. त्यामध्ये वास्तविक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करायची होती. अनेक प्रश्नांची सोडवणूक करून उत्सुक शेतकऱ्यांना या भूमीगत चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. या मेळाव्याची बातमी कोणीतरी देशद्रोही व्यक्तीने गिल्बर्ट साहेबापर्यंत पोहोचवली. मेळावा संपल्यानंतर क्रांतीवीरांगणा राजमती पाटील यांच्या घरी सर्वांसाठी जेवणाचा कार्यक्रम सुरु होता. क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्यासह सर्वजण जेवायला बसले होते. इतक्यात गिल्बर्ट साहेब पुढच्या दारातून आत घुसताना दिसले. ते जेवढ्या चपळतेने वेगाने आत घुसले त्यापेक्षाही जास्त विजेच्या वेगाने अण्णा घराच्या मागील बाजूच्या पाचफूट उंचीच्या भिंतीवरुन उडी मारून वाऱ्यासारखे एका दिशेने पळाले. पाठीमागे न बघता अण्णा एका विहिरीवर खोदून ठेवलेल्या गुहेकडे गेले. त्यावेळी गिल्बर्ट साहेब त्यांच्या पाठीमागून हातात सातबारी भरलेले पिस्तुल घेऊन धावा टाकीत पाठलाग करीत होते. नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्या हातात पिस्तूल नसल्याने साहेबाशी प्रतिकार करणे अशक्य होते. त्यामुळे साहेबांच्या गोळीला व्यर्थ बळी पडणे किंवा तुरुंगात खितपत पडणे त्यांना पसंत नव्हते. म्हणून विहिरीकडे जावून ते गुहेत लपून बसले. साहेब विहिरीच्या मोरीवर जावून विहिरीत डोकावून पाहू लागला. पाणी शांत होते. पाण्यात काहीही हालचाल होत नव्हती. गिल्बर्ट साहेबाने इकडे तिकडे पाहिले. तेथे जवळील शेतात शेतकरी कुळवीत होता. त्याला विचारले तेव्हा त्या शेतकऱ्याने हिंदी भाषेतील संभाषण न समजल्यामुळे वेगळ्याच दिशेने बोट दाखवले. त्यामुळे गिल्बर्ट साहेबांना थांगपत्ता लागेना. निराशेने ते गावी परत गेले. शेवटी साहेबांना असा भ्रम पडला की नागनाथ अण्णा देव असले पाहिजेत. हा नामदेव असला पाहिजे. याला जमीनसुद्धा साथ देते. पाहता पाहता अदृश्य झाला हा आपणास कधीच सापडणार नाही. यापुढे त्याच्या नादी लागता उपयोगी नाही. आपलाच

एखाद्यावेळी घात होईल. अशी गिल्बर्ट साहेबांची मनधारणा झाली व तो आणलेल्या सशस्त्र फौजेसह परत निघून गेला. अण्णांनी गनिमी काव्यातील पद्धत वापरुन पोलिसांच्या खात्याला तसेच गिल्बर्ट साहेबाच्या हातावर तुरी दिली. नागनाथ अण्णांना पुढील कार्याचा मार्ग खुला करावयाचा होता.

**दिल्लीहून आझाद हिंद सेनेचे मार्गदर्शक आणण्याचे कार्य :**

अण्णांनी क्रांतीकार्यासाठी फौजी संघटना उभारण्याचा ध्यास घेतला होता. त्यांना आझाद हिंद सेना उभारून देश स्वातंत्र्यासाठी प्रयत्नाची बाजी लावायची होती. पैशाची बाजू चांगलीच भक्कम होती. धुळे खजिना लुटीचा पैसा, शेणोली पे ट्रेन लुटीतील रक्कम यांचा वापर या कार्यासाठी करावयाचा होता. त्याप्रमाणे अण्णांनी आपली वाटचाल सुरु केली होती. नागनाथ (अण्णा) नायकवडी यांना महत्वाचा प्रश्न पडला होता. तो म्हणजे फौजी सेनेला मार्गदर्शनाची आवश्यकता. आणि ते आपण आणलेच पाहिजेत या विचाराने अण्णा दिल्लीला गेले. याचवेळी अण्णांनी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. ''सुभाष बाबूंच्या आझाद हिंद सेनेमधील धील्लन, सैगल व शहानवाज यांच्यावर ब्रिटिश सरकारने लष्करी खटला भरला आहे. या सेनानीच्या खटल्याच्या मदतीकरिता दरियागंज येथे कचेरी उघडण्यात आली होती.''[२४] अण्णांनी तेथे जावून कमिटीसाठी मदतीची पावती फाडली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कन्या मनिबेन पटेल या त्यांच्या प्रमुख होत्या. अण्णांच्या मनात आले त्यांच्याकडे जाऊन आझाद हिंद सेनेचे दोन लष्करी शिक्षण देणारे तज्ज्ञ सैनिक घ्यावे. तेव्हा मनिबेन यांना त्यांनी फौजेतील दोन मार्गदर्शक देण्याची विनंती केली. मनीबेन यांनी अण्णांना उत्तर दिले, ''फौजी संघटना महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानात बसत नाही.''[२५] परंतु अण्णा आशावादी विचार करुन खुर्चीत बसले. तेथे दोन शिख तरुण नवीन सेना तयार करावयाची मनिषा घेवून आलेले आढळून आले. ते मनिबेन पटेल यांची परवानगी घेण्यासाठी आले होते. मानकसिंग व नानकसिंग हे तरूण आझाद हिंद सेनेतून बाहेर पडून स्वत:ची संघटना स्थापन

करण्याच्या बेतात होते. तेथे अण्णांशी त्यांची मुलाखत झाली. हिंद सेनेच्या कॅम्पमधून ते बाहेर पडले व अण्णांना येवून मिळाले. अण्णांना भेटताच आपली इच्छा सांगितली. त्याप्रमाणे अण्णा, नानकसिंग, मानकसिंग यांच्या आई, मावशी, वडील, भाऊ, बहीण यांना भेटून आले. घरच्यांनी अण्णांना जेवण केले. जेवण केल्यानंतर अण्णांच्या बरोबर महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात नवीन आझाद हिंद सेनेच्या प्रशिक्षणासाठी दोन जवानांना आणण्यात आले. या कार्याबद्दल अण्णांचे कौतुक झाले. त्यांचे कार्यकर्ते अधिक उत्साहाने कार्याला लागले. त्यामध्ये पैलवान किसन अहीर, पैलवान बाळकू बिरनाळे, वाय. सी. पाटील, राजमती ताई इ. होते. अशा रितीने अण्णांनी स्वत:ची आझाद हिंद सेना स्थापन करुन नवीन पद्धतीची स्वतंत्र यंत्रणा स्थापन केली. अशा प्रकारचे कार्य एक योद्धा किंवा निष्पाप, नि:स्वार्थी अवलीयाच करु शकतो.

**फौजी शिक्षणाचे कार्य :**

नागनाथ (अण्णा) नायकवडींनी मातोश्रींच्या सहकार्याने आझाद हिंद सेनेच्या नवीन तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी सुरुवात केली. त्याबरोबर अण्णांनी आपले सहकारी सोबत घेतले. त्यामध्ये बाळकू बिरनाळे, वाय.सी. पाटील, कोल्हापूरचे बाबुराव जाधव, श्री. डी. बी. पाटील, पैलवान किसन अहीर, मानकसिंग, नानकसिंग (पंजाब), राजमती (ताई) पाटील इत्यादी भूमीगत सहकाऱ्यांचा समावेश होता. नागनाथ नायकवडी यांच्या कार्यावर व फौजेवर ब्रिटिश सरकारचा कायम डोळा होता. नागनाथ नायकवडी यांचा ते नेहमी शोध घेत. त्यांना पकडून तुरुंगात बंद करण्याचा विचार असे. परंतु नागनाथ नायकवडी त्यांच्या कारस्थानाला ओळखून ब्रिटिश सरकार सतत सावध राहत असे.

या काळात ढगेवाडीच्या जंगलात अण्णांनी पैलवान किसन अहिर यांच्याकडे कँपसाठी १९४५ साली कामगिरी सापवली. ही कामगिरी पैलवान किसन अहीर यांनी व्यवस्थित पार पाडली. त्यावेळी लष्करी प्रशिक्षण देण्याचे कार्य व्यवस्थित चालले होते. ही

बातमी ब्रिटिश पोलिसांना मिळाली. याची शंका नागनाथ अण्णांना आल्याबरोबर त्यांनी कँपची जागा बदलली. तो कँप शाहूवाडी महालापैकी वाड्याच्या जंगलात हलवला. क्रांतीकारकांना ही जागा पसंत पडली होती. ढगेवाडीचा कँप हलवून या वाड्याच्या मैदानात नेला. तिथे निर्धास्तपणे लष्करी प्रशिक्षण चालू केले. वाळवे व ऐतवडे गावामधून जेवण आणण्याची सोय केली गेली होती. क्रांतीविरांगणा लक्ष्मीबाईंनी जेवणाची सोय केली. या वाड्याच्या शेतकऱ्यांना त्यांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केले. फौजी प्रशिक्षकाच्या कार्याबरोबरच इतर कार्याकडेही त्यांचे लक्ष होते. त्यामध्ये प्रामुख्याने नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली भूमीगत कार्यकर्ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत कँपचे काम आटोपून खेड्यामधील ''लोकांचे प्रश्न सोडवण्याचे काम चालू होते. टग्या माणसांची यादी तयार करणे, पाटील-तलाठी गावकरी ते लोकांशी कसे वागतात? ती माहिती घेणे टग्याला पकडून कँपमध्ये आणून त्याला व्यवस्थित वागण्यास सूचित करणे, कुणा गरीबाची अन्यायाने कोणी जमीन बळकावली असल्यास ती परत द्यायला लावणे, त्याने तसे केले नाही तर धिंड काढणे, गावगुंड, पाटील, तलाठ्याने गरीबाचे पैसे लाच म्हणून घेतल्यास त्याला पकडून चावडीपर्यंत नेऊन सर्वांदेखत पैसे परत द्यायला लावणे, कोणी अन्याय केला तर या फौजी संघटनेतील कार्यकर्ते व प्रशिक्षणार्थी सर्व जण अन्याय दूर करीत.''[२६] अशा स्वरूपाचे कार्य चालू असताना नागनाथ अण्णांनी या थाबाड्याच्या जंगलात सैनिक प्रशिक्षणाला एक वेगळेच महत्त्व दिले होते. याशिवाय अण्णा यांचे कँपवर विशेष लक्ष होते. कारण इंग्रज सरकारची त्यांच्यावर नेहमी पाळत होती. त्यामुळे त्यांना नेहमी इंग्रजांच्या अधिकाऱ्यांचा संशय येत असे. याच दरम्यान ''सीआयडीची एक व्यक्ती कँपची गुप्तपणे पाहणी करताना किसन अहीर यांना सापडली. त्याला पकडून जिवंत ठेवायचे आणि पळून जाता येवू नये म्हणून नदीच्या वाळूमध्ये गळ्या एवढा पाच फूट खोल खड्डा खणून पुरुन ठेवले. नागनाथ (अण्णा) नायकवडी व इतर भूमीगत कार्यकर्ते शस्त्रास्त्रे आणण्यासाठी बाहेर गावी गेले होते. आल्यावर त्यांची चौकशी केली, ताकिद दिली आणि

त्याला सोडला.''[२७] परंतु त्याने बदला घेण्याचा प्रयत्न केलाच. ही कँपची बातमी पोलिसांना दिली. त्यामुळे फौजी कँप थाबाड्याहून मणदूरच्या जंगलात हलविण्यात आला. जागा बदलण्यात आली. जागा बदलण्यापूर्वी २३ फेब्रुवारी १९४६ साली पूर्वीची जागा पाहिली. परंतु ३-४ किलो मीटर अंतरावर पांडू मास्तर तुरुंग फोडून या जंगलात राहणार असे समजले होते. त्यांच्या तपासावर पोलीस होते. त्यांना पकडण्यास ठिकठिकाणी छापे टाकण्यात येत होते. अशावेळी सुद्धा मास्तर व त्यांचे सहकारी यांनी एक पोलीस सीआयडीला पकडून त्याला मारहाण करुन त्याची सायकल मोडली. रक्तबंबाळ अवस्थेत, फाटक्या ड्रेसमध्ये पोलीस कसाबसा शिराळ्याच्या पोलीस ठाण्यावर गेला होता आणि त्याने सांगली, इस्लामपूर, सातारा, तासगावच्या ठिकाणी वरिष्ठांना या घटनेची माहिती दिली होती.

त्यामुळे नागनाथ (अण्णा) नायकवडी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जागा बदलण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे थाबाड्याच्या जंगलातून आझाद हिंद फौजी कँप हालवून मणदूरकडे रवाना करण्यात आला. वेळ, काळ, परिस्थितीची जाणीव न ठेवता रात्रीच कित्येक मैल सूर्य उगविण्याच्या सुमारास सैनिक आखाड्याजवळ आले. पुढे ते मणदूरच्या मार्गाला लागले. मणदूरकडून येणाऱ्या वाटसरूजवळ मणदूरच्या परिस्थितीची चौकशी करावयास सुरुवात केली. रात्री मणदूर गावाला पोलिसांनी वेढा दिल्याचे कळले. दोन चार फरारी पोलिसांच्या हाताला लागले होते. आणखी काही फरारींना पकडण्यासाठी सगळा गाव पोलीस शोधत होता.

अशा वेळी ''किसन अहिर आणि त्याच्या शोधार्थ गेलेले तीन क्रांतिकारक पोलिसांच्या हाताला लागले. याबद्दलची सैनिकांना मुळीच कल्पना नव्हती. सर्वांनी एकच निर्णय घेतला की कितीही पोलीस असोत त्यांच्यावर कडाडून हल्ला करायचा आणि कैद झालेल्या सहकाऱ्याची सुटका करायची.''[२८] असा ठराव झाल्यावर पांडू मास्तर व किसन अहिर यांच्या शोधार्थ आलेले तीन सहकारी पोलिसांच्या ताब्यात गेले आणि पांडू मास्तर व

किसन अहिर पोलिसांचा ससेमिरा चुकवून त्यांच्या नियंत्रणातून शांतपणे सुटले. इकडे पांडू मास्तर आणि किसन अहिर यांना अतिशय वाईट अनुभव आला.आपल्यापुढे तीन सहकाऱ्यांना अटक झाल्याचे दु:ख किसन अहिरांना सहन झाले नव्हते. त्यांचे मन स्वत:ला सारखे प्रश्न करीत होते. आपला सहकाऱ्यांना पोलीस छळतील, त्रास देतील, मारहाण करतील, कँपची बातमी काढतील, कँपची वाताहत करतील असे किसन अहिरांना वाटत होते.

परंतु असा विचार करीत अहिर यांनी न थांबता लगेच निर्णय घेवून पुन्हा आपल्या मणदूरच्या कँपकडे निघाले. किसन अहिर नितूरच्या जंगलात जात असताना एका धूर्त पोलिसाने पाहिले. पांडू मास्तर असावेत अशी त्या पोलिसाला शंका आली. ते पोलीस पाठलाग करत आले. परंतु, किसन अहिर यांनी पेंटलोडच्या बाजूला निघून गेले. अशा रितीने पुढे मणदूरला गेले. तेथे ते न थांबता सर्व कंपनी त्यांनी मणदूरच्या जंगलातून जागा बदलली. अशा पद्धतीने फौजी कँपचे कार्य नागनाथ अण्णा व त्यांचे सहकारी व्यवस्थित रितीने करत होते. हे कार्य देश स्वातंत्र्याकरता होते.

**मणदूर चकमकीतील कार्य :**

दिनांक २४-२-१९४६ ला मणदूरच्या परिसराला पोलिसांनी वेढा घातला. हा पोलिसांचा वेढा उठविण्यासाठी यावेळी काहीतरी केलेच पाहिजे आणि तीन सहकाऱ्यांना सोडवून आणले पाहिजे. यासाठी पोलिसांबरोबर संग्राम करावा लागणार होता. वेळ अतिशय आणीबाणीची होती. यावर मात करण्यासाठी सर्व सहकाऱ्यांनी एकमताने निर्णय घेतला आणि संघर्ष करण्याचा बेत केला. भारत माता की जय, जयहिंद, वंदेमातरम् अशा घोषणा देवून पुढील कार्याला सुरुवात केली.

नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली या निर्णयाला मान्यता मिळाली. लष्करी सेनानी फौजी संघटनेला फायरचा आदेश दिला. त्याबरोबर जयहिंद, भारत माता की जय आकाशात फैरी झाडल्या गेल्या. पोटासाठी लढणारी पगारी पोलीस आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे

क्रांतीवीर, भूमीगत कार्यकर्ते, लष्करी सैनिक यांच्यामध्ये जमीन आसमानाचे अंतर होते. हा अद्‌भूतपूर्व जीवन संग्राम जीवनामधला स्वातंत्र्याचा, जीवाचा संग्राम चालू झाला. स्वातंत्र्याने वेडे झालेले, लष्करी शिक्षण घेतलेले व देशासाठी बळी जाणारे सैनिक आपला पिट्टा पाडल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांच्यावर गोळीबार करून आपण देशद्रोही बनणार याची जाणीव होत होती. तरीपण त्यांनी लढायला सुरुवात केली. ओढ्याच्या उंच काठावरुन स्वातंत्र्य सैनिकांचा ओढ्यामधील पोलिसांवर बरोबर नेम लागायला निसर्ग देवतेची मदत झाली. दोन्ही बाजूंनी एकसारखा गोळीबार चालू होता. काही पोलीस जखमी झाल्याने त्यांचा धीर खचला. अशा रितीने शित्तुरच्या जंगलाला छोट्या लढाईचे स्वरूप प्राप्त झाले होते. पोलीस पळ काढण्याच्या मार्गावर होते. चरणला शस्त्रास्त्रे आणण्यासाठी गेलेले अण्णा, राजमती (ताई) पाटील, अंनाजी पाटील, वा. सी. पाटील, बाळकू बिरनाळे इत्यादी भूमीगत काही वेळात तेथे आले. याची बातमी पोलीस प्रमुखास लागली. आपण नागनाथ अण्णांच्या कचाट्यात सापडल्यावर धडगत होणार नाही, फार मोठा अनर्थ होईल हे काही पोलिसांनी ओळखून जखमी झालेल्या पोलिसांनी लॉरीकडे नेण्यास सुरुवात केली. पोलीस पळ काढू लागले. जखमींना उचलायला लागले. त्यांचा पराभव झाला. या आनंदाच्या भरात किसन लाईंग पोझिशन सिटींग पोषिशनने गोळीबार करता क्षणीच किसन अहिर यांच्या गुडघ्याला एक गोळी लागली व गुडघ्याची वाटी निघाली. भयंकर रक्तस्त्राव सुरू झाला. हा रक्तस्त्राव थांबविण्यासाठी नानकसिंग सेनानीने किसन अहिरांच्या हृदयाकडच्या बाजूला मांडीला आवळून बांधत असताना दुसरी एक गोळी नानकसिंगाच्या मस्तकाला लागली. किसन अहिर व नानकसिंग दोघेही भूमिवर कोसळले. नानकसिंगाचा प्राण तत्काळ पंचत्वात विलीन झाला.

आपले दोन प्रमुख वीर पडल्यावर इतर भूमीगतांना, सैनिकांना फार दु:ख झाले. त्यांनी गोळ्यांचा वर्षाव चालू केला. पोलीस पळ काढून लॉरिमध्ये बसले आणि लॉऱ्या शिराळ्यामार्गाने भरधाव निघून गेल्या. या धुमचक्रीमध्ये बेड्या घालून अटक केलेले त्यांचे

तीन सहकारी ज्यांना सोडविण्यासाठी त्यांनी गोळीबार केला त्यांना तिथेच सोडून पोलीस निघून गेले. त्यांच्या बेड्या फोडून काढून त्यांची सुटका केली.

वास्तविक पाहता येथे भूमीगत क्रांतीकारकांचा विजय झाला. परंतु काही थोड्या वेळातच नानकसिंग यांना हौतात्म्य आले. त्यांचा साथीदार किसन अहिर यांचा रक्तस्त्राव न थांबल्यामुळे त्यांचा प्राण गेला होता. ते नागनाथ अण्णांना काही सांगणार होते. त्यांची वाट पाहत होते. परंतु नागनाथ अण्णा जवळ येण्यापूर्वीच काही वेळात त्यांचा प्राण निघून गेला.

नागनाथ (अण्णा) नायकवडी यांना दोन सहकारी सोडून गेल्याचे दु:ख झाले. अण्णांनी पुढील कार्याला सुरुवात केली. दि. २९ मे १९४६ ऐतवडे येथे सामूदायिक शेतीचा प्रयोग करण्यासाठी बैठकीला नागनाथ नायकवडी व त्यांचे भूमीगत सहकारी गोळा झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वत:ची जमीन त्यासाठी दिली. अनेक कष्टकरी, गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी एकटा करून सामुदायिक शेती करण्यासाठी चाललेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून ''नागनाथ (अण्णा) नायकवडी, वाय.सी. पाटील, राजमती (ताई) पाटील, बाबुराव कोकाटे (पडळवाडी), प्रताप पाटील (व्याकुड, कर्नाटक) इ. क्रांतीकारक बैठक घेण्यासाठी आले.''[२९] क्रांतीकारक भूमीगतांच्या बैठका मेळावा, सभा याची माहिती गावगुंड शोधत दि. २२ मे १९४६ या दिवशी बैठक बराच वेळ चालली. बैठकीच्या चर्चेचा शेवट झाला. त्यामध्ये प्रमुख कार्यकर्ते अण्णांच्या बरोबर थांबले. बाबुराव कोकाटे, प्रताप पाटील, राजमती ताईच्या घरी जावून झोपले. वाय.सी. पाटील सुद्धा झोपायला निघाले. परंतु नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी जबरदस्तीने त्यांना सोबतीला ठेवून घेतले. शेवटी हे दोघे वस्ताच्या मळ्यावर तिथेच झोपले. इकडे ताईंच्या घरी जनतेला छळणाऱ्या सखाराम बारबट्टे या महागुंडाचा सहकारी गुंड शिवा महार याने अण्णा आणि वाय. सी. पाटीलच झोपले आहेत असे समजून गाढ झोपेत असलेल्या बाबुराव कोकाटे आणि प्रताप पाटील यांना गोळ्या घातल्या. अण्णांचे

आणखी दोन सहकारी गेले. दोन बलिदाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशाच्या कष्टकरी जनतेच्या हक्कासाठी हुतात्मे झाले.

''नागनाथ नायकवडी यांनी एका बाजूला देशाचे स्वातंत्र्य व दुसऱ्या बाजूला जनतेला होणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त व समान कार्याचा व्याप अशी दुहेरी भूमिका पार पाडीत अण्णांच्या जीवाचा धोका कधीच संपला नाही. गुंडांच्या गोळीने तरी मरण्याची शक्यता किंवा ब्रिटिशांच्या गोळीने मरण्याची शक्यता होती. मिळवायचे होते जनतेचे स्वातंत्र्य जनतेसाठी न्याय त्यात व्यक्तीगत पातळीवर काही मिळवायचे नव्हते.''[३०] अण्णांनी १९४० ते १९४७ पर्यंत अतिशय निकराने जीवनातील संग्रामाला धैर्याने तोंड दिले. स्वत:चा विवाहही स्वातंत्र्य मिळवल्यानंतर केला.

नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्या कार्याला यश येत होते. पुन्हा एकदा सर्व क्रांतीकारक भूमीगतांनी मातृभूमीसाठी प्राणाची बाजी लावायचे ठरवले. सर्वांनी लढा दिला तरच देशाला स्वातंत्र्य मिळेल या विचारांनी सर्व जनता पेटून उठली होती. भगतसिंग हे स्वातंत्र्यासाठी फासावर गेले. त्यांच्याबरोबर सुखदेव, राजगुरु या विरांनी ही मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिली. स्वातंत्र्याचा काळ जवळ येत होता. दुसऱ्या बाजूला भारतातील इंग्रज धार्जीण्यांना या भूमीगत क्रांतीकारकांनी चांगलाच सळो की पळो करुन सोडले. इंग्रज धार्जीण्यांना चांगलीच दहशत बसवली. त्यांनी पुन्हा तोंड वर काढता कामा नये अशा स्वरुपाचे दबावतंत्र वापरले. भारतात असंख्य जाती धर्माचे लोक राहतात. आपआपल्या धर्माप्रमाणे देव-देवतांची पूजा-अर्चा करतात. भक्ती करतात. परंतु ती भक्ती एकाच देवाला पोहचते. त्याप्रमाणे क्रांतीवीरांनी, भूमीगतांनी, स्त्रियांनी असंख्य लोकनेत्यांनी व सर्व जनतेने स्वातंत्र्य देवतेच्या प्राप्तीसाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब केला. १४ ऑगस्ट १९४७ चा दिवस रात्री दिल्लीच्या लाल किल्ल्यावरील इंग्रजांचा युनियन जॅक खाली उतरविण्यात आला. भारत मातेचा तिरंगा ध्वज रात्री बारा वाजता फडकविण्यात आला. दि. १५ ऑगस्ट १९४७

साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला. महात्मा गांधींचे स्वप्न साकार झाले. नागनाथ नायकवडी यांचे ध्येय पूर्ण झाले. नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात असे अनेक महनीय कार्य केले. याची नोंद इतिहासात तर होत राहीलच. तत्वत:च ती महाराष्ट्रीयन व राष्ट्रीय पातळीवर राहील, यात शंका नाही.

**शेणोली लुटीतील कार्य :**

नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सांगाव पोलीस चौकीतून पोलिसांची हत्यारे मोठ्या धाडसाने पळवून आणली होती. शेणोली येथील घाटात पे ट्रेन लुटली होती. धुळे खजिना लुटीत महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. त्यामुळे ब्रिटिश सरकारच्या सातारा पोलिसांपुढे नागनाथ अण्णा एक आव्हान होऊन बसले होते. जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याद्वारे आदिलशाहीला हादरे देऊन त्यांचे किल्ले घेतले आणि महाराष्ट्रात आपली हुकूमत प्रस्थापित केली. त्याचप्रमाणे अण्णा वागत होते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूर दरबारामधील अफजलखान नावाच्या सरदारने शिवाजीस पकडून किंवा त्यास मारुन येणारच अशी प्रतिज्ञा करून आलेल्या त्या बलाढ्य सरदारास शिवाजी महाराज यांनी अद्दल घडवली. हा इतिहास आपण वाचतो अगदी तसाच इतिहास नागनाथ अण्णांनी सह्याद्रीच्या कडेकपारीत वारणा खोऱ्यात घडवला. ऐतवडे बु।। ही कर्मवीर भाऊराव पाटील यांची जन्मभूमी त्यांनी रयत संस्थेद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय करून महत्वाची देशसेवा केली. त्यांची ही जन्मभूमी ही १९४२ च्या क्रांती लढ्यातील भूमीगत कार्यकर्त्यांची कर्मभूमी होती. क्रांती वीरांगना राजमती पाटील या ऐतवडे येथील होत्या. त्यांनी पुढाकार घेऊन ऐतवडे येथे स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी व सेवादलाच्या कार्यकर्त्यांना एक मेळावा आयोजित केला होता. हेतू हा होता की शेतकरी मेळाव्याच्या निमित्ताने भूमिगत कार्यकर्ते एकत्र येतील व पुढील कार्याबद्दल विचारविनिमय

करता येईल.  ६ जानेवारी १९४५ ला स्वामी रामानंद भारती यांनी तुरुंगातून मुक्तता झाल्यावर त्यांनी ग्रामराज्याचा व सेवादलाचा प्रचार धूमधडाक्याने सुरू केला होता. जिल्ह्यामध्ये सभाबंदी व भाषण बंदी असताना स्वामीजींनी १८८ सभा घेऊन जनतेमध्ये चैतन्य निर्माण केले.  या मेळाव्यास नागनाथ अण्णा, वाय. सी. पाटील वगैरे सहकाऱ्यांसह उपस्थित होणार असा पोलिसांचा अंदाज होता. सातारा जेल फोडून बाहेर आल्यावर सातारा पोलिसांनी ठरवले होते की, कोणत्याही परिस्थितीत नागनाथ अण्णांना पकडायचेच. ''प्रतिसरकारमधील नागनाथ अण्णा एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले होते व तशी नोंद पोलीस दप्तरी झाली होती म्हणून क्रांतीकारी भूमीगत कार्यकर्त्यांना धडा शिकविण्यासाठी ब्रिटिश सरकारने गिल्बर्ट नावाचा पोलीस खात्यात नावाजलेला एक पोलीस अधिकारी नेमला होता.''[३१] त्यांनी अण्णांना पकडण्याचा विडा उचलला. बंगालमधील क्रांतीवीरांची चळवळ मोडून काढण्यात त्याला यश आले होते. त्यामुळे त्याला वाटले की नागनाथ (अण्णा) नायकवडी सारख्या भूमीगत कार्यकर्त्यास आपण सहज पकडू शकू अशी घमेंड तो बाळगून होता. परंतु नागनाथ अण्णांनी त्यांची घमेंड जिरवली व सातारा जिल्ह्याच्या प्रतिसरकारचे पाणी काय असते याचा प्रत्यक्ष अनुभव त्याला करून दिला होता. ऐतवडे बु।। गावी भूमीगतांचा मेळावा घेण्याचे कारण म्हणजचे सर्व ऐतवडे गावचे ग्रामस्थ शेतकऱ्यांची भूमीगतांना व त्यांच्या चळवळीला सहानुभूती होती. ऐतवडे येथील भिमराव गायकवाड हा एक अत्यंत हुशार शेतकरी होता. त्यांची व नागनाथ अण्णांची दोस्ती होती. गावाबाहेरच्या उत्तरेकडील ओढ्याकाठच्या मोकाश्याच्या जुन्या विहिरीच्या आत पिंपळीचे एक झाड होते. विहिरीच्या बगाडाखाली त्या झाडाच्या पारंब्या विहिरीत लोंबत होत्या व त्या पारंब्याची जाळीच निर्माण झाली होती. एके दिवशी ऐतवडे येथे नागनाथ अण्णा गेले असता त्यांनी भिमराव गायकवाड याला विहिरीतील पारंब्या विशिष्ट आकारात बांधण्यास सुचविले होते. अण्णांनी याच पारंब्यांचा कसा उपयोग करुन आपले प्राण वाचविले, या प्रसंगाबद्दल सांगताना आदरणीय नागनाथ अण्णा म्हणतात,

“स्वामी रामानंद भारती महाराज ऐतवड्याच्या शेतकरी मेळाव्यास आले. त्यांनी भूमीगत कार्यकर्त्याला व जमलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर स्वामी रामानंद भारती, मी. वाय. सी. पाटील वगैरे कार्यकर्ते मंडळी क्रांती वीरांगना राजमती पाटील यांचे घरी जेवण्यास गेलो. राजमती पाटील यांनी मुद्दाम पुरणपोळीचा बेत पाहुण्यांसाठी केला होता. कार्यकर्ते मंडळींसाठी राजमती पाटील यांच्या घराच्या मागील दाराशी हात धुण्यासाठी पाण्याचा हंडा ठेवला होता. पाने वाढली होती. एक एक जण हात पाय धुवून पानावर बसत होता. केळीच्या पानाभोवती रांगोळ्या काढल्या होत्या. जेवण्याचे पदार्थ वाढावयास सुरुवात झाली.मी उभा राहिलो होतो. बसण्यापूर्वी सहज माझे लक्ष बाहेरच्या दाराकडे गेले तोच डीएसपी गिल्बर्ट हातात रिव्हॉल्वर घेऊन पुढच्या दारातून घरात पाऊल टाकीत असल्याचे मी पाहिले. माझ्यात व गिल्बर्ट यांच्यात २० फुटाचे अंतर असावे. गिल्बर्टला पाहिल्याबरोबर मी पाठीमागच्या दाराने परड्यातील छातीइतक्या उंचीच्या तटावरुन उडी टाकून आमच्या छुप्या आश्रयाच्या विहिरीकडे पळू लागलो. माझ्या पाठोपाठ गिल्बर्ट व पोलिस वाढलेल्या अन्नाची पाने तुडवीत माझ्या मागे आले. मी जिवाची पर्वा न करता विहिरीचे लक्ष गाठण्याची शिकस्त करुन पळत होतो. गावाबाहेरचा ओढा मी ओलांडला. ओढ्यात गुडघाभर पाणी होते. माझ्या पायाची पाण्यात झालेली खळबळ गिल्बर्टने पाहिली व माझ्यामागे विहिरीपर्यंत येऊन पोहोचला होता. पण मी त्यापूर्वी विहिरीच्या बगाडा खालील पिंपणीच्या पारंब्यांना धरुन विहिरीत उतरलो व पारंब्यामागील घळीत जाऊन बसलो होतो. गिल्बर्टने व पोलिसाने विहिरीला फेरे घातले. पण माझा ठावठिकाणा त्यांना लागला नाही. आतापर्यंत पाठलाग केलेली शिकार हाती न लागल्याने गिल्बर्ट पाय आपटीत पुन्हा राजमती पाटील यांच्या घरी आला.”[३२] या पोलिस छाप्यातून निसटणे तसे महाकठीणच होते. परंतू प्रसंगावधान व धाडसी निर्णयामुळे पोलिसांना चकवता आले. तसेच संभाव्य संकटांना तोंड देण्याकरीता पूर्वयोजना असलेमुळेच मी या संकटातून निसटलो होतो. गिल्बर्ट व पोलिस राजमती ताईंच्या घरी आले

व त्यांनी त्यांना 'तुझे नांव काय?' म्हणून विचारले. त्यावर ताईंनी 'माझे नांव सुमती' असे सांगितले. गिल्बर्ट हे ऐकून घराबाहेर आले. तेथे पोलिस पाटील उभे होते. गिल्बर्टनी पोलिस पाटील यांना विचारले, 'राजमती पाटील कोठे आहेत?' तर पोलिस पाटील यांनी सांगितले की, ''सुमती नाव सांगितलेली महिला हीच राजमती पाटील आहे.''[३३] घराबाहेरील अंगणात चाललेले संभाषण राजमतीताई पाटील यांनी ऐकले व क्षणाचाही विलंब न करता घराच्या मागच्या तटावरुन उडी मारुन निघून गेल्या. गिल्बर्ट राजमती पाटील यांना पकडण्यासाठी घरात आला. चौकशी केली, परंतु रामजी पाटील पसार झाल्या होत्या. अशा तऱ्हेने गिल्बर्ट व पोलिसांच्या हाती काहीही मिळाले नाही व अशा रितीने पोलिसांची फजिती होत गेली. वास्तविक पाहता राजमती पाटील ताईंनी त्या दिवसाचा कार्यक्रम व जेवण आयोजित केले होते. स्वामी रामानंद भारती यांची ते आजारी असताना सेवा सुश्रुषा केली होती. पण त्या दिवशीच्या प्रकारामुळे ताईंना खूप वाईट वाटले होते. दु:ख बाजूला सारुन ताई सुद्धा पोलिस छाप्यातून निसटल्या होत्या. त्यानंतर पोलिसांनी राजमती पाटील यांच्या व इतर नातेवाईकांना खूप मारहाण केली. खूप त्रास दिला. भूमीगतांबद्दलचा ठावठिकाणा विचारला, पण त्यामध्ये पोलिसांना यश आले नाही. आणि मोकळे हात हालवित परत जावे लागले होते. तो पोलिसांच्या दृष्टीने अशुभ दिवस होता, २६ जानेवारी १९४५. योगायोगाची घटना म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजा, भारताच्या सीमा ओलांडून 'चलो दिल्ली' चा नारा देऊन याच दिवशी व याच काळात भारतात घुसत होत्या. भारताची गुलामगिरी संपण्याचा दिवस जवळ येत आहे याची वरील घटना ही सुचिन्हेच म्हणावी लागतील. अशा रितीने अण्णांनी अनेक वेळा इंग्रज अधिकाऱ्यांना फसविण्यात यशस्वी झाले होते.

**नागनाथ (अण्णांना) फितुरीमुळे अटक :**

स्वातंत्र्य संग्रामाचे काळात सातारा जिल्ह्यातील भूमीगत कार्यकर्त्यांनी घातलेल्या धुळे खजिना लुटीचा धाडसी प्रयत्न मुंबई इलाख्यात गाजला होता. ब्रिटिश सत्तेला तो एक

जबरदस्त तडाखा सातारच्या भूमीगतांनी दिला होता. त्यामुळे धुळे खजिना लुटीतील संबंधित फरारी भूमीगत कार्यकर्त्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने खूप मोठ्या पैशाची बक्षिसे जाहीर केली होती. ब्रिटिश सत्तेने भारतावर सुमारे दीडशे वर्षे सत्ता ज्या तऱ्हेने मिळवली व प्रस्थाापित केली त्याच मार्गाने स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्याचे प्रयत्न केले जात होते. प्रति सरकारचे भूमीगत कार्यकर्ते जनतेच्या पाठिंब्यामुळे उघडपणे लोकांत वावरत होते. स्वातंत्र्य चळवळीबद्दल सहानुभूती असलेले पोलीस खात्यातील कर्मचारी व अधिकारी आपली नोकरी सांभाळून भूमीगतांना मदत करत होते. तसेच भूमीगतांमध्ये वावरणारे काही कृतघ्न घरभेदे भूमीगतांच्या हालचालींची माहिती देऊन बक्षिसे, मानमरातब व पैसे मिळवून जगत होते. जेव्हा त्यांची काळी कृत्ये भूमीगतांना समजली जात तेव्हा त्यांना प्रतिसरकारच्या नियमाप्रमाणे अद्दल घडविणाऱ्या शिक्षाही केल्या जात होत्या. पोलिसांना व पोलिसांच्या खबऱ्यांना भूमीगतांची दहशत होती, भीती होती पण पैशाच्या लोभामुळे काही घरभेदे पोलीसांच्या मायावी जाळ्यात अडकत होते व पोलिसांना मदत करीत होते. त्यामुळे पोलीसांना काही भूमीगतानी पकडण्यात यश मिळाले होते. अजून भारताला स्वातंत्र्य मिळाले नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्यलढा संपला नव्हता. त्यासाठी अनेकांची पोलिसांनी तुरुंगात रवानगी केली होती, तर दुसरीकडे त्यांची जागा घेऊन क्रांतीवीर पोलीस यंत्रणेला आव्हान देत होते. ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्याचे धाडसी प्रयत्न करत होते. नागनाथ नायकवडींना धुळे खजिना लुटीच्या गुन्ह्यामध्ये प्रमुख आरोपी म्हणून सरकारने ५०० रुपयांचे बक्षीस जाहीर करुन पकड वॉरंट काढले. अण्णांच्या हालचालीकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष देण्याच्या सूचना सरकारने पोलीस खात्यास दिल्या. पोलीस त्यांच्या मागावर लक्ष ठेवून त्यांचा पाठलाग करीत होते व अण्णांनी त्यांना चुकवून स्वातंत्र्य मिळविण्याचे पवित्र कार्य धाडसाने उघडपणे चालू ठेवले होते. अण्णांनी २८ जुलै १९४४ ला सेवादलाच्यावतीने किसानांची एक मोठी फेरी वाळव्यामधील हाळ या भागामध्ये आयोजित केली होती. त्यामध्ये लहान मुलांपासून

अगदी ५०-६० वर्षापर्यंतचे शेतकरी सहभागी झाले होते. जवळ जववळ ४०० शेतकऱ्यांची ही फेरी व मेळावा सायंकाळपासून चालू होता. तो रात्री ९ वाजता संपला. मेळाव्यात आलेले शेतकरी व कार्यकर्ते आपआपल्या घरी निघून गेल्यावर अण्णा व त्यांचे प्रमुख सहकारी कार्यकर्ते सुखावले होते. समाधानात होते.

त्या प्रसंगाबद्दल सांगताना अण्णा म्हणतात, ''दिवसभरच्या धावपळीमुळे आम्ही दमलो होतो. आमचे जिव्हाळ्याचे मित्र व सहकारी शंकरराव परुळेकर होते. त्यांत्या अंगणातच आसपासच्या घरातून जमविलेल्या भाजी-भाकरीचा पाहुणचार घेण्यासाठी आमची १०-२० जणांची पंगत बसली. सर्वांनी जेवण घेतले. त्यानंतर आम्ही शेजारच्याच तुकाराम देसाई यांच्या घरात झोपलो. पदमाळाचे नारायण जगदाळे हे वसंतदादा पाटील यांचे मावसभाऊ हे त्या दिवशी आमच्याकडे आले होते. ते मुक्कामास माझ्याबरोबर होते. तेही भूमीगत होते. नंतर धोत्रेवाडीचे बाबुराव खोत, वसगडेचे शामगोंडा पाटील आणि नांद्रेचे बाबुराव पाचोरे हे बाहेरचे पाहुणे म्हणून मेळाव्यासाठी आले होते. देसाई यांचे घरी झोपण्यास एकत्रच होतो. आमच्यापैकी नारायण जगदाळे यांच्या हाताला खरुज झाली होती. त्यामुळे ते बेचैन झाले होते. त्यावर उपाय म्हणून त्यांनी रात्री अवेळी उठून अंगणात जाळ केला. हात शेकले व त्यानंतर परत येऊन झोपले. झोपताना दार बंद करण्यास व दाराला कडी घालण्यास ते विसरले. सताड उघड्या घरात आम्ही भूमीगत कार्यकर्ते डाराडूर झोपलो होतो.''[३४]

त्या दिवसाचे दरम्यान आमच्या एका सहकारी भूमीगतांचे पिस्तूल रामू गोटखिंडे याने पळविले होते. ते परत करण्याचा लकडा लावल्यामुळे व त्याला धमकी दिल्यामुळे तो दुखावला होता. तो आमच्यावर सूड उगवण्यासाठी योग्य त्या संधीची वाट पहात होता. त्याकरिता त्याने वाळवा येथील सदू अण्णा देशपांडे यांचेशी संगनमत करून आष्टा पोलिस ठाण्याचे पोलिसांना आम्ही वाळव्यात मुक्कामास असलेची बातमी दिली. पोलिसाच्या दृष्टीने ती फार मोठा आनंदाची बातमी होती. पोलिसांनी रामू गोटखिंडे याला पोलिसाचा ड्रेस दिला.

त्या ड्रेसमध्ये रामू गोटखिंडे वाळव्याचे सदू अण्णा देशपांडेस भेटणेस गेले असता सदू अण्णा देशपांडे कंदील लावून आपल्या घराबाहेर आले. त्यांच्या घराशेजारील बाळगौंडा यांची पत्नी दळण दळण्यास उठली असता तिने ते पाहिले. सदू अण्णा देशपांडे यांचेशी खलबते करून रामू गोटखिंडे देसाईचे घराकडे आष्ट्याची पोलीस पार्टी घेऊन आला आहे. रामू गोटखिंडे वाळव्यातच काही दिवस राहता होता. त्यामुळे देसाईचे घर त्याला माहित होते. देसाईचे घर नारायण जगदाळेच्या हलगर्जीपणामुळे उघडेच राहिले होते. घर उघडे असलेमुळे पोलिसांनी देसाईचे घरात सहज प्रवेश मिळवला. आष्टा पोलीस स्टेशनचा फौजदार अहमदी व पोलीस पार्टी एकदम घरात शिरली. शंकरराव परुळेकर त्यामुळे प्रथम जागे झाले व ते अण्णांना हलक्या आवाजात म्हणाले, ''अण्णा घात झाला!''[३५] त्यामुळे मी डोळे उघडले होते. पोलिसांनी रायफलीची बॉनेट माझ्यावर रोखली होती. ती मला दाखवली. त्यावेळी माझे कोटाच्या खिशात ७ बारी पिस्तूल पोलिसांना मिळाली. तसेच शे-दोनशे रुपयेही मिळाले. अशा परिस्थितीत अण्णांनी काहीही हालचाल केली नाही. नंतर पोलिसांनी अण्णा, नारायण जगदाळे, बाबूराव खोत, बाळू पाचोरे, शामगौंडा पाटील, शंकरराव परुळेकर अशा सहा जणांना दिनांक २९ जुलै १९४४ रोजी पकडून वाळव्याच्या चावडीत आणले. चावडीत एक हत्यार बंद पोलीस पहारा करीत होता. अण्णांना अटक झाल्याची बातमी गावामध्ये वाऱ्यासारखी पसरली. वाळव्यातील सहकारी चावडीसमोर जमले व चावडीचा कट्टा चढून आले. पण त्यांना चावडीत प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी सगळा गाव जागा केला. ज्यावेळी अण्णांना पोलीस पकडून न्यावयास लागले त्यावेळी हजारो शेतकऱ्यांनी पोलिसांचा पाठलाग केला. जमाव अण्णांच्या मागे येत आहे हे पाहून लोकांना अण्णांनी सांगितले की, ''कोणीही पुढे येऊ नका.''[३६] त्यानंतर लोक परत गावात जाऊन चर्चा करीत बसले. त्या दिवशी अक्षरश: वाळवा गावात अनेकांच्या घरातील चुली पेटल्या नव्हत्या. गावांत शोककळा

पसरली होती. तसेच पोलीसांना ज्या घरभेद्यांनी अण्णांच्या मुक्कामाची बातमी दिली. त्यांचेबद्दल सुडाची व तिरस्काराची भावना आपोआपच पसरली होती.

दुपारी वाळव्याचा पोष्टमन रामचंद्र शिंदे टपाल पेटीतील पत्रे गोळा करणेस गेला असता त्याला पोष्टाचे पेटीत एक पाकीट मिळाले. त्यावर पत्ता असा होता की, 'डी. एस. पी. सातारा' रामभाऊ शिंदे मनाने देशभक्त होते. त्यांचे गाव देवराष्ट्रे होते. रामभाऊ शिंदे यशवंतराव चव्हाणांचे प्राथमिक शाळेतील वर्गमित्र होते. भूमीगत कार्यकर्त्याबद्दल त्यांना सहानुभूती होती. डी. एस. पी. च्या नावाने पोष्टाचे पेटीतील पाकिटाबद्दल शिंदे पोस्टमन यांना जिज्ञासा निर्माण झाली. त्यांनी ते पाकीट फोढून वाचले. ते पत्र अण्णांच्या कार्यकर्त्याकडे आणून दिले. कार्यकर्त्यांनी ते पत्र वाचले व राष्ट्रोध्दारक देशपांडे म्हणाले की, '' हे पत्र सदू अण्णा देशपांडे यांच्या हस्ताक्षरातील व सहीचे आहे.''[३७] हे ऐकल्याबरोबर त्या ठिकाणी जमलेले शेकडो लोक उठले. सदू अण्णांचे घराकडे गेले. ''त्यांना घराबाहेर काढले. उचलले व गावाच्या बाहेर एक फर्लांगावर आष्टा रस्त्यावर नेले. तेथे सदू देशपांडे यांचा उजवा हात, डावा पाय तोडला त्याला तेथे टाकून लोक निघून गेले.''[३८] ही बातमी पोलीसांना मिळाल्याबरोबर पोलीस आले व देशपांडेचे हात पाय कोणी तोडले याची चौकशी सुरु केली. पोलीसांनी संशयावरुन १) नारायण कदम (शिराळकर), २) खंडू सखाराम शेळके (दाजी), ३) किसन अत्माराम अहिर (पैलवान), ४) किसन गोविंदा जाधव, ५) सखाराम तुकाराम घोरपडे (काका), ६) पांडू गणू पाटील, ७) दिना हिंदू नायकवडी, ८) रामचंद्र संतू अहिर (मास्तर) वगैरे २०-२२ लोकांवर गुन्हा नोंद केला पण वरील सर्व फरारी होते. त्या चौकशीवर सर्व गावकऱ्यांनी बहिष्कार घातला. त्यामुळे पोलीस चौकशीत काहीही निष्पन्न झाले नाही. पण पोलीसांना सहकार्य करणाऱ्यांवर दहशत मात्र बसली. बाबुराव देशपांडे नावाचे अनेक गावात वतन असणारे वतनदार वाळवा येथे कोटभागावर राहात होते. त्यांनी मात्र उघडपणे पोलीसांना सहकार्य करून पोलीसांना जेवण दिले. दिनांक ३१ जुलै १९४४ रोजी

गावातील भूमीगत कार्यकर्त्यांची माहिती दिली आणि बैलगाडीतून पडवळवाडीपर्यंत पोलीसांना सोडायला गेले होते. पडवळवाडीत सर्व्हीस मोटार गाडीत फौजदार व पोलीस पार्टीला बसवून नारायण अनंत उर्फ बाबूराव देशपांडे वाळव्यास परत येत होते. ही दिवसाढवळ्या घडलेली गोष्ट पडवळवाडीचे सर्व ग्रामस्थ पहात होते. त्यामुळे पडवळवाडीचे ग्रमस्थ अस्वस्थ झाले होते. त्यांचा राग अनावर झाला. ‘‘पडवळवाडीच्या ग्रामस्थांनी बाबुराव देशपांडे यांचा उजवा हात व डावा पाय तोडला. सदू अण्णा देशपांडे व बाबुराव देशपांडे यांच्या हातापायाचे कलम केले असे त्या घटनेबद्दल लोक म्हणत. बाबुराव देशपांडे यास जबर दुखापत करणेच्या आरोपाखाली पोलिसांनी पडवळवाडीच्या (१) तुकाराम नाना खोत (वस्ताद) (२) कृष्णा रामा करमाळकर (तात्या) (३) हरी गणू कदम (भाऊ) (४) यशवंता बापू करमाळकर (५) महादेवराव अनुसे (देवास) धनगर (६)शाम उर्फ तुकाराम साधु कुंभार (७)दत्तू लखू घाड यांना आरोपी केले होते पण ते सर्व फरारी झाले होते.’’[३९]

अण्णांना इस्लामपूर लॉकपमध्ये ठेवले होते. दुसरे दिवशी डीवाय. एस.पी. भोसले त्यांचेकडे आले. सावंत फौजदाराचे खोलीत म्हणाले, ‘‘वाळवा व पडवळवाडीत काल एक व परवा एक देशपांडे प्रकरण झाले. हे थांबले पाहिजे. मी सांगितले मलाही तेच पाहिजे आहे. काहीही करा पण हे थांबले पाहिजे.’’[४०] त्याकरिता बाळकू पाटील नावाचा कामेरी येथील एक विद्यार्थी आहे त्यास बोलवा म्हणून सांगितले. त्याचेकरवी वाळवा ग्रामस्थांना माझे विचार कळवतो. पोलीसांनी बाळकू पाटील याला बोलावून आणले. त्याला अण्णांनी असे सांगितले की, ‘‘वाळव्यास जाऊन माझे वडिलांना भेट, किसन अहिर पैलवानांना भेट व त्यांना असे सांग की तुम्ही काहीही आततायी काम करू नका, तुम्ही शांत रहा. मी थोड्याच दिवसात परत येत आहे.’’[४१]

हा निरोप कळल्यावर दुसरे दिवशी अण्णांचे वडील व आई अण्णांना इस्लामपूर पोलीस लॉकऑफमध्ये भेटण्यास गेले. सावंत फौजदार अण्णांना म्हणाले की, ‘माझ्या खोलीत

आई–वडिलांना भेटा. खोलीचे दार ओढून घेतो. आई वडीलांना काय सांगायचे ते सांगा.' वडीलांनाही अण्णांनी तेच सांगितले की लोकांनी शांत रहावे व ते लवकरच परत येतील. वडीलांनी विचारले 'कसे येणार?' त्यावर अण्णा म्हणाले, 'जेलच्या तटावरून उडी मारून येणार.' त्यावर वडील म्हणाले, 'तसे केलेस तर पोलीस गोळी मारतील, तसे काही करू नकोस.' असे सांगून आई वडील निघून गेले.

इस्लामपूर मध्ये अण्णा लॉकअपमध्ये असताना त्यांचे सहकारी वाय. सी. पाटील पत्राने संपर्क साधून होते. आंघोळ केल्यावर ओली धोतर वाळत घालण्यास लॉकअपचा पाणक्या कर्मचारी येत होता. धोतराच्या शेवटच्या कोपऱ्यात चिठ्ठी बांधून अण्णा पाठवत होते व धोतराचे कोपऱ्यातून त्यांना चिठ्ठी वाय. सी. पाटील पाठवत असे. यासाठी लॉकअपचा कर्मचारी बेमालूम अण्णांना मदत करीत होता. बाहेर पडण्याच्या अण्णांच्या योजनेस मूर्त स्वरुप येणार अशा वेळी एके दिवशी वाळलेल्या धोतराच्या कोपऱ्यातील चिठ्ठी खाली पडली व ती तेथे पहाऱ्यास असलेल्या पोलीसांनी पाहिली. फौजदाराकडे ती चिठ्ठी गेल्याबरोबर दुसरे दिवशी सावंत फौजदाराने अण्णांना सातारा सब जेल दाखविले. तो दिवस बुधवार होता. अण्णांना दुपारी ४ वाजता सातारा जेलमध्ये नेले. तेथे त्यांच्या पूर्व परिचयाचे कैदी होते. अण्णांना इस्लामपूरहून सातारा जेलमध्ये पाठवलेची बातमी कामेरीचे एस. बी. पाटील यांना तेथे असलेल्या कैदी सहकाऱ्याला लगेच समजली. गेटच्या जेलवर एस. बी. पाटील येऊन थांबले.

सातारा जेलमधील लॉकअपमध्ये असताना चार पोलीस अण्णांना सकाळी शौचास खोलीबाहेर काढायचे नंतर खोलीतच आंघोळ करावी लागत असे. शौचास बाहेर पडताना व परत जाताना एस. बी. पाटील यांची भेट घडत असे. पोलीसांचा डोळा चुकवित ते योजना आखीत होते व बाहेर पडण्याचा मार्ग शोधत होते. शेवटी एस.बी. पाटील यांनी अण्णांची बाहेर जाण्याची योजना आखली. ''अण्णांचे बाहेर जाणेचे ८० टक्के श्रेय एस.बी.पाटील यांनाच आहे. जेस धुळे खजिना लुटीचे श्रेय फकिरा देवरे यांना आहे. तसेच

अण्णांचे सातारा जेलमधून बाहेर पडण्याचे श्रेय एस. बी. पाटील यांना आहे.''[४२] एस. बी. पाटील सातारा शहरात बरेच दिवस असलेमुळे त्यांना शहराची रस्त्याची माहिती होती. जेल भोवतालची सर्व परिस्थिती माहिती होती. अण्णांना त्यांनी योजना सांगितली व ते कामाला लागले. एक एक कैदी मित्र मदतीस गोळा केले. वशीचे साळी, नेर्लेचे शामू रामा पाटील यांनी खाली भिंतीकडे तोंड करून उभे राहावयाचे. एस. बी. पाटील यांनी खाली बसायचे व अण्णांनी नंतर एस. बी. पाटील च्या खांद्यावर बसून भिंत पकडायची व बाहेर पडायचे अशी आखणी पूर्ण झाली. सर्वांनी बुधवारी सायंकाळी फिरायला जाण्याचे नाटक केले व शनिवारी बाहेर पडण्याची योजना पक्की झाली.

हिरू नावाचा एस. बी. पाटील यांचा कैदी मित्र होता. तो लांब मुदतीची शिक्षा भोगत होता. त्याची रविवारी १० सप्टेबरला मेसमध्ये कामाची पाळी होती. त्याने एका पोलिसास मेसचे सामान देणेच्या निमित्ताने पोलीसास गुंतवून ठेवले. नागठाणे ता. तासगांव येथील पोलीस अडिसरे त्या दिवशी ड्युटीवर होते. बर्डे मास्तर व अण्णा एकाच खोलीत होते. बर्डे मास्तर खोलीचे पाठीमागे प्रार्तविधी व आंघोळीस म्हणून गेले. त्यामुळे अडिसरे पोलीस बर्डे मास्तरांच्यावर देखरेख ठेवण्यास गेला. एक पोलीस हवालदार खोलीची कुलपे नीट लावली आहेत की नाहीत याची तपासणी करीत होता. ठरल्याप्रमाणे अण्णांनी जेलच्या भिंतीवरून उडी मारली. पूर्वेकडील बाजूच्या भिंतीचे बाहेरील दुसरी भिंत पडली होती. तेथे तारेचे कपौंड घातले होते. परंतु खेळणाऱ्या मुलांनी दोन तारांमधून बाहेर जाणेची वाट केली होती. जरा इकडे तिकडे पहात तोंड न वळवता तारेच्या बोळक्यातून बाहेर गेले व समोरच्या पोलीस लाईनकडे गेले. जाता जाता कोणास शंका येऊ नये म्हणून हरळी उपटून घेतली. समोरच्या पोलीस लाईनीतील घरात पोलीसही नव्हता व घरात कोणी बाईमाणूसही नव्हते. पायरीवर पाय ठेवला त्याच पायावर गिरकी घेतली. पोलीस लाईनीमधून बाहेर आले. पुढे जात असताना जोशी वकिलांच्या नावाची पाटी दिसली दारातून आत गेले तर तेथे पंचम जॉर्जचा

फोटो पाहून चुकीच्या घरात आल्याचे लक्षात आले. तेवढ्यात आतून 'कोण आहे?' अशी महिलेने चौकशी केली. ''वकीलांच्याकडे काम होते'' असे म्हणाल्यावर 'बसा' म्हणून सांगितले. 'पुन्हा येतो' असे सांगून ती बाहेर पडले. तोवर एक गावकरी दूध घालणेस जोशी वकीलांकडे येताना दिसला. तो दूध घालून बाहेर पडल्यावर त्याचेबरोबर बोलतच अण्णा चालले. अण्णांनी त्याला भाऊराव पाटील यांच्या घरचा पत्ता विचारला. तेवढ्यात रस्त्याचे बाजूस कार्यकर्ते जाजू यांचे दुकान दिसले. त्यांना अण्णा म्हणाले, ''मी आताच जेल फोडून बाहेर आलो आहे. मला आजच्या दिवसापुरता आसरा द्याल का? ते म्हणाले, ही जागा सुरक्षित नाही. त्यावर मी म्हणालो, ठीक आहे. मला कर्मवीर अण्णांचे घर दाखवा.''[४३] असे म्हटल्यावर जाजूंनी आपल्या भाच्यास बरोबर पाठवून दिले. थोडे अंतर चालून गेल्यावर कर्मवीर अण्णांच्या घरचा रस्ता अण्णांच्या लक्षात येताच त्याला परत पाठवून दिले व ते कर्मवीर अण्णांच्या घरात गेले. त्यावेळी तेथे मावशीबाई आणि सुखटणकर आपल्या मोठ्या मुलीला खांद्यावर टाकून उभे होते. त्यांना अण्णा म्हणाले, 'तुम्ही मला ओळखत नाही. मी तुम्हाला ओळखतो. मी जेलमधून आलो आहे. गनी भाईंना बोलवा.' सुखटणकर यांनी ए. डी. अत्तार यांना बोलावून घेतले होते. तोपर्यंत नागनाथ अण्णा कर्मवीर अण्णांचे कॉटवर गाढ झोपले होते. ए. डी. अत्तार आल्यावर त्यांनी त्यांना हालवून जागे केले व पाठीमागचे दाराने आपल्या घरी नेले. त्यांच्या पत्नीने दोघांना जेवायला वाढले परंतु अण्णांना घास गिळवेना. त्यावर गनी अत्तार म्हणाले, ''नागनाथ जेव, अरे बाबा या गनी अत्तरचा अगोदर मुडदा पडेल. मगच पोलीस हुंबऱ्याच्या आत पाऊल ठेवतील.''[४४] ते एका शिक्षकाचे धाडस बघून अण्णा पोटभर जेवले. त्यापूर्वी पोलीसांनी अण्णांना वाळवे येथे पकडल्यापासून त्यांनी पूर्ण एक भाकरी खाल्ली नव्हती. परंतु त्या दिवशी ते पोटभर जेवले. सायंकाळी रयत शिक्षण संस्थेच्या सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेजच्या वसतिगृहामध्ये अण्णांना जेवावयास घातले. वशीचे महादेव पाटील व भादल्याचा सनदे या विद्यार्थ्यांची भेट झाली.

एक दिवस महादेव पाटील व सनदे यांचे खोलीत थांबून पोलीसांचा डोळा चुकवून घनिळीच्या बागेतून अण्णा रात्रीच्या वेळी गावाबाहेर पडले. मेढ्याचे रस्त्याने जात असताना एक मोकळी बैलगाडी मेढ्याकडे जात होती. त्या गाडीवाल्याने त्यांना गाडीत घेतले व असा प्रवास करीत करीत मेढ्याचे दक्षिणेकडील ऐळीव या छोट्या गावी पोहचले. तेथे रयत शिक्षण संस्थेची एक व्हॉलंटरी शाळा होती. अण्णांना शाळा तपासणी करण्यास आलेले इन्स्पेक्टर म्हणून तेथे नेले. तेथे शिगावचे भगवान पाटील शिक्षक होते. त्यांचेकडे जेवण करून निघाले ते थेट सुपने, तांबवे येथे आले. तेथील भूमीगत कार्यकर्ते डी. जी. पाटील यांच्या मळ्यातील घरात येऊन थांबले. त्यांनी कराडला यशवंतराव चव्हाणांना ही बातमी कळवली. त्याबरोबर यशवंतराव चव्हाण अण्णांना भेटण्यास तांबवे येथे आले. त्यानंतर धन्वंतरी कासेगावला वैद्यही आले. पांडू मास्तर तर पूर्वीपासूनच तेथे होते. भूमीगत कार्यकर्त्यांची पोलीसांना माहिती पुरवणारा पोलीसांचा खबऱ्या रामू गोटखिंडे पोलीस संरक्षणात आष्टा येथे आरामात राहात होता. अण्णांच्या सहकाऱ्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली होती. त्याला धडा शिकवण्याची वाट पहात होते. शेवटी एके दिवशी पाणी आणण्यासाठी विहिरीत उतरलेवर तेथेच त्याचेवर हल्ला करून कंठस्नान घातले. त्याच्या देशद्रोहाची शिक्षा त्याला मिळाली व हाकनाकपणे त्याने आपला जीव गमावला. अशा तऱ्हेने दोन देशद्रोह्यांची हातपाय तोडून टाकले व तिसऱ्याचे झाडच उपटून टाकले.

**क्रांतिवीरांची साम्य असणारी कार्य व घटना :**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये आपल्या जीवाची बाजी लावून ज्या क्रांतिवीरांनी महाराष्ट्रातील प्रतिसरकारचा इतिहास घडविला त्यामध्ये एकाच सातारा जिल्ह्यातील तीन क्रांतिवीरांच्या धाडसी कार्यामध्ये योगायोगाने साम्य पहावयास मिळते. क्रांतिवीर किसन वीर यांचा जन्म पवित्र कृष्णा नदीचे जे तीर्थक्षेत्र दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते त्या वाई शहरामध्ये ११ ऑगस्ट १९०६ रोजी झाला. त्यानंतर कृष्णा नदीच्याच काठी वाळवा येथे ज्या

गावाला १८८५ साली अखिल भारतीय कॉंग्रेसचे पहिले अध्यक्ष अॅलेन ह्यूम व लोकमान्य टिळक यांनी काँग्रेस कार्यकत्यांची बैठक घेतली होती. त्या ऐतिहासिक वाळवा गावात नागनाथ अण्णा नायकवडी यांचा जन्म १५ जुलै १९२२ साली झाला. तसेच याच कृष्णा नदीच्या विशाल पात्राकाठी पद्माळे या गावी स्वातंत्र्य सेनानी वसंतदादा पाटील यांचा जन्म दि. १३ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. या तिन्ही लोकनेत्यांना राजकिय वारसा नव्हता. तिन्ही नेते सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मले पण स्वत:च्या कर्तबगारीवर त्यांनी अद्वितीय अशी राजकीय कामे करून इतिहास घडविला. क्रांतिवीर किसनवीरांचे पूर्वज वारकरी पंथाचे, शाकाहारी होते व त्यांचे बालपण वाई या दक्षिण काशीत गेले. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे पूर्वज मुंगी पैठण या तीर्थक्षेत्रातून कराडला कृष्णाकाठी आले. नंतर येलूर येथे आल्यानंतर तेथे काही पूर्वज थांबले व काही काळाने वाळवा येथे स्थायिक झाले. नागनाथ अण्णा नायकवडी यांचेही पूर्वज वारकरी शेतकरी कुटुंबातील होते. तसेच स्वांतंत्र्य सेनानी वसंतदादा पाटील यांचे पूर्वज महाराष्ट्रीयांचे कुलदैवत तुळजापूरच्या भवानी मातेचे पुजारी होते व त्यापैकी काही पद्माळे येथे येऊन स्थायिक झाले. तिन्ही क्रांतिवीरांचे पूर्वज कोणत्यातरी तीर्थक्षेत्री राहात असल्याचे आढळून येते. त्यानंतर स्वातंत्र्यसंग्रामामध्ये तिन्ही स्वातंत्र्य योध्यांनी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. ब्रिटीश सत्तेला धडकी बसावी अशी ऐतिहासिक कार्ये त्यांनी केली आहेत. किसन वीर यांना ब्रिटीश सत्तेने येरवडा जेलमध्ये स्थानबध्द करून ठेवले होते पण त्यांनी आल्या साथीदारांसह अभेद्य अशा येरवडा जेलच्या भिंतीवरून उडी मारून दि. ३१ आक्टोबर १९४२ रोजी भूमीगत झाले होते. वसंतदादा पाटील यांनाही ब्रिटीश सरकारने अटक करून सांगली जेलमध्ये स्थानबध्द केले होते. पण तेही आपल्या १३ साथीदारांसह सांगली जेलच्या तटावरून उडी मारून भूमीगत झाले. दुर्दैवाने पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून जखमी केले. त्यामुळे पुन्हा त्यांना अटक झाली. तसेच नागनाथ अण्णा नायकवडी यांनाही ब्रिटीश सरकारच्या पोलिसांनी अटक करून सातारा

जेलमध्ये स्थानबध्द केले होते पण त्या जेलच्या अभेद्य अशा तटावरून उडी मारुन आदरणीय अण्णा दि. १० सप्टेंबर १९४४ रोजी स्वातंत्र्य झाले व भूमीगत झाले. अशाच क्रांतिवीरांनी भारतीय स्वातंत्र्याचा लढा पुन्हा जोमाने चालू ठेवला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतकरी समाज बांधवाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास घडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. किसन वीरांनी भुईंज, ता. वाई येथे १९७१ मध्ये सहकारी साखर कारखाना सुरु केला व वाई येथे आर्टस, सायन्स व कॉमर्स महाविद्यालय जून १९६२ मध्ये सुरु केले. नागनाथ अण्णा नायकवडी यानी वाळवा येथे जून १९४९ साली किसान शिक्षण संस्थेची स्थापना करून हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाचे हुतात्मा किसन अहिर विद्यालय सुरु केले. मुलांच्यासाठी हुतात्मा नानकसिंह वसतीगृह व मुलींच्यासाठी सावित्रीबाई फुले वसतीगृह व जिजामाता विद्यालय सुरु केले. या शिक्षण संस्थेच्या आर्थिक अडचणी सोडवणेसाठी व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हुतात्मा अहिर सहकारी साखर कारखाना १९८१ साली सुरु केला. पुढे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय यांची उभारणी झाली. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये भारतात प्रथम क्रमांक मिळविला आहे व आजपर्यंत टिकवला आहे. तो 'हुतात्मा पॅटर्न' म्हणून आज भारतात प्रसिध्द आहे. वसंतदादानी आशिया खंडात जास्त गळीत करणारा 'शेतकरी सहकारी कारखाना' माधवनगरमध्ये सन १९५६ मध्ये सुरु केला व बुधगाव येथे इंजिनिअरिंग कॉलेज सुरु केले.

राजकीय क्षेत्रात तिघांनीही आपले बहुमोल योगदान दिले आहे. किसन वीर विधान परिषदेचे सदस्य व लोकसभेचे सदस्य होते. नागनाथ अण्णा नायकवडी दोन वेळा विधान सदस्य होते व लोकसभेच्या चार निवडणुका त्यांनी लढविल्या. वसंतदादा विधानसभेचे सदस्य होते व चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले व राजस्थानचे राज्यपालही झाले होते. काँग्रेस पक्षाचे किसन वीर व वसंतदादा आधारस्तंभ होते. तसेच नागनाथ अण्णा नायकवडी डाव्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व पुरोगामी विचारांच्या चळवळीचे

आधारस्तंभ आहेत. समाजवादी पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सदस्य व महाराष्ट्राचे प्रदेश अध्यक्ष आहेत.

वरील तिन्ही लोकनेते होते. शेतकऱ्यांचे खरे प्रतिनिधीत्व करीत होते. सामाजिक व राजकीय अन्याय दूर करण्यास या तिन्ही नेत्यांनी पुढाकार घेतला म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या जनमानसात स्वयंभू व स्वयंप्रकाशित व्यक्तिमत्व म्हणून आपले स्थान कायम राखले आहे. क्रांतिवीर किसन वीर अल्पसंख्याक समाजापैकी असूनसुध्दा त्यानी स्वातंत्र्य मिळाल्यापासून सातारा जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व अखेरपर्यंत केले. मा. यशवंतराव चव्हाणाचे विश्वासू सहकारी म्हणूनही त्यांनी मान्यता मिळवली होती. मा. वसंतदादा यांनी महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्रीपद व राजस्थानचे राज्यपाल पद भूषवले होते. त्याचबरोबर दिल्लीमध्ये अ. भा. काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून उत्तर प्रदेश व दिल्ली प्रदेशामध्ये काँग्रेस पक्षाचे महत्वाचे काम केले होते. आपल्या कार्याने त्यांनी महाराष्ट्राचे नाव दिल्लीत गाजवले होते. मा. नागनाथ अण्णांनी तर ओळख नसतानासुध्दा पंजाबमधील मानकसिंग व नानकसिंह या दोन माजी सैनिकांना दिल्लीतून सातारा जिल्ह्यात आणले होते. त्यांच्या मदतीने शिराळा पेट्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांना हत्यारे वापरण्याचे प्रशिक्षण आझाद हिंद फौजेच्या धरतीवर दिले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेच अनुकरण अण्णांनी केले. साताररच्या प्रतिसरकार लढ्यातील नागनाथ अण्णांचे हे धाडस सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखे आहे.

**स्वातंत्र्य संग्रामासाठी पैसे जमविण्याचे धाडसी कार्य :**

नागनाथ अण्णा गोव्यातून हत्यारे धाडसाने व कौशल्याने मिळवत होते. त्यासाठी ४४ दिवस घालवावे लागले होते. भूमीगत कार्यकर्त्यांची संख्या वाढत होती आणि ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी विविध योजना पार पाडण्यासाठी व पोलिसांशी वेळ पडल्यास सामना करण्यासाठी बंदुकांची गरज भासत होती. अण्णा कुंडल ग्रुपमधील एक जबाबदार कार्यकर्ते होते. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली कुंडल ग्रुपचा दबदबा वाढला होता.

''क्रांतिसिंहाच्या प्रतिसरकारचे प्रमुख डिक्टेटर म्हणून मान्यता त्यांना मिळाली होती.''[४५] सातारा जिल्ह्यातील भूमीगत कार्यकर्त्यांची गटप्रमुखाची संघटना अधिक मजबूत करण्याचे उद्देशाने भूमीगत कार्यकर्ते के. डी. पाटील, जी. डी. लाड, नागनाथ अण्णा नायकवडी, व्यंकटराव माने, डी. जी. देशपांडे, बर्डे मास्तर, जोशी काका, निवृत्ती काका, किसन वीर, धन्वंतरी कासेगावकर वैद्य यांची बैठक जून १९४३ मध्ये झाली. संघटनात्मक बाबींवर चर्चा होऊन के. डी. पाटील यांची जिल्ह्याची भूमीगत संघटना प्रमुख म्हणून निवड केली व त्यास सर्वांनी मान्यता दिली.

तेवढ्यात यशवंतराव चव्हाण यांनी कराडच्या शांताराम इनामदारांबरोबर भूमीगत कार्यकर्त्यांना उद्देशून एक पत्र पाठवले. त्यामध्ये भूमीगत कार्यकर्त्यांनी काम बंद करून पोलिसांसमोर हजर होण्याची सूचना केली. पत्र पाहण्यास कोणीतरी मागितले पण शांताराम इनामदारांनी ते गिळून टाकले. भूमीगत अवस्थेत सर्वच कामे तोंडी निरोपाने चालत.

विशेष प्रसंगी खात्रीच्या माणसाबरोबर चिठ्ठी पाठवली जायची पण तिचा दुरुपयोग होईल अशी शंका आल्यास चिठ्ठी खाऊन टाकायची पध्दत होती. यशवंतरावांच्या पत्रास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यावर विचार होऊन बर्डे मास्तर व जोशीकाका यांनी मुंबईस जाऊन अच्युतराव पटवर्धन यांचेकडून चळवळ बंद करण्याबाबत काय धोरण आहे हे समजून घ्यावे असे ठरले. त्याप्रमाणे अच्युतराव पटवर्धन यांनी मुंबईस भेटल्यावर बर्डे मास्तर व जोशी काकांनी निरोप आणला, तो असा होता - ''जर जनतेपासून दूर जात असाल तर चळवळ ताबडतोब बंद करा आणि जनतेचा पाठिंबा असेल तर भूमीगत चळवळ जरुर चालू राहू घ्या. फक्त पथ्य म्हणजे हिंसा करायची नाही. वैयक्तिक प्रॉपर्टी लुटायची नाही. जनतेला त्रास होईल असे काही करायचे नाही.''[४६] मुंबईहून जेष्ठ नेते सुचनावजा आदेश देत होते पण स्थानिक कार्यकर्त्यांना मात्र चळवळीच्या निमित्ताने काम करीत असताना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत होते. नाना पाटील यांनी मात्र अनेक प्रसंगांना तोंड देत चळवळ जोमाने पुढे

चालवण्याचा निर्धार केला होता. बलाढ्य ब्रिटीश सत्तेविरुध्द लढण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या मूलभूत गरजा म्हणजे शस्त्रे व पैसा महत्वाचा होता. त्या गरजा भागविण्यासाठी नेहमी काहीतरी उपाय योजना भूमीगत नेत्यांना आखणे व त्या पार पाडणे क्रमप्राप्त होते. कुंडलचे आप्पासाहेब लाड शेणोलीच्या घाटात रेल्वेच्या पगार गाडीच्या लुटलेल्या घटनेबद्दल म्हणतात, ''भूमीगत चळवळीसाठी थोडीबहुत हत्यारे आली पण पैसा मिळेना. प्रत्येक श्रीमंताने अहो आमच्याकडून अमक्याने पैसे नेले असे म्हणावे. सांगली, कोल्हापूरहून नाना पाटील यांना हजारो रुपये मिळतात म्हणून लोकांकडून पैशाची मागणी येऊ लागली. परंतु सर्व चळवळ पुरी होईपर्यंत कोल्हापूरातून शंभर रुपये, सांगलीतून २५ रुपये व विट्याहून २५ रुपये असे एकूण १५० रुपये मदत मिळाली. प्रांतिककडून थोड्या प्रमाणात मदत होईल पण लोक तर शंभर दीडशे यांचा खर्च कसा भागणार? आता प्रत्येकाने पैसा मिळणार नाही म्हणून स्पष्टच कळविले होते. जबाबदार लोक सोडून बाकीच्यानीही सत्याग्रह करून तुरुंगात जावे असा आदेश देण्यात आला होता. मे १९४२ ला आप्पा मास्तर, बाबूराव लाड, ईश्वरा लाड व कुंडलचे १०-१२ लोक पकडले गेले. आता बजेटची सर्व जबाबदारी नाथाजी लाड यांच्यावर येऊन पडली. बापूसाहेब (जी.डी) व नागनाथ अण्णा नायकवडी यांनी एक अभिनव योजना पाटलांच्यापुढे मांडली. ती म्हणजे पे स्पेशल ट्रेन लुटणे होय. नाना पाटलांना ते हवेच होते. त्यांनी तात्काळ संमती दिली. सरकारी मालमत्ता लुटण्यास नानांची संमती असे. मात्र खाजगीरित्या एखाद्या सैनिकाने तसे काही केले तर त्याबद्दल ते भयंकर संतापत.''[४७] बापूसाहेब, नागनाथ अण्णा, नाथाजी लाड, अण्णा धनगर, आप्पा लाड, बंडू लाड, रामा तेली, एस. पी.पाटील, ज्ञानू चौकिवाले (वस्ताद), रामू तात्या, एस. पी. जाधव टेलर, रावसाहेब कळके व दुधोंडीचे पाटील असे तेरा लोक या स्पेशल पे ट्रेन लुटण्याचे कामी होते. दरमहा ७ तारखेला मिरजेपासून पुण्यापर्यंत एक गाडी केवळ नोकरांचा पगार वाटीत जात असे. ७ जून १९४३ या दिवशी पगारी आगगाडी लुटण्याचा बेत मंजूर झाला. बापूसाहेबांनी सर्व

घड्याळा बरहुकूम करण्याचा कार्यक्रम आखला होता. शेणोली खिंडीत गाडी लुटावयाची तेथून मुख्य पोलीस गेट कराडला आहे ते १५-१६ मैल लांब स्टेशनवरून टेलिफोन झाला तर अर्ध्या तासात पोलीसांचा वेढा पडेल. सर्व धोक्याची ठिकाणी लक्षात घेऊन सर्व प्लॅन तयार करून तो पुढे मांडला गेला. ७ जून १९४३ ला सकाळी ८ वाजण्याचे आत वरील लोक शेणोली खिंडीत गाडीची वाट पहात राहिले. सर्व काही संकेताप्रमाणे व्हावयाचे पे स्पेशल असेल तर स्टेशनवरुन एक सायकलवाल्याने १ मैलावर असलेल्या खिंडीत येऊन निरोप द्यावयाचे एवढेच त्याचे काम. बिचूद स्टेशनवरुन गाडी सुटली. स्टेशनवर पहाऱ्याकरिता चार हत्यारबंद पोलीस होतेच. शेणोली स्टेशनवरही चार होते. दोन्ही स्टेशनच्या मध्यावर खिंड आहे. तेथील चढणाला गाडीच्या पुढे दगडाचा ढीग रचण्यात ४-५ लोक गुंतले. बापूसाहेबांनी लगेच इंजिनवर चढून ड्रायव्हरला खाली ओढले व रिव्हाल्व्हर छातील लावून गडबड न करण्याची ताकीद दिली. पाच मिनिटे गाडी थांबवण्यात वेळ गेला. पैशाची पेटी फोडण्यात तीन मिनिटे खर्च झाली आणि पैसा घेऊन डोंगरावर जाण्यात २० मिनिटे वेळ लागला.

यាप्रमाणे अर्ध्या तासांचा ठरविलेला प्रोग्रॅम २८ मिनिटातच उरकला. मात्र पोलीसांना त्या ठिकाणी येण्यास अर्ध्याऐवजी पाऊणतास लागला तो पर्यत सर्व भूमीगत कार्यकर्ते आश्रयाच्या ठिकाणी निर्धास्त पोहोचले. या गाडी लुटीत १९ हजार ७१६ रुपये मिळाले. नागनाथ अण्णासह १४ क्रांतिकारकांनी या धाडसी कामात भाग घेतला होता. नागनाथ अण्णा या प्रसंगाबद्दल सांगताना म्हणतात की, 'क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे नाथाली लाड, आप्पा मास्तर, लाड गुरुजी, जी. डी. लाड, ज्ञानू चौकीवाले (वस्ताद), रामभाऊ पवार असे आम्ही एकत्र येऊन काम करीत होतो. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी काही निधीची गरजच असते म्हणून आर्थिक अडचण सोडविणेसाठी मिरजेहून नोकरांचा पगार घेऊन जाणारी रेल्वे गाडी शेणोलीच्या घाटात धाडसाने लुटली पण यामुळे फार काही पैसे मिळाले नाहीत. जे काही मिळाले ते थोड्या दिवसातच कार्यकर्त्यांचा प्रवासखर्च व

इतर खर्च अशातच संपले. पुढे पोलीसांनी गुन्ह्याचा तपास केला पण भूमीगत काही हाताशी लागले नाहीत व लुटून नेलेले पैसेही मिळाले नाहीत.' पोलीसांनी मात्र भूमीगतांवर पाळत ठेवून त्यांना पकडण्यासाठी शर्थ केली होती. अशा परिस्थितीत असि. सुपरिटेडेंट इ. एस. मोडक या पोलीस अधिकाऱ्याने सांगली येथे फौजदार गल्लीतील एका खोलीमधून वसंतदादा पाटील व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांना २२ जून १९४३ रोजी अटक केली होती. परंतु वसंतदादा हे पारतंत्र्यात तुरुंगात खितपत पडणारे कमकुवत वीर नव्हते. त्यांनी २४ जूलै १९४३ रोजी सांगली जेल फोडला व जेलमधील १८ बंदुका व १८९ काडतुसे घेऊन दिवसाढवळ्या सहकाऱ्यासह पोबारा केला. पण पोलीसांच्या पाठलगात व गोळीबारात जखमी झाल्यामुळे अटक केले गेले. त्यांना १३ वर्षाची सक्तमजूरीची शिक्षा झाली व त्यांना येरवडा जेलमध्ये स्थानबध्द करून टाकले. तत्पूर्वी दोन साथीदार हुतात्मा झाले होते. सांगलीत वसंतदादा पाटील यांना अटक केल्यामुळे सांगली भागातील चळवळ थंडावल्यासारखी झाली होती. वाई, कराड, इस्लामपूर भागातील काही भूमीगतांना पकडल्यामुळे पोलीसांची त्या भागातील डोकुदुखी काही प्रमाणात कमी झाली होती.

या धाडसी मोहिमेबद्दल सांगताना नागनाथ अण्णा म्हणतात, ''पोलीस खात्याने त्यांची एक छावणी कोल्हापूर जिल्ह्यातील कसबे सांगाव येथे ठेवली होती. तीन पोलीस व एक हवालदार यांची तेथे नेमणूक होती. त्यांच्या चार बंदुका आणण्यासाठी जी. डी. लाड, राम पाटील कोल्हापूर, ईश्वरा गुरव, व मी असे चौघेजण तेथे दुपारी चार वाजता गेलो. पण त्यावेळी कसबे सांगावची पोस्टाची थैली कागल येथे सोडण्यासाठी एक पोलीस हत्यारासह गेला होता. राहिलेल्या तीन पोलीसांच्या तीन बंदुका आम्ही घेऊन आलो. या धाडसी मोहिमेसाठी नानासाहेब घाडगे म्हणून कागलच्या विद्यार्थी दशेतील मित्राची महत्वाची मदत झाली.''[४८] हायस्कूलमध्ये असताना जिम्नॅशियम हॉलमध्ये व्यायाम करण्यासाठी ते दोघेही एकत्र येत असत. त्यामुळे त्यांची मैत्री कायम झाली व ती आज अखेर आहे. त्यांनी सांगाव

येथे टेहाळणी करून त्याच्या माने दादांच्या पाहुण्याशी चर्चा करून आल्यावर आम्ही दुसरे दिवशी सांगाव येथे गेले. तेव्हा पोलीस चौकीचे दारात एक पोलीस उंबरठ्यावर बसून पायावर ठेवलेल्या ताटातील तांदूळ निवडत होता. अचानकपणे त्या पोलीसास ओलांडून ते सारे सहकारी आत गेले. कुठे आहेत हत्यारे, कुठे आहेत सांगेना म्हणून चौकशी करीत तीन बंदुका साहित्यासह जमा केल्या व पोलीसांनी प्रतिकार करण्यापूर्वीच चौकीतून बाहेर पडले. उंबरठ्यावर बसलेला पोलीस चोर दरोडेखोर असे म्हणून ओरडून लोकांना जमा करण्याचा प्रयत्न करीत होता. परंतू ते आत असताना खोली बाहेरून बंद करण्यासाठी त्याने कडीला हात घातला होता, पण अण्णांनी त्याचे हातावर पिस्तुलाची गोळी झाडल्यामुळे तो बाजूला झाला. तेव्हा हत्यारे घेऊन गावाबाहेर निर्वेधपणे निघून गेला. तेवढ्यात कागलला गेलेला पोलीस परत आला होता.

त्याने हत्याराचा परवाना असलेल्या गावकऱ्यांना घेऊन अर्धा तास त्यांचा पाठलाग केला पण ते वेगाने खूप दूर गेल्यामुळे त्यांनी पाठलाग सोडून दिला कारण अंधारही पडला होता. कसबे सांगाव पासून तीन मैलावर एक गाव आहे तेथे येऊन सर्वजण झोपले. दुपारी जोराचा पाऊस पडल्यामुळे झोपेतून जागे झाले व जोंधळ्याचे शेताबाहेर आल्यानंतर एका शेतकऱ्याला विचारल्यानंतर कळले की आपण सांगावच्या आसपासच आहोत. ताबडतोब कोल्हापूर येथे छ. ताराराणी विद्यामंदिराजवळच्या नानासाहेब घाटगे यांच्या घरी गेले. त्यांनी त्यांच्या जीपने वाळव्याच्या शिवारात तुजारपूरजवळ आणून सोडले. हे ठिकाण कामेरीच्या पूर्वेला होते. अशा रीतीने पोलीसांच्या तीन रायफली घेऊन वाळवा येथे आलो.''[४९] त्यांनी ८-१० रायफली घेऊन वाळवा येथे एक फेरी गावातून काढली होती. हेतू हा की कोणी विरोधकांनी आमच्याविरुध्द पोलीसांना बातम्या देऊ नयेत. अगर त्यांच्या कारवाया थांबाव्यात. त्यामुळे वाळवा गावाला अनेक वेळा पोलीसांनी वेढा देऊन मला व

माझ्या सहकारी भूमीगत कार्यकर्त्यांना पकडण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. पण कोणी सापडले नव्हते. भूमीगत गावकऱ्यांसारखे राहात असलेमुळे त्याचा संशय पोलीसांना येत नसे.

इस्लामपूरचे कॉ. डी. जी. देशपांडे ४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातील नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबद्दल लिहितात की, ''प्रतिसरकारच्या सर्व चळवळीच्या नेतृत्वाची जबाबदारी नाना पाटील यांच्यावर होती. भूमीगत अवस्थेत ते मिटींगला फारसे येत नसले तरी पोलीसांच्या हाती सापडलेल्या भूमीगतांनी सपाटून मार खात्यावर 'हे पत्र अथवा हे रिव्हॉल्व्हर तुला कोणी दिलं' या प्रश्नावर 'मला नाना पाटलांनी गावाच्या बाहेरील झाडाखाली दिले.' हेच उत्तर असावयाचे. त्यामुळे नाना पाटील म्हणजे फार भयंकर प्रकरण आहे असे सरकारला वाटू लागले. सरकारच्या पोलीस खात्याने त्यांना पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण लोकांच्या पाठींब्यामुळे नाना पाटील स्वातंत्र्य मिळेपर्यंत पोलीसांच्या हाती लागले नाहीत असा धाक क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जनमानसात निर्माण झाला होता.''[५०] शेणोली येथील रेल्वेची पे ट्रेनची मिळालेली रक्कम थोड्याच दिवसात संपली व पुन्हा पैशाच्या अडचणी वाढतच गेल्या. पैसे मिळविण्यासाठी नवीन मार्ग शोधणे सुरु झाले.

अशा वेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांचा मुक्काम आटपाडी येथे असे. तेथे भूमीगत कार्यकर्त्यांची ये जा सुरु होती. गावात समविचारी स्वातंत्र्यलढ्यास उत्स्फूर्तपणे मदत करणाऱ्या व्यक्तींच्या ओळखी होत होत्या. अशापैकी तेथे असलेल्या चरखा संघाचे खादी भांडाराचे प्रमुख व धुडकू तानाजी ठाकरे होत्रे ते कट्टर गांधीवादी होते. पैशाची अडचण त्यांना सांगितलेवर ते म्हणाले हे काम खानदेशात सोपे आहे. त्याकरिता त्यांनी धुळ्याजवळील वडजई गावचे कार्यकर्ते नास्तिक बाबू उर्फ फकिरा देवरे यांना बोलावून घेऊन कार्यकर्त्यांची गाठ ठाकरे यांनी घालून दिली. अण्णा व त्यांचे सहकारी भूमीगत कार्यकर्ते फकिरा देवरे यांच्या वडजई येथील मळ्यातील घरी दीड महिने राहिले ते एक मध्यम दर्जाचे शेतकरी होते. अत्यंत सज्जन गृहस्थ होते. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्यावेळच्या कडक उन्हाळ्याच्या दिवसात

पाहुण्यांसाठी साठवलेले साजूक तूप वाढत असत. अशी व्यवस्था सकाळ संध्याकाळचे जेवणात असे आणि हे सर्व ते नुकसान सहन करून स्वत:च्या पैशाने करीत. फकिराप्पा देवरे यांचा एक चुलत भाऊ दयाराम देवरे पोलीस खात्यात जमादार होते. त्याची नेमणूक धुळे येथील पोलीस मुख्यालयात होती. त्याचेवर फकिराप्पानी कामगिरी सोपविली की धुळ्याच्या मुख्य सरकारी खजिन्यातून काही सरकारी रक्कम बाहेरच्या गावी निघाली की ते येऊन भूमीगत कार्यकत्याना सांगायचे फकिराप्पा देवरे व दयाराम देवरे यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. त्यामुळे सोपविलेली कामगिरी त्यांनी विश्वासाने पार पाडली. ‘‘१३ एप्रिल १९४४ या दिवशी दयाराम ड्युटीवर असताना त्यांचेकडे सरकारी तिजोरीतून एक पत्र आले की पाच लाख एकावन्न हजार रुपयाची रक्कम उद्याच १४ एप्रिल १९४४ तारखेस धुळ्याहून नंदुरबार या तालुक्याचे ठिकाणी नेणेची आहे.’’[५१] त्याकरिता दोन हत्यारबंद पोलीसाची मागणी केली आहे. हे सरकारी पत्र हातात पडताच दयाराम देवरे ते पत्र घेऊन फकिराप्पाच्या मळ्यात आहे.

पुढील घडामोडीचा वृत्तांत सांगताना अण्णा म्हणतात की, ‘‘आम्ही त्यावेळी जेवावयास बसलो होतो. दयाराम देवरे यांनी आम्हाला आणलेले पत्र दाखविले. त्यावर चर्चा करताना दयाराम देवरे म्हणाले की मी असे दोन पोलीस देतो की जे ४–६ महिन्यात निवृत्त होत आहेत. पुढची तयारी तुम्ही करा. असे सांगून ते गेले. जी. डी. लाड व मी चर्चा करून योजना आखणीस चिमगणचे रस्त्यावर काय परिस्थिती आहे हे पाहणेस फकिराप्पाच्या मदतीने चारचाकी वाहनाने आम्ही गेलो. त्यासाठी आग्रा रोडने ४–४ च्या संख्येने आमच्या सहकाऱ्यांनी जाऊन गावाबाहेर येऊन थांबायचे ठरले. कारण एकदम ४० माणसे एकत्रितपणे गेली तर पोलीसाना संशय येईल म्हणून अशी योजना केली होती. आम्ही ठरलेल्या ठिकाणी येत असताना माझेपुढे जो ४ जणांचा ग्रुप होता त्यामधील एक माणूस रस्त्याचे कठड्यातून जात होता. संशय आलेवरून पोलीसांनी त्याला हटकले म्हणून तो पळून पुढे निघून गेला. त्याचा पाठलाग करीत पोलीस पळू लागले होते. हे माझे समोर घडले. धोक्याची शिट्टी

वाजवण्यासाठी पोलीस शिट्टी वाजवण्याच्या बेतात असताना मी त्या पोलीसाची शिट्टी पकडली. त्यामुळे त्या पोलीसास शिट्टी वाजवता आली नाही व काही अंतरावर असलेल्या रस्त्यावर गस्त घालत असलेल्या पोलीसांना धोक्याचा संदेश जाऊ शकला नाही. आम्ही आमचे लोकांना पुढे जावा म्हणून सांगितले पण या प्रसंगामुळे आमचे ४-४ चे ग्रुप विस्कळीत झाले. ३२ जण धुळ्यामध्ये दाही दिशांना निघून गेले. फक्त जी. डी. लाड यांचा चार जणांचा ग्रुप व माझा चार जणांचा ग्रुप चिमठाणकडे निघाला. त्याकाळात खाजगी सर्व्हिस गाडीनेच सरकारी खजिना नेत. हे समजलेवरुन धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, आप्पासाहेब पाटील यांनी खजिन्याचे गाडीत जरुरीच्या कामात चिमठाणला जायचे सांगून प्रवेश मिळविला होता. मी व जी. डी. यांनी लुटूपुटीचे भांडण करून रस्त्यावर मारायचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही चिमठाणचे अलिकडे सरळ रस्त्यावर खजिन्यांचे गाडीची वाट पहात बसलो. डॉ. उत्तमराव पाटलांना गाडीत घेतल नाही म्हणून ते ट्रकने येऊन आमच्यात सामील झाले. आम्ही आठजण व गाडी थांबली तर उत्तमराव पाटील नववे असे त्या मोहिमेत होतो. खजिन्याची गाडी वळणावर आल्याचे पाहून आम्ही नाटक सुरु केले. जी. डी. बापू त्यांचे दोन साथीदार व मी रस्त्यावर भांडण्याचे नाटक करु लागलो. रत्यावर लोक भांडत आहेत हे पाहून ड्रायव्हरने गाडी थांबवली पण चाणाक्षपणे त्या ड्रायव्हरने काहीतरी धोका असे जाणले. त्याचवेळी गाडीतील आमच्या लोकांनी दोन पोलीसांना धरून त्यांच्या बंदुका हस्तगत केल्या. त्याबरोबर पोलीस ओरडले म्हणून ड्रायव्हरने धाडसाने गाडी चलाखीने पुढे सुरु केली गाडी आमचे अंगावरच येत आहे हे पाहून आम्ही बाजूस झालो. पण पुढे रस्त्याचा चढ असल्यामुळे आम्ही पळत त्या गाडीचा पाठलाग केला. गाडीचा वेग कमी असताना एक हात दाराला व उजवा पाय बॉनेटवर ठेवून ड्रायव्हरच्या हातावर पिस्तुलाच्या दोन गोळ्या झाडल्या तरी ड्रायव्हर थांबेना म्हणून तिसरी व चौथी गोळी कानावर मारल्यामुळे ड्रायव्हरने त्याचे हातातील स्टेअरिंगच्या चाकावर डोके टेकले व त्यामुळे गाडी थांबली. मी गाडीची किल्ली काढून घेतली. गाडीतील साथीदारांनी

दोन पोलीसांना धरून ठेवले होते. त्यांचेकडील ८०३ नंबरच्या बंदुका व काडतुसे ताब्यात घेतल्या. खजिन्याच्या देवदारी पेट्या शेंदरी लोखंडी पट्टयांनी मजबूत केल्या होत्या. त्या पेट्या धोंडीराम माळी व रावसाहेब कळके यांनी गाडीतील टॉमी व स्क्रू ड्रायव्हर आणून उघडण्याचे काम झपाट्याने केले. आम्ही सर्वांनी खजिन्याचे पेटीतील पैसे व नोटांची बंडले धोतरामध्ये घेतली. रस्त्याने त्यावेळी लग्नास जाणाऱ्या वऱ्हाडाच्या बैलगाड्या दिसल्या त्या ओळख नसलेल्या वऱ्हाडींना एक हजाराची नाणी वाटून टाकली. नाण्याचे वजन घेऊन जाणे त्रासाचे होईल म्हणून हे केले. ट्रकने येऊन उत्तमराव पाटील आमच्यात सहभागी झाले. ते त्याच भागातील असलेमुळे त्यांनी आम्हाला रस्ते दाखविले. एप्रिलचा महिना असलेमुळे उकाडा होता. सर्वजण पळून घामाघूम झालो होतो. गाडीत कॅशियर होता. ३५ वर्षाच्या पांढरपेशा वर्गातील वाणी नावाच्या कॅशियरने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून रस्त्यातील एक भिल्ल मुलाकरवी जवळच्या औट पोस्टवर खजिना लुटल्याची बातमी दिली. त्यामुळे पोलीस औट पोस्टमधील तीन पोलीस पाठलाग करीत आले. त्यांनी रायफलीचा आवाज काढला व त्यामुळे आम्हाला पोलीस पाठलाग करत आहेत हे कळले. त्यांचेत व आमचेत जेवढे अंतर वाढेल तेवढी सुरक्षितता असलेमुळे वेगाने जात होतो. पण तेवढ्या अंतरावरून पोलीसांनी गोळीबार चालू ठेवला. जी. डी. बापूंच्या पिंढरीतून एक गोळी घुसली व ते जायबंदी झाले. धोंडीराम माळी यानी त्यांची विजार फाडून फडके केले व जी. डी. बापूंची जखम बांधली व पुन्हा पुढे पळत गेलो. आम्ही सर्वजण एका खड्यात बसलो तेवढ्यात पोलीसांची दुसरी गोळी माझ्या उजव्या खांद्याला लागून खाली पडली व त्या ठिकाणी जोंधळ्याएवढे रक्ताचे तीन थेंब आले व ती जागा लहान चेंडू एवढी फुगली. कारण गोळीचा रेंज संपत आला होता. मी थोडक्यात बचावलो. संधिप्रकाश संपायला आला होता. पोलीसांवर आम्हीही गोळीबार करीत होता. त्यामुळे सूर्यास्तानंतर पोलीसानी पाठलाग थांबवला. बोरकुंडच्या ओंकारराव पाटलांचे घरी थांबायचे ठरले होते. तसे उत्तमराव पाटील यांनी सांगून ठेवले होते. एक भिल्लास तीन हजार

रुपये देऊन जखमी जी. डी. बापूना खांद्यावर घेऊन येण्यास सांगितले. रात्रभर प्रवास करून उजाडताना ज्या गावात आलो तेथील शिक्षकाला भेटलो. तो खादीधारी होता म्हणून आपला समजून त्याला ४-८ दिवस आम्हाला ठेवणेची व्यवस्था कर म्हणून सांगितले पण ते शक्य नाही असे म्हटल्यावर आम्ही त्याला टांगा मिळवून देण्याची विनंती केली. त्यांनी दोन घोड्याचा टांगा ठरवून दिला. टांगा गावाबाहेर उभा होता त्यामध्ये जी. डी. बापू लाड, धोंडीराम माळी, डॉ. उत्तमराव पाटील व मी बसलो होतो. कच्च्या रस्त्याने टांगा जात असताना पुढून येणारी पोलीस पार्टी पाहिली त्यातून बेधडकपणे टांगा नेला. पोलीसांनी आम्हाला वाट करून दिली व बोरकुंडच्या ओंकारराव पाटलांचे घरी आम्ही पोहोचलो.''[५२]

मिळालेली रक्कम सातारा जिल्ह्यात कशी आणायची हा मोठा प्रश्न होता. राजमती ताई अगोदरच धुळे येथे फकीरा देवरे यांचा पाहुणा एक सी. आय डी ऑफीसर होता त्यांचेकडे येऊन थांबल्या होत्या. सर्वानुमते असे ठरले की पैसे सातारा जिल्ह्यात आणण्याचे कामाकरिता धोंडीराम बापू माळी व राजमती ताई यांची निवड केली. रेल्वेने बॅगा भरून त्यांनी यायचे असे ठरले. बोरकुंडला टरबूल, कलिंगडे भरपूर मिळत होती. ती खरेदी केली ती पळे व नोटांची बंडले पोत्यात भरली व बैलगाडीने नाशिककडे निघालो. नाशिकजवळ बाहुबली जैन देवस्थानची एक शाखा मसरुळ येथे होती. त्यांचे संचालक शांतीकुमार लोठाडे होते. त्यांचेकडे आम्ही थांबलो. मसरुळच्या आश्रमाजवळ मिलिटरीच्या गाड्या थांबल्या होत्या. त्या गाडीतून बॅगांची एक खेप केली. दुसरी खेप केली अशा रीतीने चार लाख ३१ हजार रुपये आटपाडीला नाना पाटील यांचेकडे पोहोचते केले. भूमीगत कार्यकर्त्यासाठी मदत म्हणून मुंबईच्या श्री. अच्युतराव व श्री. ग. बा. नेवाळकर यांचेकडे १ लाख १० हजार रुपये पोहोचते केले. खानदेशातील भूमीगत कार्यकर्त्यांच्या खर्चासाठी १ लाख १० हजार दिले असे दोन लाख २० हजार खर्च झालेनंतर २ लाख ११ हजार सातारा जिल्ह्याकरिता राहिले. ते जिल्ह्यातील भूमीगत चळवळीसाठी व कार्यकर्त्यासाठी खर्ची पडले. धुळ्याच्या खजिना लुटीतील पैसे

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सेक्रेटरी नाथाजी लाड यांचेकडे आणून दिलेवर सातारा जिल्ह्यातील इतर भूमीगत ग्रुपमध्ये त्या पैशाबद्दल अपेक्षा वाढल्या होत्या. इतर ग्रुपमधील नेत्यांना आपल्यालाही त्या खजिन्यातील पैसे मिळावेत असा प्रयत्न त्यांचेकडून केला गेला होता. सातारा जिल्ह्यातील ज्या भूमीगत कार्यकर्त्यांनी पैसे मागितले होते त्यांना अण्णांनी पैसे दिले. त्या प्रसंगामुळेच वाई ग्रुपचे नेते किसन वीर व नागनाथ अण्णा यांचे संबंध घट्ट झाले.

अशा रितीने देशकार्यासाठी व देश स्वतंत्र करण्यासाठी अण्णांनी व त्यांच्या सहकार्यांनी वेगवेगळ्या मार्गाने पैसा उभा करुन चळवळ चालविली व देशातील स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले.

**संदर्भ ग्रंथ :**


१. दै. सकाळ (२४ जानेवारी २००९) : सांगली कार्यालय रौप्य महोत्सवी वर्धापन दिन, पृष्ठ – ६

२. पाटील पी. बी. (२००४) : क्रांतिसिंह, शांतिनिकेतन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – ५४९

३. शिवणीकर राघव (२००२) : सातारचा सिंह, आधारे द. विजय हौसिंग सो. पुणे, पृष्ठ – ११० ते १११

४. लाड जी. डी. (१९८६) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – २२२

५. चामुंडराय चिं. (१९७१) : स्वातंत्र्याच्या हिमाचलावर मावळलेले दोन दिव्य तारे, हुतात्मा किसन अहिर स्मारक प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – ३०

६. पाटील डी. बी. (२००२) : असे लढले क्रांतिवीर, प्रसाद वितरण ग्रंथ दालन प्रकाशन, सांगली, पृष्ठ –६५

७. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, पृष्ठ – ६५

८. धर्माधिकारी भालचंद्र (२००२) : क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – १२२

९. लाड जी. डी. (१९९९) : क्रांतिअग्रणी पर्व (पाक्षिक), श्री लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस कुंडल, सांगली, पृष्ठ – ९

१०. लोहार दत्तात्रय बळवंत (१९९०) स्वातंत्र्य संग्राम, हुतात्मा किसन आहिर स्मारक प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – १३

११. बागल माधवराव – बहुजन समाजाचे शिल्पकार, पृष्ठ – ९२

१२. गरूड शांताराम (१९९२) ‘१९४२ चा लोकलढा आणि साताऱ्याचे प्रतिसरकार’, प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, पृष्ठ ६०४

१३. वळिंबे वि. स. (१९९८) : स्वातंत्र्य संग्राम ज्ञात आणि अज्ञात, नवचैतन्य, पृष्ठ – ९२

१४. कोल्हापूर समाचार – नागनाथ अण्णा गौरव अंक, पृष्ठ – १

१५. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, नवचैतन्य प्रकाशन, पृष्ठ – ९२

१६. कुंभार राजेंद्र (२०१०) सारं काही पाण्यासाठी, पृष्ठ – ४९

१७. गुरव बाबुराव (सप्टें. १९९९) : भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगारा, पृष्ठ –१९

१८. धर्माधिकारी भालचंद्र (२००२) : क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – २३

१९. लाड जी. डी. (१९८६) :पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य,भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – १०४

२०. पाटणकर भारत (१९८६) : क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – ३४

२१. तत्रैव, पृष्ठ – ६९

२२. पाटील उत्तम – क्रांतिसूर्य, पृष्ठ – १९२

२३. गरूड शांताराम (१९९२) १९४२ चा लोकलढा आणि साताऱ्याचे प्रतिसरकार, पृष्ठ – २२२

२४. केळकर श्रीपाद – क्रांतिसिंह नाना पाटील, पृष्ठ –४९

२५. गरूड शांताराम (१९८६) : भारताचा स्वातंत्र्य संग्राम, प्रवाह, सामर्थ्य, कमजोऱ्या प्रबोधन प्र. ज्योती, स. प्र. इचलकरंजी, पृष्ठ – २९२

२६. लाड जी. डी.(१९८६) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – ३४२

२७. शिवणीकर राघव (२००२) : सातारचा सिंह, आधारे, द. विजय हौसिंग सोसायटी, पुणे, पृष्ठ–१४५

२८. पाटील डी. बी. (२००२) : असे लढले क्रांतिवीर, प्रसाद वितरण ग्रंथ दालन, सांगली, पृष्ठ – २४

२९. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ – ५२

३०. जाधव दि. शा. (जून २०००) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे राजकीय, सामाजिक योगदान : एक अभ्यास, राज्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृष्ठ – ९८

३१. कारेकर म. सु. (१९७७) : क्रांतिसिंह नागनाथ पाटील, वि. स. नवलकर प्रकाशन, पुणे, पृष्ठ – १९२

३२. धर्माधिकारी भालचंद्र (२००२) : क्रांतिवीर, ना. अण्णा गौरव समिती, वाळवा–सांगली, पृष्ठ – ११२

३३. अहिर ज. य. (२००८) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती, प्र. सांगली, पृष्ठ –९३

३४. धर्माधिकारी भालचंद्र (१९३८) क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्र. सांगली, पृष्ठ –१५०

३५. सा. बा. सनदे (१९८८) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ – ८८

३६. तत्रैव, पृष्ठ – ९८

३७. लाड जी. डी. (१९८८) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पृष्ठ – २४८

३८. तत्रैव, पृष्ठ – २८९

३९. धर्माधिकारी भालचंद्र (१९८८) : क्रांतीवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती, वाळवा–सांगली, पृष्ठ – ११०

४०. टांकसाळ व नाईकवडे मनोहर – बिंदूसरचे पाणी, पृष्ठ –४२

४१. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतवीर नागनाथ नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – ९२

४२. कुंभार केतकर (१९८६) – कथा स्वातंत्र्याची, बालभारती प्रकाशन, पुणे, पृष्ठ – ९९

४३. पाटील पी. बी. (२००४) : क्रांतिसागर, शांतीनिकेतन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – ३०६

४४. तत्रैव, पृष्ठ – ३०१

४५. पाटील उत्तमराव (१९८७) : लाकेमानस, धुळे, पृष्ठ – १०६

४६. गरूड शांताराम व देशपांडे डी. जी. – १९४२ चा लोकलढा आणि साताऱ्याचे प्रतिसरकार, पृष्ठ – १४८

४७. गरूड शांताराम (१९८६) : भारताचा स्वातंत्र्य संग्राम, प्रवाह, सामर्थ्य, कमजोऱ्या, प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी, पृष्ठ ४८

४८. रावराणे अशोकराव : साप्ताहिक क्रांतियज्ञ, पृष्ठ – ६

४९. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, (संपा.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ – ९८

५०. पाटील पी. बी. (२००४) : क्रांतिसागर, शांतिनीकेतन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – २०६

५१. पाटील उत्तमराव – क्रांतिपर्व (१९८७), लोकमानस, धुळे, पृष्ठ –१५५

५२. नागनाथ आण्णा नायकवडी यांची प्रत्यक्ष मुलाखत ठिकाण – वाळवा, दि. १२.०६.२०१०.

## प्रकरण चौथे

# स्वातंत्र्योत्तर भारतातील नागनाथ अण्णा नायकवडी यांचे कार्य

नागनाथ आण्णा यांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीत जडण घडण झालेली होती. स्वातंत्र्य चळवळीतील उदारमतवादी, पुरोगामी विचारांची परंपरा त्यांच्या पाठीशी होती आणि त्यास चळवळीचा अनुभव होता. परिणामी स्वातंत्र्यानंतरही विविध राजकीय, सामाजिक प्रश्न हाती घेऊन विविध समस्या सोडविण्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर त्यांचा भूमिहक्काचा लढा व त्यासाठी घेतलेली परिषद महत्त्वाची होती. त्यांच्या नेतृत्त्वाची ही एक नांदीच होती.

**भूमिहक्क लढा परिषदेचे नेतृत्व :**

स्वातंत्र्यानंतर नागनाथ आण्णांनी भूमिहीन दलित समाजासाठी केलेले कार्य महत्त्वाचे होते. त्यांनी संघर्ष समिती स्थापन केली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू सहकारी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मशताब्दी निमित्त लढा परिषद १५ ऑक्टोबर २००१ रोजी हुतात्मा नगर सोनवडे येथे नागनाथ अण्णा यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली. रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेशचे नेते प्रतापराव मधाळे यांनी सांगली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात प्रचारसभा घेऊन नियोजित परिषदेची माहिती संबंधितांना दिली. नियोजित भूमिहिनांच्या लढ्याबद्दल सांगताना पुण्याचे माजी महापौर भाऊसाहेब चव्हाण म्हणतात, दादासाहेबांनी दीन दलित, उपेक्षित समाज घटकांना जगण्याचे हक्क मिळवून देण्यासाठी भूमिहक्काचा संघर्ष केला. त्यांच्या कामाच्या झंझावताने दलित समाजाच्या प्रश्नांबाबत जागृती निर्माण झाली. त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या कामाची पूर्ती करणेसाठी नागनाथ अण्णां यांचे अध्यक्षतेखाली भूमिहिनांचे लढ्याचे रणशिंग फुंगले आहे. सोनवडे येथील भूमिहक्क परिषदेत बोलताना नागनाथ अण्णां सरकारविरुध्द म्हणतात की, ‘‘जातीयवाद्यांनी व भांडवलदारांनी सत्तेचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी केला. त्यामुळे भूमी

नसणारी सामान्य कष्टकरी जनता आजपर्यंत दारिद्र्यात कुजत पडली आहे.''[१] सदर परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य हजर होते. तसेच डॉ. भारत पाटणकर, प्रा.डॉ. बाबूराव गुरव, वैभव काका, कॉ. नाना शेटे वगैरेनींही आपले विचार मांडले. या परीषदेत महत्त्वचे ठराव सहमत झाले. त्यामध्ये भूमिहिन लोकांना न्याय मिळेल. अशा प्रश्नाकडे भर दिला गेला.

पुण्याचे माजी महापौर भाऊसाहेब चव्हाण या परिषदे संदर्भात बोलताना म्हणतात की, ''हुतात्म्यांच्या पावन भूमित भूमिहक्क परिषदेच्या सोहळ्याची सुरवात होत आहे. त्यामुळे ही परिषद यशस्वी होणारच आहे.''[२]

समाजामध्ये ज्या ज्या ठिकाणी उपेक्षितांवर, दलितांवर, अल्पसंख्याकांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर तो अन्याय दूर करण्यासाठी नागनाथ आण्णा नेहमीच पुढाकार घेत होते. दलितांच्या भूमिहक्क परिषदेचे अध्यक्षपद याच उद्देशाने स्वीकारले असावे. भूमिहक्क परिषदेचे अध्यक्षपदावरून बोलताना दिनांक २६ मे २००२ रोजी त्यानी महत्त्वाची भूमिका मांडली. त्यांच्या मते, ''पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. जनावरे, मुले, कुपोषणाने मृत्यूमुखी पडत आहेत.' त्यास जातीयवादी पक्ष बळकटी देत आहेत. जातीयवादी संघटना बहुजनांच्या विरोधात पुन्हा सक्रिय काम करीत आहेत. त्यांच्या विरोधात भूमिहीन कष्टकऱ्यांनी लढा उभा केला पाहिजे. राज्यात नाव नोंदणी झालेले ४४ लाख तरूण बेरोजगार आहेत. कायदा निरुपयोगी झाला आहे. कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा भ्रष्ट आहे. कायदा तकलादू झाल्यामुळे जमीनी मिळत नाहीत. सरकारी मदतीचे आक्रमण होत आहे. त्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात खेडोपाडी राबणारा कष्टकरी वर्ग झोपडपट्ट्यातच राहील. थोडीफार जमीन असणारी विकावयास काढतील व ते भूमिहीन होतील. भूमिहीनांच्या हक्कासाठी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी लढा उभा केला पाहिजे. केंद्र सरकार वीज दर, पाणी दर, ऊसावरील आयकर यांच्या रुपाने गोरगरीब सामान्य

कष्टकऱ्यांना पिळून काढत आहेत. त्यांचा एकजुटीने विरोध केला पाहिजे तरच सामान्य माणसांना न्याय मिळेल.''[३] नागनाथ आण्णांचे हे विचार त्यांच्या समाजवादी विचारांची पक्की बांधीलकीच स्पष्ट करतात. पुढे भेडसाळणाऱ्या समस्यांची त्यांना ज्ञात होती. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला १९९० नंतर भारतात गरीब–श्रीमंत ही दरी आपल्याला स्पष्ट दिसते आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. एन.डी. पाटील आपले विचार व्यक्त करताना म्हणतात की, ''गरिबांच्या व भूमिहिनांच्या हक्कासाठी लढणारी चळवळ कर्मवीर दादासाहेबांनी चालविली. आज या हा प्रश्न गंभीर बनला आहे. त्याची चर्चा होत नाही. जमीन पडीक पाडण्याचा अधिकार कोणालाच नाही. पडीक जमीन आणि राबणारे हात यांची सांगड घालण्याचा प्रयत्न दादासाहेब गायकवाड यांनी केला. महार वतनाच्या जमिनी बिगर महार वतनी लोकांकडे गेल्या आहेत.''[४] डॉ. भारत पाटणकर म्हणतात, ''या संदर्भात सरकार सामान्य माणसाचे आधार असणारे वारा, सूर्य, पाणी ताब्यात घेऊ पाहतंय ते आम्ही होऊ देणार नाही. गच्चीवर शेती करणे शक्य आहे. पण पडीक व गायरान जमीनी करणेसाठी देणे काय अवघड आहे? भांडवलदारांची व जातीयवाद्यांची हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी चळवळ केली पाहिजे.''[५]

भूमिहिनांच्यावतीने पिढ्यान पिढ्या कसल्या जाणाऱ्या जमिनी, महार वतने, इनाम जमिनी, गायरान जमिनी व सर्व भूमिहिनाच्या जमिनी हक्कासाठी कृती समितीच्या वतीने १० ऑक्टोबर २००२ रोजी सकाळी मंत्रालयावर विराट मोर्चा आयोजीत केल्याचे कष्टकरी, शेतकरी संघटनेचे नेते नागनाथ अण्णा यांनी दिनांक ७ आक्टोबर २००२ रोजी सांगितले. विद्यमान आघाडी सरकारकडून शासनाच्या किमान समान कार्यक्रमातील कलम १८ च्या प्रभावी अंमलबजावणीची भूमिहिनांना अपेक्षा होती पण ती अंमलबजावणी झालीच नाही. त्याबाबत विराट मोर्चाने जाऊन अंमलबजावणीचा आग्रह भूमिहक्क समितीने धरला. पिढ्यानपिढ्या कसल्या जाणाऱ्या जंगल जमिनीवर अजूनही आदिवासी व बिगर आदिवासींचा

अधिकार नाही. अजूनही महार वतने, इनाम गायरान, जमिनीवर अनेकांना हक्कच मिळाले नाहीत. भूमिहिनांना जमिनीचे वाटप झालेच पाहिजे. यासाठी आम्ही शिवाजी पार्क ते मंत्रालय विराट मोर्चाचे आयोजन त्यांनी केले.

या मोर्चासाठी शेतमजूर, शेतकरी, कष्टकरी संघटना, श्रमिक क्रांती संघटना, आदिवासी एकता व जमीन हक्क कृति समिती, पुनर्वसन आंदोलन, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, मानवी हक्क अभियान, महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद, नर्मदा बचाव आंदोलन अशा ३५ संघटनेचे कार्यकर्ते या मोर्चात सामील झाले होते. योजलेप्रमाणे दिनांक १० आक्टोबर २००२ रोजी शिवाजी पार्क ते मंत्रालयापर्यत भूमिहक्क परिषदेच्या मागण्या मान्य करण्यास पाठिंबा देण्यासाठी हजारोचा विराट मोर्चा काढला होता आणि शासनास भूमिहक्क परिषदेच्या मागण्या देण्यात आल्या. त्याचा शासनाने गंभीरपणे विचार करणेचे आश्वासन दिले. यापूर्वी अण्णांनी १९९८ मध्ये वीज दरवाढ प्रश्नी जो लढा दिला तो महत्त्वाचा होता.

**वीज दरवाढ विरोधी आंदोलन आणि नागनाथ अण्णा नायकवडी :**

महाराष्ट्रातील शेतकरी विजेच्या भरमसाठ बिलाने त्रस्त होता. वीज दरवाढीचा सर्वात जास्त फटका सामान्य जनतेला व शेतकऱ्यांना बसत होता. दिनांक १ सप्टेंबर १९९८ पासून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने शेती वीज पंपाची वाढीव वीज बिले आकारली होती. त्या वाढीव वीज दरामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. वीजदर वाढीचा परिणाम शेती, उद्योग, साखर उद्योग यांच्यावरही दूरगामी परिणाम होणार होता म्हणून १६ सप्टेंबर १९९८ रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील शेतकरी वीज पंपधारक आणि पाणी पुरवठा संस्था प्रतिनिधींचा एक व्यापक मेळावा किणी (ता. हातकणंगले) येथे घेण्यात आला होता. अध्यक्ष पदावरुन बोलताना ज्येष्ठ विचारवंत नेते यशवंतराव चव्हाण म्हणाले की, ''सरकार परदेशी भांडवलदारांना विकले गेले असून तो करार पूर्ण करताना

शेतकऱ्यांची कूवत व ऐपत न पाहता कर लादले जात असून त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे. या अन्यायी वीज दरवाढीचा निषेध म्हणून एक दिवस विजेचा वापर न करता सत्याग्रह करावा. शेती पंपाची वाढीव वीजबिले भरली नाहीत तर महाराष्ट्र राज्य वीज मंडळ वीज तोडेल, पिकांचे नुकसान होईल याची काळजी न करता शेतकऱ्यांनी भविष्यतील नुकसानीची काळजी करावी. येत्या दोन वर्षात वीज दर वाढत वाढत प्रतियुनिट १० रुपयांपर्यंत जातील त्या भरमसाठ वाढीस आत्ताच पायबंद घालणेसाठी शेतकऱ्यांनी तोटा सोसून संघटितपणे आंदोलनात उतरावे.''[६]

त्यानंतर माजी सहकारमंत्री प्रा. एन. डी. पाटील यांनी यासंदर्भात अशी भूमिका मांडली की, ''शेतकऱ्यांच्या सबसिडी बंद केल्यामुळे शेती वीज पंपावरील दरवाढ पाणीपट्टी वाढ यामुळे शासनाने शेतकऱ्याचे कंबरडेच मोडले आहे हा लढा शेतकऱ्याच्या अस्तित्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या धोरणावर महाराष्ट्रातील राज्यकर्ते चालतात ते नाणे निधीचे बाहुले असून त्यानुसार निर्णय घेतले जातात. वीज मंडळ एस. टी. महामंडळ नफ्यात चालले पाहिजे. या बस गाड्यामुळेच दरवाढ, कर लावणे असे निर्णय घेतले जातात.''[७] यावेळी मेळाव्याचे निमंत्रक नागनाथ अण्णांनी जाहीर केले की दिनांक १२ ऑक्टोबर १९९८ रोजी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कोल्हापुरात येऊन वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चात सहभागी होण्यास आवाहन केले.

वीज दरवाढीची पार्श्वभूमी अशी होती की, महाराष्ट्र शासनाने १ जुलै १९९६ पासून वीज दरवाढ करण्याचा अव्यवहार्य निर्णय घाईत घेतला होता. त्या निर्णयाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलने केली. त्यामुळे वीज दरवाढ प्रति अश्वशक्ती ३५० रुपयांहून ३०० रुपयांवर आली. शासनाच्या निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात सार्वजनिक हितार्थ दाखल केलेल्या याचिकेचा निकाल लागण्यापूर्वीच १ सप्टेंबर १९९८ पासून वीज मंडळाने वीज दरवाढ जाहीर केली होती.

ठरल्याप्रमाणे १२ आक्टोबर १९९८ रोजी कोल्हापूर शहरातील विभागीय वीज मंडळाच्या कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी भव्य मोर्चा काढला होता. मोर्चाचे नेतृत्व नागनाथ अण्णांनी केले होते. या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आहे. सर्वानुमते त्यावेळी असे ठरले की, अन्यायी वीज दरवाढ रद्द केल्याशिवाय कोणताही शेतकरी वाढीव वीज दराची बिले भरणार नाही, जर वीजबिले भरली नाहीत म्हणून वीज कनेक्शने तोडल्यास तीव्र आंदोलने करण्याचा इशारा देण्यात आला. वीज दरवाढ रद्द करून पूर्वीचाच प्रति अश्वशक्ती वार्षिक ३०० रुपये दर ठेवावा असे ठरले. या मोर्चामध्ये प्रा. एन. डी. पाटील, एस. आर. पाटील, रविंद्र सबनीस, नागनाथ अण्णा यांनी आंदोलकांच्यावतीने मागण्यांचे निवेदन वीज मंडळाच्या मुख्य अभियंत्याला दिले.

शासन वीज मंडळाचा तोटा कमी करणे व वीज मंडळाचे खाजगीकरण व विभाजनाच्या विरोधात वीज कामगारांनी २५ जुलै २००० ला बेमुदत जाहीर केलेल्या संपामुळे कात्रीत सापडले होते. धावपळ करून वीज मंडळाच्या कर्मचाऱ्याचा संप २९ जुलै २००० ला मिटला होता. त्याच काळात एन्रॉन कंपनी बरोबरच्या वादामुळे शासन अडचणीत आले होते. नेहमीच मार्च महिन्यामध्ये वीज मंडळाचे कर्मचारी थकीत बिले वसुली करण्याची मोहीम काढतात. त्यातच मार्च महिन्यात सरकारी कर, बँकेची कर्जे वसुलीत शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. पूर्वी शेतकऱ्यांच्यावर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी भांडणारे नेते शासनात मंत्री असूनसुध्दा शेतकऱ्यावरील अन्याय दूर होत नव्हता. परंतु नागनाथ अण्णांनी या प्रश्नांबाबत तातडीची बैठक कोल्हापूर येथे दि. १७ नोव्हेंबर २००१ रोजी घेतली होती. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ३०० शेतकऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सातारा जिल्ह्यातील ३०० शेतकऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थितांच्या समोर नागनाथ अण्णा म्हणतात की, ‘‘वीज दरवाढीविरुध्द सर्वांनी संघटितपणे मुकाबला करावा. शासनाकडे शिष्टमंडळ नेऊन हा प्रश्न सुटणार नाही तर लाखो लोकांनी संघटितपणे मोर्चा काढून शासनाला

वीज दरवाढ मागे घेण्यास भाग पाडले पाहिजे.''[८] अशा पद्धतीच्या विचारश्रेणीमुळे त्यांची नेतृत्त्वाची जाणीव सरकार दरबारी घेतली जात असे अशा प्रसंगी कॉ. नाना शेटे, कॉ. वसंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत एन्रॉन प्रकल्प रद्द करण्यात यावा, वीज पंपावर पाच अश्वशक्तीपर्यंत ६०० रुपये व त्यापुढे ८०० रुपये दर स्वीकारावे, इंधन व इतर आकार आकारण्यात येऊ नयेत. वीजेवरील दंड व्याज रद्द करणेत यावेत. युनिटचा दर ५० पैशापेक्षा जास्त असू नये. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडू नये असे ठराव करण्यात आले होते.

वीज दरवाढीच्या विरोधात लवकरच दोन लाख शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित करण्यात येणार आहे असे नागनाथ अण्णांनी दिनांक २३ नोव्हेंबर २००१ रोजी मणदूर, ता. शिराळा येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर सभेत जाहीर केले. तसेच शेतकऱ्यांनी वाढीव दराने वीज बिले भरु नयेत असे आवाहन नागनाथ आण्णांनी केले होते.

डॉ. भारत पाटणकर या पार्श्वभूमीवर आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, ''१६ वर्षापूर्वी संपादित केलेल्या जमिनीचे पैसे देण्याची प्रक्रिया शासनाने सुरु केली आहे. चळवळीचा विजय होऊ लागला आहे. झगडल्याशिवाय काहीच मिळणार नाही हा स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा ५४ वर्षाचा अनुभव आहे.''[९] नागनाथ अण्णा या संदर्भात म्हणतात, ''वाढीव विजेची बिले पाहून लोकांच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले आहे. पोट भरायचे की वीजबिल भरायचे असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा आहे. काही दिवसांत पश्चिम महाराष्ट्रातून दोन लाख शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.''[१०] या प्रश्नी आण्णांचा निर्धार पक्का होता. सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळावेत हीच औचित्याची भावना त्यामध्ये होती.

दुसरी गोष्ट घरगुती वापराच्या विजेचे दर आहेत तेवढेच ठेवण्याचा आग्रह धरण्यासाठी नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली विराट मोर्चा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक २१ जानेवारी २००२ रोजी काढला. मोर्चामध्ये सहकारी पाणी पुरवठा संस्था, सेवा संस्था, सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी

कार्यालयाचे बाहेरील रस्त्यावर मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. त्यावेळी नागनाथ अण्णा म्हणतात, ''सत्ताधिऱ्यांची नाळच भांडवलशाहीशी जोडलेली आहे. सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे बाजूने नाही. हे धोरण बदलण्यासाठी जे काही करायला लागेल ते करू. एकजुटीने लढा दिला तर वीज दर वाढीनंतर पाणी, घरफाळा दरवाढीच्या हप्त्यांनाही परतवून लावू.''[११]

विशेष म्हणजे वीज दरवाढीच्या विरोध करणाऱ्या या मोर्चामध्ये वीज मंडळाच्या कामगारांची संघटना सामील झाली होती. वीज दरवाढ विरोधी कृति समितीचे नेते प्रा. एन. डी. पाटील विशाल मोर्चासमोर भाषणात म्हणतात की, 'आजचा मोर्चा सरकारला इशारा देण्यासाठी आहे. जिल्हाधिकारी व वीज मंडळाचे अधिकारी यांच्या बैठकीस वीज आकारणी बद्दलचे धोरण येत्या फेब्रुवारीच्या आत ठरविण्याचे ठरले. यापूर्वी मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, वीज मंडळाचे अध्यक्ष यांची संयुक्त बैठक घेण्याचे प्रयत्न करण्याचेही ठरले पण तसे घडले नाही तर आजच्यापेक्षा मोठा मोर्चा आणण्याचा इशारा शिष्टमंडळाने तेथेच दिला होता. यानंतर शासनाच्या विरुद्‌ध संघटित मोर्चाचे फळ म्हणून शेतकऱ्यांसाठी वीज बिल आकारणी कमी करण्यात आली. शासनाला हा निर्णय याविरूद्धच्या आंदोलनामुळे घ्यावा लागला. हा नागनाथ अण्णांच्या आंदोलनाचा विजय होता. नागनाथ अण्णा यांनी वडाप व जीप चालकांच्या न्याय मागण्यांसाठी सुद्धा महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते.

**वडाप जीप चालकांच्या आंदोलनात नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नेतृत्व :**

सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळी तालुक्यातील समान पाणी वाटपाबद्दल शेतकऱ्यांनी आटपाडी येथे भव्य पाणी परिषदा घेतल्या होत्या. त्यामुळे आटपाडीकरांच्या सामाजिक, अन्यायी प्रश्नांबाबत नागनाथ अण्णा नेहमीच लक्ष घालीत असताना दिसून येते. आटपाडी तालुक्यातील खाजगी प्रवासी वाहतूकदारांनी जीप, प्रवासी टेम्पो चालक-मालक यांनी आपली संघटना स्थापन केली व त्यांची वाहतूक शासनमान्य करावी यासाठी आंदोलनाचा पवित्रा घ्यायचे ठरविले होते. त्यापूर्वी पोलीसांनी आटपाडी

बसस्थानकाच्या दोन्ही प्रवेशद्वारांवर उभी राहणारी खाजगी प्रवासी वाहने हटविली होती व जिल्हा पोलीस प्रमुखांच्या सूचनेनुसार ती वाहने दोनशे फुटापेक्षा लांब अंतरावर उभी करणे सक्तीचे केले होते. त्याचबरोबर एस.टी. च्या भरारी पथकाच्या वाहतूक अधिकाऱ्यांनी अनेक खाजगी वाहनांवर कारवाई केल्याने खाजगी जीपचालकांची चांगलीच कोंडी निर्माण होऊन त्यांच्या व्यवसायावर मोठाच परिणाम झाला होता.

खाजगी वाहतूक मोठ्या प्रमाणावर ठप्प होऊन वाहनचालकांवर उपासमारीची वेळ आल्याने आटपाडी तालुक्यातील खाजगी वाहनचालकामध्ये मोठे नैराश्य आले होते. त्यांच्या प्रश्नासाठी ''सप्टेंबर २००० मध्ये तालुक्यातील खाजगी वाहकांची संघटना मजबूत करण्यासाठी एक मेळावा घेतला होता व त्या मेळाव्यात खाजगी वाहनचालकांच्या आंदोलनास नागनाथ नायकवडी यांचा सल्ला घेण्यासाठी व नेतृत्वासाठी आटपाडीचे संजय देशमुख, गणपतराव पवार, संजय वाघमारे वगैरे नागनाथ अण्णांना भेटण्यासाठी वाळवा येथे आले.''[१२] नागनाथ अण्णांना आटपाडीच्या खाजगी वाहनचालकांची समस्या समजली. त्याबद्दल त्या संदर्भात ते म्हणतात की, ''सरकारच्या हलगर्जीपणामुळे हा प्रश्न गंभीर झाला आहे. खाजगी बेकायदा वाहतूक वेळीच मोडायला पाहिजे होती. परंतु तसे झाले नाही. त्यामुळे यात गुंतलेल्या वाहन चालकांनी कर्जे फेडून नोकरीत सामावून घेणेच योग्य ठरेल.''[१३] ह्या चर्चेनंतर या प्रश्नांची सामाजिक व आर्थिक बाजू इत्यादीचा अभ्यास करण्यास डॉ. भारत पाटणकर यांचेवर सोपविले आणि कायदेशीर बाजूची जबाबदारी सातारचे प्रसिध्द ॲडव्होकेट धैर्यशील पाटील यांच्यावर सोपवली. त्यामुळे खाजगी वाहनचालकांच्या मनामध्ये धीर आला. त्यानंतर २५ सप्टेंबर २००० रोजी आटपाडी येथे खाजगी वाहतूकदारांच्या बैठकी घेतल्या. त्या बैठकीच्या अध्यक्षपदावरुन बोलताना नागनाथ अण्णा म्हणतात, ''शासनाच्या त्रासाविरुध्द खाजगी प्रवासी वाहतूकदारानी संघटित व्हावे, संघटनेच्या भूमिकेशी मी सहमत असून त्यांच्या मागण्यांना माझा पाठिंबा आहे. खाजगी प्रवासी वाहतुकीचे स्वागत जनतेने केले आहे.

यामुळेच या व्यवसायात गेल्या १५ वर्षात मोठी वाढ झाली आहे. व्यवसायामुळे अनेकांना उपजिविकेचे साधन मिळाले आहे. शासनकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे खाजगी वाहतूक वाढली व एस. टी. महामंडळाची सेवा बिघडल्यामुळे खाजगी वाहतुकीकडे प्रवासी आकर्षित झाले आहेत.''[१४]

खाजगी वाहतूक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नागनाथ अण्णांना संघटनेचे नेतृत्व करणेची आग्रही विनंती केली. नागनाथ अण्णां यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'मुक्त अर्थव्यवस्थेचे' धोरण असताना शासन वाहनधारकांना त्रास देत आहे. सततच्या पोलीस कारवाईमुळे वाहने बंद होतात. कर्जाचे हप्ते थकतात. अशा स्थितीत पोलीस व वाहतूक कार्यालयाचे हप्ते कायमस्वरुपी बंद झाले पाहिजेत. अशा मागण्या मांडण्यात आल्या होत्या. वरील मागण्या मांडण्यासाठी ''कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील जीप व टेम्पो चालकांनी आपल्या वाहनासह कोल्हापूर मार्केट यार्डापासून आर.टी.ओ. कार्यालयापर्यंत दिनांक ४/१२/२००० रोजी नागनाथ अण्णां यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला होता. ''[१५] मुख्य मागणी होती की खाजगी प्रवासी करणाऱ्या जीप, टेम्पोला अधिकृत मान्यता द्या अथवा मान्यता देता येत नसेल तर उदरनिर्वाहासाठी नोकरी द्या. आर.टी.ओ. कार्यालयासमोर भरलेल्या सभेत नागनाथ अण्णा म्हणाले, ''नोकरी मिळत नाही म्हणून तरुणांनी वाहने विकत घेतली पण व्यवसाय करताना अनेक अडथळे या तरुणासमोर उभी राहिली. आमचा व्यवसाय खरोखरच बेकायदेशीर असेल तर आम्ही हा व्यवसाय बंद करतो. आम्हाला कोठेतरी सरकारी नोकरी द्या. वाहने विकत घ्या व नोकरी द्या ही आमची भावी काळातील मागणी आहे. हप्ता दिला की हा व्यवसाय कायदेशीर होतो. हप्ता दिला नाही की बेकायदेशीर ठरतो. हप्त्याच्या रकमेची वाटणी करण्यासाठी वरपासून खालपर्यंत अक्षरश: चढाओढ सुरु आहे. आता हे सर्व सहन होण्यापलिकडे गेले आहे. त्यामुळेच आजच्या निर्धार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.''[१६] त्यानंतर मोर्चाचे शिष्टमंडळाने प्रादेशिक परिवहन अधिकारी एच. के. पाचारने यांना

निवेदन दिले. खाजगी प्रवासी वाहतूक शासन जोपर्यंत कायदेशीर ठरवत नाही तोवर आर. टी.ओ. विभागामार्फत दंड वाहन निलंबनाची कारवाई केली जाऊ नये. अशी मागणी डॉ. भारत पाटणकर यांनी केली. तसेच वाहनाबाहेर प्रवासी नेणाऱ्या प्रवासी जीप व टेम्पोवर कारवाई हरकत नसलेचे मोर्चात सांगितले. या धडक मोर्चात हिंदकेसरी गणपत आंदळकर, नागनाथ अण्णा, डॉ. भारत पाटणकर यांनी भाग घेतल्यामुळे मोर्चा यशस्वी झाल्याचे समाधान मोर्चेकरांना मिळाले होते.

आटपाडी, कोल्हापूर नंतर विटा येथे २७ नोव्हेंबर २००० रोजी खानापूर तालुका जीप व टेम्पोचालक व मालकाच्यावतीने नागनाथ अण्णांचा सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी ते म्हणाले, ''दुष्काळी भागातील जीप टेम्पो चालक, मालक संघटनेने संघटन वाढवावे. संघटन वाढविल्याशिवाय शासनकर्त्यावर धाक राहणार नाही. वडापवाल्यांनी मोठ्या प्रमाणावर संघटन केल्यास गाडी आडवायची त्यांची हिंमत होणार नाही.''[१७]

या प्रसंगी बाबुराव गुरव आपले विचार व्यक्त करताना असे की, ''धनदांडगे, सत्तादांडगे व जातदांडगे यांनी सर्वसामान्याच्या प्रश्नांचा खऱ्या अर्थाने विचका केला आहे. संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्यानी आपली ताकद वाढवावी.''[१८]

त्यानंतर दि. २३ जानेवारी २००२ रोजी सांगली येथे वडापला शासन मान्यता देत नाहीत याचा गैरफायदा हप्तेवसूली करून पोलीस घेत आहेत. प्रवासाची वाहतूक करणे हा कोणताही गुन्हा नसून या व्यवसायाला रितसर परवानगी घ्यावी व पोलीसांकडून होणारी आडवणूक थांबवावी. या मागण्यासाठी खाजगी चालक मालक यांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी व डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढला होता. मोर्चापुढे बोलताना नागनाथ अण्णा म्हणतात, ''वडाप वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांकडून पोलिसाना देण्यात येणारे हप्ते पूर्णपणे बंद करावेत. पोलीस आपल्या सोईप्रमाणे कायदा वापर असल्याने अनेक लोक बेरोजगार होणार आहेत म्हणून

यापुढे पोलिसांना एकही पैसा देऊ नका.''[१९] यानंतर दि. ३० जानेवारी २००२ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील चालक मालकांनी एक विराट मोर्चा काढला. त्यावेळी मोर्चाच्या सभेत खाजगी वाहन चालकांच्यावर होत असलेला अन्याय थांबवण्याचे आवाहान शासनास केले. त्याप्रसंगी बोलताना सातारचे प्रकाश गवळी म्हणतात, ''बेकायदा प्रवासी वाहतूकीमुळे एस. टी. तोट्यात आली. हा आरोप चुकीचा आहे. चुकीचे व्यवस्थापन असल्यामुळे एस. टी. तोट्यात आली आहे. खाजगी प्रवासी वाहतूकी विरुध्द कामगार संघटनेचे नेते बोलतात पण प्रत्यक्षात या नेत्याच्या मालकीचे जीप व टेम्पो आहेत ते देखिल प्रवासी वाहतूकीतून कमाई करतात.''[२०] यानंतर डॉ. भारत पाटणकर आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, ''घटनेने रोजगाराचा हक्क दिला आहे पण सरकार या हक्काची पूर्तता करू शकत नाही. परिणामी बेरोजगार युवकानी वाहतूक व्यवसाय क्षेत्रात प्रवेश केला पण हा व्यवसाय बेकायदेशीर ठरविण्याचा प्रयत्न करून या युवकावर दंड हप्ता एन्ट्री या माध्यमातून अन्याय केला जात आहे. मटका दारू यासारख्या बेकायदेशीर व्यवसाय सुरु करण्यात कोणताही अडथळा नाही पण प्रामाणिकपणे कष्ट करून जगणाऱ्या जीप व टेम्पो चालकाना मात्र कारवाईस सामोरे जावे लागते. खाजगी प्रवासी वाहतुकीमुळे एस. टी. तोट्यात जात असेल तर वातानुकूलीत आराम बस वेगवेगळ्या मार्गावर सुरु करणेस शासन का परवानगी देते? शासनाला खरोखरच एस. टी. ची काळजी असेल तर प्रथम आराम बसचा व्यवसाय बंद करून दाखववावा व नंतर सर्वसामान्य जीप टेम्पो चालकांना कायद्याचे ज्ञान सांगावे.''[२१] या सर्व प्रश्नांबरोबर पुणे विद्यापीठास राजश्री शाहू महाराजांचे नाव देण्याबाबत जे आंदोलन झाले ते महत्त्वाचे होते. अण्णांनी या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. त्यांच्या स्वातंत्र्योत्तर कार्यातील ही एक जमेची बाजू म्हणावी लागेल.

**पुणे विद्यापीठास राजर्षि शाहू महाराजांचे नाव देण्याबाबतच्या आंदोलनाचे नेतृत्व :**

औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबद्दलचे आंदोलन मराठवाड्यातील दलितांनी करून ऐतिहासिक यश मिळविलेले होते. या पार्श्वभूमीवर पुण्यातील विद्यापीठास राजर्षि शाहू महाराजांचे नांव देण्याविषयीचे आंदोलन नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजाने आयोजित केले. त्यानिमित्त गांधी मैदान कोल्हापूर येथे ६ मे १९९४ रोजीच्या राजर्षि शाहू महाराजांच्या स्मृतिदिनी भव्य सभा आयोजित केली. तसेच शासनाला निवेदन देण्यासाठी लाखो सह्यांची मोहीम आखली होती. कोल्हापूर येथील सभेसाठी प्रमुख पाहुणे उत्तर प्रदेशमधील बहुजन समाजपक्षाचे नेते कांशीराम यांना निमंत्रित केले होते.

कोल्हापूर येथील विराट सभेमध्ये बोलताना काशिराम म्हणाले, ‘‘महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या विचारातून महाराष्ट्रात सत्तांतर घडवून आणले जाईल. राजर्षि शाहू महाराजाच्या महाराष्ट्रात खुर्चीचे राजकारण खेळणाऱ्या राजकारणांनी विधी मंडळाच्या एकमुखी ठराव झाला असतानाही मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर लांबणीवर टाकून डॉ.बाबासाहेब आंबेडकराची बेइज्जत केली. उत्तर प्रदेशात बहुजन समाजपार्टीने सत्ता काबीज केल्यानंतर महाराष्ट्रात या पार्टीचे वादळ झेपावणार या भीतीने राज्यकर्ते अस्वस्थ झाले आणि त्यांनी माझी सभा शिवाजी पार्कवर होण्यापूर्वीच दोन दिवस आगोदर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करून टाकले. हा तमाम बहुजन समाजाचा विजय झाला आहे. उत्तर प्रदेशात आम्ही ५५० एकरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विद्यापीठाची स्थापना केली आहे. बहुजन समाजपार्टी, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा सन्मान करेल असा जनतेस ठाम विश्वास वाटतो. या थोर महामानवाच्या सामाजिक समतेच्या विचारांच्या आधारेच आम्ही महाराष्ट्राची सत्ता काबीज केल्याशिवाय राहणार नाही. सध्याचे राज्यकर्ते सत्तेच्या मोहात ब्राह्मणवादी

विचार आचरणात आणून बहुजन समाजात फूट पाडत आहेत. अशा सत्ता पिपासू पुढे न झुकता त्याच्या खुर्च्या हटवण्याची तयारी बहुजन समाजाने केली पाहिजे. महाराष्ट्रातील सत्ता काबीज करण्याचा तो दिवस आता दूर नाही. पुणे विद्यापीठास राजर्षि शाहू महाराज विद्यापीठ असे नाव देण्याचे अभिवचनही देत आहे.''[२२]

त्यानंतर नागनाथ अण्णांचे या सभेत अतिशय आक्रमक भाषण झाले. ते म्हणाले, आयोध्यातील बाबरी मशीद पाडण्यास मदत केल्याबद्दल काँग्रेस सरकार जबाबदार आहे. निधर्मीपणाचा टेंभा मिरवणारे काँग्रेसवाले राज्य करायला लायक नाहीत. महात्मा गांधीच्या खुन्यांनीच बाबरी मशीद पाडली. भाजप व अन्य जातीयवादी शक्ती यास जबाबदार आहेत. असे सांगून पुणे विद्यापीठास छ. शाहूचे नाव देणे हे पूरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाची भर असेल. शाहू राज्यांनी जे लोकाभिमुख कार्य केले ते महत्त्वाचे होते. त्यामुळे बहुजन समाजाची मुले शिकली. त्यांच्या कार्याचा वारसा संपूर्ण देशाला प्रेरणादायी असा असाताना त्यांचे नाव देण्यास शासन खच का खात आहे. अशा शासनाचा निषेधच केला पाहिजे, तथाकथित पुरोगामी शासन व्यवस्थेचा हा पडद्याआड लपविलेला प्रतिगामी चेहरा आहे. अन्यथा नामकरणाला विरोध झालाच नसता.

आटपाडीची पाणी परिषद अण्णांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेली महत्त्वाची परिषद होती. अण्णांना पाणी वाटपाचा प्रश्न फार जिव्हाळ्याचा वाटत होता. त्याशिवाय विकासाचा मार्ग आपण क्रमू शकत नाही, असे त्यांना वाटत होते.

**आटपाडी पाणी परिषदेचे नेतृत्व :**

बच्छावत आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्राच्या वाट्याला कृष्णानदीतून ५९४ टी. एम. सी. पाणी मिळणार होते आणि ते पाणी ३१ मे २००० पर्यंत अडविणे आवश्यक होते. या आडवलेल्या पाण्यापैकी जास्तीत जास्त पाणी स्वातंत्र्यानंतर ५० वर्षे उपेक्षित राहिलेल्या आटपाडी, खानापूर, जत, कवठेमहांकाळ तालुक्याना मिळावे अशी तेथील

जनतेची अपेक्षा होती. कॉंग्रेस राजवटीत या भागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे शेतीसाठी तर सोडाच, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. या पार्श्वभूमीवर आटपाडी येथील कार्यकर्त्यांनी १९९३ च्या मे मध्ये एक बैठक बोलावली होती. या बैठकीस खानापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्तांचे काम करणाऱ्या मुक्ती संघर्ष चळवळीचा भाग म्हणून डॉ. भारत पाटणकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या पैकी दुसऱ्या मेळाव्यासाठी क्रांतीवीर नागनाथ अण्णा यावेत अशी अपेक्षा भारतीय रिपब्लिकन पक्षाचे विलास खरात यांनी पाटणकर याच्याकडे व्यक्त केली. डॉ. पाटणकर यांनी क्रांतिवीर आण्णांनी या मेळाव्यासाठी यावे या संदर्भात बोलणी केली व अण्णांनी येण्याचे मान्य केले. त्यानुसार बैठकीस नागनाथ अण्णा गेले असता त्यांचे निदर्शनास आले की भाजपचे कार्यकर्ते बंडोपंत देखमुख त्या बैठकीस येऊन बसले होते. त्यांना निघून जाण्यास सांगितले असता ते गेले नाहीत ते जात नाही असे पाहता अण्णा स्वत: बैठकीमधून उठले. तेव्हा त्याच्याबरोबर कार्यकर्ते उठले व शंकरराव खरातांच्या घरासमोरील एका जागेत नागनाथ अण्णांनी आटपाडीच्या कार्यकर्त्यांची पहिली मिटींग १४/४/१९९३ रोजी घेतली.

तेथील कार्यकत्यांना अण्णांनी वचन दिले की पंधरा दिवसांनी आम्ही येथे येत आहोत व आपण पाणी चळवळ सुरु करू. परंतु पहिली प्रत्यक्षात आटपाडी पाणी परिषद ११ जुलै १९९३ रोजी झाली. सुमारे ४० हजार शेतकरी उपस्थित होते. या परिषदेची प्राथमिक तयारी करण्यासाठी जूनमध्ये आटपाडी गेस्ट हाऊसमध्ये बैठक झाली होती. डॉ. भारत पाटणकरांनी आटपाडी तालुक्याचा नकाशा टेबलावर अंथरला. नकाशा वाचून झाल्यावर कोण कुठे जायचे याची मोर्चेबांधणी झाली. तालुक्याचा कोपरान कोपरा पिंजून काढण्याचा आदेश दिल्याप्रमाणे कार्यकर्त्यांच्या सकाळी दोन व सायंकाळी दोन अशा ४ सभा घेण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यावर सोपवली. सुरुवातीला या उपक्रमाबद्दल जनतेमध्ये नाराजीचा सूर होता. पण सभा होत राहिल्या. जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला. याचे श्रेय जयंत निकम, धनाजी

गुरव, आण्णासाहेब लेंगरे, झिंबल, मारुती माने, सिताराम बापू पुजारी, शेख साहेब, डॉ. बाबुराव गुरव, डॉ. पाटणकर, सौ कुसुमताई नायकवडी, श्री. एस. आर. पाटील, श्री. जमादार सर, श्री. बाळासाहेब नायकवाडी व हुतात्मा किसन अहिर कारखान्यातील कामगार यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना द्यावे लागेल. त्यामुळे जागृत झालेले ३० हजार शेतकऱ्यांनी ११ जुलै १९९३ च्या परिषदेस उपस्थित राहून तत्कालीन सरकारला धडकी भरविली. दुष्काळी भागातील जनतेमध्ये आत्मविश्वास व जोश आला होता. जनतेमध्ये जागृती निर्माण झाली. ३१ मे २००० च्या आत कृष्णेचे पाणी आडवून त्याचे समान व न्याय्य वाटप झाले पाहिजे अशी घोषणा त्यावेळी करण्यात आली. त्यानंतर दरवर्षी छत्रपती शाहू महाराजांचा २६ जुलै हा जन्मदिवस आटपाडी पाणी परिषदेचा दिवस ठरविण्यात आला.

त्यानंतर अण्णांच्या मार्गदर्शनाने चळवळीतील कार्यकर्त्यांनी विचारसभा, घोषणा, भिंती रंगवणे, पदयात्रा, पोवाडे व गीते यांनी सर्व तालुका ढवळून काढला. गावचावडीवर व तहसिल कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले. तालुक्यातील १०० टक्के संस्थांचे पाणी मागण्याचे ठराव पास करण्यात आले. ६६ हजार स्त्री व पुरुषांच्या सह्यांच्या प्रचंड निवेदनाच्या माध्यमातून अभूतपूर्व एकजूट दिसून आली. परिणामी या चळवळीचे लोण हळूहळू अन्य दुष्काळग्रस्त तालुक्यात पसरले व सरकारवर दबाव वाढू लागला.

याच काळात १९९५ साली विधानसभा निवडणूका झाल्या. काँग्रेस पक्षात बंडखोरी झाली व अपक्ष आमदार मोठ्या संख्येने निवडून आले. त्या अपक्ष आमदारांनी कृष्णा खोरे पाणी प्रश्न सोडविण्याच्या अटीवर सरकारला पाठिंबा दिला. संपूर्ण दुषकाळी टापूतील काँग्रेसचे उमेदवार पराभूत झाले होते. पाणी परिषदेचे हे यश होते. युतीचे सरकार सत्तेवर आल्यावर त्यांना चळवळीची दखल घ्यावी लागली. त्यासाठी पैसा उभा करण्याकरिता रोखे विक्री करण्याची सुरुवात त्याच दिवशी झाली. आटपाडी येथील भवानी हायस्कूलच्या मैदानावरच स्वतंत्र परिषद घेऊन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना कृष्णा खोरे विकास

महामंडळाच्या स्थापनेची घोषणा करावी लागली. प्रामाणिकपणे प्रयत्न सुरु झाले. धुमधडाक्याने कामे सुरु झाली. परंतु भावनेच्या व अति उत्साहाच्या भरात काही चुकाही झाल्या. त्यामुळे विरोधकांनी सरकारवर टिकेचा भडीमार केला. परिणामी सरकारला चौकशी करून खाते पालट करावी इत्यादी गोष्टीत लक्ष घालावे लागले. याचवेळी निधीची चणचण निर्माण झाली आणि त्यामुळे कंत्राटदारांना उपोषण करावे लागले. या अडचणी दिवसेंदविस वाढत गेल्या. वादळे उठत राहिली आणि विधानसभेत युती सरकार पराभूत झाले. यामुळे पाणी चळवळीचे काम थंडावले होते.

या सर्व काळात दुष्काळी भागातील पाण्याचा प्रश्न मांडण्यात, त्यासाठी लढा उभा करण्यात, चळवळ व विचार दूरपर्यंत पोहचविण्यात आटपाडी तालुक्याने योगदान महत्त्वाचे ठरले आहे. आटपाडी बरोबर सांगली जिल्ह्यातील तासगाव, मिरज पूर्व, कवठे महांकाळ, जत आणि खानापूर, सोलापूर जिल्ह्यातील माढा, मंगळवेढा व सांगोला अशा तेरा तालुक्यातील शेतकरी जनता या चळवळीत सामील झाली. तासगावचे लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडणारे आमदार आर. आर. पाटील नागनाथ अण्णांच्या बरोबर या चळवळीच्यासाठी सावळजच्या पाणी परिषदेत सहभागी झाले. सांगोल्याचे आ. गणपतराव देशमुख अण्णांच्या बरोबर येण्यास प्रथम साशंक होते पण खात्री पटल्यानंतर तेही सहभागी झाले.

१९९४ ते १९९८ या काळात नागनाथ अण्णांनी पाच पाणी परिषदा आयोजित केल्या होत्या. त्यापैकी तीन परिषदा १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या होत्या. त्याला प्रचंड यश लाभले या परिषदेमधून जनतेची एकजूट दिसून आली. विचार मंथन झाले. चळवळीला दिशा मिळाली. संघर्ष तीव्र झाला आणि शासनाला सतत जागे ठेवण्याचे काम या चळवळीने पार पाडले. पुढे कृष्णा खोऱ्यांचे पाणी ३१ मे २००० च्या अगोदर अडवण्याची अट असलेमुळे पाणी परिषदेचे कार्यकर्त्यांना घेऊन नागनाथ अण्णा यांनी सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे पाणी परिषद घेतली होती.

या पार्श्वभूमीवर दिनांक २७ जुलै १९९८ रोजी सुमारे ६० हजार स्त्री–पुरुष यांच्या उपस्थितीत आटपाडीच्या श्री भवानी विद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यातील जनतेची पाचवी कृष्णा खोरे पाणी परिषद संपन्न केली. या परिषदेत भाषण करताना पाणी परिषदेचे निमंत्रक नागनाथ अण्णा म्हणतात, ''कृष्णेचे पाणी अडवणेची मुदत थोडीशी राहिली असल्यामुळे या दुष्काळी तालुक्याचे संघटन अधिक तीव्रपणे टिकवावे लागणार आहे. त्याकरिता प्रत्येक कार्यकर्त्यांनी प्रत्येक कुटुंबापर्यंत या परिषदेचा निर्धार पोहचविला पाहिजे. या परिषदेच्या कामकाजाची माहिती प्रत्येक गावात जाऊन या परिषदेस न आलेल्यानाही समजावून दिली पाहिजे. गेली सात वर्षे धीरोदात्तपणे हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना या लढ्याच्या पाठीमागे उभा राहिला तसेच यापुढेही या कारखान्याच्या शेतकऱ्यांची साथ शंभर टक्के मिळणार आहे. सरकारला त्या पुढच्या तीन महिन्यात आजच्या परिषदेत केलेल्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी केल्याची जाग आली नाही तर आक्टोबर महिन्यात तहसिल कार्यालयासमोर धरणे व तहसिल कार्यालयाला घेराव घालण्याची कृती आपणास प्रचंड निर्धाराने करावयाची आहे. माण तालुक्यामध्ये या आंदोलनाचे नेतृत्व मी स्वत: करणार असून तासगाव, आटपाडी, खानापूर, जत, कवठेमहांकाळ अशा दुष्काळी तालुक्यातही याच दिवशी आंदोलन यशस्वी केले जाईल.' आ. आर. आर. पाटील, माजी मंत्री गणपतराव देशमुख, माजी आ. एस. एम. पाटील, माजी आ. अनिलराव बाबर, माजी आ. भगवान बाप्पा पाटील, डॉ. भारत पाटणकर वगैरे मान्यवर त्या तालुक्यात या लढ्याचे नेतृत्व करणार आहेत. 'बाप दाखव नाही तर श्राध्द घाल.' या न्यायाप्रमाणे सरकारला या बाबतीत निर्णय करावाच लागेल अशी जय्यत तयारी कार्यकर्त्यांनी येत्या तीन महिन्यात करावी.''[२३]

या परिषदेमध्ये तीन पाळ्यांवर ताबडतोब काम सुरु करून ३१ मे २००० च्या आत कृष्णा खोऱ्याची कामे पूर्ण करावीत. त्यासाठी महाराष्ट्रातील कारखानदारांना विकास कर

लागू करून आवश्यक निधी उभा करावा. पाण्याची विषम वाटप पद्धती बदलून भूमिहिनांसह सर्व कुटुंबाना पाण्याचे समान वाटप करण्याची नवीन आखणी केली पाहिजे. पाणी असूनही ७५% कुटुंबांना कायमचे दुष्काळात ढकलणारी आखणी बदलली पाहिजे असे महत्वाचे ठराव कॉ.डॉ. भारत पाटणकर यांनी मांडले. त्यास गणपतराव देशमुखांनी अनुमोदन दिले. आ. आर. आर. पाटील यांनी निष्क्रीय युती शासनाच्या निषेधाच्या मांडलेल्या ठरावास सर्वांनी पाठिंबा दिला.

या प्रसंगी निळू फुले, अॅड. उस्मानबी शेख, प्रा. शिवाजीराव काळुंगे, बळवंतराव मोरे, चंद्रकांत लोंढे, सौ. कुसुमताई नायकवडी, वैभव नायकवडी वगैरेनी मार्गदर्शन केले. वरील पाणी परिषदेत ठरल्याप्रमाणे २९ आक्टोबर १९९८ रोजी सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, जत, आटपाडी, मिरज या तालुक्यातील हजारो दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी कष्टकरणाऱ्यांनी तालुक्याच्या तहसिलदारांना कृष्णेचे पाणी २००० सालापर्यंत अडवावे. या मागणीसाठी घेराव घालून शासकीय कामकाज बंद पाडले. आ. आर.आर.पाटील, आनंदराव मोहिते यांच्यासह सुमारे २००० आंदोलकांनी स्वत:ला अटक करून घेतली. आ. आर.आर.पाटील यांनी तासगाव येथील मोर्चासमोर शासनाला बजावले की, पाणी प्रश्नी युती सरकारने उदासीनता ठेवली तर सचिवालय बंद पाडू. सोलापूर जिल्ह्यामध्ये माढा तहसिल कचेरीसमोर नागनाथ अण्णांनी धरणे आंदोलन सुरु केले. सांगोला तहसिल कार्यालयासमोर गणपतराव देशमुख यांनी धरणे आंदोलन सुरु केले. मंगळवेढा तहसिल कार्यालया समोर आ. लक्ष्मणराव ढोबळे यांनी भारुड सादर करून मार्मिक शब्दात युती सरकारवर टीका केली. सातारा जिल्ह्यात वडूज तहसिल कार्यालयासमोर अॅड. सुभाषराव देशमुख यांनी घेरावा आंदोलन केलं.

फलटण येथे माजी आ. हरिभाऊ निंबाळकर व खंडाळ्याचे अॅड. बाळासाहेब बागवान यांनी धरणे आंदोलन केले. दिनांक २८ ऑगस्ट २००२ रोजी सांगली जिल्ह्यातील

पाण्यापासून वंचित राहणाऱ्या सहा तालुक्यातील नागरिकांचा भर पावसात नागनाथ अण्णांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. अण्णांच्या बरोबर डॉ. बाबुराव गुरव, कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर होते. त्या सभेत नागनाथ अण्णांनी निर्वाणीचा इशारा दिला की, ''वीज दरवाढ, ऊस कारखान्यावर लादलेला आयकर यामुळे भांडवलशाहीस पोषक असलेले धोरण राज्यातील लोकशाही आघाडीचे सरकार राबवत असून युती सरकारचे धोरण न बदलल्यास शेतकऱ्यांनी आता खाली खेचावे.''[२४]

२६ जून रोजी असाच विराट मोर्चा काढून पाण्यापासून वंचित राहणाऱ्याच्या वतीने शासनाला निवेदन दिले होते. त्याची सरकारने कसलीही दखल न घेतल्यामुळे हा अंतिम इशारा म्हणून पुन्हा मोर्चा काढला आहे. यापुढे समान पाणी वाटपासाठी मोर्चा न काढता धडक कृती कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय नागनाथ अण्णांनी जाहीर केला. मोर्चा काढून काही उपयोग होत नाही अधिकारी वर्ग निर्ढावला आहे. शासन बेफिकिर बनले आहे. समान पाणी वाटपाच्या मागणीसाठी धरणग्रस्ताना न्याय मिळवून देण्यासाठी धडक कृतिदल स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सांगली जिल्ह्यातील भर पावसातील झालेल्या हा मोर्चा ऐतिहासिक म्हणावा लागेल. कारण स्वत: नागनाथ अण्णा भर पावसात छत्री न वापरता भिजत मोर्चाचे नेतृत्व करीत होते. कृष्णा खोरेच्या पाण्यासाठी दुष्काळी भागाला समान पाणी वाटप होण्यासाठी पाणी संघर्ष चळवळीच्या वतीने आटपाडी तालुक्यात २२ नोव्हेंबर २००० रोजी करगणी, झरे, दिघंची, आटपाडी, शेटफळे या गावादरम्यान ५०,००० हून अधिक स्त्री पुरुषांनी, शाळकरी मुलांनी प्रचंड अशी मानवी साखळी निर्माण केली होती. नागनाथ अण्णांनी या उपक्रमाद्वारे तालुका बंद व मानवी साखळी यशस्वी केली होती.

६ एप्रिल २००१ रोजी नागनाथ अण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली शेतमजूर, शेतकरी कष्टकरी संघटनेच्यावतीने दुष्काळी आटपाडी तालुक्याला बारमाही शेतीचे पाणी टेंभू योजनेतून मिळालेच पाहिजे. या मागण्यासाठी हजारो स्त्री-पुरुष शेतकरी बांधवानी आटपाडी तहसिल

कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. त्याप्रसंगी अंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना नागनाथ अण्णा म्हणाले, 'या तालुक्यातील शेतकऱ्यांनी साराबंदीचे आंदोलन यशस्वी केले असते तर पाणी प्रश्न सुटला असता. आता तमाम शेतकऱ्याच्या विचारातून सुरु झालेले हे आंदोलन थांबवले जाणार नाही.' असा भक्कम आधार दिला. यावेळी प्रा. बाबुराव गुरव यांनी ''शासनाला देखील हिसका दाखवूनच आपण विजय मिळवूयाच''[२५] असे सांगितले. डॉ. भारत पाटणकर याप्रसंगी म्हणतात, ''संपूर्ण राज्याचे पाणी विषयक धोरण बदलण्याची लढाई आटपाडी तालुक्यातून केली जात आहे. हे महत्त्वाचे असून शासनाला नमवल्याशिवाय धोरण बदलले जाणार नाही व त्यादृष्टीने सुरु झालेले ठिय्या आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.''[२६] पुढे ७ एप्रिल २००१ रोजी टेंभूच्या डाव्या कालव्याचे काम १५ ऑगस्ट २००१ पासून सुरु करण्याची हमी अधिक्षक अभियंता आर. एल. उबाळे यांनी दिल्यानंतर आटपाडी तहसिल कार्यालयासमोर असणारे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

यानंतर आटपाडी येथे २८ जुलै २००१ रोजी १३ दुष्काळी तालुक्यांची पाणी संघर्ष परिषद आयोजित केली. तेथे बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''सत्तेवर बसलेला माणूस सहजासहजी खुर्ची सोडेल असे वाटत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात चिंतामणराव देशमुखांनी राजीनामा दिला. परंतु यशवंतराव राजीनामा देऊ शकले नाहीत. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर मुंबई महाराष्ट्रला मिळाली. सध्याचे सरकारमधील दुष्काळी भागातील मंत्री देखील सहजासहजी जनतेच्या पाणी प्रश्नांवर राजीनामा देतील असे वाटत नाही. तथापि त्यांना एक महिन्याची मुदत देऊन वाट पाहू या.'' आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, ''तरुण पिढी दुष्काळी भाग यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी ही पाणी चळवळ सुरु असून या चळवळीकडे 'तुम लड़ो हम कपडे संभालते हैं' अशा उपरेपणाच्या भावनेतून न पाहता ही लढाई केली पाहिजे तरच क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या योगदानाचे व चळवळीचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल.''[२७] शासनाकडून योग्य ती कृती न

केल्यामुळे नागनाथ अण्णांनी २२ सप्टेंबर २००१ रोजी शासनाला इशारा दिला, कृष्णा खोरे योजनेचे पाणी दुष्काळी भागात येत नाही व त्याचा लाभ येथील जनतेला मिळत नाही तोपर्यंत या भागातून सरकारला एक पैसाही शेतसारा मिळणार नाही. या परिषदेस रणरणत्या उन्हातही स्त्री–पुरुष उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. डॉ. बाबुराव गुरव म्हणतात की, ''कर्मवीर जयंती निमित्त आयोजित केलेल्या या पाणी परिषदेच्या निमित्ताने कर्मवीर आण्णांच्या स्वतंत्र्याच्या तत्त्वास अनुसरुन दुष्काळी जनतेने वाटचाल करावी. शासनापुढे लाचार न होता स्वाभिमानाने आपल्या हक्कासाठी झगडावे. नागरिकांची आंदोलने पोलिसांकरवी चिरडू पाहणाऱ्या सरकारला जाग येणार नाही हे लक्षात ठेवावे.''[२८]

गेल्या दहा वर्षे मोठ्या जिद्दीने कार्यरत असलेल्या पाणी संघर्ष तत्त्वाच्या व विचारांच्या संघर्षातून प्रत्यक्ष पाणी मिळण्याचा कृतिशील टप्पा जवळ आला आहे. प्रा. बाबुराव गुरव यांनी दिनांक ३/१२/२००१ रोजी आटपाडी येथे कार्यकर्त्यांच्या बैठकीत आढावा घेताना सांगितले की तालुक्यातील समान पाणी वाटप पथ पाणी संघर्ष चळवळ कष्टातून कार्यरत आहे. चळवळीच्या वाटेत कोणतेही अडथळे आले तर ते दूर केले जातील. ॲड. उस्मान नबी शेख याप्रसंगी विचार व्यक्त करतात, ''दुष्काळी भागाचा पाण्याचा प्रश्न चळवळीमुळे सुटला आहे. त्यामुळे पाणी मिळण्याचे यश आता अंतिम टप्प्यात आले असताना आता आम्ही अजिबात पळ काढणार नाही. नागनाथ अण्णांचे लक्ष दुष्काळी तेरा तालुक्याबरोबरच शिराळा पेट्यातील शेतकऱ्यांना समान पाणी वाटप व्हावे याकरिता पणुंद्रे वारुण येथे वारणा मुख्य कालव्याकडे होते. तेथीलच चळवळीसमोर समान पाणी वाटप परिषदेत नागनाथ अण्णा म्हणतात की, सरकार आम्हाला अडवू पाहत आहे. आम्ही स्वस्थ बसणारे नव्हे. पाण्याच्या प्रश्नावर मोठे जनआंदोलन उभे करायचे आहे. याकरिता सर्वांनी या प्रवाहात सामील होणे गरजेचे आहे.''[२९]

कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यपध्दतीवर नागनाथ अण्णा आजपर्यंत टीका करीत आले आहेत. अशा परिस्थितीत फलटणच्या ग्राम विकास प्रतिष्ठानचे विश्वस्थ दत्तात्रय भोसले व पत्रकार नाशिल शिकलगार यांनी मागणी केली की, नागनाथ अण्णा नायकवडी यांची कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी नेमणूक व्हावी.

कृष्णा खोऱ्यातील पाणी प्रकल्पासाठी राज्य सरकारने निधी उपलब्ध करून घ्यावा अन्यथा तेरा दुष्काळी तालुक्यातील दोन लाख सत्याग्रही २ आक्टोबरपासून तीव्र संर्ष करतील असा अंतिम इशारा आटपाडी येथे दिला. पाणी परिषदेमध्ये बोलताना दि. २६ जुलै २००२ रोजी दिला. या परिषदेचे उद्‌घाटन अभिनेते निळू फुलेनी केले होते व अध्यक्षपदी माजी मंत्री गणपतराव देशमुख हे होते. याप्रसंगी नागनाथ अण्णा म्हणाले, ''गेली ९ वर्षे खूप संयमाने दुष्काळग्रस्तांच्या पाण्यासाठी लढा सुरु आहे. जातीयवादी युती सरकार गेल्यानंतर आघाडी सरकार सत्तेवर आले पण दुष्काळग्रस्तांच्या पाण्याच्या प्रश्नांवर ते गांभीर्याने पाहात नाहीत. गांधीजीच्या पुण्यातिथी पर्यंत योग्य असा निर्णय झाला नाही तर मोठा संघर्ष छेडला जाईल आणि प्रत्यक्षात शेतात जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत तीव्र संघर्ष सुरुच राहील.''[३०] अण्णांच्या या निर्णयाने आम जनतेला आधार मिळत होता. शासनाची उदासिनता पाहता डॉ. भारत पाटणकर म्हणतात, ''कृष्णा खोऱ्याचे काम सध्या पूर्णत: बंद आहे. आमदारांच्या बैठकातून पैसे मंजूर केल्याच्या थापा मारल्या जात आहेत.'' पण अण्णांना लढा थांबवायचा नाही. यावेळी प्रा. बाबुराव गुरव म्हणाले, ''पहिल्या तीन वर्षामध्ये संघटन वाढविणेसाठी पाणी परिषदा घेतल्या आणि नंतर ते प्रत्यक्ष होऊ शकते हे संघटनेने दाखवून दिले आहे. महामंडळाने त्याला तांत्रिक मंजूरी दिली आहे.''[३१] या पाणी परिषदेत शिवाजीराव काळुंगे(मंगळवेढा), प्रा. विश्वंभर बाबर (म्हसवड), ॲड. बाळासाहेब बागवान (खंडाळा), प्रा. दादासाहेब ढेरे(कवठेमहांकाळ), उस्मान नबी शेख व प्रा. आर. एस. चोपडे(सर), जालंदर जमदाडे (तासगाव), मोहनराव गायकवाड(जत), रावसाहेब शिंदे(खानापूर), माजी

आ. माणिक जाधव (लातूर), कॉ. नाना शेटे(साजणी), दत्ताजीराव जाधव (खटाव), प्रा. आर. डी. गायकवाड, किसनराव बारबोले (माढा), प्रा. आ. शरद पाटील, वैभव नायकवडी, सौ. कुसुमताई नायकवडी यांनीही मार्गदर्शन केले.

आटपाडी येथे २६ जुलै २००२ मध्ये झालेल्या पाणी परिषदेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे २ आक्टोबर २००२ पर्यंत शासनाने त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास तेरा दुष्काळी तालुक्यातील जनता जेल भरो आंदोलन सुरु करेल असा इशारा नागनाथ अण्णांनी आटपाडी येथे ठरल्याप्रमाणे सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळी तालुक्यातून ३० आक्टोबर अखेर दोन लाख सत्याग्रहीची नाव नोंदणी करून जेलभरो आंदोलनास तयार राहण्याचे आवाहन २ आक्टोबर २००२ रोजी नागनाथ अण्णांनी केले. तसेच २३ आक्टोबर २००० रोजीच्या आटपाडी येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीस असे ठरले की तेरा दुष्काळी तालुक्यातील प्रतिनिधींचे शिष्टमंडळ राज्यपालांना भेटून विदर्भ, मराठवाड्याचा अनुषेषाचा आदेश मागे घेण्याची विनंती करणार आहे.

नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली तेरा दुष्काळी तालुक्यातील जनतेच्या आंदोलनामुळे शासनाने समान पाणी वाटपास तत्वत: मान्यता दिली. परंतु निधी अभावी कृष्णा खोरे विकास महामंडळाची कामे रखडली. त्यास चालना देण्यासाठी व अखेरचा शासनाला धक्का देऊन जागे करण्यासाठी पुणे येथील महाराष्ट्र कृष्णा खोरे कार्यालयाच्या मुख्य कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सोमवार दि. १९ जानेवारी २००४ रोजी आयोजित कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन केले. आंदोलनाचे नेते नागनाथ अण्णा, गणपतराव देशमुख, बाबा आढाव, डॉ. भारत पाटणकर, आमदार अनिल बाबर यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने आलेल्या शेतकऱ्यांनी १९ जानेवारी २००४ पासून सिंचन भवनासमोर आंदोलन केले होते. हे आंदोलन मागे घेण्याची विनंती करण्यासाठी दि. २० जानेवारी २००४ रोजी गृहमंत्री आर. आर. पाटील व पाटबंधारे मंत्री अजित पवार आले होते. त्यांनी तेथे जाहीर

केले की, कृष्णा खोरे सिंचन प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २००४ पर्यंत १५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यास मंजूरी दिली आहे. या रक्कमेपैकी ११५० कोटी रुपये कृष्णा खोरेसाठी खर्च करण्यात येतील. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच भू संपादनासाठी यातून रक्कम देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत महिन्याभरात कामे सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिल्यानंतर दोन दिवसांनी हे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

या ठिय्या आंदोलनाबद्दल बोलताना डॉ. पाटणकर म्हणाले, ''पाणी संघर्ष चळवळीने पुण्यात ठिय्या आंदोलन करून दिल्ली हलविली आणि त्यामुळे कृष्णा खोरेसाठी दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन हे पैसे तातडीने उभे करावेत. पाणी संघर्ष चळवळीने कृष्णा खोऱ्याच्या पाण्यासाठी गेली ११ वर्षे नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरु केलेले आहे. आजचे शासनाचे आश्वासन हे या आंदोलनाला मिळालेले सगळ्यात मोठे यश आहे.''[३२] अशा रितीने पाण्यासाठी अण्णांनी आपल्या आयुष्यातील कितीतरी वर्षे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी खर्च केलेली दिसून येतात.

**शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, कष्टकरी महिलांसाठी आण्णांचे कार्य:**

१९८५ च्या विधानसभेच्या निवडणुकीत वाळवा मतदार संघातून नागनाथ अण्णा निवडून आले होते. ऐतवडे (बु.) येथे शेतकरी, शेतमजुरांची भव्य परिषद घेण्याचे त्यानी ठरविले. त्या परिषदेच्या तयारीसाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी सुमारे १०० सभा गावागावातून घेण्यात आल्या होत्या. साताराचे ॲड. व्ही. एन. पाटील, तासगांवचे प्रा. बाबूराव गुरव व नागनाथ अण्णा यांनी वेगवेगळ्या गावी जाऊन सभा घेतल्या होत्या. सौ. कुसुमताई नायकवडी यानी सभा घेतल्या होत्या. वास्तविक शेतकरी, शेतमजुरांची कष्टकऱ्याची संघटना बांधण्याचे प्रयत्न १९७१ पासून करणेत आले होते. पण त्यास १९८५ साली चांगला प्रतिसाद मिळाला व ऐतवडची परिषद यशस्वी झाली. हजारो शेतकऱ्यांनी शेतमजुरांनी येऊन

नागनाथ अण्णांचे नेतृत्व मान्य केले. त्यातूनच पुढे किणी येथील भव्य परिषद घेणेचे ठरले होते. वाळवा इस्लामपूर रस्त्यासाठी साराबंदी चळवळीस सर्वांनीच मदत केली होती त्यासाठी सर्व थरातील लोक एकत्र आले होते. महिलांनी नागनाथ अण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई याच्या नेतृत्वाखाली साराबंदी चळवळीच्या वेळी पोलिसांना चांगलाच धडा शिकवला होता. याच रस्त्याच्या कामातील यशामुळे अण्णांना भावी जीवनातील यशाचा मार्ग खुला झाला.

त्यानंतर १९८८ साली वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या आवारामध्ये शेतकऱ्यांचे प्रबोधन शिबीर अण्णांनी आयोजित केले होते. १९९०-९१ मध्ये भारतभर अण्णानी दौरा केला होता. कष्टकरी जनतेच्या न्यायहक्कासाठी आणि जागृती करण्यासाठी २६ मे १९९३ रोजी किणी (वाठार) जि. कोल्हापूर या ठिकाणी ८० हजाराच्या संख्येने शेतमजूर व कष्टकरी, शेतकरी, शेतकरी परिषदेसाठी आले होते. त्यासाठी सुमारे ३५० सभा सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात घेतल्या होत्या. या प्रचार सभामध्ये मा. अण्णा, ॲड. धैर्यशिल पाटील, कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. बाबुराव गुरव, कॉ. धनाजी गुरव, कॉ. जयंत निकम, श्री. एस. आर. पाटील (सर) श्री. बाळासाहेब नायकवडी(सर) व जमादार सर यांनी भाग घेतला होता. २६ मे १९९३ रोजीचा हा दिवस ऐतिहासिक ठरला.

आण्णांच्या नेतृत्वाखाली एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. त्या परिषदेमध्ये अध्यक्षपदावरुन बोलताना त्यांनी असे मत व्यक्त केले की, ‘‘राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका पार पाडणारी कॉंग्रेस तत्वाच्यादृष्टिने संपली आहे ती शेतकरी, कष्टकरी याच्या विरोधी असून पक्की भांडवलदार धार्जिणी बनली आहे. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांना मदत करणाऱ्या भाजप सारख्या शक्तीशी कॉँग्रेस पक्ष युती करीत आहे. कॉँग्रेसचा या युतीच्या पार्श्वभूमीवरच या जातीयवाद्यांनी अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्याचे धाडस केले आहे. या जातीयवादी शक्ती बेफाम झाल्या असून त्यांना सत्तेची स्वप्ने पडत आहेत. अशा वेळी स्वस्थ बसणे शक्य नाही. स्वत:च्या सामर्थ्यावर प्रश्न सोडवून घेणारी संघटना गाव पातळीपासून राज्य पातळीवर येत

भक्कमपणे बांधण्यात आली पाहिजे. ही संघटना विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात स्थापन झाली पाहिजे. मात्र या संघटनेत भाजप, शिवसेना या सारख्या जातीयवाद्यांना प्रवेश दिला जाणार नाही. प्रगतीत अडथळे आणणारे देशाचे दुश्मन समूळ नष्ट झाले पाहिजेत.''[३३]

यावेळी या सभेचे प्रमुख पाहुणे चित्रपट अभिनेते निळू फुले होते. ते आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, ''बारा बलुतेदारांच्या हितांच्या मंडल आयोगाबद्दल चुकीची माहिती देवून जातीयवादी शक्ती पोरांना चिथावणी देत आहेत. हे कारस्थान आता चालू देणार नाही. महाराष्ट्रात नवीन परिवर्तनवादी चळवळीचा हा शुभारंभ करणारी ही परिषद आहे. सर्व धर्मनिरपेक्ष शक्ती एकत्र करून मोठी आरोळी ठोकावयाची आहे आणि प्रचंड वादळ उभे करावयाचे आहे.''[३४]

या प्रसंगी चित्रपट अभिनेते राम नगरकर, प्रा. डॉ. बाबुराव गुरव, आमदार के. एल. मलबादे, कॉ. गोविंदराव पानसरे, डॉ. बाबा आढाव, आ. शंकर धोंडी पाटील, यांनीही आपली मते मांडली. या प्रसंगी माजी आमदार वाय. सी. पाटील, प्रा. पी. बी. पाटील, कॉ. शेखकाका, डॉ. भारत पाटणकर, कॉ. संतराम पाटील व शंकरराव नलवडे उपस्थित होते.

नागनाथ आण्णांनी सातारा, सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळ तालुक्यातील जनतेला संघटित करण्याचे प्रयत्न आटपाडी पाणी परिषदेद्वारे १९९३ पासून सुरु केले होते. सतत दोन वर्षे अण्णा संघटना बांधणीसाठी झटत होते. ९ ऑगस्ट १९९५ रोजी ऑगस्ट क्रांतिदिनी संघटनेची व्याप्ती विद्यार्थी तरूणांपर्यंत पोचविण्याचे काम आण्णांनी केले. कोल्हापूर येथे राजर्षि शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींगच्या मैदानावर सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी, विद्यार्थीनींना एकत्र आणले आणि नागनाथ आण्णांच्या मार्गदर्शनाखाली 'क्रांतिकारी विद्यार्थी संघटना महाराष्ट्र' या नावाने वेगळी संघटना स्थापना केली. तसेच २८ नोव्हेंबर १९९५ रोजी म. जोतिराव फुले यांच्या स्मृतिदिनाच्या दिवशी शेतमजूर, 'कष्टकरी शेतकरी स्त्री संघटना' या

नावाने कष्ट करून जगणाऱ्या ग्रामीण स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी एक स्वतंत्र संघटनेची दि. २८ नोव्हेंबर १९९५ रोजी वाळवे येथे माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत स्थापना झाली. ही स्त्रियांची परिषद संघटीत करण्यासाठी सौ. कुसुमताई नायकवडी, स्वातंत्र्य सैनिक कॉ. इंदूताई पाटणकर यांनी पुढाकार घेतला होता. धरणग्रस्तांच्या चळवळी, शेतमजूर, कष्टकरी शेतकऱ्यांची चळवळ, सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या कष्टकरी जनतेला स्वावलंबी आणि समृध्द करणाऱ्या चळवळी समान पाणी वाटपाच्या चळवळ, स्त्रीयांच्या चळवळी, शिक्षण क्षेत्रात सत्यशोधकी पुरोगामी परिवर्तन घडवू पाहणारी विद्यार्थ्यांची चळवळ अशा अनेक प्रश्नांची एकत्र गुंफण करून नागनाथ आण्णांच्या नेतृत्वाखाली चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळी उभ्या करण्यासाठी नागनाथ अण्णा नायकवडी यांनी अथक परिश्रम घेतले होते.

समाजामध्ये ज्यांच्यावर शासनाकडून अन्याय झाला आहे अशा संघटना नागनाथ अण्णांकडून मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांचेकडे येत असत आणि अण्णा सर्व शक्तीनिशी अन्याय दूर करण्यास मदत करीत. ५ डिसेंबर २००२ रोजी शासकीय दूध योजनेतील कर्मचाऱ्याच्या प्रश्नांवर राज्यव्यापी परिषद नागनाथ अण्णांनी घेतली होती. साखर उद्योगावर लादलेल्या आयकर विरोधात खूप मोठे आंदोलन करून नागनाथ अण्णांच्या प्रयत्नामुळे आयकराचे संकट तात्पुरते थांबविण्यास अण्णांना यश आले होते. अन्यायी वीज दरवाढी विरोधात आंदोलन उभे करून सर्वसामान्य जनतेचा वीज दर वाढीस असलेल्या विरोध जाहीररित्या अण्णांनी प्रगट करून दाखविला. साखरवाडी साखर कारखान्याचे कर्मचारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत मागण्यासाठी नागनाथ अण्णांच्याकडे आले होते. त्यामुळे महाराष्ट्रात जेथे तेथे अन्याय होत होता. तेथील लोकांना मदत करणारे एकमेव नेते म्हणून नागनाथ अण्णा नायकवडी यांची महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासामध्ये नोंद व्हायला पाहिजे. अण्णांची ही तळमळ सामान्य

जनतेच्या हिताची होती. या पार्श्वभूमीवर अण्णांचे कार्य समाजाभिमुख बहुजनांच्या हिताचे होते. त्यांनी पारधी समाजासाठी सुद्धा महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

**नागनाथ अण्णा यांचे फासे पारधी आंदोलनाचे नेतृत्व : पुनर्वसनाचे प्रणेते**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील २४० गुन्हेगार जमातींना स्वातंत्र्यानंतर १९५२ साली गुन्हेगार कायद्यातून मुक्त केले. तत्पूर्वी इंग्रजांनी या देशातील २८० जमातींना गुन्हेगार जाती ठरवून त्यांचेसाठी १८७१ साली कायदा केला होता. त्या अन्वये गुन्हेगारांच्या पोटी जन्माला आलेल्या बालकालाही गुन्हेगार ठरविले होते. हा या वंचित समाज घटकावर अन्याय करणारी गोष्ट आहे. हे नागनाथ आण्णा यांनी जानले होते. त्यामुळे अशा वंचित घटकांना न्याय हक्क मिळायला हवेत या भूमिकेत नागनाथ आण्णा होते. त्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. एका गावाहून दुसऱ्या गावास जाताना त्या गावच्या पोलीस पाटलाचा चांगल्या वर्तणुकीचा दाखला घेऊन जावे लागे. शेकडो वर्षाच्या गुलामगीरीतून या जमातींना मुक्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अन्यायी व जुलमी कायदा नष्ट करून फासेपारधीसारख्या जमातींना मुक्त केले. स्वातंत्र्यानंतर या समाजाकडे माणूस म्हणून कोणी पाहिलेच नव्हते.

नागनाथ अण्णांनी अशा वंचित पारधी समाजाच्या प्रश्नांत १९७५ च्या सुमारास लक्ष घातले. त्यांनी पारध्याकडे बघण्याच्या दृष्टीकोन बदलला. त्याचबरोबर इतरांना बदलायला भाग पाडले. वास्तविक पाहता राजर्षी शाहू महाराजांनी कृतीने जनतेला दाखवून दिले होते की, संस्थांनी कामकाजात नेमलेले फासेपारधी इतरांपेक्षा कितीतरी पटीने प्रामाणिकपणे काम करतात. त्यांचीच प्रेरणा घेऊन नागनाथ अण्णांनी वाळवा येथे फासेपारधींना आश्रय दिला. त्यांना माणुसकीची वागणूक दिली. रोजगार देऊन उदरनिर्वाहाची सोय करून दिली. नागनाथ अण्णांच्या जीवनातील फासेपारधी समाजाच्या पुनर्वसनाचे कार्य खूप महत्त्वाचे व क्रांतीकारी होते. परंतु समाजातील काही हितशत्रूंनी कौतुक करण्याऐवजी

टीकाही केली होती पण तिकडे अण्णांनी दुर्लक्ष केले. फासेपारधी म्हणजे गुन्हेगारी जमात. स्वत:चे आणि कुटुंबाचे पोट भरण्यासाठी लहान मोठ्या चोऱ्या करणारे, वेळप्रसंगी आडवे येतील त्यांना ठार मारणारे हे चित्र पारधी समाजाचे होते. अण्णांनी ही वस्तुस्थिती बदलण्याचा जिद्दीने प्रयत्न केला. वाळवाच्या किसान शिक्षण संस्थेत तरुणांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्या अनेक पिढ्यांमध्ये शिक्षण घेतलेले कोणीही नव्हते. किंबहुना त्यांच्या शिक्षणाचा हक्कच समाजाने हिरावून घेतला होता. तो त्यांना माणूस म्हणून हक्क अण्णांनी मिळवून दिला. फासेपारधी समाजातील मुले हुतात्मा किसन अहिर विद्यालयात शिक्षण घेऊ लागली. त्यामुळे ही जमात स्थिर होऊ लागली. या पार्श्वभूमीवर नागनाथ आण्णांचे कार्य अखिल भारतीय समाज जीवनाला प्रेरणादायी दिशादर्शक ठरावे असे होते. बहुजन, वंचित घटकांसाठी त्यांनी दिलेला हा लढा महत्त्वाचा होता. त्यांनी पारधी समाजातील अनेक तरुणांना सरकारी, निमसरकारी, सहकारी संस्था, कारखान्यामधून नोकरीत समावून घेतले. या वंचित घटकांना ही आत्मविकासाची संधीच होती.

उदाहरणार्थ पारधी समाजाच्या श्रीमती चंद्रबाई लंगड्या पवार, सुकना लोमट्या काळे, भिमऱ्या किसन पवार, रचना बांगड्या पवार यांना नागनाथ अण्णांनी किसान शिक्षण संस्थेत नोकरीस घेतले. त्या समाजापैकी जितेंद्र अंकुश काळे, प्रतिका लंगड्या पवार, रणजित गिलट्या पवार, सौ. प्रवेशा विजयकुमार पवार (डी.एड) यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. महत्त्वाचे ऐतिहासिक सामाजिक कार्य म्हणजे पारधी समाजाचे पुनर्वसन करण्याची चळवळ नागनाथ अण्णांनीच महाराष्ट्रात प्रथम सुरु केली. परिणामांची टिकेची पर्वा न करता चिकाटीने व जिद्दीने नागनाथ अण्णांनी हे कार्य केले. हुतात्मा किसन अहिर विद्यालयामधील शिक्षक मधुकर वायदंडे हे आण्णांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जानेवारी २००३ पासून आदिवासी पारधी हक्क अभियान चालविले. या पार्श्वभूमीवर पारधी बांधवांसाठी अण्णांनी केलेले कार्य महत्त्वाचे होते.

दलित महासंघाच्या माध्यमातून पारधी हक्क अभियानाद्वारे प्रवाहाबाहेर राहणाऱ्या पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न मधुकर वायदंडे करीत आहेत. एक गाव एक पारधी कुटुंब अशी पारधी अभियानाची भूमिका होती. भूतपूर्व सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हणमंतराव पवार यांनी सांगली जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना पारधी कुटुंबाच्या प्रश्नात लक्ष घालण्यास सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गावागावात झालेल्या ग्रामसभेत पारधी पुनर्वसनाची चर्चा झाली व वाळवा तालुक्यातील कार्वे, साखराळे, कासेगाव, ऐतवडे बुद्रुक, ढगेवाडी, वाणापुडे, वशी, नरसिंहपूर, शिरटे, कोहे, बहे, शेणे, नागाव, गोटखिंडी, बावाची वाटेगांव, वळवे, कुरळप, ऐतिवडे खुर्द, चिकुर्डे, इटकरे, डोंगरवाडी, शेलारवाडी या २३ गावातील ग्रामसभेने पारधी कुटुंबांना गायरान व सार्वजनिक ठिकाणी जागा दिल्या. पारधी त्या ठिकाणी झोपड्या बांधून राहात आहेत. पारधी हक्क अभियानाद्वारे मागणी करीत आहेत की पारधी समाजाला कसायला जमीन द्या, शिधापत्रिका द्या, पारधी तरुणांना नोकरीत संधी द्या, समाजामध्ये माणूस म्हणून वागवा. गुन्हेगारीचा शिक्का पुसून द्या, अशा मागण्या मान्य करून देशसेवेसाठी पारधी बटालियन सुरु करावी. अशा स्वरुपाच्या मागण्या अण्णांनी सरकार दरबारी पाठविल्या होत्या. श्री. मधुकर वायदंडे यांना नागनाथ अण्णा यांच्या नेतृत्वाखाली पारधी समाजातील १४ पारधी गुन्हेगार शरण आले. ही पारधी माणसे समाजाच्या मुख्य प्रवाहात यायला तयार झाली आहेत. सांगली महानगरपालिकेच्या नोकर भरतीसाठी १० ते १२ झालेल्या पारधी तरुणांना नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलाविले आहे पण रहिवासी दाखला, रेशनकार्ड नाही म्हणून नोकरीची संधी मिळणेस अडचणी निर्माण झाल्या. नागनाथ अण्णा नायकवडी यांनी पूर्वीच २० वर्षापूर्वी धाडसी निर्णय घेऊन चंदाबाई पोवार, भिमऱ्या काळे, सुकन्या काळे यांना वाळवा येथील हुतात्मा संकुलामधील सेवेत घेतले आहे व ती मंडळी प्रमाणिकपणे सेवा करीत आहेत. या

पार्श्वभूमीवर अण्णांचे योगदान बहुमोल म्हणायला पाहिजे. यातूनच पुढे डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी पारधी समाजाच्या न्याय हक्कासाठी मुंबईसारख्या ठिकाणी परिषदा घेतल्याचे दिसते.

**सारा बंद चळवळीचे नेतृत्व :**

नागनाथ अण्णा यांनी वाळवा आणि परिसरातील सर्व शेतकऱ्यांना एकत्र बोलावून वाळवा इस्लामपूर रस्ता डांबरी करण्यास सरकारला भाग पाडण्यास म. गांधीच्या सत्याग्रही मार्ग सुचवला. जोपर्यंत वाळवा–इस्लामपूर रस्ता डांबरी होत नाही तोपर्यंत वाळव्याच्या शेतकऱ्यांनी शेतसारा भरण्यास नकार दिला. त्यासाठी आंदोलन सुरु केले. त्यामध्ये सर्व शेतकरी एकदिलाने सहभागी झाले. साराबंदी चळवळ सुरु झाल्याबरोबर पोलिसांच्या तुकड्यांनी दमदाटी देण्यास सुरुवात केली. त्याला न घाबरता हजारो पुरुष व स्त्रीयांनी लोकशाही मार्गाने आंदोलन केले.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात गुजरातमधील बार्डोली तालुक्यातील शेतकऱ्यांनी अशा प्रकारचे साराबंदी आंदोलन केले होते. स्वातंत्र्याच्या काळात विविध मागणीासाठी सीमा भागातल्या जनतेने साराबंदी चळवळ केली होती. त्याच्या मागण्याा मंजूर करून घेण्यासाठी तशी ही चळवळ वाळव्याच्या शेतकऱ्यांनी सुरु केली होती. सरकारने वाळवे गावाला पोलिस छावणीचे स्वरुप यावे इतक्या मोठ्या संख्येने पोलिस आणून ठेवले होते. अण्णांनी हजारो स्त्री–पुरुषांना एकत्र घेऊन वाळव्याच्या रस्त्यावरुन जागृती फेऱ्या काढल्या होत्या. गावात पोलिसांना कसलीही कोणतीही वस्तू मिळत नव्हती. अशा या चळवळीत क्रांतीमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांचेबरोबर नागनाथ अण्णांच्या पत्नी सौ. कुसुमताई नायकवडी व कन्या विशाखा याही इतर महिलांचे बरोबर चळवळीत सहभागी होत्या.

या साराबंदी चळवळीत क्रांतीवीर नागनाथ अण्णा यांच्या मातोश्री क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. एका स्थानिक पुढाऱ्याने पोलिसांचे मदतीने शेतसारा न दिल्याने शेतसारा न दिलेल्या शेतकऱ्यांच्या घरावर छापा घालून भांडी–कुंडी जप्त

करण्याचे प्रकार सुरु केले. ते आणीबाणीचे दिवस होते. ऐके दिवशी आंदोलनाच्या काळात पोलिस गावात आले. सौ. लक्ष्मीबाई नायकवडी यांनी झटपट गावातील बायकांना जमविले आणि चावडीत आलेल्या पोलिसांना घेरावच घातला. शेतकऱ्यांनी जप्त केलेली भांडी-कुंडी परत केल्याशिवाय सोडणार नाही अशी भूमिका घेतली. यामध्ये तुम्हाला तरी मारु किंवा आम्ही तरी मरु. अशी सडेतोल भूमिका घेतली. अखेर पोलिसांनी जिल्हा प्रमुखांशी संपर्क साधला. त्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचेशी संपर्क साधला. मा. शंकरराव चव्हाण यांनी हे आंदोलन आणीबाणी विरोधी नाही तेव्हा जप्त केलेली भांडी परत करावीत आणि माफी मागून परत जा असा आदेश बजावला. तेव्हा कोठे पोलिसांची सुटका झाली. जप्त केलेली शेतकऱ्यांची सर्व भांडी कुंडी वाजत गाजत लोकांनी ज्यांची त्याला परत केली.

रस्ता आंदोलन काळातील तणावाच्या प्रसंगाबद्दल सांगताना किर्लोस्कर ब्रदर्स कारखान्याचे मॅनेजर पी. डी. गुणे सांगतात की, ''सांगलीचे कलेक्टर श्री अय्यर व डी. एस. पी. श्री. व्यंकटाचलम हे नेहमी किलोस्करवाडीला येत असत. त्यामुळे त्यांचेशी मैत्रीचे संबंध झाले होते म्हणून एके दिवशी ते श्री. गुणे यांना म्हणाले, 'क्रांतिवीर नागनाथ अण्णांची व तुमची लहानपणापासून मैत्री आहे तर आमचेसाठी त्यांची भेट घडवून द्या. कारण आम्ही सर्व माहिती गोळा केली आहे व अशी खात्री झाली कि विरोधकाचे नाव म्हणून वाळव्यावर खरोखरच अन्याय झाला आहे व तो आम्हाला दूर करावयाचा आहे. पण त्याकरिता वाळवा येथे नागनाथ अण्णा यांची गाठच पडत नाही. ती भेट घडवून आणण्याचे प्रयत्न कराल काय?' त्याप्रमाणे श्री. गुणे क्रांतिवीर नागनाथ अण्णांना भेटले व कलेक्टर आणि डी. एस. पी. यांचे भेट किलोस्करवाडीत घेतली. त्या भेटीत कलेक्टरने प्रथमच सांगून टाकले की, 'तुमच्या गावावर अन्याय झाला आहे तो आम्ही दूर करून रस्ता तयार करून देणेस तयार आहोत.''[३५] त्यावर श्री नागनाथ अण्णांनी ताबडतोब सांगून टाकले की, ज्यादिवशी रस्ता आमच्या ताब्यात

येईल त्या दिवसापासून तीन महिन्यात आम्ही तुमचा सारा भरून टाकू. दोघांनीही शब्द पाळले आणि रस्ता डांबरी झाला व शेतकऱ्यांनी सारा भरला.

हा अनुभव सांगताना अण्णा असे म्हणतात की, ''वाळव्याच्या शेतकऱ्यांनी २५ फेब्रुवारी ७१ नंतर रस्त्यासाठी साराबंदी चळवळ केली. चार वर्षे शेतसारा दिला नाही. गावातील ७ जण फक्त शेतकऱ्यांची बाजू सोडून गेले याचं दु:ख आहे. बाकीच्यांनी हे काम इतकं धसाला लावलं कि दोन दोन हजार स्त्रिया, दोनदोन हजार पुरुष मोर्चात असायचे. ज्या दिवशी पोलीस फौज जास्त त्यादिवशी स्त्रिया जास्त, पुरुष जास्त. आनंदाने सांगण्याची गोष्ट म्हणजे माझ्या अगोदरची पिढी म्हणजे माझी आई, स्त्रियांमध्ये आघाडीवर असायची. माझी पिढी म्हणजे माझी बायको त्यांच्यात आघाडीवर असावयाची, पुढील पिढी म्हणजे माझी मोठी मुलगी त्या आघाडीत असावयाची म्हणजे माझ्या घरच्या तीन पिढ्यातील स्त्रियांनी भाग घेतला होता. स्त्रिया गोषा फेकून देऊन चळवळीत उतरल्या. पुरुषांनीही प्रचंड सहभाग घेतला. इतकं जोरात आंदोलन झाले आणि सरकारला नमावं लागलं व सरकारने डांबरी रस्ता करून दिला. डांबरी रस्त्यासाठी सुरु असलेले आंदोलन सुमारे चार वर्षे चालले होते.''[३६] नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखालील आंदोलन यशस्वी झाले. वाळवा गावच्या जनतेची अनेक वर्षाची अडचण दूर झाली. स्वातंत्र्योत्तर अण्णांच्या यशस्वी आंदोलनातील ही फार मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल.

**बंधारा बांधणीसाठी नागनाथ अण्णा नायकवडी यांचे योगदान :**

याच काळात कृष्णा नदीचे पाणी उन्हाळ्यात कमी झाल्यावर शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी कमी पडत असे. त्यावर उपाय म्हणून नागठाणे येथे कोल्हापूर पध्दतीचा कृष्णा नदीवर बंधारा बांधण्याची मागणी बरीच वर्षे नागनाथ अण्णा शेतकऱ्यांच्यावतीने करत होते. डांबरी रस्ता आंदोलन करून मिळविला. तसेच आंदोलन बंधारा होण्यासाठी होण्याची शक्यता लक्षता घेऊन शासनाने नागठाणे गावाजवळ कृष्णा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा

बांधण्यास मंजूरी दिली. त्या बंधाऱ्याचे बांधकाम नागनाथ अण्णांचे कोल्हापूरचे स्नेही कॉन्ट्रॅक्टर श्री. शंकरराव नलवडे यांनी ठरावीक वेळेत पुरे करून दिले. आज या बंधाऱ्यामुळे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यासाठी पुरेसा ऊस पिकविण्यासाठी पाणी मिळाले. शिरगांव गावचा रस्त्याचा प्रश्न कांही अंशी सुटला. कृष्णा नदीवर नागठाणे येथे झालेल्या बंधाऱ्यामुळे आज हुतात्मा कारखान्याने सहकार्य केलेल्या लहान मोठ्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. अण्णांनी धरणग्रस्तांसाठी सुद्धा भरीव कार्य केल्याचे दिसते.

**वारणा धरणग्रस्त परिषदेचे नेतृत्व :**

धरणग्रस्तांची जमीन शासनाने पाणी अडविण्यासाठी घेतली, पण त्यांचे संपूर्ण १००% पुनर्वसन झाले नाही. त्यामुळे अण्णांनी लढा तीव्र केला. आपआपसातील मतभेद विसरुन सरकारला धाक वाटेल अशी चळवळ उभी करुया असे आवाहन अण्णांनी केले. हुतात्मा किसन अहीर विद्यालयात त्यांनी सांगली, सातारा, कोल्हापूर धरणग्रस्तांची बैठक आयोजित केलेली होती. त्यामध्ये अण्णांनी अशी भूमिका मांडली की, ''काही प्रमाणात धरणग्रस्तांचे अपुरे पुनर्वसन केले म्हणजे सरकारला उपकार वाटत असेल, पण त्यांच्या जमिनी, घरेदारे पाण्याखाली गेली आहेत. त्यांना विकासाचे सैनिक म्हणून ताबडतोब पेन्शन दिली पाहिजे. त्याचबरोबर निमशासकीय नोकरीमध्ये सामावून घेतले पाहिजे. सर्वस्व गमावलेल्या धरणग्रस्तांना नागरी सुविधासह धरणाच्या लाभक्षेत्रात पुनर्वसन करण्याचा कायदा असताना सारे नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत.'' थोडक्यात अण्णांनी धरणग्रस्तांसाठी सरकारी विरोधी तीव्र लढा देऊन काही प्रमाणात त्याना त्याचे हक्क व न्याय मिळवून दिलेले आहेत.

**बहुजन समाजवादी पक्षाचे नेतृत्व :**

नागनाथ अण्णांनी राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा वारसा सोडला नाही. पुढे अण्णांनी उत्तर भारतात बहुजन समाजाचे नेतृत्व

करण्यात यश मिळविलेले नेते मा. कांशीराम यांचे मार्गदर्शन लाभले व अण्णांनी बहुजन समाजवादी पक्षात प्रवेश केला. कोल्हापूरला वरुणतीर्थ मैदानावर दि. ६ मे १९९४ रोजी महापरिषद आयोजित केली गेली. त्याचे अध्यक्षस्थान नागनाथ अण्णांनी स्वीकारले. यावेळी अण्णा म्हणतात, ''स्वातंत्र्यानंतर ब्रिटिशांची नीति काँग्रेसवाल्यांनी चालविली. महाराष्ट्रात बहुजनवादाला रोखण्यास शरद पवार प्रयत्न करीत आहेत. पण मी त्यांना इशारा देतो, याद राखा शरद पवार, तुमचे हात स्वच्छ नाहीत. ब्रिटिशांना पळवून लावणारी जनता तुमचे सरकार उलथापालथ केल्याशिवाय राहणार नाही.''[३७] अण्णांच्या या सभेला महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, पुणे इ. विविध भागातील लोक उपस्थित होते. काही काळ अण्णांनी या पक्षाचे नेतृत्व केले, परंतु पक्षांतर्गत मतभेदामुळे त्यांनी या पक्षाचे नेतृत्व सोडून दिले.

**धरण ग्रस्तांसाठीचे कार्य :**

ज्या भागामध्ये शासकीय धोरणाने मोठी धरणे बांधण्यात आली. वीज, शेतीसाठी पाणी या धरणामुळे उपलब्ध होऊ लागले. परंतु त्याच्यापूर्वी शासनाने धरणासाठी ज्यांची जमीन गेली, जे लोक बेघर झाले त्याच्या विचारच म्हणावा तसा झाला नाही. वर्षानुवर्षे गेली तरी त्यांचे पुनर्वसन झाले नाही. त्यांच्या आयुष्याचे धिंडवडे निघाले. या धरणग्रस्त लोकांना दिलासा देण्याचे, त्यांच्या समस्या सोडविण्याचे, त्याचा विकास करण्याचे जे प्रश्न आहेत ते शासन दरबारात सोडविण्याचे कार्य अण्णांनी घेतले. वारणा धरण ग्रस्त, कोयना धरणग्रस्त, कडवी कासारी धरणग्रस्त, मोरणा धरण ग्रस्त अशा कोल्हापूर सांगली जिल्ह्यातील धरणग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याचे त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे कार्य तसेच धरणग्रस्तांना संघटीत करून त्यांच्या अडी अडचणी सरकारपुढे मांडून त्या दूर करण्याचे कार्य नागनाथ नायकवडी करीत होते. धरणग्रस्ताचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी नागनाथ अण्णांनी जाहीर सभा घेवून त्यांच्या समस्या सोडविण्याचे कार्य केले. दि. २२ नोव्हेंबर १९९२ रोजी नागनाथ

नायकवडी याच्या अध्यक्षतेखाली वाळवा येथील विविध भागातील धरण ग्रस्ताच्या मागण्याचे निवेदन वाचून दाखविले. शासनाच्यावतीने पुनर्वसन खात्याच्या अधिकाऱ्यांनी ते निवेदन स्वीकारले होते. फक्त निवेदन स्वीकारून मेळावे, मोर्चा, जाहीर सभा आयोजित करून प्रश्न सुटणार नव्हते असा अंदाज नागनाथ नायकवडी यांना आला. त्यामुळे थोड्या दिवसातच चांदोली धरणग्रस्ताच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांच्या अपूऱ्या पुनर्वसनासाठी नागरी सुविधांचा प्रश्न, शासकीय, निमशासकीय, नोकरीतील ५% आरक्षण धरणाचे पाणी तुंबल्यामुळे अडचणीत आलेल्या कुटुंबाचे पुनर्वसन पर्यायी जमीनीचा प्रश्न वगैरे प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या दृष्टीकोनातून मेळावा आयोजित केला. या मेळाव्यास सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील ५० ते ६० धरणग्रस्त वसाहतीमधील अंदाजे ५००० स्त्री पुरुष उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी नागनाथ नायकवडी होते. दिनांक १५ ऑगस्ट १९९३ रोजी स्वातंत्र दिनानिमित्ताने वाळव्यामध्ये सांगली कोल्हापूर जिल्ह्यातील धरणग्रस्त लोकांचा मेळावा आयोजित केला व त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी बोलताना नागनाथ नायकवडी म्हणतात, ''विविध धरणे झाली. या धरणाच्या नावाखाली हजारो लोकांची घरेदारे गेली. जमिनी गेल्या, त्यांच्या त्यागामुळे इतराच्या जमिनीना पाणी मिळाले पण धरणग्रस्तांना मात्र उपेक्षीत रहावे लागले. त्यांचे संसार उध्वस्त झाले पण सरकार धरणग्रस्तांचे पुनर्वसन करू शकले नाही. यासाठी संघटीत ताकदीच्या जोरावरच संयुक्त कृति समिती, वारणा धरणग्रस्त संग्राम संघटना, कालम्मावाडी धरणग्रस्त संघटना, कोयना धरणग्रस्त संग्राम संघटना व कडवी कासारी मध्यम प्रकल्प धरणग्रस्त संघटना यांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते.''[३८]

नर्मदा बचाव अंदोलनाच्या निमित्ताने सरदार सरोवराखालील धरणग्रस्तांनी पुनर्वसनाबरोबर इतर काही मूलभूत प्रश्नावर तीव्र लढा उभारला. लढ्याला पाठिंबा म्हणून मेळा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी अण्णा म्हणतात, ''६५ कोटीचे वारणा धरण

४५० कोटी रुपये खर्च झाले तरी पूर्ण होऊ शकले नाही. अजून कालव्याचा पत्ता नाही. यासाठी धरणग्रस्तांनी ताकतीच्या जोरावर सरकारकडून आपले न्याय हक्क मिळवले पाहिजेत. धरणग्रस्तांना निकृष्ट दर्जाच्या जमीनी दिल्या जात आहेत. भुके कंगाल होऊन धरणग्रस्त फिरत आहेत. ही खेदाची गोष्ट आहे.''[३९] या प्रसंगी जीवनराव सावंत, कॉ. नाना शेटे, प्रा.डॉ. बाबुराव गुरव (सर), डॉ. भारत पाटणकर यांचीही मार्गदर्शनपर भाषणे झाली. सर्वच स्तरातून या प्रश्नाची चर्चा होऊ लागली. अशा पध्दतीने नागनाथ नायकवडी यांनी धरणग्रस्तांच्या समस्या मनावर घेतल्या व त्या पूर्ण करण्यासाठी त्यांनी वेगवेगळा मार्ग अवलंबला. धरणग्रस्तांना सल्ला, मार्गदशन करण्याचे त्यांना राज्यकर्ते मंडळीकडून मागण्या मान्य करून देण्याचे प्रोत्साहन दिले.

अशा रितीने दि. ३० डिसेंबर १९९३ रोजी हुतात्मानगर सोनवडे, ता. शिराळा या ठिकाणी सकाळी ११ वाजता क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या अध्यक्षतेखाली धरणग्रस्तांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी शासनाला असे प्रतिपादन केले की ''धरणग्रस्तांचे पुनर्वसन लाभ क्षेत्रात त्वरीत व्हावे.'' धरणग्रस्तांच्या समस्येबरोबरच नवीन समस्या निर्माण होऊ लागल्या. त्यामध्ये प्रामुख्याने धरणग्रस्त होते. त्या भागात पाण्याखाली दबलेला पृथ्वीचा पृष्ठभाग कायम पाणी असल्यामुळे कवच कमकुवत होवून त्या क्षेत्रात भूकंपाचे हादरे बसू लागले. त्यामुळे या भागातील जनता भूकंपग्रस्त बनली. त्यामुळे नागनाथ नायकवडी यांनी त्यांच्या समस्येकडे अधिक लक्ष दिले. त्यावेळी एका झालेल्या मेळाव्यात बोलताना नागनाथ नायकवडी म्हणतात, ''सध्याचे लाभ क्षेत्रात या ठिकाणच्या जनतेचे पुर्नवसन करण्याबाबत ते उदासीन आहे. पुर्नवसन करणे ही कायद्याने सरकारची जबाबदारी आहे. सरकारकडे आपण भिक मागत नाही तर हक्क मागतो आहे. परंतु सरकार टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे धरणग्रस्त संग्राम संघटनेच्या जोरावर

संघटीत होवून लढले तरच लाभ क्षेत्रात पूर्नवसन होईल असे उद्‌गार त्यावेळी त्यांनी काढले.''[४०]

यावेळी धरणग्रस्तांच्या अडचणी ऐकण्यासाठी अण्णांनी त्याना सूचना केली. 'आपल्या काही समस्या असतील तर सांगा' तेव्हा प्रत्येक गावच्या लोकांनी आपले अनुभव सांगण्यास सुरुवात केली. प्रथम स्त्रिया आपले धरणामुळे झालेले हाल याबाबत अनुभव सांगत होत्या त्यांचे म्हणणे होते की, ''धरणाच्या आतील भागामध्ये जनावरा पलिकडचे जीवन जगत आहे. रोजगार मिळत नाही. आजारी पडल्यास झाडपाला हेच औषध, गंभीर आजाराला मरणाशिवाय पर्याय नाही. बाजारपेठेत जायचे म्हणजे परत येण्याला दोन दिवस लागतात. सरकारकडून कसलीही मदत मिळत नाही. जमिनी पाण्याखाली गेल्या. ज्या वाचल्या त्यातील पिक गवे, रानडुक्करे वगैरे प्राणी खावून नासधूस करीत असल्यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.''[४१] याशिवाय धरणग्रस्त व भूकंपग्रस्ताच्या समस्या वेगळ्याच ऐकावयास मिळत होत्या. दि. ३० सप्टेंबर १९९३ साली झालेल्या भूकंपाच्या धक्याने बऱ्याच घराची पडझड झाली होती. काही घरे कललेली होती. या समस्येला जनता कंटाळली होती. ज्यांची घरे पडली होती त्याना १००/- रुपये मदत दिली. त्या कालावधीमध्ये पुर्नवसन खात्याचे अधिकारी सर्वे करताना फक्त चांगली घरे मोजत होते. परंतु कूडाची घरे मोजत नव्हते. धरणग्रस्तांना शेळ्या मेंढ्या पाळणे अवघड होते. अशा विविध गावच्या समस्या होत्या. सरकार त्यांच्या अडचणी लक्षात घेत नव्हते. त्यावेळी त्याना आधार म्हणून धरणग्रस्त संघटना हा त्यांचा पक्ष होता.

दि. ३० सप्टेंबर १९९३ साली भूकंप झाला. त्याच्या अगोदर नागनाथ नायकवडी यांनी जे धरणग्रस्त होते ते भूकंपग्रस्त झालेल्यासाठी एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने धरणग्रस्तांना न्याय मिळावा असे ठोस निर्णय घेण्यात आले होते. ज्या ठिकाणी धरणग्रस्तांची घरे आहेत त्यांचा बचाव व्हावा अशी शेड उभारली जावीत असा

निर्णय होता. परंतु शासनाने व राज्यकर्तानी भूकंपग्रस्तांचा निर्णय उधळून लावला होता. ज्या ठिकाणी पुनर्वसन झाले होते त्या ठिकाणी बऱ्याच नागरी सुविधा अपूर्ण होत्या. त्यांना वीज, पाणी, वैद्यकीय सुविधा, दळणवळणाची साधने अपूर्ण होती. त्यामुळे या मेळाव्यात विविध ठराव सर्वांच्या संमतीने मांडण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे –

१) लाभ क्षेत्रात धरणग्रस्तांचे त्वरीत पुनर्वसन करावे.

२) मणदूर, उरतळ वगैरे भागातील धरणग्रस्तांना गावठाण देऊन त्याचे लाभक्षेत्रात पुनर्वसन करावे.

३) धरणग्रस्तांनाही धरणाच्या पाण्याचा पुनर्वसनानंतर लाभ मिळावा.

४) धरणग्रस्तांच्या मुला–मुलींना शिक्षणाची सोय करावी.

५) धरणग्रस्ताना ज्या ठिकाणी जागा दिल्या आहेत त्या ठिकाणी सुविधा व्हाव्यात.

अशा स्वरुपांच्या मागण्या ठराव स्वरुपात मांडण्यात आल्या होत्या.''[४२] अशा रितीने अण्णांनी आपल्या जीवनात धरणग्रस्त किंवा सामान्यांसाठी कार्य केले.

**नागनाथ नायकवडी यांनी शेतकऱ्यांसाठी केलेली कार्ये :**

नागनाथ नायकवडी शेतकरी सुखी झाला पाहिजे यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले होते. १९४७ पूर्वीही भूमीगत चळवळीत असताना शेतकऱ्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ते कार्यरत होते. महाराष्ट्रातील सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या समस्या जर मिटल्या तर महाराष्ट्राचा कृषीक्षेत्रात विकास होण्यासाठी कोणताही अडथळा येणार नाही. अशी भूमिका त्यांची होती त्यासाठी ते प्रयत्नशिल होते. भारत देशाला स्वातंत्र्य मिळून आज ५४ वर्षे झाली तरी शेतकरी सुखी झाला नाही. काही अपवादात्मक काही शेतकरीच फक्त आधुनिक यंत्राचा वापर करू लागले आहेत. परंतु इतर जो शेतकरी वर्ग आहे. त्याच्या शेताला पाणी कमी आहे. शेतकऱ्याच्या मागण्या राज्यकर्ते मान्य करण्यासाठी विलंब लावतात. तसेच शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य दर दिला जात नाही. या अशा विविध मागण्यासाठी नागनाथ नायकवडी

कार्यरत रहात होते. त्यांनी २६ मे १९९३ साली कोल्हापूर जिल्ह्यातील किणी या गावी मोठा शेतकरी मेळावा आयोजित करून शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळवून देण्यासाठी अण्णांनी शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी संघटना स्थापन केली. त्यावेळी झालेल्या शेतकरी मेळाव्यात बोलाताना नागनाथ नायकवडी म्हणतात, ''भाजप आणि शिवसेना या जातीयवादी शक्ती देशाच्या प्रगतीत मोठा अडथळा आणत असून देशातील लोकांची मने तोडण्याची कृत्ये ही त्याच्या हातून घडत आहेत. दुसरीकडे केंद्रातील नरसिंहराव सरकार कारभार करायला लायक राहिले नव्हते. अशा बिकट परिस्थितीत देश वाचण्यासाठी शेतमजूर, कष्टकरी शेतकरी संघटना स्थापन करुन संघटितपणे लढा दिला पाहिजे.''[४३] या परिषदेमध्ये खालीलप्रमाणे मागण्या सर्वानुमते मंजूर करण्यात आल्या. शेतकऱ्याच्या प्रश्नासंबंधात मागण्या होत्या.

१) शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे.

२) रासायनिक खते, किटकनाशके, बी-बियाणे याचे दर कमी करा.

३) सूर्यशक्तीच्या आधारे वीजनिर्मिती करणारी यंत्रणा उभी करा.

४) सर्व धरणांची कामे तातडीने पूर्ण करून शेतीला पाणी पुरवठा त्वरीत करा.

५) खोडशी कालव्यातून बारमाही पाणी पुरवठा करा.

६) पाण्याचे समान वाटप करून, धरणाचे पाणी दुष्काळी भागाला पोहचवावा.

७) ताकारी-म्हैशाळ टेंबू पाणी योजना २००० सालाच्या आधी पूर्ण करा.

८) शेतकऱ्याच्या वीजेला दर कमी लावा.

या मागण्या सर्व शेतकऱ्याच्या सहमतीने ठरविण्यात आलेल्या होत्या.''[४४] अशा पध्दतीने नागनाथ नायकवडी यांनी शेतकऱ्याचे रक्षण करण्यासाठी विविध ठिकाणी परिषदा, मेळावे, चर्चासत्रे आयोजित करून त्याच्या समस्या सोडविण्याचा संग्राम चालू ठेवला आहे. दि. १९/१०/१९९३ रोजी घेतलेल्या मेळाव्यास तासगाव तालुक्याचे आमदार आर. आर. पाटील तेव्हा म्हणतात, ''मी वसंतदादाचा अनुयायी आहे. म्हणून नागनाथ अण्णांच्या श्री.

एस. आर. पाटील, श्री. एच. डी. पाटील, श्री. सुर्याजी साळुंखे, श्री. शहाजी पाटील इत्यादिच्या मोर्चात सहभाग घेतला.''[४५] या मेळाव्याच्या वतीने शेतकऱ्याचे वीजदरवाढ रद्द करण्या संदर्भातील निवेदन अभियंता शिवाजी चव्हाण यांच्याकडे देण्यात आले. नागनाथ नायकवडी यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाची सोडवणूक कायदेशीर व्हावी यासाठी तहसीलदार, जिल्हाधिकारी, विधानसभा (मंत्रालय) या शासन यंत्रणेवर घेराव, मोर्चे आयोजित करून या शेतमजूर कष्टकरी, कामगार यांच्या प्रश्नांना दाद देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

त्यावर्षी बुधवार दि. २८/९/१९९३ साली पहाटे चार वाजता लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ६.५ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसून किल्लारी, उमगरा, लातूर या भागातील घरे पडून जवळ जवळ ५०-६० हजार माणसे झोपल्या ठिकाणीच मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली आणि आसपासच्या ७३ गावामधून ही कमी अधिक प्रमाणात सर्व महाराष्ट्रभर जाणवली होती. किल्लारी, उमरगा गावासारखे नुकसान इतर कुठल्याही भागात झालेले नव्हते. या परिस्थितीचा आवाका विचारात घेऊन नागनाथ नायकवडी यांनी या भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी त्याचे सांत्वन करण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूरविण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांसह त्या भागामध्ये सेवा करण्यासाठी धाव घेतली होती.

१९९३ साली नागनाथ नायकवडी यांनी या भुकंप ग्रंस्तांसाठी वैद्यकिय सुविधा, संसार उपयोगी वस्तू मदत दिली. त्या भागातील लहान मुलांचे शिक्षण खंडीत झाल्याची काही मुले अनाथ झाली. तेव्हा नागनाथ नायकवडी यांनी ''हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १०० विद्यार्थी दत्तक घेतले. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडली होती. शिवाय अण्णांनी कारखान्यामार्फत सात लाख सोळा हजार रुपयेची देणगी जाहीर केली.''[४६] त्याप्रसंगी नागनाथ नायकवडी म्हणतात, ''भूकंपग्रस्तानी आता दु:ख विसरुन जे बचावलेत त्यांच्या पोटा पाण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पुन्हा नव्याने संसार उभे

करावेत.''[४७] नागनाथ अण्णांनी भूकंपग्रस्तांना मूलभूत सोयी पुरविण्याचे कार्य केले. यावेळी धर्म, जात, वंश, गरीब श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता जनसेवा केली. त्यावेळी अण्णांच्या कार्यामध्ये माजी आमदार अण्णासी लेंगरे डॉ.प्रा. बाबुराव गुरव व कार्यकर्त्यांनी सहकार्य करत होते. सन १९९३ सालापासून नागनाथ नायकवडी यांनी कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा हिस्सा समान मिळाला पाहिजे. दुष्काळी भाग कायमचा दुष्काळमुक्त झाला पाहिजे. सांगली, सातारा व सोलापूर या भागातील जनता कायम दुष्काळमुक्त झाली पाहिजे. या विचाराने नागनाथ नायकवडी यांनी प्रामुख्याने दुष्काळग्रस्ताना संघटीत करण्याचे कार्य चालू ठेवले होते. त्यासाठी विविध ठिकाणी परिषदा घेतल्या, मेळावे आयोजित करून दुष्काळी भागात पाणी पुरवठा करावा. या अशा मागण्यासाठी नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळग्रस्त भागातील जनतेचे प्रश्न सोडवित असताना अण्णांनी विविध मार्गांनी शासनावर दबाव आणण्याचा ध्यास घेतला होता.

आटपाडी तालुक्यात सुरु झालेल्या या परिवर्तनाच्या लढ्याला कृष्णा खोऱ्याच्या मोठ्या दुष्काळी पट्ट्यातील व्यापक जन आंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले. सांगली, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्ह्यातील तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यात जनता ८०-९० हजाराच्या संख्येने आटपाडी येथील भवानी हायस्कूलच्या मैदानावर दि. २६ जुलै १९९५ रोजी एकत्र जमली होती. तेव्हा कृष्णा खोत्यातील खात्रीत्या पाण्याचा हक्काचा समान वाटा मिळाल्याशिवाय चळवळ थांबणार नाही अशा निर्धार मेळाव्यास उपस्थित असलेल्या जनतेने व्यक्त केला होता. नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली केला. दि. १८/९/१९९८ रोजी जनतेसाठी संघर्ष करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन करून नागनाथ अण्णांनी आपले विचार व्यक्त केले. वास्तविक आटपाडी तालुका दलित एकीकरण मेळाव्यात बोलताना पुढे म्हणतात, ''कष्टकरी जनतेच्या हातात राज्य व्यवस्था येईपर्यंत संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही समान वाटपाची क्रांतीकारक चळवळ, तेरा तालुक्याची आटपाडी पाणी परिषद

शेतात पाणी आल्याशिवाय थांबणार नाही. दि. २६, २७, आणि २९ आक्टोबर रोजी तेरा तालुक्यातील तहसिलदार कार्यालयापुढे धरणे व २९ रोजी त्याना घेराव घालण्यात येईल असे यावेळी बोलताना जाहीर केले होते.''[४८] यावेळी या कार्यक्रमास आटपाडी तालुक्यातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर छोटीशी मिटींग घेवून आटपाडी, तासगांव, विटा, जत, कवठेमहांकाळ या तालुक्यातील दुष्काळ हटविण्यासाठी तहसिलदार कार्यालयावर त्याच्या तालुक्यातील आमदार नेते, कार्यकर्ते यांनी जनतेला एकत्र करून घेराव घालण्याचे आणि पाणी प्रश्न सोडविण्यासाठीची मागणी मान्य करावयास लावणे ठराव करण्यात आला. त्याप्रमाणे प्रत्यक्षात कार्याला सुरवात केली. या दुष्काळग्रस्तांच्या पाणी परिषदेला माफक आंदोलनाचे स्वरुप आले.

दि. २९/१०/१९९८ रोजी क्रांतिवीर  नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली जत तहसिलदार कचेरीचे कामकाज बंद केले. कृष्णा खोरे पाणी संघर्ष समितीच्यावतीने तहसिलदार शामराव कांबळे यांना घेराव घालण्यात आल्याने कामकाज बंद पाडण्याची घटना प्रथम घडली. तीन दिवस धरणे अंदोलन चालू होते. या चळवळीचे नेतृत्व मा. आमदार सनमडीकर यांनी केले. यावेळी त्यांनी प्रा. आमदार आर. आर. पाटील यांच्याशी दूरध्वनीने संपर्क साधून आंदोलनाच्या पुढील भूमिकेबाबत मार्गदर्शन घेत होते. शासकीय यंत्रणेस जाग यावी म्हणून दुष्काळी भागातील शेतीला बारमाही पाणी मिळावे म्हणून घेराव घालण्यात आला. यावेळी विविध कार्यकर्ते उपस्थित होते. अशा रितीने पाणी प्रश्नासाठी अण्णांनी केलेली कार्ये उल्लेखनीय म्हणावे लागेल.

**राष्ट्रीय एकात्मकतेसाठी केलेली कार्ये :**

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद जमातवाद्यांकडून पाडण्यात आली. ही घटना अण्णांच्या जिव्हारी लागली. हिंदू-मुस्लीम बहुजन कष्टकरी जनतेचे शोषण वाढविणे

त्यांच्यात फूट पाडणे, भांडवलशाही आणि जातीयवादी व्यवस्थेचे प्रभूत्व वाढविणे या दिशेने वाटचाल होत असल्याचे त्यांना स्पष्ट जाणवू लागले म्हणून ''९ डिसेंबर १९९२ रोजी वाळव्याच्या शेतकऱ्यांनी वाळवे गावातून निषेधाची फेरी काढली.''[५०] निषेधाची मिरवणूक काढण्याचा हेतू म्हणजे जमातवादी धर्मांधशक्तीचा अशुद्ध हेतू जनसामान्यांना समजावून सांगणे हा होता. तसेच सामाजिक ऐक्याला, राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी अण्णांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दि. २५ फेब्रुवारी रोजी नागनाथ नायकवडी, हुतात्मा किसन अहिर आणि हुतात्मा नानकसिंग यांच्या स्मृती दिनादिवशी कार्यक्रम आखला. वाळवा ते हुतात्मा नगर या ८० कि. मीटर आंतरातराष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणून एक प्रचंड मानवी साखळी संघटीत केली. या राष्ट्रीय एकात्मतेसाठी मानवी साखळीमध्ये विद्यार्थी, शिक्षक व महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच शेतकरी कामगार इ. सलगपणे एकाच वेळी हातात हात घालून उभे राहिले आणि त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा नारा दिला. सन १९९४ ते १९९८ पर्यंत जातीयवादी धर्मांध शक्तींचा बिमोड करून राष्ट्रीय ऐक्य साधण्याचे कार्य चालू ठेवण्यात अण्णांचे कार्य उल्लेखनीय आहे.

मे १९९८ या साली पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने पोखरणला अणूस्फोट घडवून आणला तेव्हा या अण्विक शक्तीवर झालेला खर्च विचारात घेता त्या पैशामधून असंख्य कुटुंबाचे संसार उभे राहिले असते. नागनाथ नायकवडी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात या संदर्भात उद्‌गार काढताना ते म्हणतात, 'हा अणू म्हणजे भारत नेत्याच्या डावपेचाचा एक भाग असून सत्तेतील भ्रष्टाचारी मंत्र्यांचे थोतांड उघडे पडू नये व लोकांचे लक्ष वेधावे या उद्देशाने तो केला आहे.''[५१] अशी टीका तत्कालीन सरकारवर न घाबरता त्यांनी केली. आताच्या काळात अणूस्फोटाची गरज नव्हती. युध्द करण्याची पाकिस्तानची ताकद नाही आणि त्याची इच्छाही नाही. देशाची शांततामय मार्गाने प्रगती आवश्यक असून त्या दिशेनेच अनेक राष्ट्राची वाटचाल चालू आहे असे असताना कारण

नसताना भारताने शेजारी राष्ट्रात केवढा तणाव निर्माण केला. या देशाची ५० वर्षे काँग्रेसने फूकट घालवली. भाजप पक्ष सत्तेवर येणे हाच मोठा घोटाळा आहे. त्यामुळे या मंडळींना दूर ठेवण्याची गरज आहे. त्याकरिता कष्टकरी जनतेने आणि बहुजनानी या जातीयवाद्यांना सत्तेपासून दूर फेकले पाहिजे. त्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे, असे त्यांचे मत आहे. जातीयवाद्यांनी हिंदू-मुस्लीम, शिख, इसाई, ख्रिश्चन जैन पारशी यांनी कधी आपल्यात सामावून घेतले नाही. इतर समाजाने केलेल्या उपकाराची जाणीव नाही. त्यांच्यात सदसदविवेकबुध्दी नाही म्हणून डॉ. आंबेडकरानी बौध्द धर्म स्वीकारला. तसेच लढा दिला होता. नुसतेच समाजाला राबवून घेतले याची जाणीव शाहू महाराज व फुले यांनी करून देवून त्यांची जागृती केली. त्यांच्या भाषणाचा उद्देश व्यापक असे. अर्थात, जमातवाद्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजाना लष्कर भरतीसाठी मदत केली आणि स्वातंत्र्योत्तर काळात आता परकिय कंपन्या भारतात आणू पाहत आहेत. त्यामुळे जो बहुजन समाज आहे तो तसाच राहिला पाहिजे असा काँग्रेसचा दृष्टीकोन त्यांना सतत जाणवत आहे.

अशीच घटना त्यावेळी दि. १९/९/१९९८ रोजी कवठे महांकाळ तालुक्यातील बोरगाव या गावी सवर्ण व दलित जातीमध्ये मोठा संघर्ष झाला. तो समाज शांत करण्यासाठी नागनाथ नायकवडी यांनी स्वत: प्रत्यक्ष जावून लोकांना शांत केले. त्यावेळी ग्रामस्थ व पत्रकाराशी बोलताना ते म्हणतात, ''गावात लोकामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. जे घडले ते चांगले नाही. घरात मुलीला धाक दाखवून पळवून नेणे हे तर वाईट कृत्य आहे आणि दलिताची घरे जाळून ती उध्दवस्त करणे हे देखील वाईट आहे. त्यासाठी गाव कसे शांत होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. अशी गावकर्त्याची प्रामाणिक इच्छा आहे. सवर्णदलित पिढ्यानपिढ्या एकत्र राहत आहेत. यापुढे एकत्र राहावयाचे आहे.''[५१] अण्णांनी त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. त्यांना दिलासा दिला. दोन्ही बाजूच्या

लोकांशी स्वतंत्रपणे बराच वेळ चर्चा केली आणि गावात जातपात मानू नका, संघर्ष करुन नका, शांतीने विकास होतो असे अवाहन केले.

गावातील एकात्मता कायम टिकवा असे मार्गदर्शन गावातील प्रतिष्ठित नागरीक व तेथील कार्यकर्त्यांना केले. अशा पध्दतीने नागनाथ नायकवडी यांनी सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण होईल त्या ठिकाणी जावून जातीवाद, जमातवादाच्या समस्याचे निवारण करून राष्ट्रीय एकात्मता टिकविण्याचे कार्य चालू केले होते. याशिवाय इतर जिल्ह्यामध्ये घडलेल्या घटना प्रसंग यावर अण्णांनी संघटन शक्तीने ऐक्य घडविण्याचे कार्य केलेले आहे. १९७८ साली मराठवाडा विद्यापिठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे करण्याच्या प्रश्नावरून मराठवाड्यात समाजकंठकांना अचानक क्रूर घटना घडविल्या. गावोगावी दलित वस्त्यावर हल्ले झाले. कॉंग्रेसच्या सरकारने हा प्रश्न अनेक वर्षे भिजत ठेवल्यानंतर ज्यावेळी नामांतराऐवजी ‘नामविस्ताचा’ का होईना निर्णय घेतला जाणार आणि अंमलात येणार असे दिसू लागले यावेळी अण्णा सावध झाले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेवून मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचा दौरा केला आणि नाम विस्तारानंतर पुन्हा वाईट घटना घडू नयेत म्हणून शक्य तेवढे प्रयत्न नागनाथ नायकवडी यांनी केलेले आढळून येते. अण्णा ज्या व्यापक दृष्टीने समाजाकडे पाहतात. ती व्यापकता भव्य आहे. जाती-पातीच्या पलीकडचे राजकारण आणि समाजकारण करणारे अण्णा सर्व समाजास वंदनीय आहेत. अण्णांच्या या व्यापक कार्याची नोंद समाजाने घेवून आपली विचाराची दिशा ठरविणे निश्चित सोपे होईल. एकंदरीत अण्णांनी एकात्मता टिकविण्याचे कार्य केले. त्यांचे हे कार्य आखिल भारतीय समाज जिवनाला दिशादर्शक आहे.

**शेतकरी, मजूर, दुष्काळग्रस्तासाठी व समान पाणी वाटपासाठी केलेले कार्य :**

दि. १७ मार्च १९९९ रोजी नागनाथ नायकवडी शेतकरी, दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त आणि कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याचे संपूर्ण पाणी आडवून त्याचे समान वाटप व्हावे

या मागणीसाठी मुंबईच्या मंत्रालयावर निर्धार मोर्चा आयोजित केला होता. त्या निर्धार मोर्चामध्ये निवेदन, परिपत्रके काढून विविध प्रश्न हाताळण्यात आले. त्यामध्ये धरणाची व पाटाची कामे त्वरीत सुरु करा. धरणग्रस्तांचे पुनर्वसन त्वरित घडवून आणा, खाजगी कारखानदार, उद्योजक यांच्याकडून विकास कर लागू करा, प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी द्या इत्यादी मागण्याच्या निवेदनावर ठराव करण्यात आल्र तसेच कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी मुदतीत आडवून त्याचे वाटप करणे या संदर्भातील वादळी विचार घराघरात पोहचवून नंतर नागनाथ नायकवडी यांनी एक आवाहन निर्धार मोर्चाच्या रुपाने सरकारसमोर उभे केले होते.

वास्तविक पाहता नागनाथ अण्णांच्या या कार्याला यश आलेले होते. जरी सरकारने दुर्लक्ष केले तरी काही प्रश्न सोडविलेले आहेत. शेतकरी, धरणग्रस्त व दुष्काळग्रस्तांच्या समस्येबाबत अनेक वेळा पुस्तीका, पत्रके, प्रकाशने, जाहीरसभा, मेळावे याचे आयोजन परिषदा घेवून विद्वानांचे मत प्रदर्शन करुन विषयवार वेगवेगळ्या भूमिका मांडून त्यातून विचार मंथन, निर्णय, ठराव हे सर्व घडविण्यात आले. त्यातून अण्णांना बरेच यश मिळाले आहे. या सर्व विचारांची मांडणी करताना डॉ. भारत पाटणकर, डॉ.प्रा. बाबूराव गुरव (सर), कॉ. नाना शेटे, ॲड. धैर्यशील पाटील अशा समाजातील विचारवंतानी त्यात सहभाग घेतलेला आढळून येतो. सरकारच्या कामातील दिरंगाई, भ्रष्टाचार, वशिलेबाजी याबाबत अनेक वेळा जाहीर चर्चा होत आहे. परंतु सरकारशी वाद घालणे चांगले नव्हते. म्हणून त्यासाठी न्यायालयात जाणे चुकीचे ठरते तेव्हा कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने घालून दिलेल्या मुदतीच्या आत प्रश्न मार्गी लागला पाहिजे असा ठोस निर्णय हा नागनाथ अण्णांचा विचार आहे. आता हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ३१ मे २००० पर्यंत सरकार कोणताही विचार करत नाही ही खेदाची बाब अण्णांच्या लक्षात येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार न

करता नागनाथ नायकवडी यांनी आपले कार्य चालू ठवले आहे. यशाकडे वाटचाल करण्याचे उद्दिष्ट गाठत आहेत.

याशिवाय १९९९–२००० सालामध्ये नागनाथ नायकवडी यांनी शेतकऱ्याच्या समस्या सोडविलेल्या आहेत. कृषितज्ञांच्या मार्फत शेतकऱ्यांना नवीन पिक तंत्रज्ञान, खते, बी, बीयाणे यांचा वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन करणारे कार्यक्रम आयोजित केले. याबरोबर कारखाना, दुध संघ, बँका शेतमजूर, शेतकरी संघटनेचे कार्य हे दैनंदिन कार्यातील नवीन निर्णय अण्णांच्या सहाय्याने घेतले जातात.

रविवार दि. ९ एप्रिल २००० रोजी दुपारी ३ वाजता विद्याभवन, एस.टी.स्टॅन्ड जवळ कोल्हापूर येथील सभागृहात ऊस शेतकरी, साखर कामगार, साखर कारखान्याचे चेअरमन व संचालक आणि धरणग्रस्त इत्यादीच्या प्रतिनिधी समवेत बैठक नागनाथ नायकवडी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये धरणग्रस्त, कारखान्याचे संचालक व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. ठरावानुसार सोमवार दि. १ मे २००० रोजी धरणग्रस्त शेतकऱ्यांचा कोल्हापूरात अण्णांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. 'अण्णांच्या नेतृत्वाखाली टाऊन हॉल येथून मोर्चास सुरवात झाली. यामध्ये प्रामुख्याने बिनपरतीची व बिनव्याजी ठेव म्हणून करण्यात येणारी कपात बंद करा. धरणग्रस्तांना निर्वाहभत्ता व घरबांधणीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची रक्कम त्वरीत द्या. त्यांनी जिल्हाधिकारी अरविंदसिंह तसेच प्रादेशिक साखर सह. संचालक यु. यु. शेख यांच्याशी चर्चा केली. यानंतर धनादेश देण्यात आले. यावेळी नागनाथ अण्णां म्हणाले, आता येणाऱ्या काळात यापेक्षाही मोठ्या ताकदीने संघर्ष करण्याची गरज असल्याचे नमुद करुन असे म्हटले की, ''जनतेचे प्रश्न सोडविले नाहीत तर जनता तुम्हाला ठोकारुन वेगळा मार्ग शोधेल आपण साठ वर्षाच्या सार्वजनिक जीवनाच्या अनुभवातून हे सांगतो आहोत. जनतेच्या शिक्षणाकडे राज्यकर्त्यांनी लक्ष दिलेले नाही.''[५२] शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी या मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री आणि

संबंधिताना देण्यात येईल असेही स्पष्ट केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर अंदोलन मागे घेण्यात आले.

**रिपब्लिकन नेत्यासाठी कार्ये :**

अण्णांनी दि. ३० ऑगस्ट १९९८ रोजी कोल्हापूर येथे वरुणतिर्थ मैदानावर भरविलेल्या मेळाव्यात रिपब्लिकन पार्टीला टाटा सुमो गाडी प्रदान केली व राज्य घटना बचाव परिषद या विषयीची परिषद भरविली गेली. तसेच वाळवा या गावी एक कार्यक्रम आयोजित करून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना कामगार सभासद, शेतकरी यांच्यावतीने अण्णांनी टाटा सुमो ही गाडी प्रदान करण्यात आली. यावेळी गाडीचा स्वीकार करताना मा. खासदार रामदास आठवले, खासदार रा. सु. गवई, खासदार प्रकाश आंबेडकर, खा.प्रा. जोंगेद्र कवाडे इ. नेते व कार्यकर्ते हजर होते. याशिवाय १९९९-२००० यासालामध्ये प्रामुख्याने नागनाथ अण्णां यांनी शेतकरी, धरणग्रस्त, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, कारखाना संचालक बहुजन समाज इ. साठी विविध ठिकाणी मेळावे, परिषदा, अंदोलने, साहित्य संमेलने, आयोजित करून समाजसेवेचे कर्तव्य पार पाडीत राहिले.

**साहित्य संमेलनाद्वारे केलेली कार्ये :**

दि. २६ व २७ फेब्रुवारी २००० रोजी दुधाळी मैदान, रंकाळा वेश कोल्हापूर येथे नागनाथ नायकवडी यांच्या सहकार्याने दुसरे विद्रोही मराठी साहित्य संमेलन आयोजित केले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वाहरु सोनवणे (आदिवासी कवी) हे होते. तसेच स्वागताध्यक्ष स्वत: नागनाथ अण्णा होते. यावेळी संमेलनाला आलेल्या पाहुण्याचे स्वागत अण्णांनी केले. स्वागत अध्यक्ष म्हणून नागनाथ नायकवडी यांचे भाषण झाले. यावेळी अण्णा म्हणतात, ''जातीवाद्यांनी पुन्हा आपल्या देशात वैदिक परंपरा निर्माण करून पूर्वीची जातीय व्यवस्था आणू पाहत आहेत. ते ह्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आपण जागृत झाले पाहिजे. राजर्षि शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा समाज कसा उभा राहिल यासाठी प्रयत्न केले

पाहिजेत. दिडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले. याचा जास्तीत जास्त फायदा हा जातीयवादी धर्मांध शक्ती वाढविणाऱ्या लोकांना झाला आहे.''[५३] दि. ३ व ४ एप्रिल २००० रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे समाजशास्त्र विभाग व सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दलित आणि सामाजिक संघर्ष, इश्युज ॲन्ड इंटरव्हेशन या विषयावरील कार्यशाळेसाठी  नागनाथ नायकवडी हजर होते. अशा प्रकारे अण्णांनी त्यांच्या वर्तमान परिस्थितीत अनेक साहित्य संमेलनाद्वारे समाजउद्धार केलेला आढळतो.

**महारवतन, गुलामगिरी संपविण्याचे केलेले कार्य :**

अनादी काळापासून हिंदू धर्मात द्रविड, अनार्य व बाहेरून आलेल्या आर्य लोकांमध्ये समझोता झाल्यामुळे विश्वधर्माची गंगोत्री म्हणजे हिंदू धर्म होय अशी अवस्था होती पण निसर्गदत्त धर्मात व्यक्तिगत स्वार्थासाठी मनू या स्वार्थी माणसाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे चार वर्ण समाजाचे पाडून विषमतेचे बीज पहिल्यांदा या देशात पेरले. त्यामुळे भारतीय समाज रचना 'चातुर्वर्ण्य' व्यवस्थेवर आधारीत बनली. यापैकी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णासाठी त्या त्या कामाच्या जागा, धार्मिक, सामाजिक कायदे कानून रुढींनी अगदी ठरवून दिल्या गेल्या. सत्ता संपत्ती, वैभव, ज्ञान, प्रतिष्ठा, व्यापार, लष्करी, निमलष्करी मुलकी, अधिकार पदे या तीन वर्गातील लोकांनी उपभोगली, पण चौथा वर्ण शुद्र अतिशुद्र आणि दलित यांना सत्ता, संपत्ती, ज्ञान, वैभव, प्रतिष्ठा, अधिकार पदासाठी अपात्र ठरविला. अशी व्यवस्था अनेक वर्षे चालत आलेली आहे.

कुणबी शेतकऱ्यांनी घाम गाळून शेतीची मशागत करावयाची व कसबी कामाची जबाबदारी बारा बलुतेदारांनी उचलावयाची. शुद्रापैकी ढोरांनी कातडी कमवायाची, चांभारांनी पादत्राणे तयार करावयाची, भंग्यांनी मैला उचलावयाचा, मांगाने फाशी देणेचे काम करावयाचे, तसेच दोरखड झाडू बनवायचे, शेवटी राहिलेले महार यांना इतर म्हणजे पडत्या कामाचे चाकर, गाव गाड्याचा खरा वेठबिगारी किंवा हरकाम्या महार होय. महाराला शेतीचा हक्क नसे

आणि त्याच्या उदरनिर्वाहासाठी ज्या जमिनी दिल्या होत्या त्यास महार वतन असे म्हणत. अस्पृश्यता अणि जातीपातीवर आधारलेली भारतीय समाज रचना म्हणजे सामाजिक समतेच्या आड उभी राहिलेले फार मोठी धोंड आहे. या अडथळ्याला दूर करण्याचे काम महात्मा ज्योतिबा फुले, महर्षि शिंदे, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते की, महार वतनामुळे महार समाजाची अधोगती झाली आहे. महार समाजाची प्रगती घडवून आणावयासाठी महार वतनाच्या शृंखलांतून या समाजाला मुक्त करणे गरजेचे आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ मार्च १९२८ रोजी ब्रिटीश कॉन्सिलमध्ये महार वतने नष्ट करण्यासाठी बिल मांडले. महारांची मोफत सेवा बंद करण्यासाठी या बिलास सर्वांनी विरोध केला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी बिल परत घेतले. महारांची कामे निश्‍चित करावीत, त्यांना भरपूर पगार द्यावा अशा मागणीचे बिल डॉ. आंबेडकरांनी पुन्हा १७/९/१९३७ रोजी मांडले पण त्यास ही पाठिंबा न मिळाल्यामुळे परत घ्यावे लागले. महार वतनी जमीनीवर जो सरकारी सारा घ्यावा लागे त्याला जुडी म्हणतात. त्या जुडीच्या दरात १९३९ साली सरकारने वाढ केली. त्या दरवाढी विरोधी ठिकठिकाणी सत्याग्रह झाले. नाशिक जिल्ह्यात तीव्र सत्यागृह झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सरकारपुढे पाच मागण्या ठेवल्या (१) महार वतन पध्दतीत आमूलाग्र बदल करणे, (२) महारांच्या वतनी जमिनी रयताच्या कराव्यात. (३) महारांना मासिक पगार द्यावा. (४) महारांनी फक्त सरकारी कामे करावीत, (५) ती कामे ठरवून घ्यावीत. पण त्याच काळात दुसरे महायुध्द झाल्यामुळे चळवळ थांबली. यापूर्वीच छ. शाहू महारांनी कोल्हापूर संस्थानात महार वतने खालसा करून महार समाजाचा दुवा मिळविला होता. परंपरेने मिळालेल्या महार वतनी जमीनीसाठी स्वातंत्र्यानंतर न्याय मिळेल. असे वाटले होते पण महार समाजाला त्यासाठी झगडावेच लागले. १९४७ साली पलूस या गावी श्री. बी. सी. कांबळे यांनी महार लोकांनी सवर्णाची (सर्वाची) कामे बंद करावीत व महार वतनी जमीनी रयतावा कराव्यात म्हणून

आंदोलन सुरु केले होते. ही वस्तुस्थिती नागनाथ अण्णा नायकवडी पहात होते. अभ्यास करीत होते. त्यावर त्यांनी ठरविले की वाळवा व तासगाव तालुक्यातील ८० गावातील प्रत्येक गावचे ५ महार व त्यांचे समर्थक यांची संघटना बांधून वाळवा येथे महार वतनी जमीनी रयतावा करण्याच्या मागणीसाठी परिषद घ्यावी. त्याच्या तयारीसाठी पडवळवाडीचे वस्ताद तुकाराम खोत व इतर कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन नागनाथ अण्णा प्रत्येक गावी पायी जाऊन मागासवर्गीय लोकांना भेटले. त्यांचेकडे जेवण घेतले व त्यांना प्रत्येक गावचे ५ महार प्रतिनिधी वाळव्याच्या परिषदेसाठी पाठविणेस तयार केले. नागनाथ अण्णांच्या पायी केलेल्या भ्रमंतीस वाळवा व तासगाव तालुक्यातील महार समाजातील लोकांनी भरघोस पाठिंबा दिला.

त्यामुळे वाळवा येथे भव्य परिषद यशस्वी झाली. त्या परिषदेमध्ये महार वतने रयतावा करण्याची एकमुखी मागणी सरकारकडे करण्यात आली. महारांनी गावातील कामे करणे बंद केले. हे परिषदेचे यश म्हणावे लागेल. घटनेने मिळालेले समानतेचे हक्क मिळविण्यास महार समाज जागृत झाला. अशा रितीने अनेक वर्षाच्या सामाजिक अन्यायाच्या विरोधात महार समाज बांधवांना एकत्र आणून संघटितपणे सरकारपुढे, महारांच्या वेठबिगारी रुढीच्या परंपरेला संपविण्याससाठी नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला. एक समाजसेवक, निष्ठूर देशभक्तच अशा प्रकारचे कार्य करु शकतो, यात शंकाच नाही. अण्णांचा हा व्याप व्यापक आहे, सर्वांगीण आहे. ज्या ज्या क्षेत्रात ते जातात ते यशस्वीच करतात.

शेवटी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यावर ना. यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने कनिष्ठ महार वतन खालसा करण्याचे बिल विधानसभेत मांडले व पासही झाले. या बिलाच्या ठरावावर बोलताना आमदार पी. टी. मधाळे, महार वतनामुळे महार समाजावर होणाऱ्या अन्यायाचे वर्णन करताना म्हणतात की, ''एखादा अधिकारी ऑफीसमध्ये गैरहजर असेल तर त्याच्या पत्नीला हजर राहण्यास सांगितले जात नाही. परंतु महार चावडीत गैरहजर असेल तर त्याच्या बायकोला बोलवा, असे सांगितले जाते; ती नसेल तर त्याच्या मुलाला

बोलवा. अशा तऱ्हेने चावडीतील कनिष्ठ कामे महारांच्या कुटुंबियांकडून करून घेत असत.''[५४] अशा रितीने त्यानंतर मानवी रुढीचे उच्चाटन करण्यास सुरवात झाली. महारांची कामे पगारी कोतवाल नेमून त्यांचेवर सोपविण्यात आली. १९५७-६९ या काळात मा. नागनाथ अण्णां नायकवडी विधान सभेचे सदस्य होते व त्यानीही 'महारवतन' खालसा बिल पास करण्यासाठी भाग घेतला. अण्णांनी ज्या सामाजिक अन्यायाच्या विषयास हात घातला, संघटितपणे पुढाकार घेतला, त्याचे निराकरण झाल्याचे समाधान आ. नागनाथ अण्णांना व महार समाज बांधवांना नक्कीच लाभले.

१९३१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशास स्वातंत्र्य मिळाल्यावर अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्वाची मागणी केली होती. म्हणून म. गांधीनी येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरु केले. त्यावर समझोता होऊन अस्पृश्यांना सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागा ठेवण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मान्यता दिली. म. गांधीचे उपोषण सुटले. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण रहावे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचे युनियन बोर्डिंग हाऊस पुणे येथे पांडवनगर भागात १९३२ साली सुरु केले होते. अगदी याच व अशा उद्देशाने क्रांतिवीर नागनाथ अण्णां नायकवडी यांनी स्थापन केलेल्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून अस्पृश्यापैकी श्री. महादेव शिवाप्पा कांबळे यांची बिनविरोध निवड १९९१ मध्ये करून सहकार क्षेत्रातील उद्योगामध्ये इतिहास घडविला होता. भारतामध्ये अस्पृश्यांना समानतेचे स्थान देण्याचे हे एकमेव उदाहरण आहे व हे कार्य प्रशंसनीय सुद्धा आहे. अशा प्रकारच्या कार्यामुळे अण्णा जनमानसात सर्वांचे नेते म्हणून व घरचा माणूस म्हणून प्रचलित झाले आहेत.

**दलित संमेलनाद्वारे कार्य :**

नागनाथ नायकवडी यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी सामाजिक कार्य केले आहे. जिथे दलित, गरीब, अस्पृश्य समाजावर अन्याय होईल, तिथे अण्णा त्यांच्या मदतीसाठी

धावून जात. त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करत. सन १९८५ साली वाळवे येथे दलित साहित्य संमेलन अण्णांनी भरविले. तीन दिवसाच्या कार्यक्रमात सर्व तालुका दलितमय करुन सोडला. संमेलनाचे अध्यक्ष कवी नारायण सुर्वे यांनी सांगली, सातारा, कोल्हापूर या ठिकाणी दौरा काढून दलित साहित्याचे आकर्षण निर्माण करुन दिले. अण्णांनी दलित, अस्पृश्यांचा सांस्कृतिक दृष्टीने विचार करुन त्यांच्यात जागृती निर्माण केली. हा बहुजन समाज दारिद्र्यामध्ये राहिलेला होता. त्यांच्या उन्नतीसाठी अण्णांचे कार्य सुरु आहे. सर्वांच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या आधुनिक काळातील मुलभूत गरजा भागल्या तरच त्यांची प्रगती होईल, अण्णांच्या समाजवादी विचारातील महाराष्ट्र घडेल, अशी अपेक्षा आहे. क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) न ायकवडी आणि धर्मपत्नी सौ. कुसुमताई नायकवडी यांनी दलित साहित्य संमेलन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी रशियाचा दौरा करुन त्या ठिकाणची साम्यवादी माहिती घेवून त्याप्रमाणे त्यांनी आपल्या समाजाची प्रगती सामाजिक कार्याद्वारे चालू ठेवली.

नागनाथ नायकवडी यांनी सामाजिक कार्याद्वारे अस्पृश्यता नष्ट केली, हे कार्य हुतात्मा चळवळीला जोडले. महाराष्ट्रात सभा, चर्चासत्रे, मेळावे, परिषदा होवून समाज जागृतीचे कार्य करण्यास सुरुवात केली. ११ डिसेंबर १९९२ रोजी पहिली सभा वाळवे येथे घेतली. त्यावेळी अण्णा म्हणाले, ‘‘जातीय विष पसरविणारे राष्ट्रीय व सामाजिक एकात्मतेस काळीमा फासत आहेत. म. गांधींचा खून करणारे भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक पुन्हा देशात थैमान घालून पुन्हा पेशवाई आणू पहातात. राम मंदिराचे नाव पुढे करुन माणसा-माणसाजत जातीय विष पसरवून हे लोक देशातील राष्ट्रीय एकात्मतेला काळीमा फासत आहेत.’’[५५] असा आरोप नागनाथ नायकवडी यांनी सामाजिक कार्यातून अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हाती घेतले असताना सांगली जिल्ह्यात २४ सभा घेतल्यानंतर २५ वी सभा कोल्हापूर जिल्ह्यात पेठ वडगांव येथे दि. ३० मार्च १९९३ रोजी झाली, त्यावेळी बोलताना म्हणाले, ‘‘जातीचा वापर करुन देशाला संकटाच्या खाईत लोटणाऱ्या संघटनांना चोख

प्रतीउत्तर देण्यासाठी सर्वसामान्य जनतेने एकत्र येवून वेगवेगळ्या पद्धतीची समाजवादी चळवळ चालविणे गरजेचे असून हे समाजवादी विचार जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.''[५६]

**हुतात्मा किसन अहिर अर्धपुतळा अनावरणातील सोहळा:**

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये नागनाथ अण्णांबरोबर ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची पर्वा न करता बलिदान केले त्यामध्ये हुतात्मा किसन अहिर हे प्रमुख होते. त्यांची स्मृती जिवंत रहावी म्हणून जाणीवपूर्वक अण्णांनी आपल्या सहकाऱ्याचे स्मारक, हुतात्मा किसन अहिर विद्यालय वाळवा येथे व हुतात्मा किसन अहिर वसतिगृह हुतात्मानगर (सोनवडे) येथे सुरु केले आहे. त्या हुतात्मा किसन अहिर यांचा अर्ध पुतळ्याचे त्यांच्या २५ व्या स्मृतिदिनादिवशी म्हणजे २५ फेब्रुवारी १९७१ रोजी विद्यालयाच्या समोर वाळवा येथे भारताचे अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते अनावरण सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी ना. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, 'आपल्या नेत्यांवर आलेले मृत्यूचे संकट स्वत:चे अंगावर ओढून घेऊन जाणून बुजून स्वातंत्र्यासाठी कुर्बानी करणाऱ्या किसन अहिर यांच्यासारख्या क्रांतिकारकाच्या लौकिक या अर्थाने पुतळा उभारण्यापेक्षाही त्यांच्या नावाने सुरु असलेल्या शैक्षणिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे देशातील प्रश्न समजावून घेऊन गरीबाविरुध्द लढणारे सैनिक निर्माण झाले पाहिजेत. हाच त्यांचा स्मृति बाळगण्याचा क्रांतिकारक मार्ग आहे. आजच्या समारंभाची पार्श्वभूमी क्रांतिकारक इतिहासाची आहे. ४२ च्या राजकीय आंदोलनाच्या काळात साताऱ्यात सशस्त्र उठाव झाला. साऱ्या देशभर हेच वातावरण होते. नव्या उमेदीने भारुन गेलेली नवी पिढी उत्साहाने काम करण्यास पुढं आली होती. १० सप्टेंबर १९४२ ला इस्लामपूरातून जो मोर्चा निघाला होता त्यावेळी वाटेत एक जिद्दीचा तापट तरूण मला भेटला. अनेक प्रश्नासंदर्भात तो माझ्याशी वाद घालत होता. असे

जिद्दी तरूण हवेत या विचाराचा मीही होतो. कारण त्यातूनच इतिहास घडत असतो. माझ्याशी वाद घालणाऱ्या तरुणाचे नाव नागनाथ नायकवडी आहे हे मला नंतर समजले.

परंतु १९४२ , १९४७, १९६० सालात काय पण १९६७ सालाचा संदर्भही आज राहिलेला नाही. भावा भावा सारखे कार्यकर्ते एकमेकाविरुद्ध झाले आहेत. त्यासाठी तशी कारणेही झाली. देशातील आर्थिक व सामाजिक प्रश्न तीव्र होत चालले असून त्याचे उत्तर नव्या धोरणातून सोडविले पाहिजे आणि त्यासाठी विविध पक्षाच्या नेत्यांना एकत्र आणण्याची कल्पना पसंत आहे. आमची क्रांती धनिकाविरुध्द नाही तर देशाची परिस्थिती गंभीर होईल म्हणून गरीबीविरुध्द योजनाबध्द तीव्र लढा केल्याशिवाय गत्यंतर नाही. समान समता असलेल्या शोषणरहित समाजनिर्मितीच्या प्रयत्नातील कोणत्याही कार्यक्रमास माझा पाठिंबा राहील. वाळवा गावचे गावकरी आणि या समारंभाचे नायकवडी यांना मी धन्यवाद देतो. ' समारंभाचे प्रारंभी नागनाथ अण्णांनी सर्वांचे स्वागत करून समारंभाचा हेतू विशद केला. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. दत्ता देशमुख यांनी ४२ च्या लढ्यातील क्रांतिकारकांच्यावतीने सर्वांचे स्वागत केले होते. अध्यक्षीय समारोप करताना क्रांतिसिंह नाना पाटील हुतात्मा किसन अहिर यांना अभिवादन करताना म्हणाले, '४२ चा लढा हा कोणा एकट्याचा नसून सर्व जनता ही त्यात सहभागी झाली होती. भूमीगत कार्यकर्त्यांना आपल्या पदराखाली ज्यांनी आश्रय दिला त्यांचे उपकार स्वत:च्या कातड्याचे जोडे करून घातले तरी फिटणार नाहीत. या लढ्यात ज्यांनी कुर्बानी केली ते हुतात्मे फार थोर होते. ज्यांच्या नखाची सर आज कुणालाही नाही. स्वातंत्र्य संग्रामात ज्या क्रांतिकारकांच्या कुटुंबांनी त्याग केला त्यांच्या पोषणाची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे.' या समारंभाची वैशिष्टये म्हणजे हुतात्मा किसन अहिर यांच्या स्मरणार्थ कविश्रेष्ठ ग. दि. माडगुळकर यांनी खास स्मरण गीत रचले होते. त्यास संगीतकार दत्ता डावजेकर यांनी संगीताचा साज चढविला होता व ते गीत त्यांचे कन्या रेखा डावजेकर यांनी म्हटले होते.

या समारंभाचे एक वेगळेच आगळेपण होते. निवडणुकीच्या ऐन धामधुमीत सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचे ना. चव्हाण कम्युनिस्ट पक्षाचे नाना पाटील व लाल निशाण गटाचे कॉ. दत्ता देशमुख या तिघांना एकत्र आणण्यात नागनाथ नायकवडी यांनी जी कार्यकुशलता दाखवली त्याबद्दल तिघांनीही समाधान व्यक्त केले. वरील तिन्ही नेत्यांनी निवडणुकीचे भाषण करण्याचे टाळलेच पण आमचे मार्ग व राजकीय पवित्रे भिन्न असले तरी जनतेवरील निष्टा ही एकच आहे. त्याद्वारेच आम्ही जनतेच्या हितासाठी प्रयत्न करण्याची घोषणा ना. चव्हाण यांनी केली होती. या आगळेपणाचे उपस्थित सर्वांनीच स्वागत केले. या समारंभाप्रसंगी ॲड. चामुंडराय यांनी किसन अहिर व नानकसिंग यांच्या जीवनावरील लिहीलेले 'दोन दिव्य तारे' या पुस्तकाचे प्रकाशन ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले. याकामी क्रांतीमाता लक्ष्मीबाई नायकवडी, दादा पाटील, राजूताई बिरनाळे, शिक्षक व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले.

**नागनाथ अण्णांचे शैक्षणिक कार्य :**

महात्मा फुले, शाहू, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा चालविण्यासाठी तसेच भावी पिढी सुसंस्कारीत घडण्यासाठी शैक्षणिक संस्था उभारणीच्या कार्याला महत्त्व दिले. नागनाथ नायकवडी यांचा शिक्षण संस्था स्थापन करण्याचा महत्त्वाचा उद्देश हा आहे कि शेतकरी, मजूर, दलित या वर्गातील मुलांना शिक्षणाचा लाभ घेता यावा. समाजाचे आधारस्तंभ बनावेत. या उद्देशाने शैक्षणिक कार्य केले. प्रामुख्याने नागनाथ अण्णांनी १९४९ साली हुतात्मा किसन अहिर विद्यालयाची व किसान शिक्षण संस्थेची स्थापना वाळवे येथे केली. या विद्यालयात शिक्षणाच्या सर्व सोयी आहेत. क्रांतिवीर कॉलनी, माळभाग, वाळवा येथे अण्णांनी हुतात्मा नानकसिंग यांच्या नावाने मुलांच्यासाठी वसतीगृह स्थापन केले. विद्यार्थ्यांच्या राहण्याची, भोजनाची सोय विनामूल्य केली.

अण्णांच्या शैक्षणिक कार्याचे श्रेय मातोश्री कै. लक्ष्मीबाई यांच्याकडे जाते. कारण ही शिक्षण संस्था स्थापण्यापासून, तिची उभारणी आणि कार्यवाही होईपर्यंत आईचा सिंहाचा

वाटा होता. समाजातील गोरगरीब मुलांनी शिकले पाहिजे, त्यांना ज्ञान मिळाले पाहिजे, ह्या मताच्या त्या होत्या. आज आपल्यात त्या नसल्या तरी त्यांचे कार्य स्फूर्तिदायक आहे. लक्ष्मीबाई ह्या हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रत्येक कामामध्ये जातीने लक्ष घालत. पूर्वीचे गुरुनानक वसतीगृहासाठी गावोगाव-घरोघर फिरुन धान्य, पैसा जमा करुन मुलांच्या जेवणाची व्यवस्था पहात. वसतीगृहाच्या मुलांना चांगले जेवण देतात कि नाही, यावरही लक्ष असे. अशा नागनाथ नायकवडी यांना मदत गोळा करण्याची गरज नाही, कारण हुतात्मा किसन अहिर कारखाना हे अन्नछत्रालय चालविते.

विद्यालय शैक्षणिक सोयीबरोबर क्रीडा क्षेत्रात अग्रेसर आहे. विद्यालयाच्या अध्यापकांनी विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा व राज्य पातळीवरचे क्रमांक पटकाविले. यामध्येही लक्ष्मीआईंचे सहकार्य अनन्य साधारण आहे. त्या विद्यालयाच्या मुला-मुलींबरोबर स्वत: बुलढाणा, अमरावती, पुणे, मुंबई, यवतमाळ इ. लांबच्या ठिकाणी जावून मुला-मुलींचे खेळ पाहण्यास हजर राहत. उत्तम खेळाडूंना दूध, खाणे-पिणे याची कधी कमतरता पडू देत नव्हत्या. क्रांती विरांगना लक्ष्मीबाई नायकवडी यांनी विद्यालयाच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यामुळे नागनाथ अण्णांना शैक्षणिक कार्यात विशेष कामगिरी करता आली. पुढे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील विद्यार्थ्यांची वाढती संख्या विचारात घेवून मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय केली. या विद्यालयाशी संलग्न जिजामाता कन्या विद्यालय सुरु केले. विद्यालयाचा कारभार अण्णांच्या पत्नी सौ. कुसुमाताई नायकवडी यांनी पाहण्यास सुरुवात केली. त्या एक आदर्श शिक्षिका आहेत. आज अण्णांनी सौ. कुसुमाताई नायकवडी यांच्या सहकार्याने जिजामाता कन्या विद्यालयाची एक मोठी शाखा स्वतंत्रपणे उभी केली. याविद्यालयामध्ये मुलींचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्व साहित्य व सोयी उपलब्ध केल्या. जिजामाता कन्या विद्यालयाची स्वतंत्र इमारत, अध्यापक वर्ग आणि सर्व सोयीनियुक्त असा कारभार चालू आहे.

किसान संस्थेच्या विविध शाखा आज वाढविलेल्या आहेत. हुतात्मा किसन अहिर विद्यालयाशी संलग्न हुतात्मा किसन अहिर कनिष्ठ महाविद्यालय तसेच या विद्यालयाची तांत्रिक, अभियांत्रिकी व कृषी अशा विविध शाखा अण्णांनी सुरु केल्या. सर्व शैक्षणिक उपक्रम ह्या किसन शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली चालू आहेत. अण्णांना शिक्षणाचे महत्त्व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे व सहवासामुळे पटले. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी किसान शिक्षण संस्था स्थापन केली. त्यामागे एक मोठा हेतू होता, तो हुतात्म्याच्या मनिषा पूर्ण करणे, हा होय. किसान शिक्षण संस्थेच्या विविध शाखा आज उभ्या राहिल्या. त्याचबरोबर अण्णांचे गुरु क्रांतीसिंह नाना पाटील यांची स्मृती चिरंतन राहण्यासाठी वाळव्याला क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालयाची स्थापना १९९३ साली केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राहण्याची व भोजनाची सोय मोफत करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या विकास कार्यात मा. वैभव (काका) नायकवडी यांनी विशेष लक्ष घातले. महाविद्यालयामध्ये सुसज्ज ग्रंथालय, विज्ञान शाखेसाठी प्रगत प्रयोगशाळा व ज्ञानदानाचे कार्य करणारा अनुभवी प्राध्यापक वर्ग प्रगतीशील आहे. तसेच क्रीडा, बौद्धिक अशा विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांना विकास साधता येईल असे वातावरण तयार केले.

किसान शिक्षण संस्थेच्या शाखा अन्यत्र ठिकाणी चालू आहेत. त्यामध्ये १९४२ साली स्वातंत्र्य लढ्यात पोलिसांच्या बरोबर सोनवडे (हुतात्मानगर) खेडे गावाच्या नदीकाठी नानकसिंग व किसन अहिर गोळीबार करीत असताना हुतात्मा झाले. त्या ठिकाणी अण्णांनी या दुर्गम भागाच्या शैक्षणिक विकासासाठी हुतात्मा नानकसिंग विद्यालय, सोनवडे-हुतात्मानगर आणि हुतात्मा किसन अहिर वसतिगृह, सोनवडे या दोन संस्था १९९३ साली स्थापन केल्या. आज त्या प्रगतिपथावर आहेत. अण्णांनी तेथेही विद्यार्थ्यांना शिक्षणाची, राहण्याची व भोजनाची विनामूल्य सोय केलेली असून हा शैक्षणिक कार्यातील विकास कायम

चालू ठेवला. नागनाथ नायकवडी यांच्या मते शिक्षणाने माणसाची सुधारणा होते, शिक्षणामधून संघटित समाज निर्माण करण्याचे कार्य होते.

स्त्री–पुरुष समानतेचा विचार अण्णांच्या शैक्षणिक कार्यातही दिसतो. नागनाथ नायकवडी यांनी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही शिक्षण घेतले पाहिजे. त्यांना स्वावलंबी जीवन जगता आले पाहिजे. या विचाराने १९९९ साली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह, क्रांतीवीर कॉलनी, माळभाग, वाळवा येथे उभारले. वसतीगृहात मुलींच्यासाठी राहण्याची, भोजनाची व शिक्षणाची मोफत सोय आहे. वाळवा येथे १ कोटी २० लाख रुपये खर्चून बांधलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या अद्ययावत मोफत वसतीगृहाच्या उद्‌घाटनाला माजी खासदार श्रीमती फुलनदेवी यांना निमंत्रीत करण्यात आले. अण्णांनी शैक्षणिक विकास करीत असताना स्त्री–पुरुष, विद्यार्थी–विद्यार्थिनी असा भेदभाव न करता सर्वांना समानतेने माणुसकीचा दर्जा, मान दिला आहे.

अशा रितीने कॉ. नागनाथ अण्णा यांच्या कार्याची व्याप्ती अधिक आहे. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात फक्त चांगली कार्य करत आलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांचे प्रत्येक कार्य एक समजदार भारतीय नागरीक व जबाबदार नेतृत्वाचे गुण आढळून येतात. त्यांची कार्य करण्याची पध्दत म्हणजे ते सर्वाना घेवून धाडसाने कोणतीही गोष्ट करताना आवर्जुन दिसते. एक योध्दा, सेनानी, एक विचारवंत, एक क्रांतिकारक अशा विविध रुपात अण्णांची कार्य सामान्य लोकांस खूळ लावतात. समझदारपणा हुशार आणि कुशाग्र बुध्दीच्या जोरावर अण्णांनी इंग्रजांना हैरान करून सोडलेले आढळून येते. अण्णांच्या या कार्याला त्या काळात देशबांधवांच्या मदतीने यश येत होते. सर्व क्रांतिकारक व भूमीगतांनी नेटानी प्राणांची बाजी लावून धरली. अण्णांचा लढा हा सर्वसामान्यांचा झाला. ‘सर्वानी लढा दिला तरच देशाला स्वातंत्र्य मिळेल’ या विचारांनी जनता पेटून उठली. भगतसिंग फासावर गेले. सुखदेव,

राजगुरु या वीरांनी मातृभूमिसाठी प्राणाची आहूती दिली. तशी तमाम जनतेनेसुध्दा इंग्रजाविरुध्द अति प्रमाणात चीड निर्माण होत गेली.

नागनाथ अण्णा हे हत्याराने जेल तोडण्याचे लोकांना शिक्षण देवू लागले. त्यांनी लावलेली छोटीशी ज्वालेची पणती मशाल होवून सर्वत्र मिरवू लागली. अशा पध्दतीने अण्णांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्याची सर्व थरातून जनमानसातून दखल तर घेतलीच आणि इंग्रजांनी दशहत घेतलेली आढळून येते. अण्णांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक कार्य उल्लेखनिय असून त्यांनी मानव जन्माचे सार्थक केल्याचे लक्षात येते. स्वातंत्र्यदेवतेला मानणारे अण्णा शेवटपणे त्याच पद्धतीने वागले. कोणतीही भिड न ठेवता समाजासमोर स्वच्छ हातानी आणि प्रतिमांनी पुढे जाणारा एक दृष्टा असे त्यांचे वर्णन करावे लागेल. भूमीगत चळवळीत काम करताना त्यांनी स्वत:चा कधीच स्वार्थ पाहिलेला नाही. भारत मातेला बंधनातून मुक्त करण्याची स्वप्ने क्रांतिवीरानाच पडतात. त्यामध्ये अण्णा अपवाद मुळीच नाहीत. आझाद हिंद सेनेचे एक जहाल क्रांतिकारक म्हणून अण्णांची ओळख पुरेशी होते.

भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी दरोडे तर घातलेच पण इंग्रजांचे खूनसुध्दा पाडलेले आढळून येते. एक साधा माणूस क्रांतिच्या विचाराने भारावतो आणि प्रतिसरकारच्या प्रमुखात स्वत: जावून बसतो हे आजकालच्या समाजातील तरुणांना अभिमानास्पद व हेवा वाटणारी गोष्ट आहे. अण्णांचे कार्य सर्वसमाजाला एक दिशा देते. या दिशेस योग्य आकार विकार आणि क्षमता आहे. योग्य संस्कार आहेत. स्वातंत्र्यानंतर अण्णा आजसुध्दा गप्प नाहीत तर त्यांनी आजसुध्दा वर्तमान काळातील सरकार विरुध्द अनेक आंदोलने केलेली आहेत. शेतकरी मजूर व दुष्काळग्रस्तासाठी त्यानी केलेली अनेक कार्य समाज परिवर्तनाचे नवे पैलूचे दर्शन घडवितात. समाजाला योग्य दिशा देण्याचे त्यांचे कार्य आहे. वाळव्याच्या पटांगणात दरवर्षी ते सामुहिक विवाह सोहळ्याचे कार्य करतात. यामुळे सामान्य जनतेला आपले लग्न कार्य करण्याची कुवत प्राप्त होते. या विवाह समारंभास कमी खर्चात व अक्षता ऐवजी फुले व

बौध्द भिक्षूकांच्या मदतीने करुन समाजात ऐक्याचे नवे परिवर्तन सुरु करतात. एक समाज दृष्टाच हे सर्व करू शकतो. सामान्य माणसाला अशी कार्ये करणे अशक्य आहे. अण्णांचे अनेक पैलू या कार्याच्या माध्यमातून प्रकट होताना दिसतात. गावातील शेतकऱ्याला व बहुजनाला सत्ता मिळावी म्हणून झटणारे अण्णा गावासाठी नव्हे तर देशासाठी सुध्दा तेवढेच महान आहेत. एक महामानव आणि शक्ती यांचा संचय अण्णाच्या कार्यातून प्रकट होतो. महाराष्ट्राला एक चांगले मार्गदर्शक म्हणून अण्णाकडे पाहणे गरजेचे वाटते पण खंत एवढीच आहे की त्यांनी केलेल्या कार्याची नोंद इतिहासापूर्वी मर्यादित ठेवण्याचे कट कारस्थान प्रस्थापितांनी केलेले आढळते. पण अण्णा या सर्व गोष्टीचा उहापोह कधीच करताना आढळत नाहीत. अण्णाचे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील कार्य समाजास उपयुक्त आहे. नव तरुणांना मार्गी लावणारे आणि त्याच्या मनामध्ये देशप्रेम आणि चांगले संस्कार उभे करणारे नक्कीच आहेत. अण्णानी आज जरी आपल्या वयाची पातळी ओलांडली असली तरी ते पूर्वी इतकेच कार्यात सतत मग्न असतात. भारतमातेला स्वतंत्र करणाऱ्यामध्ये एक साधा कार्यकर्ता अशा पध्दतीत राहतात बोलतात. त्यांचे साधेपण समाजाला व्यापकता देते. स्थीरता आणि योग्य दिशा देण्याचे काम त्याच्या कार्यातून दिसून येते.

**नागनाथ अण्णा नायकवडी यांचे राजकीय कार्य:**

डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी याचे राजकीय नेतृत्व राष्ट्रीय लढ्यातून सिध्द होते. त्याची जीवनशैली व इंग्रजाविरोध खेडोपाडी गावातून निर्माण होणारे क्रांतिवीर हे त्यांचे द्योतकच म्हणावे लागेल. इंग्रजाच्या काळात भारतीयावर विशेषत: खेडोपाड्यात लादलेली गुलामगिरी, दंडूकशाही याच्या विरोधात ते जीवाची पर्वा न करता कार्य करताना दिसून येतात. सशस्त्र हल्ले, तुरुंग, बँक दरोडा, रेल्वेफलक उचकटणे, इंग्रजाना हैराण करून सोडणे, हत्यारे गोळा करून नवीन क्रांतिवीर तयार करणे या कामात अण्णांचा हातखंड राहीला आहे. त्यांच्या एका शब्दावर अनेक तरुण प्राण देण्यास तयार असल्याचे दिसून येते. त्यांच्या राजकीय

नेतृत्वाची चिकित्सा करावयाची झाल्यास त्यांचे नेतृत्वामध्ये कार्ल मार्क्सच्या विचारांची बैठक आण्णांच्या राजकीय नेतृत्वात दिसून येते. अण्णांची ही तडजोड मुळीच नव्हती. जनतेचे प्रश्न सुटावेत म्हणून ही चळवळ होती.

भारतीय संघराज्याच्या कार्यक्रमात अण्णांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे. हैद्राबादचा मुक्ती संग्राम असो, गोवा मुक्ती असो त्यांचा या कार्यात सहभाग आपोआपच होत गेलेला दिसून येतो. अर्थात हैद्राबाद मुक्ती संग्राम यशस्वी करण्यामध्ये इतर पक्षाबरोबर शेतकरी कामगार पक्षाने महत्वाची भूमिका पार पाडली. त्यात अण्णा आग्रक्रमावर होते. बहुजन समाजासाठी सत्ता वापरली जात नाही हे लक्षात येताच ते स्टेट काँग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार पक्षात दाखल झालेचे दिसून येते. परंतु त्यामध्ये वैचारिक मतभेदामुळे ते सध्या सर्व पक्षापासून अलिप्त भूमिका घेताना दिसून येतात. कारण अण्णांना समाज कारणासाठी राजकारण हवे होते. सत्तेसाठी केलेले राजकारण त्यांना अमान्य होते. या तत्त्वनिष्ठेमुळे त्यांचे मतभेद होत होते.

त्यांचे या काळातील त्यांचे अनेक सहकारी मित्र सत्तेच्या व स्वार्थाच्या मागे लागून सत्ताधारी पक्षात गेलेत व मोठमोठी पदे भोगू लागले आहेत. परंतु नागनाथ (अण्णा) हे स्थितप्रज्ञासारखे स्थीर राहून आपल्या विचारांचे आचाराचे आदर्श घालून देत आहेत. शेतकरी कामगार पक्षात अनेक वर्षे कार्य केले असल्याने अनेक संधी चालू आल्या असतानाही त्यांनी तत्त्वाला कधीच बगल दिलेली नाही.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राजकीय व सामाजिक चळवळीतून समाजाचे प्रबोधन करण्याचे त्यांचे प्रयत्न सतत चालूच होते. नागनाथ अण्णांचे राजकीय नेतृत्व म्हणून ते भावी पिढीला दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहेतच. अण्णां बहुजन समाजासाठी कल्याणासाठी लढणारे शूरवीर म्हणावे लागेल. सीमा भागातील त्याचे नेतृत्व जनतेला दिलासा देणारे ठरले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळ पुढे चालू ठेवण्यात अण्णांची

महत्त्वाची भूमिका राहीली आहे. विधानभावनात किंवा सरकारला योग्य प्रश्नासाठी तात्काळ जागे करणारे त्यांचे नेतृत्व आजसुध्दा तेवढेच ताकतीचे दिसून येते.

सरकारला आपल्या प्रभावी वक्तृत्त्वामुळे प्रभावीत करणारे अण्णां राजकीय विचार ते छातीठोकपणे मांडणारा नेता म्हणून मान्यता मिळवितात. शेती व शेतकरी प्रश्नाबाबत सखोल ज्ञान असणारे ते विचारवंत होय. अगदी संशोधनात्मक दृष्टीकोनातून भारतीय राजकारण व शेतीची चिकित्सा करणारे ते संशोधक होय. परंतु दूर्दैवाने त्यांच्या या आधुनिक विचाराला प्रस्थापिताकडून मुद्दामच दडपण्याचे प्रयत्न आजसुध्दा सुरु आहेत. काही वाळवा तालुक्यातील राजकीय प्रस्थापित त्यांच्या विचाराची पायमल्ली करताना दिसून येतात. काही लोक केवळ वक्तेच असतात. कृतिशिलता त्यांच्या अंगी शुन्य असते. परंतु अण्णांच्याकडे मात्र या दोन्ही गोष्टी असण्याने ते कोणताही संग्राम चळवळ त्यांनी यशस्वी करून दाखविली. दलितांना सामाजिक न्याय, प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये ते मागे पाहत नाहीत. दलितांना सामाजिक प्रतिष्ठा लाभावी म्हणून ते आपल्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष करतात व त्याच्या मार्गदर्शनाखाली कारखाना चालवितात. एवढेच नव्हे तर त्यांच्या विविध संस्थामध्ये शिक्षक व मागासवर्गीयाना विशेष स्थान दिले जाते. विविध राजकीय व सहकारी चळवळीमध्ये दलिताना सहभागी करून घेण्याची त्यांची वृत्ती स्तुत्य राहीली आहे.

**अण्णांची नेतृत्वा संदर्भात वैचारिक भूमिका :**

नागनाथ अण्णां हे कार्य गाव पुढारी म्हणून किंवा गल्लीतून उठून निवडणूका लढवून नेतृत्वाची धुरा सांभाळणारे नेते झालेले नाहीत तर ते स्वातंत्र्य संग्रामात प्राणाची बाजी लावून स्वत:च्या ताकतीने कार्याने नेते झालेले आढळून येतात. त्यांची वैचारिक जडणघडण वेगळ्या पध्दतीने घडलेली आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला नेता आहेत. नागनाथ अण्णांनी इंग्रजाच्या विरोध लढा लढला आहे. बहुजनातून समाजातून आलेले त्यांचे गुरु नेते शंकरराव पाटील, तुळीदास जाधव, जी. डी. लाड यांच्या सारख्या नेत्याच्या बैठकीत

त्यांची नेतृत्वाची वैचारिक बैठक पक्की झालेली दिसून येते. शेतकरी कामगार पक्षात असल्यामुळे मार्क्सवादाचा मोठा प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा साध्या सोप्या भाषेत मार्क्सवादाचे दर्शन ते सर्वसामान्यांना घडवीत असतात.

अण्णांच्यावर मार्क्सवादाचा व सत्याशोधक चळवळीचा प्रभाव असल्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्याच हिताची जोपासना करणारे विचार सतत मांडताना दिसून येतात. शेतकरी व कामगाराचे राज्य निर्माण व्हावे यासाठी प्रमाणिकपणे प्रयत्न आजसुध्दा करत असतात. अण्णांच्यावर मार्क्सवादाचा व शाहू, फुले आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असल्यामुळे ते सतत श्रमीकांचे व शोषितांचे लढे उभे करताना दिसतात.

अण्णांची चळवळीवर फार मोठी श्रध्दा होती. चळवळीने सर्व कांही मिळू शकते. यावर त्याचा पूर्ण विश्वास आहे. अर्थात चळवळ मात्र सतत करत राहिले पाहीजे. भारतीय समाजात कोणतीही गोष्ट चळवळ व तीव्र आंदोलन अथवा लढा याशिवाय मिळू शकत नाही. या गोष्टीवर त्यांचा ठाम विश्वास दिसून येतो.

सरते शेवटी त्यांची वैचारिक भूमिका बदलताना दिसून येते. वैचारिक भूमीका संघर्षाची नसून सहकार्याची असावी असे त्याना वाटे. आपले विचार स्पष्ट व प्रभावीपणे मांडून सत्ताधारी सरकारला आपल्याकडे आकर्षित करून घेण्याची त्यांची पध्दत औरच म्हणावी लागेल. त्यांच्या या वैचारिक बैठकीत सत्यशोधक मार्क्सवाद आणि शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा पगडा राहीला आहे. समाजिक व आर्थिक विषमता व शोषण नष्ट करूनच नवा समाज उभा करण्याचे स्वप्न ते पहात असत.

नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाची वैशिष्टये कोणतीही राजकीय, संस्थानिक पार्श्वभूमि नसलेला सामान्य कुटुंबातील अण्णांचे मोठेपण स्वकर्तृत्वानेच पुढे आलेले दिसून येते. शेतकरी व सामान्य कुटुंबात जन्म झाल्याने सर्व सामान्यांची दु:खे चटकन जाणणारा व त्यांचे अश्रू पुसणारा नेता म्हणावे लागेल. अण्णां कार्यकर्त्याशी मनमोकळे आणि दिलखुलास चर्चा

करतात. त्यामुळे ते कार्यकर्त्यांना ते आपलेसे वाटतात. नेता आणि कार्यकर्ता अशी भिंत त्यांच्यात आणि कार्यकर्त्यात असत नाही. म्हणून कार्यकर्त्यांना त्यांच्याशी वागताना बोलताना दुजाभाव वाटत नाही.

अनेक राजकीय पुढारी व नेत्यानी त्यांना पक्षात येण्यासंदर्भात आमिषे दाखविली. परंतु ते आपल्या तत्त्वापासून कधी ढळले नाहीत. त्यांची वैचारिक निष्ठा निर्विवाद आहे. कसलाही अवघड प्रश्न अत्यंत ग्रामीण व सोप्या भाषेत उकलून स्पष्ट सांगत. त्यांचे विचार ऐकताना कार्यकर्त्यांच्या मनात ते अगदी जवळचे वाटत. कार्यकर्त्यात व स्वत:मध्ये अण्णां कधीही अंतर वाढू देत नसत. कार्यकर्त्याच्या चुका सहानुभूतिपूर्वक दूर करत. कार्यकर्त्याला कामाला लावण्याची व त्यांच्यातील कृतीशीलता विचार प्रगल्भ करण्याचे अण्णांचे तंत्र इतरांपेक्षा वेगळे आहे. म्हणून अण्णां शेवटपर्यंत कार्यकर्ते म्हणून जगत राहिले. अण्णांचे व्यक्तीमत्व अजातशत्रू आहे. त्यांच्याबद्दल सरकार दरबारी व विरोधी पक्षातसुध्दा आदरच होता आणि आजही आहे.

त्यांची वैचारिक बांधिलकी, शुध्दचारित्र्य, लढावूबाणा ही अण्णांच्या स्वभावाची खास वैशिष्टे म्हणता येतील. शेतकऱ्यांचे संघटन करण्याची क्षमता असणारा नेता म्हणून पूर्ण महाराष्ट्रात ख्याती आहे. त्यांचे कार्यक्षेत्र व नेतृत्व प्रभावी आहे. साधी राहणीमान खाकी फूल तीन बटनी शर्ट व धोतर हे त्यांचे आगळे वेगळे वैशिष्ट आहे. नेतेपणाची दिमाख दाखविणे हे त्यांच्या व्यक्तीमत्वात मूळीच बसत नव्हते. सध्या शेतकऱ्यांच्या पोषाखात राहणार, वावरणारा हा नेता खऱ्याखुऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा नेता होता. नेतृत्वासाठी लागणारी नैतिकता आणि समाजहिताची कणखर दृष्टी हे त्यांचे खास वैशिष्ट्ये होती. समाजाच्या सर्वांगिन प्रश्नांचा अभ्यास, व्यासंग, इत्यादी गुणांनी त्यांचे व्यक्तीमत्व महाराष्ट्राच्या जनतेच्या प्रश्नावर लढणारे एक लढावू नेतृत्वा सारखे होते.

**नागनाथ अण्णांचे सहकार क्षेत्रातील कार्य:**

''भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्यास ज्या काही मोजक्या भारतीय विरांगणा समरागणांत झगडल्या त्यामध्ये आपल्या मुलासह क्रांतीची मशाल हाती घेऊन अखेरपर्यंत ब्रिटीशाशी प्रतिसरकारच्या उग्र लढ्याने झुंज देऊन स्वातंत्र्यसूर्य हस्तगत करणारी आणि सामाजिक शैक्षणिक, औद्योगिक व क्रीडाक्षेत्रात तळमळीने कार्य करणारी क्रांतीमाता स्वातंत्र्यसैनिक सौ. लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी ही नागनाथ अण्णांची जन्मदात्री आई होय.''[५७]

घराणे छोटे कष्टकरी शेतकऱ्याचे, खास अभिमानाने सांगावी अशी कोणतीही पूर्वपरंपरा नाही. प्रामाणिकपणे घाम गाळून नितीने जगणारे कुटुंब. अण्णांचे सातवीपर्यंतचे शिक्षण वाळवा आणि आष्टा येथे झाले. अण्णांनी पुढे काय करायचे म्हणून त्यांच्या आईवडिलामध्ये वाद सुरु झाला. वडील म्हणत की, ''पोराला तालमीत घालून चांगला पैलवान करायचा' तर आईचे म्हणणे होते की, 'पोराला खूप खूप शिकवायचे आणि शहाणे करायचे.''[५८] वयाच्या १८ व्या वर्षानंतर इंग्रजी मॅट्रीकनंतरच्या पुढील शिक्षणास अण्णांनी रामराम ठोकला आणि संघटनात्मक कामास सुरुवात केली. सेवादलातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यामध्ये पत्रीसरकारच्या चळवळीचे वादळ घोंघावू लागले आणि अण्णांच्यासह सर्वस्वाचे बलिदान करण्यासाठी आईने चळवळीत उडी घेतली. ब्रिटीशांच्या काळात भूमिगतांच्या वळवळीतील एक अग्रगण्य सेनानी म्हणून नागनाथ अण्णांचा लौकीक सर्वत्रुत आहे. या त्याच्या सेनानी भूमिकेची बीजे त्यांच्या आईच्या व्यक्तिमत्वात रुजलेली दिसतात. आपल्या मुलाकडून सर्वापेक्षा अधिक चांगले आणि भरीव काम व्हावे असा एकच ध्यास त्यांनी घेतला होता. ''अण्णांच्या सर्व कार्यामागे प्रेरणा आणि स्फूर्ती होती त्यांच्या आईची. त्यांच्या प्रत्येक कार्यात त्यांची आई आघाडीवर असायची आणि तिच्याच आशिर्वादाने आणि प्रेरणेने अनेक शैक्षणिक सामाजिक व औद्योगिक कार्ये उभी राहिली.''[५९]

'प्रबोधन, रचना आणि संघर्ष' हे अण्णांच्या कामाचे विचारसूत्र आहे. धवल नैतिक चरित्र्य मूलगामी तलस्पर्शी विचारपध्दती, जहाल क्रांतीकारी, धगधगती व्यवहारी जनसंघटना आणि स्वच्छ आर्थिक व्यवहार यामुळे नागनाथ अण्णा नायकवडी हे प्रसिध्दी पराङमुख भूमीगत कार्यकर्ते असूनही पश्चिम महाराष्ट्रातील कष्टकरी धर्मनिपेक्षतावादी, पूरोगामी, विज्ञाननिष्ठ, स्त्री पुरुषांच्या हृदयसिंहासनावर अण्णा आरुढ झाले आहेत.

''श्री. नागनाथ अण्णांनी वयाच्या १८ वर्षापासून आपल्या आयुष्याचा एक एक क्षण भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि जनतेच्या हितासाठी खर्च केला आहे आणि अजूनही तेच सुरु आहे.''[६०] त्यांनी शांतपणे कधी झोप घेतली नाही की विश्रांती घेतली नाही. अगदी उत्तम तांदळात एखादातरी खडा सापडेल परंतु अण्णांच्या संपूर्ण जीवनकोशात स्वार्थ, भय, अस्पृश्यता, जातिभेद, संकुचितदृष्टी याबाबी शोधूनही सापडणार नाहीत. अशा स्वच्छ चारित्र्याच्या निर्भय व निस्वार्थी क्रांतीकारक नागनाथ अण्णांना अगदी सुरुवातीपासून किसान, शेतमजूर, कष्टकरी, दलित, आदिवासी आणि धरणग्रस्त बंधुभगिनींनी नेहमीच साथ दिलेली आहे. या जनशक्तीच्या प्रचंड बळावर त्यांनी हातात बंदुका घेऊन भारतभूमीला परतंत्र्याच्या साखळदंडातून मुक्त केले. जनहितासाठी अनेक क्रांतीकारक व वादळी अशा चळवळी उभ्या करून असंख्य कामे केली.

'१९४२ च्या प्रतीसरकारच्या' प्रतिसरकारच्या चळवळीतील ते एक प्रमुख आणि झुंजार नेते आहेत. आपल्याला खुर्ची मिळावी म्हणून ही चळवळ संघटित करायला ते उतरले नव्हते. मिळालेले स्वातंत्र्य राबणाऱ्या स्त्री-पुरुषांचे खरे स्वातंत्र्य नाही म्हणून त्यांनी पुन्हा राबणाऱ्या जनतेच्या चळवळीत राहणे पसंत केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून आजपर्यंत त्यांनी महाराष्ट्रातील अनेक महत्वाच्या चळवळीमध्ये हिरीरीने काम करत आहेत. या चळवळीतील सहभागाचा भाग म्हणून त्यांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवे ची स्थापना केली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रेरणादायी

चळवळीत सहभागी होऊन त्यासाठी लागणाऱ्या हाताऱ्याची त्यानी स्वत: गोव्याहून आयात केली. नानकसिंग व मनससिंग या दोन सुभाष बाबूंच्या पंजाबी साथीदारांना पंजाब, दिल्लीमधून त्यांनी आणून सुभाषबाबूंच्या कार्याला हातभार लावला आहे. प्रतिसरकारची उभारणी करून गावगुंड व गुन्हेगार यांच्याशी अनेकदा सशस्त्र लढे दिले. काहीना नमविले आणि काहीना नष्ट केले. गावोगावी शस्त्रधारी सहकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी न्यायदान करून गोरगरीबांना, दुर्बलांना न्याय दिला, आधार दिला. २५ फेब्रुवारी १९४६ या दिवशी ब्रिटीशांशी नागनाथ अण्णांनी समवेत सशस्त्र झुंज देताना क्रांतीवीर किसन अहिर व नानकसिंह हे हुतात्मे झाले. या हुतात्म्यांची मनिषा पूर्ण करण्याच्या प्रेरणेतून हुतात्मा चळवळ सुरु झाली व ही चळवळ नागनाथ अण्णांच्या नेतृत्वा खालीच वाटचाल करीत आहे. हे या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

स्वातंत्र्यासाठी सुरु असलेल्या चळवळीला आर्थिक बळ देण्यासाठी ट्रेनमधील रक्कम त्यानी सहकाऱ्यांच्या मदतीने लुटली. इंग्रजी सत्तेला उखडून काढण्यासाठी त्यानी सहकाऱ्यांच्या सहकार्याने स्वत: हातात बंदूक घेऊन धुळ्याच्या साडेपाच लाखाचा खजिना लुटला. त्यावेळी पोलीसांच्या गोळीने अण्णांच्या खाद्यांवर केलेले कठोर आघात त्या प्रसंगाची आजही आठवण करून देतात. ‘‘सन १९४४ साली विश्वासघातामुळे अण्णांना अटक झाली. परंतु अगदी ४४ व्या दिवशी सातारा जेलच्या तटावरून ते उडी मारुन निसटले आणि भूमीगत राहून त्यांनी इंग्रजांना सतावले.’’[६१] स्वातंत्र्यपूर्व काळातील अण्णांच्या सहकार्याने विविध पक्षात विभाजन झाल्याने त्यांनी स्वातंत्र्य गट म्हणून कार्यास सुरुवात केली. तेलंगण लढा व निझाम विरोधी लढ्यातही अण्णा सहभागी झाले होते.

भारत सरकारचे पकड वॉरंट असल्याने ते भूमिगत होते. भूमिगत असतानाच हुतात्म्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन त्यांचे अमर शैक्षणिक स्मारक उभे रहावे म्हणून त्यांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालय आणि हुतात्मा नानकसिंग वसतिगृह या संस्थांची स्थापना

केली. त्यानंतर जिजामाता विद्यालय व सावित्रीबाई फुले वसतीगृह स्थापन केले. त्यांच्या या कार्यात त्यांच्याबरोबर त्यांची आईही सतत आघाडीवर राहिली. विद्यालयाच्या स्थापनेपासून विद्यार्थी, शिक्षक, क्रीडा व आरोग्य या बाबीकडे त्यांच्या आईने सातत्याने चौफेर लक्ष पुरविले. ग्रामीण भागातील गरीब व उपेक्षित मुलांच्या बरोबरच डांग व फासेपारध्यांच्या मुलांच्या शिक्षणाचीही सोय या ठिकाणी करण्यात आली. वाळव्याच्या शेतकऱ्यांच्या हितासाठी किसन लिफ्ट इरिगेशन सुरु केले. व्यायामशाळा बांधून घेतली. सन १९५७ ते १९६२ या काळात अण्णां महाराष्ट्र राज्यातील एक आमदार होते. संयुक्त महाराष्ट्र समिती, गोवामुक्ती संग्राम यांतही अण्णा सहभागी होते. भूमिहीन शेतमजुरांच्या हितासाठी त्यांनी अनेक चळवळी उभारल्या. इस्लामपूर-वाळवा या डांबरी रस्त्याच्या मागणीसाठी त्यांनी साराबंदीची उग्र चळवळ उभारुन त्या चळवळीच्या रेट्यावर तो रस्ता करवून घेतला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अखेरपर्यंत अण्णांनी साथसंगत दिली. क्रांतिसिंहाच्या मरणोत्तर त्यांच्या स्मारकाची योजनाही त्यांनी तयार केली. नागठाणा पाटबंधारा अण्णांनी झगडून मंजूर करवून पूर्ण करवून घेतला आणि त्या परिसरातील कष्टकऱ्यांचे शेतकऱ्यांचे जीवन उलळून टाकले. त्यांची त्यानी भव्य परिषद आयोजित केली आणि संघटनात्मक कामांची निश्चित दिशा त्यांना दिली.

शासन यंत्रणेवर अवलंबून न राहता दुष्काळात स्वतंत्रपणे बेनापूरकुची ता. कवठेमहांकाळ येथे दुष्काळी जनावरांची शिबीरे (कॅम्पस्) आयोजित केली आणि मुक्या जनावरांचे जीव वाचविले. काळम्मावाडी, वारणा, कोयना येथील धरणग्रस्तांसाठी त्यांनी अनेक लढे उभारले. वाळवा आणि निफाड जि. नासिक येथे महाराष्ट्रातील सर्व साखर कामगारांच्या डोळे दिपविण्याऱ्या परिषदा त्यांनी घेतल्या आणि कामगारांना न्याय हक्कांची जाणीव करून दिली.

“ ‘अमर हुतात्मा’ या साप्ताहिकाचे निफाड येथील साखर कामगारांच्या परिषदेत उद्घाटन करून त्याची सुरुवात केली आणि त्याद्वारे जनजागृतीची वादळे उठविली.”[६२] अशा या महाराष्ट्रातील नि:स्वार्थी क्रांतिकारकास सन १९८४ ते १९८९ या मुदतीत महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा आमदार पद लाभले. १९८८ मध्ये त्यांनी रशियाचा दौराही केला. अण्णांनी अशाप्रकारे अनेक शैक्षणिक सामाजिक कार्ये पार पाडली. अशारितीने अण्णांनी अनेक संस्थांना जन्म दिला. परंतु ते कोणत्याही संस्थेत कसलेही पदाधिकारी नाहीत कि साधे सभासदही नाहीत. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यातून ज्या क्षणाला साखर बाहेर पडली त्या क्षणाला तो कारखाना शेतकऱ्यांच्या हवाली करून अण्णा कारखान्याच्या बाहेर पडले. त्यानंतर आजतागायत त्यांचे कारखान्यात पाऊल पडले नाही. “या कारखान्याचे संस्थापक असूनही कसल्याही स्वार्थाची अपेक्षा न करणारा महामानव आजतरी महाराष्ट्रात नव्हे तर भारतातदेखील सापडणार नाही.”[६३] साखर कारखाना सुरु होईपर्यंत त्या परिसरात वावरणाऱ्या अण्णांनी कारखाना सुरु झाल्याबरोबर तेथे पाऊल टाकणेही वर्ज केले. भारतात सर्वात अधिक दर ऊसाच्या प्रत्येक टनाला दिला. कायद्याप्रमाणे कामगारांना वेतन मिळाले पाहिजे हे सूत्र कटाक्षाने पाळले. कारखान्यातून निढळाच्या घामाने तयार झालेला पैसा काटकसरीने वापरला गेला पाहिजे यावर भर दिला. महाराष्ट्रातल्या पुनर्वसनाच्या चळवळीला पुरोगामी विचारांच्या प्रचाराला बळ दिले. ऊसतोडणी कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्नात सक्रीय सहभाग दिला व “ ‘अमर हुतात्मा’ साप्ताहिक सुरु करून विचारमंथन आणि पुरोगामी विचाराच्या प्रसाराला गती देण्याचे अभिवचन दिले. सार्वजनिक निकोप जीवन साम्यवादी विचारांच्या आधाराने कसे जगता येते हे दाखवून दिले.”[६४] स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या शासनाच्या पेन्शनलाही त्यानी झिडकारून टाकले आणि क्रांतीवीराच्या स्वाभिमान जिवंत ठेवला.

अण्णांनी अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या. जमीनदारांच्या घशातून गरीबांच्या जमीनी काढून घेऊन गरीबांना परत दिल्या. अनेकांना सुखी केले, परंतु स्वत:कडे मात्र कधी एक रुपायादेखील बाळगला नाही की स्वत:च्या सुखाचा विचार केला नाही. मिष्टान्न, किंमती वस्त्रे आणि वस्तू यांचा थोडाही लोभ न धरता अण्णा आजही सामान्य व्यक्तीसारखे नव्हे महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासारखे जीवन जगत आहेत. स्वत:चा प्रपंच, पत्नी व मुलेबाळे यांचे हित आणि सुख त्यांनी कधीही पाहिले नाही. संत गाडगे महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याप्रमाणे सर्व धर्माच्या बांधवांना मुलांना अण्णा स्वत:ची म्हणूनच मानतात.

भूमिहीन शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी, धरणग्रस्त व दलित आदिवासी स्त्रियांच्या चळवळी, अंधश्रध्दा निर्मूलन, स्त्री मुक्ती, पर्यायी शेती विकास पाण्याचे नियोजन, फेरवाटप शेतीसुधारणा, शिक्षण, सहकार, साखर कामगार, बलुतेदार संघटना, तोडणी मजूर संघटना, एस. टी. कामगार, रिक्षा टॅक्सी युनियन, शेती महामंडळ, कामगार, कापड कामगार, टेल्को कामगार, साखर कारखान्याचे सभासद शेतकरी, पूरग्रस्त, भूकंपग्रस्त अशा विविध जनथरात अण्णांचे विविध पातळ्यांवर संबंध आहेत. चौफेर भ्रमंती, घणाघाती वक्तृत्व, वादळी व्यक्तिमत्व आणि कष्ट याबद्दल तळमळ, पोटतिडीक यामुळे क्रांतीवीर नागनाथ नायकवडी ही आता एक व्यक्ती किंवा संस्था राहिली नसून ती उग्र पण मंगलजन चळवळ बनली आहे. 'हुतात्मा चळवळ' या नावाने कष्टकरी समाज आता वेगाने या चळवळीत सहभागी होऊ लागला आहे. 'उदबत्तीने कोपऱ्यात शांतपणे जळत रहावे, सुगंध शोधत रसिकाने जवळ यावे.' ''या न्यायाने एक उदबत्ती गेली ५० वर्षे वाळवा-शिराळा या क्रांतीकारी कोपऱ्यात जळत आहे. तिचा सुगंध आता सर्वत्र पोहचू लागला आहे.''[६५] कष्टकरी जनता व्यापक हलचाल स्वयंस्फूर्तीने करते आहे. निस्वार्थी युवक त्यामध्ये सहभागी होत आहेत. या सर्वांच्या प्रयत्नाने सामाजिक, आर्थिक समतेचा ध्वज आणखी थोडा उंच आकाशात फडकण्यास मदत होणार आहे.

**अण्णांचे सहकारातील महत्त्वाचे पाऊल:**

'हुतात्मा किसन अहिर' यांच्या स्मरणार्थ उभे केलेले औद्योगिक स्मारक म्हणजेच 'हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना' होय. हुतात्मा कारखान्याच्या निर्मितीचा इतिहास पहाताना या कारखान्याचे संस्थापक नागनाथ अण्णा नायकवडी यांचाही विचार करावा लागतो. हा कारखाना पूर्ण करण्यामागे प्रेरणा होती आईची. अलिकडील हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या रुपाने ते प्रत्यक्षात साकार करीपर्यंत त्या कार्याचा अखंड ध्यास घेतला. क्रांतीसिंह नाना पाटलांनी त्यावेळी या कार्यास आशिर्वाद दिले होते.

हा कारखाना काढण्याचे उद्देश – हा कारखाना स्थापन करण्यामागे काही उद्देश होते. (१) कारखान्याच्या कार्यक्षेत्रात १५ गावे येतात. या गावांचा औद्योगिक, समाजिक व सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने या कारखान्याची उभारणी केलेली आहे. वाळवा ते इस्लामपूर हा रस्ता डांबरी व्हावा या मागणीसाठी वाळव्यातील व आसपासच्या लोकांनी साराबंदीची उग्र चळवळ सुरु केली. यावेळीही साऱ्याची रक्कम राजारामबापू सहकारी साखर कारखाना साखराळे या कारखान्याने सभासदांना विचारात न घेता ऊसाच्या बिलातून कपात करून घेतली व सरकारकडे भरणा केली. यावेळी भागातील शेतकऱ्यांच्या मनात 'आपल्या भागाच्या विकासासाठी आपण स्वत:चा साखर कारखाना असावा ही भावना निर्माण झाली व त्यांनी राजारामबापू पाटील सहकारी साखर काखाना साखराळे या कारखान्याचे सभासदत्वाचे राजीनामे कारखान्याकडे पाठविले व कारखाना निर्मितीसाठी प्रयत्न सुरु केले. (२) शेतीचा विकास घडवून आणणे, (३) शिक्षण संस्थांच्या अडचणी (आर्थिक) सोडविणे. वरील प्रमुख उद्देश हा कारखाना स्थापन करण्यामागे होते.

अमर हुतात्माच्या पुण्याईने व पंधरा गावांच्या जागृत शेतकऱ्यांच्या अखंड परिश्रमातून आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या अचूक मार्गदर्शनाने हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची उभारणे ११ महिन्यात पूर्ण झाली. या सर्वामागे प्रेरणा होती

आईचीच. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना जरी अवघ्या ११ महिन्यात उभा राहिला तरी त्याच्या मान्यतेसाठी सतत कितीतरी वर्षे झगडावे लागले. कारखान्याच्या ११ महिन्यांच्या उभारणीच्या काळात उघड्या माळावर दगडधोंड्यांच्या मातीवर घोंगडी टाकून अण्णा बसून राहिले आणि कामगारांना प्रेरणा दिली. यावेळी अविश्रांत कष्टामुळे सतत उभे राहिल्याने त्यांचे पाय सुजून राहिले होते. परंतु त्याचीही तमा त्यांनी बाळगली नाही.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना सुरु होणार होता. राजारामबापू पाटलांचा शिवेशेजारचा कारखाना हरकत दाखल घ्यायला तयार नव्हता. सांगून झाले भेटून झाले पण जमेना. आई एक दिवस हातात कागदाचे भेंडोळे घेऊन साखराळ्याच्या माळावर गेल्या आणि राजारामबापूंची गाडी अडवली. ''या कागदावर सही कर''[६६] अशी आज्ञा केली. पाटलांना ते मान्य करणे भाग पडले. तुझं-माझं करून वैर मांडायला ही काय राजेशाही आहे? आता लोकशाहीत सर्वांना आपला विकास साधण्याचा अधिकार आहे त्यांच्या या विकासाच्या कामात आड येता कामा नये. हे स्पष्ट आणि स्वच्छ जनहिताचे राजकारण करायला भाग पाडणारी ही माता लोकशाहीची एक मूक प्रवक्ता होती. अशाप्रकारे आईंनी राजरामबापूंच्या कडून सही घेऊन कारखान्याच्या मार्गातील अडचणी दूर केल्या.

ना. वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना किसन अहिर सहकारी साखर कारखाना सुरु झाला. वाळव्याला लिफ्ट इरिगेशन योजना पूर्ण झाली. शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन त्यात उडी घेतली. शेतात कांड पुरले आणि अण्णा कारखान्याच्या उभारणीच्या कामात दंग झाले. विरोधी पक्षात, श्रमिकांच्या राजकारणात पक्षातील राहून काम करणारा आपला मुलगा साखर कारखाना सुरु करणार त्या मार्गात किती अडचणी येतील याची पुरती जाणीव या मातेला होती. सतत घारीसारखी सावध नजर ठेवून त्या मदत करीत होत्या. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना ह्या मातेचे शहाणपण ठाऊक होते. अण्णांचे धाडसी आयुष्य दादांच्या सत्ताधारी धाडसी आयुष्याच्या साक्षीने वाट चालत होते. उद्दिष्ट सामान्य माणसाच्या उन्नतीने होते. सर्व

कागदपत्र घेऊन गुढी पाडव्याच्या दिवशी वाळव्याच्या या साखर कारखान्यासाठी आलेल्या १५-२० लोकांना दादानी बासुंदीचे जेवण दिले आणि अर्जासह अण्णांनी दिल्लीची वाट धरली. पक्ष कोणताही असो, माणूस सामान्य जनजीवनाच्या उत्थापनासाठी ध्येयवादाने काम करणारा आहे ना, हे पाहण्याची मागच्या राजकारण्यांची रीत, औदार्य आणि लक्ष्मीबाई नायकवडीसारख्या क्रांतीमातेविषयी असणारा अपार आदर, निकोपवृत्तीचे लोकशाहीचे स्वप्न असे आरोग्यदायी प्रसन्न दर्शन माळावर मळे फुलविणाऱ्या या कर्त्या माणसाने घडविले. त्याला मायेचे शिंपण लोकमातेने केले अन एक ओॲसिस निर्माण झाले आणि ते म्हणजे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची निर्मिती.

**हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची वाढ/विकास, सद्यस्थिती आणि भविष्यकालीन योजना :**

महाराष्ट्रातील एकूण साखर कारखानदारीत हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवेचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. हा कारखाना अगदी नवीन असताना व त्यासाठी अनेकवेळा चळवळी कराव्या लागल्या असताना महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील सहकारी साखर कारखानादारीत हुतात्मा कारखान्याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. चळवळीतून उभ्या राहिलेल्या हुतात्मा कारखान्याच्या शेतकरी कामगारांनी मिळून कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालविला असून कारखान्याचा ५ वर्षातील साखर उतारा देशामध्ये उच्चांक निर्माण करणारा ठरला. याशिवाय सामाजिक बांधीलकीचा भाग म्हणून कोयना धरणग्रस्त, वारणा धरणग्रस्त, दलित, आदिवासी यांच्यासाठी तसेच ग्रामीण साहित्य संमेलन इ. सारखे प्रकल्प हाती घेतले आहेत. भारतामध्ये सर्वात जास्त साखर उतारा मिळविण्या बरोबरच शेतकऱ्यांच्या ऊसाला सर्वात जास्त दर देणारा कारखाना म्हणूनही हा कारखाना ओळखला जातो.

या कारखान्याने महाराष्ट्राच्या सहकारी साखर उद्योगात एक वादळ उभे केले आहे. आठ तासांच्या आत ऊसाचे गळित होऊन ऊसाच्या वजनातील आणि साखर उताऱ्यातील घट रोखणे यासाठी मर्यादित असे कार्यक्षेत्र करणे, कार्यक्षेत्रातील लहान मोठ्या शेतकऱ्यांना सार्वत्रिकपणे शेअर्स देणे, प्रत्येक गावाच्या निर्णयाने सर्वात गरीब थरातून सुरुवात करून शेअर्सच्या प्रमाणात नोकऱ्या देणे, कामावरच्या कामगारांना काढून टाकण्याचा अधिकार त्या त्या गावाच्या गावसभेस देणे, गेटमधून बाहेर येताना कामगारांचे खिसे तपासण्याची लांछनास्पद रीत बंद करणे, संस्थापकांचे कारखान्याचे सभासदत्व न स्वीकारता डायरेक्टर किंवा चेअरमन बनण्याचा मार्ग बंद करणे, प्रत्येक निवडणुकीच्या वेळी चेअरमनसह सर्व डायरेक्टर्स बदलणे या सर्व कारभारातून सतत पाच वर्षे भारतात पहिल्या नंबरचा साखर उतारा काढणे, शेतकऱ्यांना सर्वात जास्त दर देणे, ऊसाच्या वजनातून पालापाचोळ्याच्या नावाखाली टनाला १० किलो वजा न करता, बिलातून अनधिकारे एक पैसासुध्दा न कापणे, ऊसतोडणी आणि साखर कामगारांच्या लढ्याच्या मागण्या लढा सुरु होतानाच जास्त रकमेने मंजूर करणे, कार्यक्षेत्रातील गावाचा अनेक मार्गानी व वेगाने विकास घडविणे इत्यादि व्यवहारातून संपूर्ण साखर उद्योगाला चांगले वागण्याचा धडा या चळवळीने दिला आहे. त्यामुळे इतर कारखान्यानाही आपला व्यवहार बदलावा लागेल अन्यथा या उदाहरणाने जागृत झालेल्या त्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या प्रचंड असंतोषला तोंड द्यावे लागेल अशी भिती वाटते.

''विदर्भ मराठवाडा येथे साखरधंद्याच्या अविकासातून प्रश्न निर्माण झाले आहेत. तेथील बहुतेक कारखाने आजारीच आहेत तर दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीत विकासातून प्रश्न निर्माण झालेले आहेत.''[६७] विशेषत: साखरधंद्यातून निर्माण झालेला नफा काही विशिष्ट विभागात कसा जिरवता येईल या विवंचनेमधून भ्रष्टाचारासारखे प्रश्न निर्माण झाले आहेत. यातूनच सहकाराचा जास्त फायदा घेणारे व समानरीत्या वंचित असणाऱ्यामध्ये सुप्त तणाव निर्माण झाला आहे. पण सहकाराच्या जाळ्यात अडकलेल्या

छोट्या शेतकरी मात्र हा तणाव उघडपणे व्यक्त करू शकत नाही. शिवाय सहकारी क्षेत्रातील निवडणुकीतील पॅनल व्होटिंगमुळे नको ती माणसेच पुन्हा पुन्हा निवडून येतात व एक प्रकारची घराणेशाही निर्माण होते.

''परंतु या सर्वापेक्षा वाळवा येथील हुतात्मा कारखाना वेगळा आहे. नफा सामाजिक कारणासाठी, सामाजिक बांधीलकीसाठी कसा जिरवावा याचे आदर्श उदाहरण म्हणून या कारखान्याचा उल्लेख करता येईल.''[६८] या कारखान्याचे प्रवर्तक नागनाथ अण्णा नायकवडी नफ्यातला ४ आणे वाटा शेतकरी, शेतमजूर, धरणग्रस्त, दलित, आदिवासी, ग्रामीण भटके, स्त्रिया यांच्या चळवळी उभ्या करून त्यांना प्रोत्साहन देऊन या शोषणयुक्त अर्थव्यवस्थेत तळागाळातील जनतेमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी खर्च करतात.

''शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांचेकरवी चालविलेला एकमेव भारतातील आदर्श कारखाना म्हणजे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना''[६९] असे या कारखान्याचे वर्णन करता येईल.

**कारखान्याची स्थापना :**

हा कारखाना 'हुतात्मा किसन अहिर' यांच्या स्मरणार्थ उभे राहिलेले एक औद्योगिक स्मारक आहे. या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात १५ गावे येतात. या गावांचा औद्योगिक सामाजिक व सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने या कारखान्याची उभारणी केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शिफारशीनुसार या कारखान्यास केंद्र शासनाकडून दि. २६ मार्च १९८१ रोजी इरादापत्र 'Letter of intent' मिळाले व त्यानंतर दि. २९/६/१९८१ रोजी मा. साखर संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सहकारी कायद्यानुसार कारखान्याची नोंदणी झाली. कारखान्याच्या बॉयलर प्रदीपन समारंभ वाळवा वुल्फ कंपनीचे कार्यकारी संचालक श्री. दमानिया व सौ. दमानिया यांच्या हस्ते दि. २७ नोव्हेंबर १९८३ रोजी संपन्न

झाला. कारखान्याची उभारणी पूर्ण होऊन सर्व जय्यत तयारीनिशी कारखाना दि. ३१/१२/१९८३ रोजी गळितासाठी पूर्ण झाला होता. ''मात्र महाराष्ट्र शासनाने झोनिंग संबंधी निर्णय घेतला नसलेमुळे कारखान्यास केंद्र सरकारकडून लेटर ऑफ इंटेटचे औद्योगिक परवान्यात रुपांतर होऊन मिळणेस विलंब लागला.''[७०] भारत सरकारकडून दि. २८/११/८४ रोजी औद्योगिक परवाना मिळाला असून त्याचा क्रमांक सी.आय.एल-२६ '८४' न्यू दिल्ली दि. २८/१/८४ असा आहे. सदरचा परवाना मिळालेनंतर लगेच ''मा. साखर संचालक यांचेकडून गाळप परवाना Crushing Licence मिळाला आणि दि. २०/१/८४ रोजी रीतसर गळितास प्रारंभ झाला.''[७१]

कारखाना उभारणीचे काम लवकरात लवकर कसे पुरे करता येईल यासाठी मा. संचालक मंडळ व कार्यकर्ते मंडळी यांनी अहोरात्र परिश्रम घेतले आणि कारखान्याची उभारणी सर्वांचे सहकार्याने ३१ डिसेंबर १९८३ रोजी पूर्ण केली व केवळ ११ महिन्यांच्या कालावधीत कारखाना यंत्रसामुग्री उभारणीचे काम पुरे करण्याचा उच्चांक प्रस्थापित करून दाखविला.

**नागनाथ अण्णा नायकवडी यांची वैचारिक भूमिका:**

भारतीय चळवळीतील अग्रभागी असणारे क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील कृतिशील चळवळीतून त्यांचे राजकीय विचारांचे संदर्भ सापडतात. अण्णा केवळ देश भक्त स्वातंत्र्य सेनानी नाहीत तर आज ते कृतिशील राजकीय विचारवंत ही वाटतात. त्याच्या कालखंडात त्यांनी कोणताही एक विशिष्ट सिद्धांत मांडलेला आढळत नाही. मात्र त्यांच्या वेगवेगळ्या कृतीतून आणि भाषणातून व आचरणातून राजकीय विचार स्पष्ट होत आहेत. आज हे विचार प्रगतीशील भारतास महत्वाचे आहे.

तरूण पिढीस तर ते आधार व नवचैतन्य निर्माण करून बलशाही भारत बनविण्यास उपयुक्त आहेत. नवभारताचे ध्येय गाठू इच्छिणाऱ्या व ध्येय वेड्या नागनाथ अण्णांनी नेतृत्वच साकारले नाही तर आपल्या राजकीय जीवन प्रवासातून एक अगळा-वेगळा

राजकीय विचार निर्माण केला आहे. त्यांचा राष्ट्रवाद, स्वराज्यवाद, रामराज्य, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षवाद, स्वातंत्र्य या सर्वांबदल त्यांची स्वतंत्र विचार धारा आपणास दिसून येते. या सर्व संकल्पनेत अण्णांनी स्वत:च्या विचारांची भर टाकलेली आढळून येते आणि हा त्यांच्या राजकीय जीवनातील आदर्शवत वारसा म्हणून ओळखत जाणार आहे. त्यांच्या कृतीचा व विचारांचा प्रभाव जनमानसावर आज जाणवत आहे. ते त्रसलेले नाही तर काळ त्यांच्या पुढे टाकून उभा आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात नवभारतीची निर्मिती कोणत्या वैचारिक अधिष्ठानावर असावी याची समीकरणे अण्णांची सुभाषचंद्र बाबूंच्या विचार श्रेणीशी जुळणारी आहेत. विद्यार्थी दशेतच भारतमातेची सेवा करण्याचे व्रत घेणारे अण्णा स्वतंत्र भारताचे स्वप्न बाळगून आज सुद्धा ते वाट पाहात आहेत. खरे स्वातंत्र्य अजून मिळाले नाही ही त्यांची खंत स्वातंत्र्य प्राप्ती नंतर ५४ वर्षानी सुद्धा तेवढीच जीवंत वाटते आहे. अण्णांनी आपल्या राजकीय विचारांच्या आराखड्यात प्रामुख्याने समाजवाद, स्वराज्य, लोकशाही, रामराज्य, धर्मनिरपेक्षता या प्रमुख राजकीय विचारांना का आधार ते पाहणे गरजेचे आहे.

भारतात प्रामुख्याने सामाजिक-राजकीय विचारांच्या पारंपरिक-धार्मिक कल्पतेचा पुरूज्जीवन करण्याचा विशेष प्रयत्न झाल्याचे पाहावयास मिळते. मात्र बुद्धी प्रामाण्याची कास धरून स्वत:ची नीतिमुल्ये निर्धारित करण्याऐवजी परंपरेतूनच ती शोधण्याचा प्राध्यान्याने प्रयत्न झालेला दिसतो. तेव्हा समाज प्रबोधनाची चिकित्सा करताना भारतात बदलेल्या तत्कालीन प्रबोधनाच्या मर्यादा कोणत्या होत्या. त्याचा विचार करणे आवश्यक असल्याचे अण्णांना वाटते. तत्कालीन समाज सुधारकांचे प्रयत्न हे समाज माणसात रूजलेल्या व परंपरेला चिकटलेल्या अंधश्रद्धा पुर्वग्रह, अज्ञान, सनातनी, प्रवृत्ती यामुळे अपुरे पडल्याचे त्यांचे मत आहे. प्रबोधन सुरू होऊन शंभर वर्षे झाली तरी हो प्रबुद्ध भारत निर्माण झाला नाही. या वस्तुस्थितीवर पारंपरिक व संकुचित राष्ट्रवादा ऐवजी एक नव्या राष्ट्रवादाची उभारणी व्हावी.

आधुनिक ज्ञान विज्ञान व विचारांशी विसंगत असलेल्या पूर्व श्रद्धांना तिलांजली देवून आज या परिस्थितीशी सुसंगत अशा आर्थिक, सामाजिक व राजकीय आधारावर ती केली पाहिजे आणि झालेल्या समकालीन प्रबोधनाचा नव्याने अन्वयार्थ लावून प्रबुद्ध भारताबाहेर सुबुद्ध भारत घडविण्याचा प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे असे नागनाथ अण्णाचे मत आहे.

याच पार्श्वभूमीवर अण्णांनी आपले राजकीय विचार प्रसंगोचित पद्धतीतने भाषण व कृत्तिद्वारे प्रस्थापित केले आहेत. या कृतीतून त्यांनी मुलभूत विचार केलेले दिसतात. त्यांच्या भाषण व कृतिचा राज्यशास्त्रीय आशय प्राप्त झालेला आहे. त्यामुळे त्यांचे राजकीय विचार त्यांच्या चिंतनाची प्रचिती असलेचे दिसून येते. त्यांचे राजकीय विचार विखुरलेले असलेने त्यांचा सुसंगत राज्यशास्त्रीय अन्वयार्थ लावता येतो. त्या अनुषंगाने त्यांचे राज्यसत्ते विषयची भूमिका, विचार, राजकीय संकल्पना, राजकीय व्यवस्था संबंधीची मिमांसा, बहुजनवाद, राजकारणाचा विचार, चिकित्सा इत्यादीचा या प्रकरणात परामर्श घेण्यात येईल.

**समाजवादी विचार :**

पिढ्यान्-पिढ्या वैचारिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरीला बळी पडलेल्या अखिल मानवाची अन्यायी जोखडातून मुक्तता करण्यासाठी समाजवादी, विचारांचा उदय प्रामुख्याने युरोप खंडामध्ये झाला. पारंपरिक समाजवादीतील स्वप्नाळू समाजवादाचा फोलपणा जाणवू लागला. त्यामुळे त्याला व्यवहारिक आणि शास्त्रीय रूप देण्याचे कार्य कार्ल मार्क्सने केले व त्यांच्या प्रभावातून लेनिनने रशियातील लाल क्रांती घडवून आणली. संपूर्ण युरोपात ज्या वेळेस वैचारिक घडामोडीना उधाण आले होते त्यावेळेस भारतात इंग्रजाचे राज्य होते.

पाश्चात्य समाजवादी विचार परंपरेप्रमाणेच भारतात ही समाजवादाची प्रदीर्घ परंपरा चालू होती. ऐहिक सुखा पेक्षा दलितांचे अश्रू पुसण्यात सूख मानणाऱ्या साधू संताची परंपरा भारताला लाभली आहे. पोथीनिष्ठ समाजवादाला बगल देवून भारताच्या तत्कालीन

समस्यांशी समरस होऊन ज्यांनी समाजवादाची फेर मांडणी केली होती त्यापैकी सुभाषचंद्र बोस एक होते. त्यांच्या विचारांचा पगडा क्रांतिवीर अण्णांच्यावर असल्याने त्यांच्या सारखीच विचार सरणी अण्णांनी बाळगलेली दिसून येते. समत्तेवर व न्यायावर आधारलेला समाज निर्माण करणे हे समाजवादाचे मुलभूत उद्दिष्ट आहे. समाजातील आर्थिक विषमता, दारिद्र्य, अन्याय नष्ट करून बंधूभावावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे समाजवादाचे कार्य असते. शोषण मुक्त समाज हे समाजवादाचे प्रमुख ध्येय असते. मानवनिर्मित विषमयता हेच शोषणाचे मूळ असल्याने त्याच्यावर घाला घालण्याची भूमिका समाजवाद घेतो. स्वातंत्र्योत्तर लढ्यात अण्णांनी इंग्रजा विरूद्धच प्रतिसरकार व प्रतिसरकारच्या वतीने अण्णांचे लढणे म्हणजेच शोषण मुक्तसाठी इंग्रजाच्या ताब्यातून भारतीयांना काढून घेणे होय. एका प्रसंगी ते इंग्रजाच्या सत्ते विरूद्धच व तत्कालीन सरकार विरूद्ध दै. पुढारीशी बोलताना म्हणतात – ''१९४७ साली मिळालेले स्वातंत्र हे खरंखुरं स्वातंत्र नव्हते. ते खरंखुरं स्वातंत्र्य आणि लोकशाही सत्ता स्थापन करण्यासाठी तळागळातल्या जनतेला विश्वास आणि प्रेरणा मिळाली तर स्वातंत्र्यापेक्षा ही मोठी चळवळ उभी राहू शकते. ते चित्र आणि योग्य दिशा आज मला दिसते आहे. म्हणूनच आपण कष्टकरी जनतेची चळवळ अविरत चालू ठेवली आहे. हे ध्येय साध्य झाल्याशिवाय ही चळवळ थांबणार नाही.''[७२] असे प्रतिपादन दै. पुढारीशी खास मुलाखतीमध्ये नागनाथ अण्णा आपले विचार व्यक्त करतात. स्वातंत्र्य चळवळीनंतर जी स्थित्यंतर झाली त्याबाबत अण्णा समाधानी नाहीत. त्यामुळे ते सामाजिक जीवनापासून बाजूला गेले. पण ते स्वातंत्र्यानंतर देशाच्या उभारणीत ते जिद्दीने उभे राहिलेत. नव्या समाज रचनेसाठी प्रयत्न करीत आहेत. एका प्रसंगी ते म्हणतात – ''अन्न-वस्त्र-निवारा, पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी, सुख समाधान आणि शांतता सर्वांना शिक्षण आणि हाताला काम ही आम्हाला अपेक्षित सत्ता होती. पण आजअखेर मिळाली नाही. आदर्श राज्य येणार असेल तर स्वातंत्र्यापेक्षा कितीतरी पटीने मोठी क्रांती घडू शकते. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला

सामर्थ्यवान करावे लागेल. त्यांचे प्रश्न समजून घ्यावे लागतील. त्यांची राजकीय तयारी, गणिते ध्यान्यात घेतली पाहिजे. दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त, कष्टकरी, कामगार, शेतकरी या साऱ्या तुकड्या एका लयीत आल्या पाहिजेत. त्यांच्या मनात विश्वास निर्माण केल्यास ''उपाशी मरू पण लढू'' या हिमतीने ती लढू शकेल. मला ते चित्र आणि योग्य दिशा आज दिसते आहे. १९४७ पासून आम्ही जे म्हणत आलोय तेच आज ही म्हणतोय म्हणूनच २०१० सालापार्यंत हे खरंखुरं स्वातंत्र्य हाती आल्याशिवाय राहणार नाही''[७३] शोषण मुक्त समाज हे समाजवादाचे प्रमुख ध्येय असते. समाजवादी विचार धारेचे स्वरूप हे नैतिक अधिष्ठानावर आधारित असते. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच, आहे रे-नाही रे अशी शोषणावर आधारीत वर्गीय व्यवस्था नष्ट करणे. समाजातील विशेषाधिकार संपुष्टात आणणे आणि समाजात समता आणि स्वातंत्र्य या मूल्यांची रूजवात करणे हा समाजवादाल अभिप्रेत असणारा अर्थ आहे. अण्णा ज्या प्रतिसरकारचे जहाल नेते होते ते त्या प्रतिसरकारची सर्व ध्येय धोरणे ही समाजवादाला अनुसरूनच होती म्हणून १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये प्रतिसरकारला लोकांनी आपल्या घरात हृदयात स्थान देऊन इंग्रजी सत्तेविरूद्ध लढा लढण्यास बळ दिल्याचे दिसून येते.

**नागनाथ (अण्णा) यांचे जातीभेदा विषयक विचार :**

नागनाथ अण्णांचा पहिला मित्र सखाराम मकदुम हा वडार समाजातील दूसरा वर्ग मित्र बंडा गायकवाड चांभार समाजातील, अनेक धर्माचे जातीचे त्यांचे मित्र होते. त्यांच्या काळी जाती-पात मानली जायाची पण अण्णाच्या डोक्यात जातीयेतेचा कधीच भेदभाव आला नाही. ते आपल्या मित्रना घरी जेवायला बोलवत व बरोबरीने जेवत-झोपत. अण्णांनी कधीही भेदभाव मानला नाही. एक प्रसंग असा झाला एक वेळ अण्णाचे चर्मकार वर्गातील जिवलग मित्र बंडा गायकवाड रात्री अण्णाचे घरी जेवत आणि रात्री तेथेच झोपले. सकाळी लवकर उठून आपल्या घरी गेले. अण्णांचे वडील बापू सकाळी कामानिमित्त चांभार वाड्यात गेले. तेथे बापूना बंडा दिसला. बापूंच्या मनात विचार आला रात्री हा पोऱ्या आपल्या घरात

जेवला तो आणि नागनाथ एका अंथरूणात झोपले आणि हा चांभार वाड्याला कसा? बापूनी घराकडे गेल्यावर अण्णांना विचारले, ''अरं नागनाथ रात्री आपल्या घरी आलेला पावणां चांभार वाड्यात कशाला गेला त्यावर अण्णा म्हणाले – अहो बापू तो चांभार वाड्यातच राहतो, बापू म्हणाले. मग तो चांभाराचा हाय? अण्णा म्हणाले होय.''[७४] पण अण्णांनी आपल्या मित्राची जात लपवली नाही किंवा बापाच्या व गावाच्या भितीने मित्रास कधीच दूरावा दिला नाही. अगदी लहानपणापासून अण्णा हे आधुनिक विचारांचे व प्रवर्तक राहीले आहेत जातीभाव या सारख्या शूद्र गोष्टीकडे अण्णांनी कधीच लक्ष दिलेले नाही म्हणूनअण्णांच्या भूमिगत काळात अनेक जातींच्या लोकांनी त्यांना मदत केलेली आढळून येते.

समाजवादाचे ते नवप्रवर्तक आहेत. समाजात समानत राखण्याचे नेहमी ते प्रयत्न करत असतात. अण्णांनी काढलेल्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे अण्णा फक्त या कारखान्याचे संस्थापक आहेत. गेल्या २० वर्षात सभासदामधून कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडले जात आहेत. ''पहिले चेअरमन शामराव सव्वाशे मराठा समाजाचे दूसरे तातोबा वाजे जैन समाजले, तिसरे महादेव कांबळे दलित समाजातले चौथे अजिज चाऊस मुस्लीम समाजातले तर पाचवे २००२ साल महिला सबलीकरण वर्षाचे औचित्य साधून पाचवे चेअरमन पदी श्रीमती निलवती माळी तर व्हा.चेअरमन पदी कुंदाताई शेळके या महिलांची निवड केली''[७५] अण्णांनी फक्त मानव प्राणी यालाच महत्व दिले. जातीला त्यांनी नगण्य स्थान दिल्याचे दिसून येते जातीवर आधारित कधीच त्यांनी कोणतीही कृती केलेली नाही. अण्णांचे समाजवादी विचार कुठे पुस्तकातून किंवा लेखमालेतून प्रकाशित झालेले नाहीत. तर ते खरेखुरे विचार समाजात पहिल्या पासून रूजविण्याचा प्रयत्न करत आहे. आज समाजासाठी लढणारे अण्णा प्रत्यक्षात ग्रंथात किंवा पुस्तकात नसून कृतीत दिसतात.

**हिंदुत्ववादी संघटनेबदलची मते :**

ज्यांनी संकुचित अर्थाने महाराष्ट्र धर्माची कल्पना मांडली त्यांनीच हिंदुत्ववादी संघटनेबद्दल मते मांडली. चिपळणूकरांची ही परंपरा राजवाडे, भावे, लो. टिळक व त्यांच्या अनुयायानी पुढे चालविली. त्यांच्या दृष्टिने हिंदु संघटन हे धार्मिक आधारीत संघटन होते. यात धर्माभिमान होता तसेच हिंदु धर्मातील जातिव्यवस्थेचा पुरस्कार आणि ब्राह्मण जातीचे प्रभुत्व त्यांना अपेक्षित होते. अशी धार्मिक आधारावरील व विषमतेला खत पाणी घालणारी हिंदु संघटनेची कल्पना क्रांतिवीर अण्णांना मान्य नव्हती. अशा संघटनाबद्दल स्पष्ट आपली भूमिका मांडताना ते म्हणतात, ‘‘हिंदु महासभा भाजपा, आर.एस.एस. सारख्या प्रतिगामी शक्ती पूर्वीपासूनच जास्तीत जास्त तीव्र होण्याचा प्रयत्न करीत आहेत. या शक्ती देशाच्या शत्रू आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत या प्रवृत्तिना प्रवेश दिला गेला तेव्हा या चळवळीला लढण्याऐवजी वेगळेच स्वरूप प्राप्त होऊ लागले. सारा बहुजन समाज हजारो वर्षे अज्ञानात कसा राहील हेच मंडळीचे प्रयत्न करीत राहिले.’’[७६] थोडक्यात अण्णाना हिंदु संघटन हा शब्द व्यापक अर्थाने अभिप्रेत होता. हिंदुधर्मातील सर्व जातीमध्ये सलोखा करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, हिंदु मुसलमान एकत्रित करणे अशा गोष्टींना ते मानवतावादी संघटन या व्यापक अर्थाने घेतात. राष्ट्र बांधणीचे काम पूर्वी शिवाजी महाराज यांनी केले. तसेच त्यांचे अनेक जातीचे मावळे करत व भागवत धर्मीय संतानी सुद्धा हेच प्रयत्न केले. म्हणून संघटन हा शब्द अण्णांनी व्यापकतेने व अतिशय महत्त्वपूर्ण रचनेवर आधारित अर्थाने घेतला आहे. परंतु आजच्या अनेक संघटनानी मात्र त्याचा अर्थ वेगळा करून आपले भांडवल तयार करत आहे असे त्यांचे मत आहे.

**समाजवाद :**

क्रांतिवीर नागनाग (अण्णा) यांनी आपल्या जीवनात ज्या विचारांना प्रमाण मानले त्या पैकी समाजवादहा अग्रभागी असलेला विार होता. समाजवादाबद्दल अण्णांची स्वतंत्र

आणि वेगळी धारणा आहे. लहानपणापासून गावातील विषमतेचे आणि जातियतेचे व परकीय गुलामगिरीचे दर्शन अगदी जवळून अण्णांनी भोगले आहेत. त्यामुळे समाजवादाबद्दलचे त्यांचे आकर्षण तेव्हापासून आजपर्यंत तसेच आहे. अगदी शाळेला असल्यापासून त्यांनी क्रांतीची मशाल, प्रभात फेरी, देशभक्ति गीते आणि विचार आकर्षित करत होते. हाच धागा त्यांना त्यांच्या भावी सामाजिक तत्त्वज्ञानाला प्रेरणार देणारा ठरला. त्यांच्या समाजवादी विचारांवर कौटुंबिक पार्श्वभूमीचा प्रभाव दिसून येतो. गरीब व दीन दलित लोकांना मदतीचा हात देणे ही त्यांच्या घराची परंपरा होती. राजाराम मोहन रॉय यांचे या तात्विक व त्यागी भूमिकेचा त्यांच्यावर परिणाम दिसून येतो. विवेकानंद यांची बंधुत्वाची आणि मानवी सेवेतून मोक्षप्राप्तीची शिकवण त्यांना प्रेरणादायी ठरली आहे. महापुरूषांच्या शिकवणूकीचा वारसा नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्या विचारातून प्रतिबिंबित होतो.

आणि याच भूमिकेतून अण्णांनी संकटग्रस्त जनतेच्या सेवेचे व्रत हाती घेतले. तरूण वयातच देशसेवा समाज सेवा व ग्रामबांधनी कार्यात सहभागी झाले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या ग्रामसमाजाची धूरा अण्णांनी नेटाने पेलली. समाजातील गरीब, निराधार, दीन-दलित व्यक्तिंना न्याय व त्यांची सेवा करण्यातच अण्णांनी धन्य मानली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रभावाने त्यांनी सुरू केलेले राजकीय कार्य केवळ स्वातंत्र्य प्राप्ती पुरते नव्हते तर ते सामाजिक व्रत आहे. आज ही वर्तमान काळात हे कार्य एक शक्तीदायक व प्रेरक ठरत आहे.

अण्णा समाजवादाचा एक व्यापक अर्थ घेऊन ते वावरत आहेत. मानवतेची सेवा हाच सेवाधर्म, आदर्श धर्म मानून ते कार्य करत आहेत. त्यांनी आजपर्यंत आपल्या सामाजिक कार्यात कधी ही खंड पडू दिलेला नाही. जगविख्यात लेखक रोमॉरोला याचे भारतीय स्वातंत्र्य लढ्याविषयाचे मत असे होते, - ''जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र असावीत, त्यांचे हक्क समान असावेत. राष्ट्रातील स्त्री-पुरूष समान असावेत आणि शोषित श्रमजीवी वर्गाला न्याय मिळावा

या उद्दिष्टासाठी आपण आयुष्यभर झटले पाहिजे.''[७७] भारतात काँग्रेसने शेतकरी व कामगार यांच्या हितासाठी व हक्कांसाठी लढावे हा रोमॉरोलाचा संदेश अण्णांच्या समाजवादी विचारांना दिशा देणारा माफक ठरलेला इथे जाणवते. 'सातारचे प्रति सरकार' हे जेव्हा स्थापन झाले तेव्हा त्याच्या पाठीशी हीच धारणा होती.

समाजवादी पक्षाचे नेते आमदार प्रा.ग.प्र.प्रधान यांची १९५४ साली आचार्य जावडेकर गेले असता अण्णांची भेट झाली तेव्हा अण्णांच्या सोबत गप्पा मारताना अण्णा म्हणतात, ''स्वातंत्र्य मिळालं पण शेतकऱ्याचं राज्य झालं नाही. याची माझ्या मनाला खंत आहे. शहरात कामगारांचा ट्रेड युनियन चालविणं फारसं अवघड नाही पण खेड्या-पाड्यात पसरलेल्या शेतकऱ्याला संघटित करणं, त्यात न्याय मिळवून देणं सोप नाही''[७८] अण्णांनी साखर कारखाना उभा केला हे त्यांचे मोठे कर्तृत्व आहे. पण अण्णा कधीही साखर सम्राट झाले नाहीत. ऊसाला महाराष्ट्रात सर्वात जास्त भाव देण्यात आला. साखर कारखान्यातील कामगाराना जास्तीत-जास्त सुविधा देण्यात अण्णांचे कर्तृत्व दिसून येते. नागनाथ अण्णा हे खरे धरतीचे पुत्र आहेत. काळ्या आईवर त्याचे प्रेम आहे. पीक चांगले काढावे. पण जमिनीला ओरबाडू नये, खते वाजवी पेक्षा जास्त वापरू नये असे ते सांगत असतात. सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या जमिनी जास्त रासायनिक वापराने खाऱ्यावल्या आहेत या गोष्टीचा अण्णांना खूप राग येतो. निसर्ग संतुलन संतुलन राखले पाहीजे. ''अण्णा खरे समाजवादी आहेत. त्यामुळेच आज महाराष्ट्रातील डॉ. भारत पाटणकर सारखे नव्या पिढीतील कार्यकर्ते त्यांच्या बरोबरीन काम करत आहे.''[७९] असे प्रतिपादन आ.कॉ. दत्ता देशमुख करतात. अण्णांनी आपल्या चळवळ व चळवळीची ताकत संदर्भात खूप सुंदर विधान केलेली आहेत. ते म्हणतात, ''नर्मदा आंदोलनाच्या नेत्या मेघा पाटकर आणि सुंदरलाल बहुगुणा, अण्णा हजारे, गो.रा. खैरनार, बाबा आमटे या सर्व मंडळीचा त्याग व लढ्याविषयी शंका घेण्याचे काही कारण नाही. पण संघटनेत समर्थ शक्ती असायला हवी. ही सर्वसामान्यांची शक्तीच संघटनेला

समर्थपणे पुढे नेऊ शकते. अशा चळवळीत विविध जनसमूह एकत्र आले पाहिजेत. या सर्वांचे मार्ग मात्र गांधीवादी पगड्याचे व व्यक्तिवादापेक्षा सर्वसामान्य जनतेला ही त्यात भाग घेता येईल. या संघटीत तुकड्या राजकीय दृष्ट्या ही जाणत्या व्हायला हव्यात. त्या आंधळेपणाने कुठेहीजाता कामा नयेत. तेच कायम स्वरूपी टिकणारी लोकशाही सत्ता स्थापन करतील. तेव्हाच त्याला खरी दिशा सूर लागला असे म्हणता येईल. आज हा प्रभाव कमी आहे. म्हणून त्याची चळवळ उठून दिसत नाही. पण ते केव्हा तरी पुढे येणार आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी संघटितपणे रान उठविले म्हणूनच ब्रिटीशांना चांगला तडाखा बसलेला होता. तसा तडाखा आज ही आवश्यक आहे. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचा ब्रिटींशानी धसका घेतला होता. जोपर्यंत समूह पेटून उठत नाही तो पर्यंत ताकद वाटत नाही ही वस्तुस्थिती आहे.''[८०] अण्णांची समाज जीवनातील चळवळ व समाजवाद या सर्व गोष्टीच्या त्यांच्या भाषणातून स्पष्टपणे उल्लेख आढळतो. समाजवादी मूल्ये जोपासताना माणसाला अन्य तत्त्वाची गरज असते व या तत्त्वाला धरूनच कार्य करावे लागते अशी त्यांची वैचारिक बैठक सांगते.

अण्णांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रातील सत्य शोधक चळवळीबद्दल मत प्रदर्शित केले आहे ते म्हणतात,-''महाराष्ट्रातील चळवळीला सत्यशोधक चळवळीने खतपाणी घातले त्यावेळी बाकीचे लोक अज्ञानात चाचपडत होते. महाराष्ट्रात फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारामुळे तळागाळातला समाज जागा झाला. कष्टकऱ्यासाठी लढणाऱ्या चळवळी तरी ही कमीच होत्या. अशा काळात प्रतिगामी आणि संकुचित जातीयवादी शक्तींनी मोठे थैमान माजविलेले होते. काँग्रेसमधील भांडवलदारांनी राजकीय सता संपादन केली होती. त्यांच्याकडून लोकांचा भ्रमनिरास झाला होता. तरी ही काँग्रेसने खूप काळ सत्तेचा अनुभव घेतला. मध्यतंरीच्या काळात भाजप-शिवसेना युतीच्या सरकाराचाही जनतेने अनुभव घेतला ते सर्व सामान्यांया उन्नतीसाठी कांहीही करू शकले नाहीत. म्हणूनच आम्हा सर्व सामान्य जनतेला समाजवादाच्या दिशेने जाणारी खरी-खुरी जनतेची सत्ता आली पाहिजे असे वाटू

लागले आहे हे चळवळीचे यश म्हणावे लागेल''[८१] समाजाला व तळागळातील लोकांना केंद्र बिंदू मानून जनतेची सत्ता ते अपेक्षित करतात म्हणून खरे समाज सेवक किंवा समाजवादाचे प्रवर्तक त्यांना म्हणावे लागेल. अण्णांवर वेगवेगळ्या भाषणातून व कृतीतून समाजवादाचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते. त्यांनी समाजरचना समाजवादी अर्थव्यवस्था, राष्ट्रीय नियोजन समाजावर आधारीलेले पक्षाचे धोरण यावर सुद्धा चर्चा केलेली आहे. समाजातील सर्व सामान्य कष्टकरी, शेतकरी, शोषित पीडीत, अन्यायग्रस्त जनतेचे जीवन अधिक उन्नती पातळीकडे नेण्यासाठी त्यांनी समाजवादी विचार प्रस्तुत केलेले आढळून येते.

अण्णांच्या समाजावादा बरोबर प्रति सरकारची रामराज्य स्वराज्य ही कल्पना त्यावेळी फार प्रसिद्ध झाली. बहुजनाच्या साठी सर्व कांही असा अट्टहास दिसून येतो. एका पुस्तक प्रकाशन सोहळ्या दरम्यान ते आपले विचार मांडतात-''गांधीजीची हत्या किंवा बाबरी मशीद पाडणे हे बहुजनांना आव्हान आहे. म्हणून आपल्या विचारांची माणसे वाढविली पाहिजेत. शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून आपण सांगतो. शिवसेना व भाजप राज्य करतात हे दुर्देव आहे. छत्रपतीचे वारस म्हणून घेणारे त्यांच्या बरोबर गेले. त्यांच्यावर बहिष्कार घातला पाहीजे. किमान निषेध नोंदविला पाहिजे अन्यथा आपल्या बरोबर असल्याचा ते समज करून घेतील.''[८२] अण्णांच्या 'स्वराज्य' विषयक विचारांवर योगी अरविंद घोष लोकमान्य टिळक सी.आर. दास यांच्या विचारांचा प्रभाव राहिलेला दिसून येतो.

**समाजवादा बद्दल व्यवहारी दृष्टीकोन :**

क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) पोथीनिष्ट समाजवादी नसले तरी त्यांचा समाजवादाबद्दल दृष्टिकोन व्यवहारी दिसून येतो. स्वातंत्र्योतर समाजाची रचना समता, स्वातंत्र्य, बंधुता वर आधारीत असावी व अशा प्रकरचा समाज निर्माण व्हावा ही ध्येय वृत्ती आहे. आज पर्यंत याबाबत कोणताही आंधळेपणा त्यांना अपेक्षित नाही. भारतीय परंपरा आणि सांस्कृति

ठेवा जपणारा भारतीय लोकांच्या व परिस्थितीच्या गरजी व स्वरूप जाणणारी व्यवस्था त्यांना अपेक्षित होती. मार्क्सवाद किंवा साम्यवादाबद्दल त्यांना आदर आहे.

त्यांच्यातील व्यवहारवादाने त्यांना भारतीय संस्कृतीचा वारसा, भारतीय लोकांच्या गरजानुरूप समाज स्वीकारण्याची प्रेरणा मिळाली आहे. भारताला समाजवाद हा नवीन नसून तो भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. मात्र आपण आपल्या संस्कृतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्याला परकीय समाजवाद अंगिकार करण्याचा मोह होतो. संस्कृतीचे जाणीवपूर्वक अवलोकन केले तर भारतात समताधिष्ठित समाज रचनेची विचारसरणी प्रचलित असल्याचे दिसते. असे अण्णा म्हणतात. त्यांना असे वाटते भारताने आपल्या संस्कृतिचा वारसा, परंपरा विचार, आदर्श आणि विश्वास, प्रेरणा घेऊन स्वत:चे प्रारूप निर्माण करावे. हेच व्यवहारवादी विचार समाजवादाच्या रूपाने स्पष्ट होतात. जगातील कोणत्याही देशात समाजवादातील झालेला बदल भारतीयांच्या परिस्थितीनुसर स्वीकारण्यास ते मान्यता देतात पश्चिमेकडील ऐहिकवादी दृष्टीकोणाचा भारतीय परंपरेवर होणारा परिणाम त्यांना अमान्य आहे. एकंदरीत भारतींया समाजाबद्दल विचार करताना ते राष्ट्राच्या भौतिक सुविधा व भरभराटी बरोबर अध्यात्मिक व नैतिक विकासाकडे लक्ष देतात.

**समतेवर भर :**

समता हे समाजवादाच्या केंद्रस्थानी असलेले मूल्य आहे. समाजात सामाजिक व आर्थिक समता असण्याशिवाय स्वातंत्र्य व बंधुत्व प्रस्थापित होऊ शकत नाही. अण्णा हे सुद्धा एक विचारवादी व क्रांतिकारी असून त्यांनी या सर्व स्तरावर विचार केलेला आढळून येतो. जिथे जिथे आर्थिक विषमता असते तिथे अण्णा जागृकपणे कार्य करताना दिसून येतात. भारतीय समाजातील विशेष अधिकारांचे उच्चाटन केल्या खेरीज समता कशी येईल असे त्यांना वाटते. वर्तमान परिस्थितीत १९५७ नंतर देशातील परिस्थितीवर व सध्याच्या सरकारवर बोलताना ते, ''पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. जनावरे मूले कुपोषणाने मृत्यु मुखी पडत

आहेत. त्यास जातीयवादी पक्ष बळकटी देत आहेत जातीयवादी संघटना बहुजनांच्या विरोधात पुन्हा सक्रीय काम करत आहेत. त्यांच्या विरोधात भुमिहीन कष्टकऱ्यांनी लढा उभा केला पाहिजे. राज्यात नाव नोंदणी झालेले ४४ लाख तरूण बेरोजगार आहेत. कायदा निरूपयोगी झाला आहे. कायद्याची अमंलबजावणी करणारी यंत्रणा भ्रष्ट आहे. कायदा तकलादू झाल्या मूळे जमिनी मिळत नाहीत. सरकारी मदतीचे आक्रमण होत आहे. त्यावर अकुंश ठेवणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात खेडोपाडी राबणारा कष्टकरी वर्ग झोपडपट्ट्यातच राहील. थोडी फार जमीन असणारी विकावयास काढतील व ते ही भूमिहीन होतील. चळवळ पुढे नेण्यासाठी लढा उभा केला पाहिजे. केंद्र सरकार वीज, वीज दर, पाणी दर, ऊसावरील आयकर यांच्या रूपाने गोरगरीब सामान्य कष्टकऱ्यांना पिळून काढत आहेत. त्यांना एकजुटीने विरोध केला पाहिजे, तरच सामान्य माणसाला न्याय मिळाले.''[८३] जन्म वंश जात यावर आधारलेले मानव निर्मित समाज व सामाजिक भेदभाव नष्ट झाले पाहिजेत असे अण्णांना वाटते. श्रीमंत-गरीब उच्चवर्गीय, भेदभाव यापासून समाज मुक्त करणे हे अण्णांचे स्वप्न व ध्येय असल्याचे दिसून येते.

या समतेवर आधारित रचनेत ते स्त्री व पुरूष यांना विशेष महत्व देतात एका युवक सम्मेलंनात ते म्हणतात -'संपूर्ण समतेच्या आधारा वर नव समाज निर्माण करावा लागेल. जातीभेदाची सध्याची चौकट पूर्णपणे लागेल, मोडून तोडून टाकावी लागेल, स्त्रियांना सगळ्या क्षेत्रात मुक्त करून त्यांना संपूर्ण देशात पुरूषांच्या बरोबरीने अधिकार व जबाबदारी द्यायला हवी. आर्थिक विषमता दूर करावी लागेल. आणि वर्ण व धर्म यावर आधारीत सर्व भेदभाव विसरावा लागेल. समतेवर आधारीत सपूंर्ण स्वतंत्र राष्ट्राची स्थापना करण्यासाठी आपल्याला कार्य करावयाचे आहे.''[८४]

स्वातंत्र प्रांतानंतर अण्णांनी कॉंग्रेस पक्षाच्या विरोधात काम केलेले आहे. स्वातंत्र्यानंतर उभारलेल्या लढ्याची सुत्रे भांडवलदार व जमिनदार यांच्याकडे राहू नयेत असे

त्यांना वाटत होते. त्यामुळे ते कधीही काँग्रेसच्या पक्ष तिकीटावर उभारले नाहीत किंवा त्यांच्या प्रचारात आजपर्यंत कम्युनिस्ट पक्षाचे आमदार झालेत व संसदेत कार्य करत राहीले. पण काँग्रेस पक्षांच्या झेंड्याखाली कधी गेले नाही. थोडक्यात त्यांच्या विचारांवरून ते भारतीय राज्यघटनेच्या 'समता तत्वाशी चिकटून राहीलेले आढळून येतात. १९५० नंतर तर काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांच्या अहवाना नंतर सुध्दा ते त्यांच्या पक्षात सामील झाले नाहीत हे त्यांचे वैशिष्ट म्हणावे लागेल.

**शेतकरी व कामगार वर्गा विषयी विचार :**

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी शेतकरी व कामगारांच्या मुक्तीचा विचार मांडला आहे. शास्त्रीय समाजवादाचे जनक मार्क्स व एंजेल्सने औद्योगिक समाजातील केवळ कामगार वर्गाच्या प्रश्नांची बाजू घेतली. त्यांनी कामगारांना क्रांतिकारक समजून कष्टकरी शेतकऱ्यांना प्रतिगामी (Reactionory) संबोधले आणि लेनिनने त्यांचे वर्णन नगन्य अल्प क्रांतिकारक (Less revolutionnary) तसेच समाजवादी चळवळीसाठी कमी विश्वासू वर्ग (Less reliable) असे केले आहे, असे असले तरी क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी व्यवहारवादी दृष्टिकोनातून शेतकरी वर्गामुळे पाहत आहेत.

भारतातील अर्थव्यवस्था शेतकऱ्याशी निगडीत असल्यामुळे त्यांना नगण्य स्थान देऊन केवळ कामगार वर्गाचा विचार करणे भारताच्या संदर्भात अयोग्य व वास्तवतेपासून दूर जाण्यासारखे आहे असे अण्णांना वाटते. म्हणून त्यांनी आपल्या काळात अनेक शेतकरी परिषद चळवळी हाती घेतल्या आहेत. कष्टकरी जनतेच्या चळवळीचा स्वाभिमानी पर्याय उभा करण्यासाठी २६ मे १९९३ साली किणी (वाठार) जि. कोल्हापूर या ठिकाणी ८० हजारांच्या संख्येने शेतकरी, शेतमजूर कष्टकरी यांचा मेळावा घेतला होता. त्या परिषदेमध्ये बोलताना ते म्हणतात – ''राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका पार पाडणारी काँग्रेस तत्त्वाच्या दृष्टीने संपली आहे. तरी शेतकरी, कष्टकऱ्यांच्या विरोधी असून पक्की भांडवलदार धार्जिण बनली आहे.

स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांना मदत करणाऱ्या भाजपासारख्या शक्तीशी काँग्रेस पक्ष युती करीत आहे. काँग्रेसच्या या युतीच्या पार्श्वभूमीवरच या जातीयवाद्यांनी आयोध्यातील बाबरी मशीद पाडण्याचे धाडस केले आहे...''[८५] भांडवलशाही समाजात मालक व सरंजामदारानांच स्वातंत्र्य उपभोगण्याची संधी मिळते आणि उर्वरित बहुतांश कामगार शेतकरी व कष्टकरी वर्ग स्वातंत्र्याच्या हक्कापासून मुकतो त्यामुळे त्यांना सर्वस्वी भांडवलदार किंवा सरकारवर अवलंबून राहावे लागते. म्हणून समाजात सर्वांना स्वातंत्र्याचा समान उपभोग घेता पाहिजे या मताचा आग्रह क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी धरत आहेत.

म्हणूनच त्यांनी २८ नोव्हेंबर १९९५ रोजी म. ज्योतीराव फुले यांच्या स्मृतिदिनी शेतमजूर कष्टकरी शेतकरी स्त्री संघटना या नावाने कष्ट करून जगणाऱ्या ग्रामीण स्त्रियांच्या मुक्तीसाठी व त्यांच्या वर होणाऱ्या अन्यायाचे निर्मुलन करण्यासाठी एक स्वतंत्र संघटना न्यायमूर्ती पी.बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. आतापर्यंत अण्णा धरणग्रस्तांच्या चळवळी, शेतमजूर, कष्टकरी शेतकऱ्याच्या चळवळी, सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या चळवळी, स्त्रियांच्या चळवळी शिक्षण क्षेत्रात सत्यशोधक पुरोगामी परिवर्तन घडवून आणणाऱ्या चळवळी उभ्या केल्या आहेत. नागनाथ अण्णा वयाच्या ९४ वर्षी सुद्धा या चळवळीना गती देण्याचे कार्य करत आहेत. समाजामध्ये ज्यांच्यावर शासनाकडून आज सुद्धा अण्णांकडून मार्गदर्शन घेण्यासाठी येत आहेत. अण्णांनी सध्याच शासकीय दूध योजनेतील कर्मचाराच्या प्रश्नावर राज्य व्यापी परिषद घेऊन त्यांच्यासाठी काम सुरू केले आहे. साखर उद्योगावर लादलेला आयकर विरोधात मोठे आंदोलन करून शेतकऱ्यावरील आयकर संकट दूर केले आहे. अन्यायी वीज दरवाढ विरोधी आंदोलनामुभळे सामान्यांचे जगने आता व्यवस्थीत सुरळीत आहे. अशा रितीने नागनाथ अण्णा म्हणजे शेतकरी व कष्टकऱ्याचे कैवारी आहेत.

अण्णांना या भारतीय स्वातंत्र्यात संधीची समानता अभिप्रेत आहे. त्यांना केवळ राजकीय स्वातंत्र नको आहे तर त्याच बरोबर सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य हवे आहे. स्वातंत्र्य म्हणजेच सामाजिक व आर्थिक संपन्नतेचा समाजातील प्रत्येक घटकांना समान उपभोग घेता येईल अशी त्यांची धारणा आहे.

**नागनाथ अण्णांचे आधुनिक महाराष्ट्रातीत योगदान :**

क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्वाचा वाटा आहे. इ.स. १९३० ते आजपर्यंत त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमठवला आहे. आजपर्यंत त्यांनी स्वातंत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक चळवळी उभारलया असल्या तरी व्यक्तिीची प्रतिष्ठा व राष्ट्राची बांधणी हे समान सूत्र त्यामध्ये दिसून येते. या सर्व क्षेत्रामध्ये त्यांनी काम केल्याने इतर प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्राला बराच पुढे जाण्यास चालना मिळाली आहे.

स्वातंत्र्य पूर्वकाळात त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अहोरात्र कष्ट केले. क्रांतिची ज्योत खेड्यापाड्यात पोहचविण्याचे कार्य केले ते केवळ क्रांतिचे समाज प्रचारक नव्हते तर ते क्रांतिचे अनेक तत्वे समाजमूख अंगीकारणारे देवदूत होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे अत्यंत विश्वासू व जहाल क्रांतिकारक असा त्यांचा उल्लेख मिळतो. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर ते एकाच खुर्चिला अथवा सत्ता भोगत बसले नाहीत यासाठी तर त्यांनी समाजातील समता, बंधुता, दलित, शेतकरी, कष्टकरी यांच्या कल्याणासाठी चळवळी उभ्या केल्या. तसेच गोरगरीब मुलांना–मुलींना शिक्षणाची सोय करून दिली. समाजातील शेतकरी वर्गाला नगदी पिकांचे पैसे मिळावेत यासाठी त्यांना साखर कारखाना, दूध संघ, कापड गिरणी, महिला उद्योग या करवीर महाराष्ट्रातील जनतेला आर्थिक स्तरातून पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहेत.

आज सुद्धा ते कामगारांच्या शेतकऱ्यांच्या, धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी सरकारशी लढत आहेत. अण्णांनी महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा क्षेत्रात भरीव कार्य केले आहे.

सुधारणा करताना मुलभूत प्रश्न कोणते ते ओळखून आहेत. या देशातील जातीभेदाचे अडसर सर्वच क्षेत्रामध्ये विकासाला मारक असल्याने त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा सर्व बाजूनी विचार करून त्यांच्या चळवळीना योग्य न्याय देण्यासाठी व त्यांच्या प्रश्नासाठी ते लढत आहेत.

अस्पृश्यांच्या परिषदा घेऊन महार वतन खालसा करण्यासाठी मंदिर प्रवेशासाठी चळवळी उभा केल्या आहेत. म. फुल्यानंतर शेतकरी प्रश्नाकडे फारसे कोणाचे लक्ष नव्हते त्यामुळे त्यानी या प्रश्नाकडे आपले लक्ष दिले व सारा बंदीसाठी आंदोलन केली. शेतसारा खंड या प्रश्नांने शेतकऱ्याचे करोडो रूपये नुकसान टाळले. अन्यायकारक सरकारी कायद्यांना त्यांनी चळवळीच्या माध्यमातून विरोध करत असले कामगार, मजूर, शेतकरी, दलित, स्त्री उद्धार यांच्या चळवळीचे आज महाराष्ट्रातील ते नेते आहेत.

अण्णांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला लोकशाही व नैतिकतेचा आधार देण्याचा प्रयत्न करत आहेत. आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला आहे. आज त्यांचे राजकारण समन्वयाचे राजकारण आहे. ब्राम्हण, मराठे-मराठेत्तर कुलीन यासारखे मतभेद मिटवून ते उदारवादी राजकारण महाराष्ट्राच्या नव्या पानावर मांडण्याचा प्रयत्न करत आहेत.

थोड्यात अण्णांनी आयुष्यभर यातना सोसून महाराष्ट्राच्या भावी विकासाची आर्थिक राजकीय, सामाजिक व मानसिक तयारी करण्याचा त्यांचा सातत्याने प्रयत्न आज सुद्धा सुरू आहे.

**बहुजनवादी राजकारण :**

नागनाथ (अण्णा) नायकवडी हे बहुजन समाज्याच्या हिताची काळजी वाहणारे एक तत्वचिंतक सत्यशोधक व समाजाचे नाड ओळखणारे क्रांतिवीर आहेत. हे त्यांच्या कृतितून व भाषणातून सातत्याने जाणवत आहे. गौतम बुद्धाने प्रथम 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा संदेश दिला. तोच वारसा पुढे महात्मा फुले-राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जोपासला व आग्रहाने प्रतिपादन ही केला. या अर्थाने बहुजवादी समाजकारणाचा व

राजकारणाचा पाया घालण्याचे श्रेय बुद्धालाच देणे योग्य ठरते. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी वरील बहुजनवादी परंपरा पुढे चालवून बहुजनवादी विचाराला त्यांनी चालना दिली आहे.

नागनाथ अण्णांचे प्रेरणास्थान 'महात्मा फुले' होते. तसेच अण्णांच्या मूलगामी चिंतनात फुलेंच्या बहुजनवादी विचाराला महत्व अण्णांनी दिलेले आढळून येते. जसे महात्मा फुल्यांनी बहुजनवादी विचार केवळ संस्कृतीच्या आधारावर केलेला दिसत नाही तसाच अण्णांनी हा विचार केलेला आढळतो. संस्कृतिकरणाच्या मर्यादा फुलेनी निश्चितच ओळखल्या होत्या. संस्कृतिकरणाने सामाजिक स्थान उंचावणे फक्त सर्वणांना शक्य होते. दलित अस्पृश्य नाही. यासाठी त्यांना संघटीत करून बहुजनवादी सामाजिक परिवर्तन घडवून आणता येईल अशी फुलेंची धारणा होती.

बहुजनवादी विचाराचे समर्थन राजर्षि शाहू यांचे विचार लोककल्याणकारी राज्य, विकेंद्रीकरण, समाजवाद, साम्यवादी शाश्वत तत्वे व निधर्मी लोकशाही यांना पुरक होते. राजर्षि शाहूची भूमिका यासंदर्भात दखल घेण्यासंधी आहे. राजर्षि शाहू म्हणतात, – ''आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधु आहोत. हिंदी प्रजानन कोणत्या ही वर्णाचे, धर्माचे असावे ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तिच्या दृष्टीने धर्माची बाब महत्वाची असेल पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हा ही आड येता कामा नये. या पुरती धर्म ही बाब फार कमी महत्त्वाची आहे, असे मला वाटते. आज हा विचार भारतातील नानाविध धर्माच्या लोकांनी अंगिकारला तर राष्ट्रीय एकात्मता व भारतीय जीवनाशी एक संघता सर्वांना साधता येईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तावीस वर्षात जातवारी व जातीयता काढली व कोणत्याही संघटनेच्या आड जाती प्रकार आडवे येतात. निवडणूकावर एकूण राजकारणावर व पर्यायाने औद्योगिक सुधारणेवर ते अनिष्ट परिणाम करतात. हा आजचा अनुभव सर्वांचा आहे.''[८६] या विकासाच्या सर्वांगिण कार्यात राजर्षि शाहू महाराज फारच पुढे असल्याचे त्यांच्या विचारावरून लक्षात येते. क्रांतिवीर नागनाथ

अण्णांनी राजर्षि व आंबेडकर यांच्या विचाराना आदर्श मानून समाज कार्य केलेले आढळून येते. समाजातील शेतकऱ्यांचे पोरं शिकावे. नोकरीस लागावे, त्याचा संसार चालावा एवढा विचार अण्णांनी केलेला आहे. म्हणूनच त्यांच्या सहकारी प्रत्येक संस्थेत बहुजनांच्या मुलांना संधी दिली गेलेली आहे. अण्णांच्या बाबतीत श्री. पन्नालाल सुराणा लिहीतात, ‘‘नागनाथ अण्णांनी मात्र स्वातंत्र्य प्राप्ती बरोबर आपल्या जीवनाचा नवा अध्याय सुरू केला. आपल्या आजूबाजूच्या लोकांचे दु:ख दारिद्र्य नष्ट व्हावे, अन्याय-जुलूम थांबावेत आणि सगळ्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आयुष्य वेचण्याचा ‘पण’ अण्णांनी केला. गोरगरीब शेतकरी, अलूतं बलुतेदार यांच्या बाजूने नागनाथ अण्णा उभे राहिल्याने सताधाऱ्यांचा त्यांच्यावर रोष असावयाचा, सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी आवश्यक ती जुळवाजूळव करून त्यांनी सरकारकडे रीतसर अर्ज केला. सत्ताधारी मंडळी त्यांची डाळ शिजू देईनात. अण्णांनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला अखेरीस त्यांना परवाना मिळाला. ती संधी आहे तसे आव्हान ही आहे. असे समजून अण्णा कामाला लागले. जिवाला जीव देणारे आणि आपले काम चोखपणे करणारे सहकारी मिळवले. हुतात्मा किसन आहेर सहकारी साखर कारखान्यात व्यवस्थापक, लेखपाल, एवढेच नव्हे तर यंत्राची देखभाल करणारे तंत्रज्ञ सुद्धा, साळी-माळी, दलित मुस्लीम आदी अठरापगड जातीतले निवडले. अल्पावधीत साखर कारखाना चांगल्या प्रकारे चालू लागला. साखरेचा उतारा साडेबारा - पावणेतेरा पडू लागला. महाराष्ट्रातील अनेक जुन्या कारखांन्याचा उतारा सुद्धा साडे अकरा टक्क्यापेक्षा पुढे जात नाही. त्यापेक्षा एक टक्का जास्त उतारा देणाऱ्या कारखान्याचे नाव सर्वत्र आदराने घेतले जाऊ लागले. यात आश्यर्च ते कसले? उतारा चांगला पडतो म्हणून शेतकऱ्यांना ऊसाला भावही चांगला द्यायचा असे धोरण अण्णांनी ठेवले. वायफळ खर्च अजिबात करायचा नाही. यंत्राच्या देखभालीत कसूर करायची नाही. कारखान्याचे चेअरमन एकदा चाऊस (मुस्लीम) झाले तर एकदा कांबळे’’[८७]

अण्णांचे कार्य व विचार हे बहुजनवादी जनतेसाठी आहेत व आज सुद्धा याच विचारांशी ठाम असलेले दिसून येते. बहुजनाच्या साठी आपला देह झिजवणारे अण्णा या युगातील पुरूष अवतार म्हणावा लागेल.

**स्वराज्य आणि धर्म व राजकारण :**

भारतीय समाजाचे भौतिक आणि राजकीय अंध:पतनाची कारणे देऊन स्वराज्य विषयक कल्पना नागनाथ अण्णांनी विषद केली आहे. अंधश्रद्धा दैववादावरील आंधळा विश्वास आणि आधुनिक विज्ञानवादाशी आपण केलेली प्रतारणा हेच भारतीय अध:पतनास कारणीभूत उरलेले घटक आहेत असे ते ठामपणे आपल्या भाषणात सांगतात. स्वराज्य किंवा देश स्वातंत्र्य करण्याच्या प्रकियेस धर्मयुद्ध आहे असे समजतात.

नागनाथ अण्णा राजकीय स्वातंत्र्यापेक्षा अध्यात्मिक स्वातंत्र्यकाळ महत्व दिले असले तरी राजकारणाच्या अध्यात्मिकरणाला त्यांचा विरोध आहे. कारण त्यामुळे राजकारणात धर्माचा गैरवापर होतो व राजकारणावर धर्माचे प्राबल्य निर्माण होते. धर्म आणि राजकारणाची सरमिसळ देशहिताच्या दृष्टीने घातक असते असे त्यांचे मत आहे. धर्म आणि राजकारणाची सांगड घालून ब्रिटीशांनी भारतात 'फोडा आणि झोडा' या कुटनीतिचा अवलंब केला होता. याचे भान त्याना आहे. म्हणून त्यांनी स्वराज्यच्या संकल्पनेत धार्मिक राजकारणाला छेद दिला. स्वातंत्र्यानंतर नव भारताची रचना धर्म निरपेक्ष तत्त्वावर व्हावी अशी त्यांची तीव्र इच्छा होती व त्या दृष्टीने एक क्रांतिवीर म्हणून त्यांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. राजकीय घडामोडीवर धर्म, श्रद्धा, कल्पना यांचे वर्चस्व प्रस्थापित होऊ नये म्हणून अण्णा नेहमी दक्ष असतात. ६ डिसेंबर १९९३ रोजी बाबरी मशीद पाडल्या नंतर अण्णांनी राष्ट्रीय एकात्मेचे प्रतिक म्हणून एक प्रंचड मानवी साखळी संघटीत केली. ८० कि.मी. लांबीची लोकांची रॅली काढून त्यांनी जातीवादी, धर्माधशक्तीला विरोध दर्शविला. एवढेच केले नाही तर कोल्हापूरच्या गांधी मैदानावर तीन जिल्ह्यातील ५० हजारापेक्षा जास्त कार्यकर्त्यांचा

मेळावा घेऊन धर्माच शक्ती विरोध आवाज उठाविला. अण्णांनी या काळात ३०० पेक्षा अधिक ठिकाणी सभा घेऊन आपल्या धर्मनिरपेक्ष बुद्धीचे दर्शन घडविले. नागनाथ अण्णा बिमाडे दिनाविषयी सांगतात, ''जातियवाद्यांनी ६ डिसेंबर हा दिवस बाबासाहेब आंबेडकर याचा महानिर्वाह दिन बाबरी मशीद पाडण्यास मुद्दाम निवडला होता. तसेच मुस्लीम वेश धारण करून नथुराम गोडसे ने महात्मा गांधीचा खून केला हे सर्वसामान्य जनतेला धर्मांध शक्तीचा डाव कळावा म्हणून ६ डिसेंबर या दिवशी बिमाडे दिन साजरे करण्याचा उद्देश आहे.''[८८]

थोडक्यात अण्णांनी धार्मिकता, धर्म अशा या सर्व गोष्टींना राजकारणातून अलिप्त ठेवलेले आहे. अर्थात् धर्म व राजकारणाची वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा केलेली आढळून येते. त्यांनी राजकीय किंवा राजकारण व आर्थिक व्यवहारात सुद्धा धार्मिक बाबींना स्थान दिलेले नाही.

**स्वराज्याची आर्थिक नीति :**

भावी स्वराज्याची आर्थिक धोरणाबाबत अण्णांची तात्विक बैठक दिसून येते. त्यांनी भारताला आधुनिक आणि वास्तवादी दृष्टीकोनातून स्वराज्याच्या आर्थिक धोरणाचा विचार केलेला आढळून येतो. भारतीय अर्थ व्यवस्थेत आधुनिक पद्धतीचा अवलंब करून भारताला भूतकालीन सामर्थ्यवान, वैभवशाली बनविण्याचे अण्णांचे ध्येय आहे. यासाठी ते आज सुद्धा भारतीय सरकारशी संघर्षाचा लढा लढण्यास तयार आहेत. ते म्हणतात, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला मिळालेले राजकीय स्वातंत्र्य आपणाला अपेक्षित असलेले खरेखुरे स्वातंत्र्य नाही. कामगार, शेतकऱ्यांना जनसतेत सहभाग व आर्थिक उन्नतीसाठी लागणारे उद्योग धंदे हे जन सामान्यांसाठी असणे म्हणजेच आर्थिक स्थितंराची वाटचाल होय''[८९] सामाजिक आर्थिक राजकीय आणि सांस्कृतिक स्वातंत्र्या प्राप्तीच्या दृष्टीकोनातून त्यांनी नि:संदिग्धपणे मला भारतात समाजवादी लोकराज्य हवे आहे अशी भूमिका घेतली आहे.

त्यांनी दारिद्र्य, निरक्षता, रोगराई लोकसंख्या, बेकारी आदि राष्ट्रीय समस्या सोडविण्याचे धोरण आखलेले आहे व ते स्वत: आपल्या विभागात त्या पद्धतीने आर्थिक स्तोत्र वाढविण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. विविध उद्योग-धंदे व कामगार भरती. साखर-उद्योग, कापड उद्योग, शैक्षणिक व तांत्रिक उद्योग, आदि द्वारा आर्थिक विचार समाजात रूजवत आहेत. आधुनिक विज्ञानाची कास धरून राष्ट्रीय उत्पादन आणि त्याचे वाटप कसे करावे याचे ते नियोजन करतात.

भारतातील दारिद्र्य निर्मुलनासाठी स्वस्त कर्ज वाटप धोरण, जमीन धारणा पद्धतीत बदल, सहकार चळवळीला प्रोत्साहन आणि कृषि क्षेत्रात आधुनिकतेला प्राधान्य व उपाय योजनाचा त्यांनी विचार व्यक्त करून प्रत्यक्षात कृतित अवलंबला आहे. भारतात कुटीर उद्योगांना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रयत्नशील असतात. समाजातील जनतेचे राहणीमान उचविण्यासाठी भौतिक क्षेत्रात प्रगती होण्यासाठी आधुनिक व समाज वादाची कास धरली पाहिजे असे त्यांचे मत आहे.

राजकीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य त्यांनी स्वराज्य संकल्पनेत स्वीकारलेले आढळून येते. हाच त्यांच्या स्वराज्य विचारांचा व्यापक पाया आहे. राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक, आर्थिक सुधारणांनी त्यांनी प्राधान्य दिलेले आढळते. त्यांच्या स्वातंत्र्य किंवा स्वराज्य कल्पनेतून आधुनिकता, विज्ञाननिष्ठा, विवेकवाद, मानवतावाद ही मूल्ये प्रतिबिंबीत होतात.

**लोकशाही विषयक विचार :**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात क्रांतिवीर अण्णांनी शिरकाव केल्यानंतर त्यांनी केवळ ब्रिटीश गुलामगिरीतून भारताची मुक्तता करणे एवढेच ध्येय ठेवले नव्हते. तर भारताच्या राज्य पद्धतीचे समीकरण करण्यात ते पुढे होते. भारताची भावी समाजव्यवस्था समाजवादी लोकराज्य तत्त्वावर आधारलेली असावी असे त्यांचे मत असे भारतीय समाज जीवनापुढे

असलेले आव्हानांना पेलण्याची क्षमता असणारी 'शासन' संस्था त्यांना अभिप्रेत होती. परंतु लोकशाही जरी सर्वश्रेष्ठ शासन प्रणाली असली तरी ती राबविण्यात अनेक आव्हाने असतात. त्यामुळे ती आज सुद्धा यशस्वी होण्यास असमर्थ ठरली आहे.

नागनाथ अण्णा अशा स्वातंत्र्याबद्दल आपली नाराजी व्यक्त करतात ते म्हणतात, – ''आम्ही एक टप्पा ओलांडले की आमचे एक पाऊल पुढे पडते परंतु ब्रिटीश भांडवलदारांचे सरकार गेले व हिंदी भांडवलदाराचे आणि उच्चवर्णीय वर्गाचे हिंदी सरकार अस्तित्वात आले. देशातील कष्ट करणाऱ्या जनतेला, दडपलेल्या जाती–जमातींना व महिलांना वाटले तरी आपली आता गरीबी हटणार, दुःख संपणार, सुखाचे दिवस येणार पण तसे काही घडणार नाही याची जाणीव झाल्यामुळे मी १६ ऑगस्ट पासून समाज बांधवांच्या समाज सेवेचे, अन्यायाला तोंड देऊन तो दूर करण्याचे पूर्वीचे काम चालू ठेवले.''[१०] थोडक्यात आज सुद्धा अण्णांना लोकशाही तत्त्वप्रणाली हवी आहे व त्या प्रणालीचे ते पाईक आहेत. अण्णांचे राजकीय तत्त्वज्ञान लोकशाहीच्या प्रेरणेने भारावलेले आहे. मानवी जीवनातील नैतिक अधिष्ठानाला महत्त्व देणारे त्यांचे गुरू क्रांतिसिंह नाना पाटील, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावातून अण्णांनी आपल्या जीवनात नैतिकतेला महत्व दिले. सेवा, त्याग, संयम ही आदर्श जीवन मूल्ये नागनाथ अण्णांच्या लोकशाही जीवन मार्गाच्या केंद्रस्थानी आहे. त्यातून त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान आकार घेताना दिसून येते.

**लोकशाहीचे समर्थन :**

नागनाथ अण्णा हे लोकशाहीचे समर्थक आहेत. तरी ही त्यांनी कांही उणिवा आजपर्यंत दाखवून दिलेल्या आहेत. लोकशाही जरी सर्वश्रेष्ठ शासन प्रणाली असली तरी ती राबविण्यात अनेक आव्हाने असतात. त्यामुळे ती यशस्वी होण्यास कठीण आहे असे त्यांचे मत आहे. तिच्या यशस्वी त्यासाठी जागृत लोकमत, सुसंघटीत राजकीय पक्ष, लोक सहभाग, सहिष्णुता इ. बाबींची आवश्यकता असते असे त्यांचे विचार आहेत.

लोकशाहीत अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते आणि ती जनता जर नाराज आणि उदासिन असेल तर राज्याची सत्ता त्यांच्या हाती जाण्याऐवजी स्वार्थी व्यक्तीच्या हातातील बाहुले बनते. अशा प्रवृत्तीमुळे लोकशाही यशस्वी होत नाही. अशी त्यांची खात्री आहे. अण्णा हे शासनाची अंतिम सत्ता लोकांच्या हाती असावी या विचारांचे पुरस्कर्ते आहेत. लोक इच्छेवर आधारलेले शासन असावे अशी ते भूमिका येतात. म्हणूनच ते ठिकाणी सुंदर विचार स्पष्ट करतात ते म्हणतात, ''सांगली, सातारा, कोल्हापूर हा टापू ऊसाच्या साखर उताऱ्यात आघाडीवर आहे. इतर धान्याच्या उताऱ्यात ही आघाडीवर आहे. या टापूत निर्माण होणारी माणसे विशेष गुण असणारी असावीत. म्हणून या तीन जिल्ह्यातून स्वातंत्र्य संग्रामात झालेला उठाव अखेरपर्यंत टिकला. स्वातंत्र्य मिळविणेचा या टापूचा सहभाग विशेष महत्त्वाचा ठरला. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने व नागरिकांनी उठाव केला आणि गोऱ्याची सत्ता गडगडली. त्यातच महात्मा गांधीची जनशक्ती प्रभावी ठरली. स्वातंत्र्य पूर्व काळात काँग्रेस पक्ष स्थापन झाला. त्याची स्थापना एका गोऱ्या अधिकाऱ्याने केली. हा काळा डाग कायम मनात राहिला. लोकमान्य टिळक यांची काँग्रेस ही पांढरपेक्षी होती. तरी ग्रामीण भागात पोहचलीच नाही. मिळालेले स्वातंत्र्य शेतकरी, कष्टकऱ्याचे नाही हे क्रांतिसिंह नाना पाटलांनी ओळखले होते म्हणून त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. ५० वर्षे लोटली तरी आम्ही खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत.''[९१] अण्णांना ब्रिटीश हुकुमशाहीचा तिटकारा आहे. शालेय जीवनापासून त्यांनी इंग्रजाची हुकुमशाही सत्ता पलटण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनात आलेले विदारक अन्यायी हुकुमशाही आलेला असलेने लोकशाही तत्त्वांचा स्वीकार केलेला आहे. भारतात लोकशाही प्रवृत्ती तीचे धोरण यापैकी प्रत्यक्षात व्हावीत अशी त्यांची इच्छा आहे.

**समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय :**

नागनाथ अण्णानाचा स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय या मूल्यावर त्यांचा विश्वास व निष्ठा आहे. व्यक्ति स्वातंत्र्या बरोबर, सामाजिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य ही त्यांना अभिप्रेत आहे व ते सर्व वर्गासाठी स्वातंत्र्याचा आग्रह धरतात. समाजातील विषमता नष्ट झाल्याशिवाय प्रत्येक व्यक्तिला स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही असे त्यांना वाटते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत व संग्रामास त्यांना साम्राज्यवादाच्या विरूद्धची लढाई मानत होते. त्यांना स्वातंत्र्याच्या संकल्पनेत संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे सर्वांचे स्वातंत्र अभिप्रेत आहे. पुरूषा बरोबर स्त्रीयांना अल्पसंख्याकांना, श्रीमतांबरोबर गरीबांना स्वातंत्र्य हवे असा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो. जमातवाद व धार्मिक भेदभाव हे स्वातंत्र्याचे खरे शत्रू आहेत असा त्यांचा मानस आहे. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. लोकशाहीचे दूसरे मूल्य म्हणजे समता होय. अण्णां स्वातंत्र्य व समता परस्परपुरक मानतात. त्यांना पूर्ण स्वातंत्र्य म्हणजे आर्थिक जातीभेद निर्मुलन, सामाजिक रूढी, मुक्तता असा कार्य अभिप्रेत आहे.

जन्म, जात, धर्म, भाषा प्रदेश इ. आधारावर असलेली विषमता नष्ट करून समतानिष्टीत समाज निर्माण करणे म्हणजे समता होय अशी त्यांची धारणा आहे. ते समाजवादी विचाराने प्रेरित झाले असल्याने त्यांना समता हे मूल्य अधिक प्रिय वाटत आहे. त्यांनी आपल्या समतेच्या धोरणात जातीयतेचे उच्चाटन करण्याच्या कार्यक्रमााला, हिंदु-मुस्लीम ऐक्याला, जमिनदारी निर्मुलनाला, गृहउद्योगाला महत्त्व दिले. त्यांचे विचार हे व्यक्तिचा विकास याकडे राहिलेला आढळतो. एके ठिकाणी आपले विचार स्पष्ट करताना म्हणतात, ‘‘बहुजनांच्या सत्यशोधक चळवळीचा विकास करण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा घटक गरजू व्यक्ती हा आहे. ज्यांना जमीन नाही इतर काही उत्पन्नाचे साधन नाही अशा व्यक्तीच्या प्रश्नांवर चळवळी करणे व चळवळीच्या साहय्याने कष्ट करणाऱ्याचे, गरजू व्यक्तीचे सामर्थ्य

वाढविण्याची गरज आहे. तरच आपणा सर्वांचे प्रश्न सुटणार आहेत.''[१२] न्याय हे लोकशाहीचे आणखी एक आधारभूत तत्व आहे. अण्णांनी न्याय ही संकल्पना जुनी व व्यापक संकल्पना मानतात. तिचा धर्म या संकल्पनेशी जवळचा संबंध मानतात.

अण्णांनी लोकशाहीत बंधुभावाना विशेष महत्त्व दिलेले आहे. बंधुत्व या राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. नवभारताच्या जडणघडणीत धार्मिक वितंडवाद व जात हे प्रमुख दोन अडथळे सतत विचलीत करताना त्यांना दिसतात. ब्रिटीशानी जाती-जाती व धर्मा-धमृात बंधुभावाची भावना निर्माण करण्याच्या प्रयत्नांना विरोध केला होता. समतेप्रमाणे बंधुता हे राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट साध्य करण्याचे मूल्य आहे असे अण्णांना वाटत होते.

नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यत्तोर काळात सौदेबाजीचे व तडजोडीचे राजकारण कधीच केलेले नाही. राष्ट्र मुक्ती आणि देश सेवेने प्रेरित होऊन ही कार्ये कर्तव्य मानून केलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या व्यापक बुद्धीचा व मनाचा ठाव हा लोकशाही तत्त्वाकडे अधिक आकर्षक होताना दिसतो. अर्थात अण्णांच्या भाषणाचा राजशास्त्रीय भाषेत चिकित्सा केल्यास आपणास हेच दिसून येते की, सामाजिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह अण्णांनी पूर्वीपासून केलेला आहे आणि आज सुद्धा ते स्वातंत्र्याचीच मागणी करत आहेत.

**धर्मनिरपेक्ष विचार :**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा व विचार परंपरेचा आढावा घेत असताना धर्मनिरपेक्षता हा कळीचा मुद्दा ठरतो. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटीशांनी अवलंबलेल्या 'फोडा व झोडा' वृत्तीच्या परिणामातून स्वातंत्र्य चळवळीला धर्मनिरपेक्षचा आशय देण्याचा ज्या-ज्या विभूतीनी प्रयत्न केला त्यामध्ये नागनाथ अण्णांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो असे म्हणावे लागेल.

अण्णांनी आपल्या धर्मनिरपेक्ष विचारांची सैदान्तिक, चौकटीबद्ध मांडणी केली नसली तरी त्यांनी आपल्या व्यक्तीगत आणि सार्वजनिक जीवनात अवलंबलेल्या धोरणामधून त्यांची धर्म निरपेक्ष विचारांशी असलेली बांधिलकी स्पष्ट होते अशा समभाव राखणारे क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणजे एक वैशिष्ट पूर्ण व्यक्तिमत्व होय.

**नागनाथ (अण्णा) अस्पृश्यांच्या चळवळी व परिषद :**

नागनाथ अण्णांनी अस्पृश्यतेच्या उदाराच्या चळवळी राबविली. म. फुलांच्या नंतर चळवळी उभारण्याचा प्रयत्न छ. शाहू व छ. सयाजीराव गायकवाड यांनी केला. हे दोघे संस्थानिक असल्याने त्यांच्या हातात चळवळी उभारण्यासाठी आवश्यक ती राजकीय सत्ता होती. क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या हातात अशी पुरेशी सत्ता नसताना केवळ समाज परिवर्तनाच्या व्यापक ध्येयासाठी त्यांनी अस्पृश्यता निमूर्लनाच्या कार्यात तन्मतेयने कार्य करत आहेत. त्यांनी वाळवा, तासगांव तालुक्यातील ८० गांवातील प्रत्येकी संघटन बांधून महार वतनी जमिनी रयतावा करण्याच्या मागणीसाठी परिषद घेतल्या.

अनेक वर्षाच्या सामाजिक अन्यायाच्या विरोधात महार समाज बांधवाना एकत्र आणून संघटितपणे सरकार पुढे महार वेठबिगारी रूढीच्या परंपरेला संपविण्यसाठी नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला. शेवटी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यावर ना. यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने कनिष्ठ महार वतन खालसा करण्याचे बिल विधानसभेत मांडले व पास ही झाले. या काळात नागनाथ अण्णा विधानसभेत सदस्य होते. १९५७ ते १९६२ या काळात या प्रश्नावर त्यांनी आवाज उठवून बिल पास करण्यासाठी पुढाकार घेतलेला आढळून येतो.

अण्णांनी १९८८ साली दलित-आदिवासी साहित्य संमेलन हुतात्मा किसन आहेर विद्यालयाच्या प्रांगणात भरविले. कामगार वर्ग राबणाऱ्या सर्व जाती-जमातीच्या व स्त्रीमुक्तीच्या चळवळी एकत्र येवून नवीन उपक्रम वाळव्याच्या पार्श्वभूमीने सुरू केला.

संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात जेष्ठ कवी नारायण सुर्वे म्हणतात – ''आपण स्वतंत्र होऊन ४० वर्ष लोटली तरी फार मोठी राजकीय मन्वंतर घडले आहे असे वाटत नाही. पिळवणूक व छळवणूक असे सर्व प्रकार आबाधित चालूच आहेत. कायदे झाले खरे परंतु ते सत्ताधिशांच्याच बाजूने कसे वळले जातील हेच सातत्याने पाहिले गेले. धनधांडग्या वर्गाना अजून ही या देशात अभय आहे. तर सर्व सामान्य जनतेचे रोजच्या जगण्यातले भय भयानक स्वरूपात वाढले आहे. जातीच्या नावाखाली दंगेधोपे मोकाटपणे होत असून शासक वर्ग वेगवेगळ्या नावाखाली काम करणाऱ्या विविध संघटनाना पाठीशी घालीत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटीलह, विठ्ठल रामजी शिंदे, भाई माधवराव बागल, महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा आधार घेत आपल्या परिस्थितीतून वाट्यास करावयाची आहे. पिळवणूक, जातपात, उच्चनीच असा भेदभाव किंवा पिळवणूक करणाऱ्या शक्तीचा समूळ नारा होईल व नवा प्रगतशील भारत देश साकारला जाईल असे आपले ध्यये आहे. यासाठी एक सहकारी म्हणून आपल्या साहित्याला व तिच्यातील सर्व कर्तबगार प्रतिभावंतानी सिंहाचा वाटा उचलावा''[९३] अण्णांनी वाळव्यामध्ये चौथे दलित साहित्य १९९६ ला भरवले या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बाबुराव बागुल म्हणतात, – ''बहुजन समाजाच्या चळवळीत पुन्हा नव्याने गती देण्याचे महत्वपूर्ण कार्य बहुजन समाजातील साहित्यिकांनीच करायचे आहे. भारतीय समाजात ज्या प्रकारची विषमता व असमानता आढळून येते तशी असमानता जगाच्या पाठीवर अन्यत्र कोठे दिसून येत नाही. ही मनोवृत्तीच भारतीय समाजाच्या विघटनाचे खरे कारण आहे. यामध्ये बदल होण्याची नितांत आवश्यकता आहे. गेल्या अनेक काळापासून केवळ शोषकांचीच सत्ता आहे. या काळात वर्ण वर्चस्व वाढविण्याचे पद्धतशीर प्रयत्न झालेले दिसून येतात. बहुजन समाजातील शंबुक, एकलव्य, बळी व कर्ण आदि नायकांना संपविण्याचे कारस्थान या काळात घडले. गेल्या काही दिवसात बहुजन समाजाची चळवळ कांहीशी थंडावल्याने समाजातील या मनुवादी प्रवृत्तीने पुन्हा उचल खाल्ली आहे. त्याचा गांभीर्याने

विचार करण्याची आवश्यकता आहे.''[९४] नागनाथ अण्णांनी बहुजन समाजामधील विद्वान जाणकार, विचारवंतानी भूमिका घेवून साहित्य क्षेत्रातही काय कृत्य करायला हवे याचे मार्गदर्शन व प्रबोधन दलित–आदिवासी साहित्य संमलेनाच्या निमिताने केलेले आहे. अर्थात् समाजातील दलित उद्धाराच्या पद्धतीत त्यांनी सर्वपरिणी प्रयत्न केलेले आढळून येते.

२३ डिसेंबर २००१ मध्ये विद्रोह मराठी साहित्य संमेलनांच्या प्रमुख पाहुणा या नात्याने क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) भाषण करताना म्हणतात,–''आपण १५ वर्षे गुलामगिरीत होतो अनेक चळवळी केल्या. पोटासाठी लष्करात गेलो, आझाद हिंद सेनेचे सुभाषचंद्र बोस यांनी स्थापना केली. म्हणून ब्रिटीश सरकारने धास्ती घेतली. त्यांचे राज्य गेले व आम्हास स्वातंत्र्य मिळाले. बहुजनांचे दु:खच वेगळे तर ब्राम्हणवाद्यांचे दु:ख वेगळे आहे. या दु:खातून वेगळे व्हायचे असेल तर ब्राम्हणी संस्कृतीतून मुक्त झाले पाहिजे महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळ उभी केली म्हणून सर्व संकटातून मुक्त झालो अशा प्रकारची विद्रोही चळवळ व्हावी तो दिवस उजाडावा''[९५] असे त्यांना वाटते. नागनाथ अण्णांनी अशा चळवळी व सत्यशोधक संमेलन मधून समाज प्रबोधन केलेले आढळते.

लातूर येथे पहिले सत्यशोधक साहित्य संमेलन २००३ मध्ये आयोजित केले होते. त्या वेळे नागनाथ अण्णांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती प्रतिमेचे अनावरण झाले. त्या प्रसंगी अण्णा म्हणतात, – ''बहुजन समाजाच्या हिताची सत्यशोधक चळवळ जनतेपर्यंत नेण्यात आपण यशस्वी झालो नाही. महात्मा फुलेंच्या या चळवळीच्या धागा पुढे न नेणारे आपण गुन्हेगारच आहोत. महात्मा फुले यांची चळवळ राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय देऊन उचलली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ती पुढे देश पातळी वर नेली. संपूर्ण समाजाने ही चळवळ स्वीकारण्याची गरज आहे. तसा प्रयत्न सत्यशोधक साहित्यिकांनी केला पाहिजे. केवळ शोभे पुरती चळवळ न वापरता खऱ्या अर्थाने बहुजनांची असलेली ही चळवळ बहुजनापर्यंत पोहाचवावी''[९६] थोडक्यात अण्णांनी अनेक संमेलन, परिषदा, चळवळी द्वारे

दलित उध्दाराचे कार्य केलेले आढळते. त्याचे विचार व दृष्टिकोन व्यापक आहे, मानवाचा समाज हा जाति विरहीत असावा. गुलामगिरी व वेठबिगर हे त्यांना आवडत नाही. जात व धर्म समाज परिवर्तन आडवे येतात त्यामुळे विकास होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

**हिंदु–मुस्लीम ऐक्य व अखंड हिंदुस्थानासाठी प्रयत्न :**

स्वातंत्र्य आंदोलनाचा लढा व्यापक बनविण्यासाठी हिंदु व मुसलमान यांनी स्वातंत्र्याची लढा व्यापक बनविला. या लढ्यास हिंदु बरोबर मुसलमान यांचा पाठिंबा आवश्यक होता या दृष्टिने अण्णांनी हिंदु–मुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. १९३७ ला स्थापन झालेल्या प्रांतिक मंत्री मंडळात काँग्रेसने मुस्लीम प्रतिनिधीना सामावून न घेतल्यामुळे दहा वर्षानंतर देशास फाळणीस सामोरे जावे लागले, असे त्यांचे मत आहे. ब्रिटीशांची 'फोडा–झोड' ही नीति यशस्वी झालेचे त्यांना दुःख आहे.

**सामाजिक सुधारणाबाबत विचार :**

ब्रिटीश सत्तेच्या जोखडातून भारत भूमीची मुक्तता करणे एवढेच ध्येय समोर ठेवून अण्णा स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले नव्हते तर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शक्तीशाली नवभारताच्या निर्मितीचे आराखडे ही त्यांनी तयार केलेले होते. केवळ राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करणे ही संकुचित अर्थ त्यांना आपल्या स्वातंत्र्य संकल्पनेत अर्थ अभिप्रेत नव्हता. तर समाजाच्या सर्व क्षेत्रात स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा त्यांचा विचार होता ते मुलतः समाजवादी विचारांचे आग्रही असल्यामुळे राजकीय स्वातंत्र्या बरोबर सामाजिक आर्थिक स्वातंत्र्याला महत्त्व देतात. भारताच्या सामाजिक, आर्थिक पुर्नबांधणीत त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या सामाजिक सुधारणा बाबतचा आढावा घेत असताना अण्णाचे जात, धर्म, दारिद्र्य लोकसंस्था व बेकारी बाबत विचार अभ्यासने गरजेचे आहे.

**धर्म, जात बाबत विचार :**

बालवयापासून विशाल दृष्टिकोन असलेले नागनाथ अण्णा धर्म, जात बाबत उदार मतवादी विचारांचे आहेत. वास्तवस्तेचे भान ठेवून धर्म आणि जातबाबत योग्य भूमिका घेतलेली दिसते. त्यांच्या ठायी असणारी धार्मिक वृत्ती त्यांना कर्मकांडा कडे घेऊन जात नाही. तसेच कट्टर पंथीय बनवत नाही तर ती निर्मळ व स्वच्छ विचारांने प्रकट होते. त्यांनी गुढवाद व अंधश्रध्देला प्रखर विरोध दर्शविलेला दिसतो. राष्ट्रीय ऐक्य व संपूर्ण स्वातंत्र्यसाठी ते ध्येयशील व त्यांच्या ठायी विकसित दृष्टिकोन आढळतो. त्यांचे मानवतावादी विचारामूळे धर्म व जातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन विशाल बनला आहे. त्यांचा पाप-पुण्य कर्म, पुर्नजन्म यावर विश्वास नाही. ते वैज्ञानिक व आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते आहेत. अस्पृश्यतेला त्यांचा विरोध आहे. जात-पात, मराठा, कुळ या सर्व बाबतीत ते विरोध करतात. त्यांचा वर महात्मा फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अधिक प्रभाव आहे. त्यांचे समाज परिवर्तन चळवळीत मोठे योगदान आहे. जाती व्यवस्थेला धर्माची मान्यता असेल तर ते चुकीचे आहे. ते जाती व्यवस्थेचे निमूर्लन करण्याचे प्रयत्न करतात. हिंदू धर्म सहित इतर सर्व धर्माबाबत त्यांची भूमिका सर्वधर्म समभाव आहे.

१८५७ च्या उठावात बहादूर शाह जफर, टिपू सुलतान, तात्या टोपे, झाशीची रानी, नाना पेशवे या सर्व हिंदु-मुस्लीम या संस्थानिकांनी एकतेच्या भावनेने ब्रिटीश सत्तेविरूद्ध लढा दिला होता. हा आदर्श अण्णांच्या पुढे आहे. धर्म हा व्यक्तीगत बाब आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ब्रिटीशानी आपल्या ‘फोडा झोडा’ तंत्राचा वापर करून भारतीय जाती-जमाती मध्ये तेढ निर्माण केले. त्यामुळे त्यांचे विरूद्ध लढ्याला बळकट रूप प्राप्त होत नाही त्यांनी जाती व्यवस्थेपन बाबत उपाय योजना ही सुचविल्या आहेत.

स्वतंत्र भारताचे शासन हे प्रत्येक धर्माबाबत निष्पक्ष भूमिका घेणारे असावे असे त्यांना वाटते. तसेच भारतातील प्रत्येक व्यक्तीला धार्मिक आचरणाचे व प्रचाराचे स्वातंत्र्य

असावे अशी ते भूमिका घेतात. जमातवाद हा ब्रिटीश सत्तेविरूद्धच्या लढ्यातील अडसर असल्यामुळे धार्मिक मतभेदाना बगल देण्याचा संदेश दिलेला आहे. जमातवाद व जातीयवादाला नष्ट करण्यासाठी शिक्षण व विकासाच्या संधीवर लक्ष केंद्रीत करण्यास सांगितलेले आहे. राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समान हक्क पाहिजेत. संपत्तीचे समान वाटप करावे ज्या योगे नवसमाज व्यवस्था निर्माण करणे सोपे होईल असे त्यांना वाटते.

जातीयता व जमातवाद संपुष्टात आणण्यासाठी लोकांची मानसिकता नष्ट झाली पाहिजे. या मानसिकतेच्या जागी राष्ट्रवादी मानसिकता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सातारच्या प्रतिसरकारच्यावतीने केलेला आढळतो.

**दारिद्र्य व बेकारी :**

ब्रिटीश राजपटीत भारतीयाचे दारिद्र्य व बेकारी अण्णांनी अनुभवली आहे. तशीच आजच्या म्हणजे २१ व्या शतकात अर्थात् स्वातंत्र्यानंतर सुद्धा या दोन समस्या ते जवळून पाहत आहेत. ग्रामीण भागातील व गरीब शेतकरी व दारिद्र्य यांची त्यांना अधिक चिंता होती. आपल्या वैचारिक चिंतनात दारिद्र्याची कारणे स्पष्ट करताना ब्रिटीशांच्या धोरणांना सर्वस्वी जबाबदार धरलेले आहे. सुभाषचंद्र बोस हे यासंदर्भात लिहीतात – ''ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी भारतीय लोकांची अन्न ग्राहक वस्तू आणि शस्त्रास्त्रांची गरज भागलेली होती. युरोपीय देशात भारताचा व्यापार सुरु होता. मात्र युरोपातील औद्योगिक क्रांतीमुळे ब्रिटीशांनी राजकीय वर्चस्वाद्वारे भारतातील पंरपरागत उद्योग यंत्रणा नष्ट केली. ब्रिटीशानी जाणीव पूर्वक भारत हा कच्चा मालाचा पुरवठा करणारी वसाहत राहील या दृष्टीने प्रयत्न केले. या औद्योगिकरणामुळे बहुतेक भारतीय हस्त व्यवसायांवर अनिष्ठ परिणाम झाला त्यामुळे त्यांना रोजगाराला मुकावे लागले. भारतातील ७०% लोकांची सहा महिने काम व सहा महिने बेकार अशी परिस्थिती निर्माण झाली.''[९७] भारतातील दारिद्र्याचे कारणे अशी आहेत. ब्रिटीशांनी

भारतीय उद्योग धंद्याचा पद्धतशीरपणे विनाश केला व भारतीय शासकीय व आधुनिक कृषि व्यवस्थेला खिळ घातली.

देशाच्या अर्थव्यवस्थेत व नवभारताच्या निर्मितीसाठी दारिद्र्य व बेकारीचा प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले आहे. या दोन्ही समस्या सोडविण्यासाठी वैज्ञानिक कृषी व्यवस्थापन अर्थात् शास्त्रीय शेती व औद्योगिकरण यांना महत्त्व दिले आहे. यासाठी त्यांनी शेतकरी व कामगार यांना हाताशी धरून अनेक उद्योग समूहांची निर्मिती केलेली आहे. औद्योगिकरणा बरोबर कुटीर उद्योग गृह उद्योग यांना सुध्दा महत्व दिले आहे. नागनाथ अण्णांनी दारिद्र्य निर्मुलनचा कार्यक्रम हाती घेऊन शेतकऱ्याची कर्जबाजारी कमी करणे, स्वस्त दरात कर्ज वाटप करणे, सहकार क्षेत्राचा विकास आधुनिक शेती विकास, छोट्या मोठ्या गृह उद्योगाना चालना मिळेल अशी व्यवस्था करणे व ग्रामीण विकासाकडे अधिक लक्ष देणे तसेच स्थानिक गरजा व समस्या सोडविण्यासाठी पंचायत राज्याचे महत्त्व वाढविणे पंचायत मार्फत व्यापारी मार्गदर्शन, गरीबांन मोफत आरोग्य, सुविधा, शिक्षण, आदि उपक्रम राबवावेत असे त्यांचे मत आहे. ग्रामीण जीवन मजबूत केल्या शिवाय बलाढ्य भारताची निर्मिती होणार नाही असा त्यांचा विश्वास आहे.

**स्त्री सुधारणाबाबत विचार :**

स्वामी विवेकानंद व माता यांच्या बरोबर, महात्मा फुले यांच्या विचार सरणीचा त्यांच्यावर प्रभाव असलेने स्त्री विकास किंवा सुधारणाबाबत स्त्री कडे ते आदर्श माता, बहीण या नात्याने पाहतात. काँग्रेस विरोधात डाव्या फळीचे नेतृत्व करताना त्यांनी स्त्री व महिलांच्या प्रश्नाकडे अत्यंत गंभीरतेने पाहिले आहे.

त्यांचा स्त्री शक्तीवर विश्वास आहे. ही शक्ती राष्ट्रवादी चळवळीस सहाय्यभूत ठरते असे त्यांना वाटते. त्यामुळे ते आज सुद्धा त्यांच्या मातोश्री यांना आपली आधी शक्ती मानतात. झाशीची राणी, अहिल्याबाई, सावित्रीबाई फुले यांना ते वंदनीय मानतात.

सांगली, सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारचे ते महत्वाचे सेनापती असलेने प्रतिसरकारच्या जाहीरनाम्यात स्त्रीला अधिक महत्त्व व मानाचे स्थान दिले गेले होते. विधवा महिलांचा पुर्नविवाह यासाठी त्यांचे महत्त्वाचे विचार त्यांचे दिसून येतात. त्यांना स्त्री शिक्षणाची चांगली जाण आहे. म्हणून मुलांसाठी जिजामाता प्राथमिक शाळा व हायस्कूल वाळवा येथे सुरू केले. स्त्री शिकावी व मोठी व्हावी यासाठी त्यांनी स्वत:च्या पत्नीस विवाह नंतर शिक्षण देण्यास सुरू केले व मुख्याध्यापिका पदापर्यंत पोहचविले. स्त्री शक्तीची त्यांना चांगली जाण आहे. या भूमिकेतून त्यांनी त्यांच्या चळवळीत आक्कामाता बिरनाळे, कुसुमताई, नायकवडी यासारख्या महिला सामावून घेऊन जबाबदारीची कामे करून घेतली. स्त्री शक्तीबदल नेहमी ते म्हणतात, ‘जो पर्यंत स्त्री जागी होत नाही तो पर्यंत भारत जागा होणार नाही.’

चळवळीच्या माध्यमातून सुरू केलेला स्वातंत्र्य संग्रामातून त्यांनी कधीच स्त्रीला मागे ठेवले नाही. घराघरातील स्त्रीयांनी हातात बंदूक घेतल्या शिवाय इंग्रज या देशातून पळून जाणार नाहीत असे त्यांना वाटत होते.

**शिक्षणाविषयक विचार :**

भारताच्या आजच्या व पूर्वीच्या आर्थिक सामाजिक पुर्नबांधणीमध्ये शिक्षणाची गरज क्रांतिवीर अण्णांनी जाणली होती. मुक्त भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कार्यक्रम आखला पाहिजे असे त्यांना वाटत होते. देशातील ९०% जनता निरक्षर असल्याने त्यांनी प्रथम प्राथमिक शिक्षणाला अग्रक्रम दिला.

शिक्षण ही गरज देश पारतंत्र्यात असल्यापासून आजपर्यंत सुटलेली नाही असे त्यांना मनापासून वाटते. लोकांची किंवा शिक्षण घेणाऱ्याची प्रबळ इच्छा शक्ती निर्माण झाल्याशिवाय आम्ही शिक्षणाच्या बाबतीत स्वावलंबी बनू शकणार नाही असे त्यांना वाटते. तत्कालीन इंग्रजी शिक्षणावर आणि शैक्षणिक धोरणावर ते टिका करतात. अण्णांनी आपल्या

शैक्षणिक कार्यक्रमात प्राथमिक शिक्षणाला अधिक प्राधान्य दिले आहे. हे प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना अनुभवातून दिले पाहिजे असे त्यांना वाटते. प्राथमिक शिक्षणात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे ते जाणीव करून देतात. प्राथमिक शिक्षणाची मुलतत्त्वे काय आहेत हे प्रथम सर्व शिक्षकांना माहीत असले पाहिजे. तसेच शिक्षकाच्या मनात विद्यार्थ्यांच्या बदल प्रेम व सहानुभूति असावी अशी ते अशा बाळगतात.

त्यांच्या मते शिक्षणाची तीन अंगे आहेत. (१) शिक्षकाचे व्यक्तिमत्व, (२) शिक्षण देण्याची पद्धत, (३) शिक्षण देण्याविषयीची क्रमिक पुस्तके. अण्णांना धर्मनिरपेक्ष व वैज्ञानिक शिक्षण अभिप्रेत आहे. तसेच शिक्षणात ते व्यवहारिक व तंत्र शिक्षणाची बाजू धरून ठेवतात. शिक्षणामुळे सांस्कृतिक एकात्मता घडवून आणने शक्य होते. मुलांच्या शिक्षणासोबत मुलींना ही शिक्षणाची संधी मिळावी यावर त्यांचा जोर राहिलेला आहे. शिक्षणाची सक्ती केल्यामुळे समाजातील निरक्षरता व दारिद्र्य नाहीसे होईल. मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळालेच पाहिजे. हे ते ठासून सांगतात व या प्रश्नावर कृती करतांना दिसून येतात.

थोडक्यात क्रांतिवीर अण्णांनी शिक्षणाचा संबंध राष्ट्रीय उद्दिष्टाशी जोडलेला आहे हे स्पष्ट होते. सांस्कृतिक व स्थानिक परिस्थितीच्या संदर्भातून त्यांनी शिक्षण व्यवस्थेकडे पाहिलेले आहे. चारित्र्यवान, त्यागी, धाडसी देशभक्त व नागरीक निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश्य शैक्षणिक विचारांच्या तळाशी आहे.

**लोकसंख्येबाबत विचार :**

क्रांतिवीर नागनाथ अण्णा स्वातंत्र्य आंदोलनाच्या व्यासपीठावरून लोकसंख्या वाढीच्या समस्येवर जाहीर भाष्य करत. यावरून त्यांची दूरदृष्टी जाणवते. त्यांनी केवळ इंग्रजी सत्ते विरूद्ध बंड केले नाही तर तत्कालीन व आजच्या सद्य परिस्थितीवर व समस्यावर चिंतन केलेले आहे. त्यामुळे आज सुध्दा ते उद्याच्या बलाढ्य भारताचे स्वप्न उराशी बाळगून वयाच्या ९४ व्या वर्षी सुद्धा या समस्यावर बोलत असत.

**संदर्भ :**


१. पाटणकर भारत – क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – २४

२. पवार वसंत (गुरुवार दि. २६ मे २००२) – अमर हुतात्मा (साप्ताहिक), पृष्ठ ८

३. नागनाथ अण्णा नायकवडी यांची प्रत्यक्ष मुलाखत, ठिकाण – वाळवा, जिल्हा सांगली दिनांक १२.०६.२०१०.

४. पाटील डी. बी. (२००२) – असे लढले क्रांतिवीर, प्रसाद वितरण ग्रंथ दालन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – २२

५. धर्माधिकारी भालचंद्र (१९९६) – (२००२) – क्रांतिवीर नागनाथ अण्णा गौरव समिती प्र. वाळवा, सांगली, पृष्ठ – १५२

६. पाटणकर भारत – क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा–सांगली, पृष्ठ – २३

७. पाटणकर भारत – क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी, पृष्ठ – २८

८. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ –४७

९. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ –१९

१०. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, वसंतराव पवार प्र. वा. साळवी, पृष्ठ – ३८

११. सनदे सा. बा. : जीवन संग्राम, म. रा. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, पृष्ठ – ३८

१२. नागनाथ अण्णा नायकवडी यांची प्रत्यक्ष मुलाखत, दि. १२ मार्च, २०१०

१३. दै. कोल्हापूर समाचार (२६ जानेवारी, २००२) : पृष्ठ – ४

१४. अहिर ज. य. (२००८) – क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गो. स. वाळवा.

१५. नागनाथ अण्णा नायकवडी यांची प्रत्यक्ष मुलाखत दि. १२ मार्च २०१०

१६. पाटील पी. बी. (२००४) : क्रांतिसागर, शांतीनिकेतन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – ३९४

१७. साप्ताहिक अमर हुतात्मा (२६ मे २००२) : पृष्ठ – १

१८. पाटणकर भारत (१९९६) : क्रातिवीर नागनाथ नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – ४३

१९. धर्माधिकारी भा. वि. (२००२) : क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन वाळवा, पृष्ठ – ४८

२०. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, पृष्ठ – ६०

२१. पाटील पी. बी. (२००४) : शांतीनिकेतन प्रकाशन, सांगली, पृष्ठ – २२२

२२. पवनेचा प्रवाह (१९९९) : साप्ताहिक पिंपरी–चिंचवड, पृष्ठ– ४

२३. लाड जी. डी. (१९९९) : क्रांतिअग्रणी पर्व (पाक्षिक), श्री लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस कुंडल, सांगली, पृष्ठ – २

२४. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा, पृष्ठ ग २७

२५. उपरोक्त, पृष्ठ – २०

२६. चामुंडराय चिं. (१९७१) : स्वातंत्र्याच्या हिमाचलावर मावळलेले दोन दिव्य तारे, हुतात्मा किसन अहिर स्मारक प्रकाशन, पृष्ठ – ३२

२७. सनदे सा. बा. (१९८८) : जीनवसंग्राम, भाग २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ, मुंबई, पृष्ठ – ८

२८. लाड जी. डी. (१९८६) : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारतीय विद्यापीठ प्रकाशन,पुणे, पृष्ठ – २९९

२९. सनदे सा. बा. (१९८८) : जीविन संग्राम, भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ –२२

३०. उपरोक्त, पृष्ठ–३१

३१. अहिर ज. य. (२००२) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – १२

३२. धर्माधिकारी भालचंद्र (२००२) :क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा, पृष्ठ –१२२

३४. सनदे सा. बा.(१९८८) : जीवन संग्राम भाग १, महाराष्ट्र साह्यि आणि सांस्कृती मंडळ, मुंबई.

३५. धर्माधिकारी भालचंद्र (२००२) : क्रांतिवीर, क्रांतिवीर ना. नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ. –९०

३६. अहिर ज.य.(२००६ क्रांतिवीर, क्रांतिवीर ना. नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – ३३

३७. सनदे सा.बा. (१९८८)– जीवन संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ प्रकाशन मुंबई. पृष्ठ – १०३

३८. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, वसंतराव पवार प्रकाशन वाळवा. पृष्ठ – ८९

३९. गुरव बाबुराव ( ) भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगाश, पृष्ठ – ४७

४०. दै. सकाळ (मार्च १९९९) पृष्ठ – ८

४१. दै. सकाळ (मार्च १९९९) पृष्ठ – ७

४२. गुरव बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगाश, पृष्ठ – ९०

४३. सनदे सा. बा. (१९८८) : जीवन संग्राम, पृष्ठ – १०८

४४. उपरोक्त पृष्ठ – ९०

४५. गुरव बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ९२

४६. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव अंक, (२५ ऑगस्ट १९९९) पृष्ठ–२

४७. पाटणकर भारत (१९९६) : क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, वसंतराव पवार प्रकाशन, वाळवा पृष्ठ – ४८

४८. गुरव बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ४२

४९. धर्माधिकारी भा. वि. (२००२) : क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, गौरव समिती, प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – १०९

५०. अहिर ज.य.(२००८): क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – ८९

५१. धर्माधिकारी भा. वि. (२००२) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – १९८

५२. पाटील पी.बी. (२००४) : क्रांतिसागर, शांतीनिकेतन प्रकाशन, पृष्ठ – ५०९

५३. उपरोक्त पृष्ठ – ८७

५४. उपरोक्त, पृष्ठ – ८७

५५. सनदे सा.बा. (१९८८): जीवनसंग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतिमंडळ, मुंबई, पृष्ठ – ८०

५६. गुरव बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ४८

५७. अहिर ज.य. – क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – २०

५८. पाटणकर भारत – क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृ. क्र.

५९. बागल बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ८२

६०. बागल बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ४८

६१. पाटील उत्तमराव (१९८७) : क्रांतिपर्व, लोकमानस धुळे. पृष्ठ – २२०

६२. अहिर ज.य. (२००८): क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा.पृष्ठ –२२२

६३. धर्माधिकारी भा. वि. – क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – ३४२

६४. बागल बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ४९

६५. धर्माधिकारी (२००८) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – ३४२

६६. अहिर ज.य.(२००८): क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृ. क्र.

६७. सिंह रामविचार – शुगर इंडस्ट्रीज इनइंडिया, पृष्ठ – ४२

६८. किसन अहिर सहकारी साखर कारखाना – वार्षिक अहवाल, पृष्ठ – ३

६९. बागल बाबुराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, पृष्ठ – ११२

७०. अहिर ज.य. (२००८) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा., पृष्ठ – २२

७१. (किसन अहिर सहकारी साखर कारखाना – वार्षिक अहवाल, पृष्ठ – ४

७२. धर्माधिकारी भा.वि. (२००२) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – १९५

७३. उपरोक्त, पृष्ठ – ९६

७४. आहेर ज.य. (२००९) क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – १६

७५. धर्माधिकारी भा.वि. (२००९) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – ११०

७६. उपरोक्त, पृष्ठ – २००

७७. तरूणेर स्वप्ने – सुभाषचंद्र बोस, अनुवाद भावे ह.अ., पृष्ठ – १६७

७८. धर्माधिकारी भा.वि. (२००८) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा. पृष्ठ – २०२

७९. उपरोक्त, पृष्ठ – १९८

८०. उपरोक्त, पृष्ठ – १९८

८१. उपरोक्त, पृष्ठ – १७७

८२. उपरोक्त, पृष्ठ – १८१

८३. उपरोक्त, पृष्ठ – १२४

८४. उपरोक्त, पृष्ठ – १२४

८५. चव्हाण – रा.ना. लोकनेते राजर्षि शाहू महाराज–काल आणि कार्ये, पृष्ठ – ६५

८६. धर्माधिकारी भा.वि. (२००८) : क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा, पृष्ठ – २०३

८७. उपरोक्त, पृष्ठ – १४९

८८. उपरोक्त, पृष्ठ – २०५

८९. उपरोक्त, पृष्ठ – ४८

९०. उपरोक्त, पृष्ठ – २०४

९१. उपरोक्त, पृष्ठ – १६६

९२. उपरोक्त, पृष्ठ – १३५

९३. उपरोक्त, पृष्ठ – १३५

९४. उपरोक्त, पृष्ठ – १७८

९५. उपरोक्त, पृष्ठ – १७८

९६. उपरोक्त, पृष्ठ – १७८

97. subhashChandra Bhose, The dfernative leardership, Specohes Articles, statmants of letters - P. 81

## प्रकरण पाचवे

# उपसंहार

ब्रिटीश राजवटीतून हिंदुस्थान मुक्त करून नवभारत निर्मितीचा ध्यास अनेक देशभक्तांनी घेतला होता. त्या प्रेरणेने त्यांनी केलेल्या अथक परिश्रमातून आणि त्यागातून उभारलेल्या प्रदीर्घ लढ्यातून भारत स्वतंत्र झाला. भारतीय राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या अनेक नेत्यांनी आणि तरूणांनी आपल्या प्राणाची जराही तमा बाळगळी नाही. त्यातून देश स्वतंत्र झाला पुढे देश प्रगती करेल अशी आशा बाळगण्यात आली. परंतु स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षाच्या काळात ती ध्येये अपेक्षित होती. ती आज तरी साध्य होवू शकलेली नाहीत. ज्या व्यापक वैचारिक पायावर भारत स्वतंत्र झाला त्या वैचारिक वारसाचा विसर भारतीय समाजाला होवू लागला आहे. या पार्श्वभूमीवर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी जे योगदान दिले ते महत्त्वाचे होते.

आधुनिकतेचा वेध घेत असताना इतिहासाकडे आणि इतिहासाने दिलेल्या वैचारिक ठेव्याचे भान समाजातील सर्व घटकांना ठेवणे आवश्यक असते. किंबहुना इतिहासानुसार वागण्यापेक्षा इतिहासापासून शिकले पाहिजे. परंतु वास्तवात तसे होताना दिसून येत नाही. स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून विविध नेतृत्वांनी विचारवंतानी आपल्या मौलिक विचारांचा ठेवा समाजाला दिला आहे. यामध्ये क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांचे कृतिशील विचार महत्त्वाचे आहे. क्रांतिवीर नागनाथ यांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्याशिवाय त्यांच्या कार्यातून समाजापुढे आदर्श वैचारिकता जोपासली जात आहे. त्यांच्या विशिष्ट राजकीय, सहकारी, सामाजिक सिद्धातांची व कार्याची मांडणी करणे उपयुक्त ठरेल. त्यांनी सहकार व राजकारण या क्षेत्रात नेतृत्त्वाचा जो ठसा उमठवला आहे त्यामुळे एक आदर्शवत विचार समाज रूढ होण्यास मदत झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यत्तोर काळात त्यांनी ज्या ध्येयाने काम केले आहे. हे काम आजच्या तरूण पिढीना प्रेरणादायक ठरू शकते.

१८५७ च्या बंडापूर्वी अनेक बंड या भूमितून निर्माण झालेले आपणास दिसून येतात. उदा. सन १८५३ मध्ये रंगो बापूजी गुप्तेचे बंड, वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडात तासगांव, विसापूर, शिगांव गावचे रामोशी यांचा उठाव १८२१ मधील गोपाल हरी पटवर्धन, अण्णाजी शेडे, विठूजी कुंडलकर, संतू घाडगे यांचा उठाव किंवा १८४० मध्ये कोळे गावच्या (कराड) पवारानी केलेला उठाव १८४८ चा सामानगड भागातील इंग्रजा विरोधातील उठाव, तसेच १८४५ चा इस्लामपूर गावातील उठाव हे याच सांगली, सातारा जिल्ह्यातून झालेले आढळून येतात. थोडक्यात या भूमितील शेतकरी व जनता ही आपल्या स्वातंत्र्याबद्दल जागृत होती हे निश्चित आहे. याच जिल्ह्यातून व्यापक प्रमाणात इंग्रजाना विरोध केलेला आहे. साताराचे प्रतिसरकार व क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांचे क्रांतिकारक यांचे यामध्ये मोठे योगदान दिसून येते. या प्रेरणेतूनच नागनाथ नायकवडीसारखे नेतृत्त्व स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात उदयास आले.

या चळवळीने ग्रामसंघटना, तरूण संघटना, शेतकरी संघटना, साक्षरता प्रसार, शाळा-हायस्कूलमध्ये मुला-मुलींना पाठविणे, व्यसनमुक्ती, गांधी पद्धतीने लग्ने लावणे, सामुदायिक समारंभ घडवून आणणे. कोर्ट कचेरीत न जाता तडजोडीने दावे मिटविणे अशी अनेक कार्य या चळवळीने पूर्ण केली आहेत. याच चळवळीतील जहाल क्रांतिकारक म्हणून क्रांतिवीर नागनाथ अण्णांची ओळख इंग्रज सरकारला होती. अतिशय चपळ व हुशार व्यक्तिमत्त्व होते. प्रतिसरकारमध्ये अण्णा सर्वात जहाल क्रांतिकारक म्हणून प्रसिद्ध होते. 'झटपट दावा झटपट न्याय' यामुळे अण्णा सांगली, सातारा व पूर्ण भारत देशामध्ये प्रसिद्ध झालेले होते. प्रतिसरकारने अनेक ध्येय धोरणे आखली व कार्यरूपात आणली. यामध्ये जमीन मालकी हक्काच्या प्रस्थापिताना धक्का न लावता इतर प्रश्ना संबंधी न्याय निवाडा करणे, अन्नधान्य, बाजार व्यवस्था, पुरवठा कामे, वाहतूक वगैरेच्या बाबतीत खाजगी व्यापारी व सरकारी संस्था यांना मुभा ठेवणे, त्यांना संरक्षण देणे, सावकारी जबर व्याज व कर्ज फेडीचे जुलूमी देण्या-

घेण्याचे व्यवहार, फौजदारी स्वरूपाचे गुन्हे, स्त्री विषयक व अन्यायकारक बाबींचा निकाल लावण्याचा सपाटा या चळवळीने सुरू केल्याने अल्प अवधीमध्ये ही संघटना जन सामान्यात रूजू झालेली होती. त्यामुळे नागनाथ अण्णांची महत्त्वाची भूमिका होती.

थोडक्यात महाराष्ट्राच्या या चळवळीने इंग्रज सरकार विरोधी जी भूमिका घेतली त्यामध्ये सांगली, सातारा जिल्हा हा आघाडीवर दिसून येतो. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी हे या क्षेत्रातील क्रांतिकारकांनी नवीन इतिहास रचल्याचे आढळून येते.

नागनाथ अण्णांची जहाल विचारसरणी व क्रांतीकारी भूमिका इंग्रजाबाबत दिसून येत असली तरी भारतीय समाज व जनतेबद्दल फारच वेगळी मते आहेत. चळवळीशिवाय व्यक्ती जीवंत असल्याची जाणीव कधीच दिसून येत नाही. म्हणून ते शेवटपर्यंत समाजातील लोकांसाठी, म्हणजे पाण्यासाठी, जमिनीसाठी, शेतसारा, खंडसारा, ऊस प्रश्न, वीजप्रश्न, धरणग्रस्त, आदि लोकांसाठी चळवळ करीत राहिले. चळवळ ही मानव जीवनातील शक्तीचा उदय करणारी प्रक्रीया आहे असे त्यांचे मत होते. मानवाच्या असंख्य गरजा व समस्या या चळवळीला बळ देतात. विद्रोह अंगी असणे म्हणजेच चळवळीचे बीजारोपण करणे होय अशी त्यांची धारणा होती. नागनाथ अण्णां यांनी शस्त्रे पळविणे, खजीना लूटने, जेल फोडणे, तार यंत्रणा विस्कळीत करणे, इंग्रजाविरोध पत्रके काढणे, यासाठी चळवळ संघटीत करणे या सर्व गोष्टी केलेल्या आहेत. त्यामुळे क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) हे त्याकाळातील एक जहाल क्रांतिकारक अशी प्रतिमा तयार झालेली आढळून येते. इंग्रजाना या देशातून हाकलून लावून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हा यामागील शुद्ध उद्देश्य दिसून येतो.

अण्णांनी शेतकरी कामगार पक्षाच्या तिकीटावर लढून तत्कालीन काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला होता. सत्तेत असतानाही त्यांनी गरजा मर्यादित ठेवल्या. तसेच साधे राहणीमान कटाक्षाने ठेवले. त्यांनी सत्तेत असताना अनेक विधायक कामे केलेली आहेत. त्यांच्या काळातील महत्त्वाचे कार्य म्हणजे ‘महार’ वतन खालसा केली. रोजगार हमी योजना,

पाणी योजना, धरण योजना अशा अनेक प्रश्नासाठी त्यांनी विधीमंडळात जोरदार भूमिका मांडली होती. अण्णांना त्यांचा आयुष्यात मिळालेले अनेक सन्मान पुरस्कार हे त्यांच्या कार्याची पोच देतात. सन्मान किंवा पुरस्काराने भारावून न जाता त्यांनी त्यांची कार्ये थांबविलेली नाही तर आयुष्याच्या शेवटपर्यंत जोमाने काम करत राहिले. म्हणून पदमश्री, विद्यावाचस्पती, अशा मोठमोठ्या पदव्या देवून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे.

आपले व्यक्तित्व आणि ऋण, कर्तृत्व या आधारावरच निवडणूक जिंकून राजकीय पद प्राप्त करणे हीच नेतृत्वाची कल्पना आज मान्य झाली. असली तरी या सर्वाला अपवाद क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आहेत. कारण त्यांचे नेतृत्त्व हे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतून प्राण हातावर घेवून लढून निर्माण झालेले आहे. त्यांच्या नेतृत्वात कोठे ही पदाची किंवा खुर्चीची हाव दिसत नाही. नि:स्वार्थी स्वच्छ नेतृत्व देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी निर्माण झालेले होते. अण्णाच्या नेतृत्वामध्ये ग्रामराज्य विचार किंवा प्रभाव पडलेला आढळून येतो. गांधीजीनी देशाच्या उन्नतीसाठी ग्राम किंवा गाव महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू मानले. सहकार्य व गौरवशाली शांती जीवन व्यतीत करण्यासाठी गाव उन्नत होणे हे काळाची गरज मानली होती. त्याप्रमाणे क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी ग्राम अभियान सुरू केलेले आढळते. त्यातूनच स्वातंत्र्यानंतरही त्याचे सर्वस्पर्शी नेतृत्त्वाचा प्रभाव टिकून राहिला.

डॉ. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी भारतीय समाजाचे दोन प्रकारे नेतृत्व केलेले आढळते. अण्णांनी भूमिहीन दलित समाज भूमिहक्क लढ्याचे नेतृत्व स्वातंत्र्यनंतर केले यामध्ये त्यांना बहुतांशी यश प्राप्त झालेले दिसून येते. सरकारने त्यांच्या मागण्या अशा प्रकारे मान्य केलेल्या आहेत. महार इनाम वर्ग यांच्या जमिनी सरकारने संबंधीत धारकाला परत केल्या. अण्णांनी दुष्काळी भागातील पाणी प्रश्न, बेरोजगारी, बेकारी या प्रश्नावर महाराष्ट्रातील जनतेच्या परिषदाचे नेतृत्व केलेले आढळून येते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे ते गंभीरपणे पाहतात. म्हणूनच शेती वीज दरवाढी विरोधी आंदोलनाचे नेतृत्व करून संपूर्ण

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वीज दरवाढी विरूद्ध एकत्र करून त्यांनी सरकारला धोरण बदल करण्यास प्रभाव टाकला. त्यांच्या या नेतृत्वामुळेच महाराष्ट्र सरकारने प्रति अश्वशक्ती ३५०/- रूपयाहून ३००/- रुपयांपर्यंत दर खाली आणलेले आढळून येते. एवढेच नव्हे तर वीज मंडळे तोट्यात दाखवून मंडळाचे खाजगीकरण करण्याच्या विरोधात ते कामगारांना मदत करतात त्यांच्या सेवा ज्येष्ठता व सेवा कायम राहाव्यात याकरीता धरणे आंदोलन करून या प्रश्नाची जाणीव सरकारला करून देतात. महाराष्ट्र सरकारला धडकी भरविण्याकरीता दोन लाख शेतकऱ्यांच्या मोर्चाचे नेतृत्व करून वीजेवरील दंड-व्याज रद्द करणेत यावी, युनिटचा दर ५० पैशा पेक्षा जास्त असू नये. शेतकऱ्यांची वीज तोडू नये अशा प्रकारचे ठराव मंजूर करून सरकारला या मागण्या मान्य करणेस भाग पाडले होते.

अण्णांनी सर्व सामान्य जनतेच्या अनेक प्रश्नावर वेळोवेळी आंदोलन केलेले आहे. त्यांनी सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळी जिल्ह्यासाठी समान पाणी वाटपासंदर्भात परिषदेचे नेतृत्त्व केलेले आढळून येते. एवढेच नव्हे तर आटपाडी तालुक्यातील खाजगी जीप प्रवासी टेंपो चालक व मालक संघटना स्थापन करून त्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन केलेले आहे. पुणे विद्यापीठास राजर्षि शाहू महाराजांचे नाव देण्यात यावे या प्रश्नासाठी झालेल्या आंदोलनाचे अण्णांनी नेतृत्त्व महत्त्वाचे होते.

स्वातंत्र्यानंतर अण्णा एका खुर्चीत किंवा सत्तेत वाटा घेवून कधीच बसलेले नाहीत तर ते नवनवीन प्रश्नावरून लोकांच्या प्रश्नासाठी चळवळ उभी करून नेतृत्व करताना दिसून येतात. 'बच्छावन आयोगा'च्या शिफारशीनुसार महाराष्ट्राच्या वाट्याला कृष्णा नदीतून ५९४ टी.एम.सी. पाणी मिळणार होते व हे पाणी आडवले जात असे... स्वातंत्र्यानंतर ५० वर्षे उपेक्षित राहिलेल्या आटपाडी, खानापूर, जत व कवठेमहांकाळ भागांना मिळावे अशी अपेक्षा या परिसरातील लोकांची होती. पण काँग्रेस राजवटीत त्या भागाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. अण्णांनी १९९३ ला पाणी प्रश्नासाठी चळवळ उभी केले यासाठी त्यांनी अनेक वेळा राज्य

सरकारच्या विरोधात मोर्चे काढले. ६६ हजार स्त्री–पुरूषांचे निवेदन दिले. गाव चावडी, तहसिलदार कार्यालयावर अनेक मोर्चे काढले. दहा वर्षे पाणी व धरणग्रस्त प्रश्नासाठी लढत राहीलेले आढळून येतात. व शेवटी या प्रश्नाला न्याय मिळवून दिलेला आढळून येतो. १३ दुष्काळी तालुक्याला शासनाने समान पाणी वाटपास तत्त्वत: मान्यता देवून कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत निधी दिला गेला. अण्णांचे हे नेतृत्व समाजाच्या कोणत्या वर्गीकरणात करावे हे अवघड आहे. अण्णांनी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी महिला संघटनाचे नेतृत्त्व करून शेतकरी जागृत व्हावा या उद्देशाने त्यांनी १०० गावात सभा घेवून सर्वांना एकत्रित आणले आहे. या काळात अण्णांनी पारधी समाजाच्या पुर्नवर्सनासाठी आंदोलन करून त्यांना हक्काचे घर व शिक्षणाची व्यवस्था त्यांनी करून दिलेली आहे. अण्णाचे नेतृत्त्व हे राजकीय सामाजिक व सांस्कृतिक विभागामध्ये लागू होणारे असून त्याचे नेतृत्त्व हे व्यापक आहे. याची परिभाषा करणे तसे अवघडच आहे. अण्णा आपल्या काळात अनेक जनसमूह व मोर्चाचे नेतृत्त्व केलेले आढळून येते. यामध्ये सारा बंद–चळवळीचे नेतृत्व, बंधारा बांधणीसाठीचे नेतृत्त्व, वारणा धरणग्रस्ताचे नेतृत्त्व हे आपणास दिसून येते.

नागनाथ अण्णांचा लढा हा सर्वसामान्यांचा होता 'सर्वानी लढा दिला तरच देशाला स्वातंत्र्य मिळेल' हे विचार त्यांचे होते. या विचारांनी जनता पेटून उठली होती. भगतसिंग फासावर गेले. सुखदेव, राजगुरु या वीरांनी मातृभूमिसाठी प्राणाची आहूती दिली. तशी तमाम जनतेनेसुध्दा इंग्रजाविरुध्द अति प्रमाणात चीड निर्माण होत गेली.

नागनाथ अण्णा स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्याची सर्व थरातून जनमानसातून दखल तर घेतलीच आणि इंग्रजांनी दशहत घेतलेली आढळून येते. अण्णांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक कार्य उल्लेखनिय असून त्यांनी मानव जन्माचे सार्थक केल्याचे लक्षात येते.

भारतदेशाला स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी दरोडे तर घातलेच पण इंग्रजांचे खूनसुध्दा पाडलेले आढळून येते. एक साधा माणूस क्रांतिच्या विचाराने भारावतो आणि प्रतिसरकारच्या

प्रमुखात स्वत: जावून बसतो हे आजकालच्या समाजातील तरुणांना अभिमानास्पद व हेवा वाटणारी गोष्ट आहे. अण्णांचे कार्य सर्वसमाजाला एक दिशा देते. स्वातंत्र्यानंतर अण्णा गप्प नसत त्यांनी आयुष्याच्या आखेरपर्यंत सरकार विरुध्द अनेक आंदोलने केलेली आहेत. शेतकरी मजूर व दुष्काळग्रस्तासाठी त्यानी केलेली अनेक कार्य समाज परिवर्तनाचे नवे पैलूचे दर्शन घडवितात. समाजाला योग्य दिशा देण्याचे त्यांचे कार्य आहे. वाळव्याच्या पटांगणात दरवर्षी ते सामुहिक विवाह सोहळ्याचे कार्य करीत असत. यामुळे सामान्य जनतेला आपले लग्न कार्य करण्याची कुवत प्राप्त होत असे. या विवाह समारंभास कमी खर्चात व अक्षता ऐवजी फुले व बौध्द भिक्षूकांच्या मदतीने करुन समाजात ऐक्याचे नवे परिवर्तन सुरु करतात. एक समाज दृष्टाच हे सर्व करू शकतो. सामान्य माणसाला अशी कार्ये करणे अशक्य आहे. अण्णांचे अनेक पैलू या कार्याच्या माध्यमातून प्रकट होताना दिसतात. गावातील शेतकऱ्याला व बहुजनाला सत्ता मिळावी म्हणून झटणारे अण्णा गावासाठी नव्हे तर देशासाठी सुध्दा तेवढेच महान होते. एक महामानव आणि शक्ती यांचा संचय अण्णाच्या कार्यातून प्रकट होतो.

अण्णाचे कार्य व्यापक व जनमानसास भारावून टाकणारे असून अण्णांच्या संपूर्ण चरित्राची झलक त्याच्या कार्यातून जाणीव करून देतो. त्यांच्या कार्याची व्याप्ती व्यापक आहे. उभ्या आयुष्यात फक्त चांगले कार्य करण्यात त्यांनी घालविलेली आढळून येते. १९४२ च्या क्रांति समरात जाणुनबुजून उडी घेणारे अण्णा स्वातंत्र्यानंतर सुद्धा तेवढ्याच जबाबदारीचे कामे केली.

स्वातंत्र्यानंतर अण्णांनी स्वत:च्या गावीच वास्तव्य केले. आणि ग्रामीण भाग केंद्रस्थानी मानून विविध उद्योगांना चालना देत आंदोलने उभी करीत समाजाचा विकासाच्या प्रक्रियेचा पाया घातला. त्यामुळे अण्णा सहकार क्षेत्रातील सहकार महर्षि म्हणणे योग्य होईल शेतकरी व बहुजन हाच केंद्र बिंदू धरून त्यांनी आपल्या सहकारा क्षेत्राचा विस्तार केला आहे. यामुळे त्यांच्या उद्योग धंदे अर्थात सहकाराचा महाराष्ट्राला फायदा झालेला आहे. त्यांच्या क्रांतिकारी

किसन आहिर सहकारी साखर कारखान्याने वाळवा पॅटर्न विकसित करून महाराष्ट्रात सहकारातील वेगळी पद्धत अस्तित्वात आणली आहे. कामगार भरती, उसाला योग्य भाव, मळीच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन, वाळवा दूध संघ या सहकारी संस्थेने अल्पावधित देशाच्या कानाकोपऱ्यात दूध, तूप, लोणी व पॅकींग दूधामुळे प्रसिद्धी मिळवली आहे. कामगार भरती, योग्य पगार व नियोजन यामुळे उत्पादन क्षमता वाढत आहे. शेतकरी व या परिसरातील कामगारांच्या हातात नगदी पैसा खेळत आहे. हा अण्णांच्या कार्याचा परिणाम आहे.

त्यांच्या सहकार संस्थानी शेतकऱ्यासाठी ऊस बियाणे, त्यांना योग्य शेती प्रशिक्षण असे विविध उपाय योजना केलेली आढळते. कुटीर उद्योगाद्वारे खेड्यापाड्यातील महिलांना पापड, लोणचे व अन्य छोट्या-छोट्या उद्योगाने त्यांनी बांधून ठेवले आहे. त्यामुळे या परिसरातील ग्रामीण महिला व तरूणांना काम मिळालेले आहे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटलेला आहे.

थोडक्यात अण्णांच्या सहकारी संस्थामध्ये कोणीही मालक नाही. ते स्वत: या संस्थाचे सभासद किंवा अध्यक्ष नाहीत. त्यांचा कारखान्याला लागणाऱ्या मशनरी शाळेतील शिक्षका मार्फत खरेदी केली. त्यामुळे भ्रष्टाचार इथे होत नाही. कारखान्याचा अध्यक्ष हा सर्व जाती धर्मातील निवडतात. यामध्ये कोठेही हुकुमशाही पद्धत दिसून येत नाही. सर्व अधिकार सामान्य कामगार व शेतकऱ्यांना आहेत. त्यामुळे अण्णाचे कोणतेही सहकारी उद्योग बंद न पडता आज भरभराटीस आलेले दिसून येतात.

अण्णांच्या या सहकारी उद्योग धंद्याने शेतकरी व त्यांची मुले काम करत आहेत. रोजंदारी मिळत आहे. मजूरांना काम मिळत आहे. बेकारी कमी झाल्याने येथील तरूण वर्ग अण्णाच्या कामात स्वत: सामील होत आहे. अण्णाचा सहकार हा इतर राजकर्त्यांच्या किंवा पुढाऱ्यांच्या पेक्षा किती तरी पटीने वेगळा आहे. त्यामुळे अण्णाचे सहकारातील योगदान महाराष्ट्राचा आर्थिक पाया भक्कम करण्यास सहाय्यभूत ठरले आहे.

त्यांनी सांगली, सातारा क्षेत्रात आपल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य महत्त्वाचे होते. स्वातंत्र्यानंतर शांत बसून न राहता ते शैक्षणिक कामसुद्धा करताना दिसतात. स्वत:च्या पत्नीस शिक्षित करून त्यांनी प्राथमिक शाळेपासून कॉलेज, आय.टी.आय., इंजि. कॉलेज पर्यंत मजल मारलेली आढळून येते. माध्यमिक हायस्कूल द्वारा त्यांनी विविध ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कायापालट केलेला आहे. मुलींना बाहेर गावी जावून शिकणे शक्य नव्हते म्हणून अशा ठिकाणी त्यांनी जिजामाता गर्ल्स हायस्कूल व मुलींसाठी स्वतंत्र प्राथमिक व हायस्कूल निर्माण केली. या शाळेतील अध्यापकाकडून कोणत्या प्रकारचे डोनेशन स्वीकारले जात नाही. आज सुद्धा अण्णांच्या शाळेतील विद्यार्थी गांधी टोपी परिधान करून शिक्षण घेतात. गौरवाची गोष्ट असून पुऱ्या महाराष्ट्रात अशी वेगळी परंपरा अण्णांच्या शाळेतून दिसून येते. अण्णांच्या बरोबरीने १९४२ च्या लढ्यात स्वातंत्र्यासाठी लढलेले क्रांतिवीरांच्या नावाने अण्णांनी हायस्कूल, शाळा, कॉलेज व हॉस्टेल्स सुरू केलेली आहेत. 'ज्यांचा कोणी नाही त्याचे आम्ही आहोत' अशी ब्रीद वाक्य असणारे ही संस्था खरोखरच या भागातील तसचे कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील विद्यार्थ्यांना आर्दशात घडविणारी संस्था आहे.

अण्णांनी महाराष्ट्राच्या अर्थ कारणात खूप मोठी मदत केलेली आहे. त्यांच्या उद्योगाने शेतकरी व बहुजनांच्या हातात नकदी चलन खेळू लागले आहे. अण्णांची हुतात्मा सहकारी बँक, हुतात्मा दूध संघ, हुतात्मा संकुल, हुतात्मा पत संस्था याद्वारे या क्षेत्राचा आर्थिक कायापालट झालेला आहे. आर्थिक बळामुळे लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली. गरीबीला हटविण्याचा थोडा फार प्रयत्न यशस्वी झालेला आहे. आर्थिक विकास हा कुटुंबाचा प्रमुख विकास असतो ही धारणा अण्णांची असलेने त्यांनी आपले आर्थिक क्षेत्राशी निगडीत सर्व उद्योग धंदे याच परिसरात उभे केलेले आहेत. महाराष्ट्रातील त्यांचा हुतात्मा किसान आहिर हा कारखाना सर्वात उसाला जादा भाव देणारा म्हणून प्रसिद्ध आहे. प्रत्येक महिन्याच्या १

तारखेला बँकेत पगार जमा होतात. या भागातील विद्यार्थ्यांने विविध क्षेत्रात प्रवेश केलेला आहे. आय.पी.एस., आय.एस.आय. विभागात तो स्पर्धा परीक्षा द्वारे या भागाचा नाव लौकिक वाढवत आहे. त्याच्या सोबतीला मुलींची शैक्षणिक विकास सुद्धा महत्त्वाचा दिसून येत आहे.

वाळवा परिसरात शिक्षणामुळे व आर्थिक सुबतेमुळे मोठे परिवर्तन झालेले आहे. १९३० सालापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी सतत क्रियाशिलता आण्णांनी दाखविली.

अण्णा हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या अग्रभागी असणारे क्रांतिवीर होत. तसेच ते विचारवंत ही होते. त्यांच्या विचारांची सुत्रबद्ध मांडणी जरी नसली तरी ही त्यांच्या कृतीशील जीवनातून भाषणातून आणि आचरणातून राजकीय व सामाजिक विचारांचे संदर्भ सापडतात.

अण्णांनी ज्या विचाराबाबत आपली स्वतंत्र धारणा निश्चित केली आहे त्यामध्ये प्रामुख्याने समाजवाद, स्वराज्य, धर्मनिरपेक्षता व लोकशाही यांचा समावेश होतो. हिच अण्णांची विचारधारा आहे. अण्णांनी पोथीनिष्ट समाजवादाला फाटा देऊन भारताच्या तत्कालीन समस्यांच्या संदर्भात समाजवादाची फेर मांडणी केली आहे. समतेवर व न्यायावर आधारलेला समाज निर्माण करणे हे समाजवादाचे प्रमुख तत्त्व त्यांना मान्य आहे. 'मानवतेची सेवा हाच सेवा धर्म' हा भारतीय ऋषीमुनींनी घालून दिलेला आर्दश आपल्या समाजवादात प्रमाण मानला आहे. त्यांच्या समाजवादी विचारांवर मार्क्स-लेनिनचा प्रभाव आहे.

भारतातील शेतकरी आणि कामगार हे समाजातील महत्त्वाचे घटक आहेत असे त्यांचे मत आहे. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्त्व व कार्य केलेले आहे. स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक व आर्थिक संपन्नतेचा समाजातील प्रत्येक घटकांना समान उपभोग घेता येईल अशी व्यवस्था होय. अशी त्यांची धारणा आहे. तसेच प्रत्येक घटकाला समान संधी अभिप्रेत आहे. बहुजन समाजाला देशाच्या राजकारणात संधी मिळावी. शेतकऱ्यांची मुलं समाज्याच्या विकासात यावीत ही त्यांची प्रामाणिक भूमिका दिसून येते. यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले

आढळून येतात. थोडक्यात अण्णांनी धर्म, जात व राजकारण हे वेगळे मानले असून राजकारणात या गोष्टीमुळे मोठी गल्लत होते असे त्यांचे मत आहे. राष्ट्रीय ऐक्यासाठी आज सुद्धा ते तेवढ्याच तत्परतेने कार्यरत असतात. मुंबईत झालेल्या बॉम्ब स्फोटाचा निषेध करण्यासाठी त्यांनी प्रत्येक गावा-गावातून मानवी साखळी निर्माण करून राष्ट्रीय ऐक्याबद्दल असणारी त्यांची भावना दाखवून दिलेली आहे. अण्णांचा भांडवलशाहीला विरोध आहे. सामान्य जनता कष्टकरी वर्ग दीन-दलित यांच्या हक्कासाठी अण्णा लढताना दिसतात. त्यांच्या प्रश्नासाठी ते मोर्चे, लढे व परिषदा घेतलेल्या आहेत. त्यांची राजकीय विचार प्रणाली भारताला सदृढ व बळकट आणि एकात्मतेत बांधणारी असून राष्ट्रीय ऐक्यासाठी ते शेवटपर्यंत प्रयत्नशिल राहिले.

**मुल्यमापन :**

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत ज्या क्रांतीकारकांनी राष्ट्रीय नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली त्यामध्ये नागनाथ नायकवडी यांचे स्थान महत्त्वाचे होते. देशाला स्वातंत्र्य मिळावे, यासाठी त्यांनी ब्रिटिशांची महसूल घेऊन जाणारी पे ट्रेन लुटण्यापासून त्यांनी अनेक भूमिका बजावल्या. हा लुटीचा पैसा क्रांतिकारकांना देणे, शस्त्रे खरेदी करणे आदी महत्त्वाच्या कामासाठी वापरण्यात आला होता. त्यांनी भूमिगत राहून ब्रिटिशांना तीव्र लढादिला. ही. लूट ७ जून, १९४३ रोजी करण्यात आली. या कार्यात जरासी चूक झाली असती तरी प्राण गमवावे लागले असते. त्यानंतरच्या कालखंडात नागनाथ नायकवडी यांनी २६ एप्रिल, १९४८ रोजी मोजक्यासाथीदारांना घेऊन कुंडल बँकेची लूट केली. पुढच्या कालखंडात ब्रिटीशांचा धुळे खजिना लुटला. ब्रिटिशांनी हा पैसा सर्वसामान्य कष्टकरी शेतकरी यांच्या शोषणातून मिळविलेला होता. त्यामुळे तो लुटून देशाच्या स्वातंत्र्यासाठी वापरावयाचा असा निश्चय नागनाथ अण्णा यांनी केलेला होता. ब्रिटीशांची सत्ता भांडवलशाही शोषणव्यवस्थेवर उभी राहिलेली शासनव्यवस्था होती अशी अण्णाची भूमिका होती. म्हणून या गुलामीतून देश मुक्त

व्हावा, अशी इच्छाशक्ती त्यांनी बाळगली होती. स्वातंत्र्यासाठी अण्णांना तुरुंगवासही भोगावा लागला. त्यांना बेसावध अवस्थेमध्ये २९ जुलै, १९४४ रोजी अटक करण्यात आली.

परंतु १० सप्टेंबर १९४४ रोजी अण्णांनी योग्य नियोजन करून सातारा जेल फोडून पलायन केले. गोव्यातून शस्त्रे मिळविणे, इंग्रज अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार मारणे, दिल्लीतून आझाद हिंद सेनेचे मार्गदर्शक आणणे, क्रांतिकारकांना सैनिकी शिक्षण देण्याची सोय करणे, असी अनेक कामे नागनाथ अण्णांनी केली. त्यांची मणदूर येथे ब्रिटिश सैन्यासी चकमक झाली. मोठ्या प्रमाणात गोळीबार झाला. त्यामध्ये अण्णांचे काही साथीदार शहिद झाले. मात्र अण्णांनी ब्रिटिशांना तीव्र लढा दिला. शेवटी ब्रिटीश सैन्य परत गेले. पुढच्या कालखंडात अण्णांनी सेनोलीचा खजिना लुटण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांना पुन्हा अटकही करण्यात आली. थोडक्यात १९४७ पर्यंत नागनाथ अण्णांयांनी ब्रिटिशांना गनीमीकाव्याने क्रांतिकारी मार्गाने हैराण करून सोडले. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत नागनाथ आण्णा नायकवडी यांनी यशस्वी योगदान दिले.

दुसरी गोष्ट स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सांगली व सातारा असे दोन जिल्हे वेगवेगळे नव्हते ते एकत्र होते. सातारा परिसरातून नाना पाटील अग्रेसर होते. तर सांगलीतून क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी क्रांतीकारी चळवळीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. साताऱ्यांच्या चळवळीने ब्रिटिश साम्राज्याला दिलेल्या पर्याय महत्त्वाचा होता आणि ते ब्रिटीश साम्राज्याला दिलेले मोठे आव्हान होते. सांगली सातारा जिल्ह्यातून ज्या क्रांतीकारी कारवाया होत असत. त्यामध्ये नागनाथ अण्णा अग्रभागी असत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सांगली व सातारा परिसरातील क्रांतीकारी चळवळीचे नेतृत्व नागणाथ अण्णा नायकवली यांनी यशस्वीपणे केले.

१९४७ साली देश स्वतंत्र झाला. परंतु नागनाथ अण्णा यांनी देश सेवेच्या कार्यात सतत सहभाग दिला. त्यांना सत्तेची आशा नव्हती. कोणत्याही प्रकारच्या अमिशापासून ते सतत दूर

असत. परंतु लोकांच्या प्रेमाखातर त्यांनी विधानसभा निवडणूक लढविली. प्रचंड बहुमतांनी ते निवडून आले. सत्ता प्राप्तीनंतरही त्यांनी आपली सेवाभावी वृत्ती, साधी राहाणी सोडली नाही. त्यांनी विधीमंडळात नेहमी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी दलित अशा अनेक वंचित घटकांचा प्रश्नांना घेवून लढा दिला. त्यांनी विधानसभेत पाण्याचा प्रश्न, धरणग्रस्थांचा प्रश्न, पारधी समाजाच्या पुर्नवसनाचा प्रश्न असे अनेक प्रश्न घेऊन त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढा दिला. त्यांनी सत्तेसाठी राजकारण न करता समाजाच्या हितासाठीच राजकारण केले आणि समाजाचे नेतृत्व कसे असले पाहिजे हे प्रत्यक्ष कृतीतून भारतीय समाज जीवनाला दाखवून दिले. नि:स्वार्थी, साधे स्वच्छ प्रतिमेचे नेतृत्व म्हणून स्वत:ची त्यांनी ओळख निर्माण केली. त्यांनी सत्तेचा कधीच गर्व केला नाही. ते स्वत:ला कधीच नेता समजत नसत. ते एक कार्यकर्ता म्हणून जगत राहिले.

आज राजकारणात मनी (पैसा) माफीया (गुंड) आणि मसल (लनटकशाही) हे तीन 'म'कार राजरोसपणे वावरताना दिसतात. त्याच्या जोडीला भ्रष्टाचार हा एक घटक ही राजकारणाचा शिष्टाचार होऊन बसलेला आहे. राजकारणाकडून समाजकारणासाठी राजकारण करण्याची परंपरा खंडीत होत आहे. सर्वत्र तत्वशुन्य राजकारणाची नांदी आहे. अशा तत्त्वशुन्य, सत्तालालची, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या राजकीय परिस्थितीमध्ये नागनाथ अण्णांसारखे तत्त्वाने बांधील राहून शुद्ध नेतृत्व देणाऱ्या व्यक्तीची खरी गरज आहे. अण्णा कधीही सत्तेत गेले नाहीत. त्यांनी तत्त्वाने राजकारण केले. भारतीय पुरोगामी मुल्यांशी त्यांनी इमानदारी ठेवली आणि शेवटपर्यंत स्वच्छ कारभार केला. अण्णांना सत्तेची लालसा कधीच नव्हती त्यामुळे लोकांची इच्छा असून सुद्धा ते सत्तेत गेले नाहीत. त्यांच्यासारख्या स्वच्छ नेतृत्वाला नेहमी भ्रष्ट असणाऱ्या राजकीय नेतृत्वाचा त्रास सहन करावा लागला. प्रसंगी त्यांचे मतभेदही झाले. मात्र राजकीय नेतृत्वाच्या संदर्भात नागनाथ अण्णांचा आदरही सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी पक्षातील लोक ही करत आणि आजही करीत आहेत. म्हणून यातून एक गोष्ट स्पष्ट

होते ती म्हणजे नागनाथ अण्णा नायकवडी स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये जे नेतृत्व विशेषत: महाराष्ट्रामधून दिले ते महत्त्वाचे होते. त्यांच्या अंगी असणारे नेतृत्वगुण पुढच्या पीढीला दिशादर्शक आहेत.

नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाच्या संदर्भात अभ्यास करीत असताना एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे त्यांनी स्वातंत्रपूर्व आणि विशेषत: स्वातंत्र्योत्तर जे राजकीय, आणि सामाजिक कार्य केले. ते महत्त्वाचे होते. बहुजन समाजाच्या हितासाठी त्यांनी अस्पृष्यता निर्मुलनाचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी समाजात प्रचलित या प्रथेचा धिक्कार केला व त्यास तीव्र विरोध केला. त्यांनी काढलेल्या हुतात्मा साखर कारखान्याचे चेअरमन एक दलित, व्यक्तीस केले. त्यांनी महार वतन खालसा करून त्यांना न्याय दिला. ज्यांना जमीन नाही अशा भूमिहिन वंचित लोकांना जमिनी व उदरनिर्वाचे साधने उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर त्यांनी खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कष्टकरी लोकांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला.धरणग्रस्त, पुरग्रस्त लोकांना मदत केली. त्यांच्या पूर्नवसनाच्या कार्यात हिरिरीने भाग घेतला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पारधी समाजाच्या पुर्नवसनाच्या कार्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली या वंचित घटकांना उदरनिर्वाहाचे साधने दिली. पारधी समाजातील मुलांच्या शिक्षणाची सोय करून दिली. या वंचित घटकातील तरुणांना शासकीय, निमशासकीय व सहकारी क्षेत्रात नोकऱ्या आग्रक्रमाने देऊन विकासाच्या प्रवासात या समाजाला येण्यासाठी महत्त्वपूर्ण सहाय्य दिले. आमदार असताना त्यांनी सतत या प्रश्नांचा एक क्रांतिकारक, समाजसेवक, कार्यकर्ता आणि आंदोलक या भूमिकेत राहून विधानसभेत सतत पाठपुरावा केला. परिणामी या वंचित घटकांना न्याय मिळत गेला. म्हणून नागनाथ अण्णा नायकवडी यांचे राजकारण बहुजन समाजाच्या आणि वंचित, शोषित घटकांच्या हिताचे होते.

महाराष्ट्राचा सहकार क्षेत्रामुळे विकास झालेला आहे आणि सहकारामुळे अनेक लोकांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झालेले आहे. नागनाथ अण्णा यांनी सहकार क्षेत्रात

महत्त्वाची भूमिका साकारली. त्यांनी सहकारी साखर कारखाना, बँका काढल्या. कारखान्याची भक्कम उभारणी करून, त्यांनी त्यांची यशस्वी वाटचाल ठेवली. कारखान्याच्या माध्यमातून लोक कल्याणकारीअनेक योजना आखल्या आणि कारखाना यशस्वी व फायद्यात ठेवला.परंतु कारखान्याची सत्ता कधीच हाती घेतली नाही. ते पदांपासून सतत दूर राहिले. कारखाना हा सर्वसामान्यांचा कष्टकऱ्यांचा आहे. अशी कारखान्याची त्यानी प्रतिमा निर्माण केली. महाराष्ट्रात मोजकेच साखर कारखाने उसाला उच्चांकी दर देतात. त्या यादीत कारखान्याला नेऊन बसविले. परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व राहणीमान उंचावण्यास मदत झाली. त्यामुळे नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सहकार क्षेत्रातील योगदान महत्त्वाचे, प्रेरणादायी आणि लोककल्याणकारी होते. असे म्हणता येते.

स्वातंत्र्यानंतर नागनाथ अण्णा यांनी सामाजिक, राजकीय क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी उभे केलेले लढे आंदोलने यातून त्यांच्या या कार्याची जाणीव होते. म्हणून स्वातंत्र्योत्तर कालखंडात नागनाथ अण्णा नायकवडी यांनी लोककल्याण आणि सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी जी आंदोलने, जे लढे, उभे केले ते भारतीय समाजजीवनाला दिशादर्शक आहेत.

नागनाथ अण्णा नायकवडी राजकारणात फार काळ रमले नाहीत. राजकारणाला आलेले भ्रष्ट स्वरूप, जातीवादी, जमाववादी प्रवृत्ती अण्णांना अमान्य होती. स्वातंत्र्य चळवळीच्या उज्ज्वल परंपरेतून निर्माण झालेले हे निस्वार्थी, त्यागी आणि सुसंस्कृत नेतृत्व अण्णांच्या रूपाने निर्माण झालेले होते. त्यांच्यावरील संस्कार व वैचारिक भूमिका त्यांना तत्त्वशुन्य, तत्त्वहिन राजकारण करण्यास मान्यता देत नव्हते. त्यामुळे अशा तत्त्वशुन्य, भ्रष्ट राजकारणापासून अलिप्त राहण्याचाच त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले. सार्वजनिक जीवनात त्यांनी ज्या निवडणूका लढविल्या, निवडून आले आणि यशस्वीपणे कार्य केले ते लोकांच्या इच्छेमुळे आणि लोकांच्या प्रश्नांना दूर करण्यासाठीच. त्यामुळे त्यांना राजकारणात फार उच्च

पदापर्यंत मजल मारली नाही. त्यांना तत्त्वशुन्य राजकारण पसंद नसल्याने आणि सत्ता लालसा नसल्याने ते जास्तकाळ राजकारणात रमले नाहीत. परंतु अण्णांनी राजकारणाच्या बाहेरील जीवनात राहून सतत लोकांच्या न्याय हक्कांसाठी शासनावर आपला दबाव ठेवला व लोकांना हक्क मिळवून दिले. त्यामुळे नागनाथ अण्णा नायकवडी हे एक कुशल नेतृत्व या अर्थात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात यशस्वी ठरले.

थोडक्यात नागनाथ अण्णा नायकवडी यांनी स्वातंत्र्याची चळवळ, सामाजिक, राजकीय नेतृत्व, बहुजन, कष्टकरी जनतेचे वंचितांचे प्रश्न सहकार क्षेत्र अशा विविध पातळ्यावर भरीव कामगिरी केली. म्हणून नागनाथ अण्णा नायकवडी एक क्रांतीकारक, लढवये कार्यकर्ते, आंदोलक व एक चळवळ करणारा कार्यकर्ता म्हणून महत्त्वाच्या भूमिकेत राहिले. त्यांचे नेतृत्व अखिल भारतीय समाजजीवनाला दिशादर्शक, प्रेरणादायी, स्फूर्ती देणारे असेच आहे. त्यांनी ज्या दिशेने भारतीय समाज जीवनाला जाण्यास सांगितले ते कृतितून सिद्ध करून दाखविले. त्यामुळे त्या दिशेने संपूर्ण भारतीय समाज जाईल आणि प्रगती करेल अशी अशा त्यांच्या नेतृत्वाच्या पार्श्वभूमीवर बाळगण्यास हरकत नाही. त्यामुळे नागनाथ अण्णांसारख्या नेतृत्त्वाची आजही गरज आहे. त्यांच्या विचारांचे औचित्य पूर्वीपेक्षाही आज अधिक औचित्याचे आहे.

**पुढील संशोधनासाठी दिशा :**

- ''पश्चिम महाराष्ट्रातील जन चळवळी आणि नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान''(विशेष संदर्भ १९६०-२०१०)
- ''साताऱ्यातील प्रतिसरकारचा प्रयोग आणि क्रातिसिंह नाना पाटील आणि नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास.''
- ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आणि नागनाथ आण्णा नायकवडी यांचे योगदान''

- ‘‘स्वातंत्र्योत्तर भारतातील समाजवाधी समाजरचनेच्या प्रस्थापनेसाठी नागनाथ आण्णा नायकवडी यांनी दिलेल्या वैचारिक भूमिकेचे टिकात्मक मुल्यमापन’’
- ‘‘१९६० नंतरचे महाराष्ट्राचे बदलते राजकारण आणि या बदलत्या प्रवाहात नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या राजकीय, सामाजिक, सहकारी चळवळीने शासनव्यवस्थेवर टाकलेला प्रभाव : एक अभ्यास’’
- ‘‘महाराष्ट्रातील समाजवादी विचारांची परंपरा आणि नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या योगदानाचे मुल्यमापन’’

# <u>संदर्भ ग्रंथ सूची</u>


१. अहिर ज. य. (२००८) : *'क्रांतिवीर नागनाथ अण्णा'*, क्रांतीवीर नागनाथ अण्णां नायकवडी गौरव समिती प्रकाश वाळवा, सांगली.

२. अत्रे प्र. के. (१९९८) : *'कऱ्हेचे पाणी'*, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, खंड पाचवा.

३. आंबेडकर प्रकाश (डिंसे.२००२) : *'समकालिन राजकारण बहुजन दृष्टिकोन'*, क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले प्रकाशन येवला, नाशिक.

४. बेडकीहाळ किशोर व बाळप्रकाश (सं.) (२००२): *'भारतीय राजकीय प्रक्रिया आणि स्वरूप'* आंबेडकर अकादमी, सातारा

५. बेडेकर दि. के. (१९४७): *'संयुक्त महाराष्ट्र'* ,चित्रशाळा प्रेस प्रकाशन पुणे. प्र.आ.

६. बेडेकर दि.के./भणगे म.श. (संपा.) (१९७३): *'भारतीय प्रबोधन'* समाज प्रबोधन संस्था पुणे. प्रथम आवृत्ती

७. बोधनकर सुधीर (१९९३) *:'सामाजिक संशोधन पद्धती'* श्री साईनाथ प्रकाशन नागपुर.प.आ.

८. भावे ह.अ. (१९९३) : *'कौटिल्याचे अर्थशास्त्र'*, वर्धा बुक्स प्रकाशन पुणे. तृ.आ.

९. भोळे भा.ल. (२००२) : *'ज्योतिरावांची समता संकल्पना'*, लोकवाङ्मय गृह प्रकाशन मुंबई. तृ.आ.

१०. भोळे भा.ल. (२००३) : *'आधुनिक भारतातील राजकीय विचार'*, पिंपळापुरे अँड कं. नागपुर. द्वि.आ.

११. भांडारकर पु.ल. (१९८१): *'सामाजिक संशोधन पद्धती'* महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ–निर्मिती मंडळ, नागपूर द्वि.आ.

१२. चौधरी के. के. (१९९८) *: 'महाराष्ट्र अँड इंडियन फ्रीडम स्ट्रगल'*, एस. के. सागल डी जी आय पत्रकार गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र.

१३. चामुंडराय चि. (१९७१) : *'दोन दिव्य दारे'*, जयवंत अहिर, हुतात्मा किसन अहिर स्मारक प्रकाशन.

१४. धर्माधिकारी भा. वि. (२००२) *: 'क्रांतिवीर'*, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती प्रकाशन, वाळवा, सांगली.

१५. धर्माधिकारी भा. वि.(२००३) : *'क्रांतिवीर किसनवीर'*, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा

१६. डोळे ना. य. (२०००) : *'भारतीय राज्यघटना पुनरावलोकन'*, एक्सप्रेस हाऊस, कोल्हापूर

१७. दाभोळकर देवधर (१९७६) : *'लोकशाही समाजवाद'*, साधना प्रकाशन, पुणे दु.आ.

१८. धांडे भगवान एस. (२६ जुलै २००५): *'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नेतृत्त्व'* कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती

१९. फाटक न. र. (१९७२): *'श्री शाहू छत्रपती सामाजिक सुधारणेबाबत विचार-जागृती'*, मराठी इतिहास व्याख्यानमाला, पुष्प २ रे शिवाजी विद्यापीठ, प्रथमावृत्ती.

२०. फडके य. दि. (संपा.) (१९९१) : *'महात्मा फुले समग्र महाराष्ट्र राज्य साहित्य वाङ्मय'* सांस्कृतिक मंडळ, मुंबई

२१. गुरव बाबुराव (१९९९) : *'उजळती प्रकाशरेखा'*, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंत वडिये.

२२. गव्हाण सुधीर (३ एप्रिल, १९९३) : *'समकालिन सामाजिक, राजकीय वाद व प्रबोधन परंपरा'* प्रचार प्रकाशन, कोल्हापूर

२३. गरूड शांताराम (१९८६) : *'भारताचा स्वातंत्र्यसंग्राम : प्रवाह, सामर्थ्य, कमजोऱ्या'*, प्रबोधन प्रकाशन ज्योती, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरजी.

२४. गर्दे दि. का. (१९७५) : *'आधुनिक भारतीय विचार'*, परिमल प्रकाशन, औरंगाबाद.

२५. घोटाळे रा. ना. (२००३) : *'समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती'* श्री मंगेशी प्रकाशन नागपुर. आठवी आ.

२६. लाड जी.डी. (१९९९) : *'क्रांतिअग्रणी पूर्व पाक्षिक'*, श्री लक्ष्मी प्रिंटींग प्रेस कुंडल सांगली

२७. जगन फडणीस (१९९७) : *'सत्तेचे मोहरे'*, ग्रंथाली अभिनय चळवळ, मुंबई प्रथमावृत्ती.

२८. जवळकर दिनकरराव (१९९१) : *'देशाचे दुश्मन महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर'*, शताब्दी प्रकाशन बोरगांव-वर्धा.द्वि.आ.

२९. जावडेकर रां.द. (१९७९) : *'आधुनिक भारत'*, काँटीनेंटल प्रकाशन, पुणे. तृ.आ.

३०. कुलकर्णी ल. ग. (१९८८) : *'सातारचे प्रतिसरकार'*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ प्रकाशन

३१. कामत मंगला (१९६७): *'महाराष्ट्रातील समाजसुधारक'*, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी प्रकाशन, पुणे.

३२. कुरुंदकर नरहर (१९६९) : *'जागर'*, देशमुख आणि कंपनी,पुणे प्रथमावृत्ती.

३३. कुलकर्णी भिमराव (१९७१) : *'अस्मिता महाराष्ट्राची'*, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती.

३४. केळकर श्रीपाद (१९८३) : *'छोडो भारत १९४२'*, कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे.

३५. कारेकर म. सु. (१९७७) : *'क्रांतिसिंह नाना पाटील'*, वि. सा. नवलकर प्रकाशन, पुणे

३६. केतकर कुमार (१९८६) : *'कथा स्वातंत्र्याची'*, बालभारती प्रकाशन, पुणे.

३७. कंटक प्रेमा (१९४७) : *'सत्याग्रही महाराष्ट्र'*, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला प्रकाशन, पुणे.

३८. कडियाळ रा. अ. (१९९०) : *'सत्यशोधन कै. ना. भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य'*, इंदुमती प्रकाशन, पाचगाव कोल्हापूर. प्रथमावृत्ती.

३९. केळुसकर कृ. अ. (१९९१) : *'छत्रपती शिवाजी महाराज चरित्र'*, वर्धा प्रकाशन, पुणे चौथी आवृत्ती.

४०. कुलकर्णी कुसुम (२००२): *'प्रबोधन पर्व'* सिंहवाणी प्रकाशन, कोल्हापूर. द्वि.आ.

४१. लिमये मधु (१९८५) : *'स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा'* कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, पुणे प्रकाशन प्र.आ.

४२. लिमये मधु (१९९८) *'पेच राजकारणातील'*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्र.आ.

४३. मोरे विठ्ठल/मोरे सुदर्शन (जाने.२००३) : *'महाराष्ट्रातील राजकीय स्थित्यंतरे'* विचार मंथन, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद संशोधन पत्रिका अंक ३ रा.

४४. मधु लिमये (अनु.) (१९७८) : *'समाजवादाचे भवितव्य'* म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र.आ.

४५. मेहेंदळे विश्वास (१९८६) : *'यशवंतराव ते विलासराव'* अनुबंध प्रकाशन, धनकवडी, पुणे.

४६. नायकवडी कुसूमताई (१९८८) : *'इच्छापुर्ती'*, किर्ती प्रकाशन, कोल्हापूर

४७. निर्मलकुमार फडकुले (संपा.) (१५ ऑगस्ट २००८) : *'कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व'*, म.रा.साहित्य आणि संस्कृतिक मंडळ, मुंबई.

४८. नवनाथ शिंदे (१४ एप्रिल २००७) : *'प्रबोधनकार ठाकरे कार्य आणि कर्तृत्व'* नागनालंद प्रकाशन, इस्लामपुर.

४९. उत्तम कांबळे (१५ सप्टें. २००२) *'जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न'* सुगावा प्रकाशन, पुणे. द्वि.आ.

५०. पाटील विलास (१९८६) : *'क्रांतिसिंह नाना पाटील'* क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ हणमंत वडिये, सांगली. प्र.आ.

५१. पाटणकर भारत (१९९६) : *'क्रांतिवीर नागनाथ नायकवडी'*, वसंतराव पवार, प्रकाशन वाळवा, सांगली.

५२. पाटील डी. बी. (२००२) : *'असे लढले क्रांतिवीर'*, प्रसाद वितरण ग्रंथ दालन, प्रकाशन, सांगली.

५३. पाटील उत्तमराव (१९८७) : *'क्रांतिपर्व'*, लोकमानस साप्ताहिक, धुळे

५४. पाटील डी. बी. (२००४) : *'क्रांतिसागर'*, शांतीनिकेतन प्रकाशन, सांगली.

५५. पाटील दिनकर (१९८८) : *'मराठी माणसे'*, किर्ती प्रकाशन, कोल्हापूर

५६. पाटणकर भारत (२००१) : *'महात्मा फूले आणि सांस्कृतिक संघर्ष'*, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मंबई, तृतीय आवृत्ती.

५७. पाटणकर भारत (२००१) : *'महात्मा फूले आणि सांस्कृतिक संघर्ष'*, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मंबई, तृतीय आवृत्ती.

५८. पवार जयसिंगराव (१९८३) *'क्रांतिसिंह नाना पाटील'* अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर. प्र.आ.

५९. पाटील विवेक वसंत (१९८९): *'वसंतदादा : विशेष स्मरण'* बागणी, जि.सांगली प्र.आ.

६०. पवार जयसिंगराव (१९८३) : *'क्रांतिसिंह नाना पाटील'* प्रिया पब्लिकेशन, कोल्हापूर. प्र. आ.

६१. शिवणकर राघव (२००२) : *'साताराचा सिंह'*, एस. एस. आधारे, द विजय हौसिंग सोसायटी, पुणे

६२. सनदे सा. बा. (१९८८): *'जीवनसंग्राम'*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन.

६३. शिंदे ज.श. (१९८७) : *'आधुनिक भारतीय विचारवंत'* कैलास प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद द्वि.आ.

६४. सरदार गं.बा. (संपा.) (मे १९६०) : *'महाराष्ट्र जीवन आणि परंपरा प्रगती'*, जोशी लोखंडे प्रकाशन टिळक रस्ता, पुणे प्र.आ.

६५. सरदार गं. बा. / धनागरे द. ना. (मार्च २०००) : *'समाज परिवर्तन आणि प्रबोधन'* समाजवादी प्रबोधनी इचलकरंजी.

६६. शिवणीकर राघव (१५ ऑगस्ट १९८६) : *'सातारचा सिंह (क्रांतीसिंह नाना पाटील चरित्र)* श्रीराम बुक एजन्सी, पुणे

६७. ठेंगडी द. बा. (२००४) : *'सामाजिक क्रांतीची वाटचाल आणि डॉ. आंबेडकर'* भारतीय श्रमशोध मंडळ शनिवार पेठ, प्र.आ.

६८. वाळिंबे वि. स. (जुलै १९९८) : *'स्वातंत्र्य संग्राम ज्ञात आणि अज्ञात'* नवचैतन्य प्रकाशन प.आ.

६९. विभुते भालबा (१९९९) : *'भारताचे संविधान'* मनोविकास प्रकाशन मुंबई. प्र.आ.

७०. विद्यार्जन (१९९०) : *'सामाजिक विचारधारा समकालीन समाज – शास्त्रीय सिद्धांत'*, श्री गजानन प्रकाशन महाल, नागपुर प्र.आ.

७१. वैद्य द्वा. गो. (१९२७) *'प्रार्थना समाजाचा इतिहास'* प्रार्थना समाज प्रकाशन, मुंबई

**दैनिके**

१. माडगुळकर ग.दि (१९७६) : *'मी सिंह पाहिला होता'* रविवार दै. सकाळ, पुणे

२. पारेकर दशरथ (ऑक्टोबर १९८१) : *'प्रतिसरकारची कहाणी'* दै. सकाळ कोल्हापूर

३. पाटील दिनकर (३ ऑगस्ट १९८६) : *'शेतकरी नेते नाना पाटील'* दै.पुढारी, कोल्हापूर.

४. पाटील दिनकर (३ ऑगस्ट,१९९०) : *'क्रांतिसिंह नाना पाटील'* दै. समाज, कोल्हापूर

५. शिंदे आबासाहेब (१८ ऑगस्ट, १९८५) : *'प्रतिसरकारची न्याय व्यवस्था'* दै. तरुण भारत, पुणे

## नियतकालिके

१. भोसले एस.एस. (जाने-फेब्रु.८१) : *'क्रांतिसिंह नाना पाटील'* समाज प्रबोधन पत्रिका अंक ९७

२. चव्हाण रा.ना. (जानेवारी १९९१) : 'कर्मवीर भाऊरावातील तत्त्वनिष्ठ परिवर्तने' नवभारत,

३. Chousalkar Ashok (Aug.1992) : *'The Parlour Govt. of Satara'* New Age A Special Issue of Silver Jubilee August Movement,1942

४. पाटील उत्तमराव '१९८४) : *'४२ चे क्रांतिपर्व प्रतिसरकार'* दौंडाईचे लोकमानस दिवाळी अंक,

५. पवार आप्पासाहेब (संपा.) (फेब्रुवारी १९९५): *'शेतकी आणि शेतकरी'* डेक्कन ॲग्रीकल्चरल असो. पुणे, अंक १०वा.

६. शिंदे वि.रा. (१९०९) : *'निराश्रीत सहाय्य'* मनोरंजन मासिक, मुंबई

७. शिंदे वि.रा. (जुलै-डिसें. १९२५) *:'सह्याद्रीवरुन'* मनोरंजन मासिक, मुंबई

८. सरदार गं.बा./धनागरे द.ना. (मार्च २०००) *'समाजपरिवर्तन आणि प्रबोधन'* प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी अंक ३ रा.

## विशेषांक

१. चव्हाण अण्णा (संपा.) (१९८२) : 'प्रहार' कोल्हापूर, स्वातंत्र्य सैनिक खास अंक

२. क्रांतिसिंह नागनाथ अण्णा नायकवडी विशेषांक, (१९९९ ते २००८) सांगली

३. क्रांतिसिंह स्मरणिका (१९७८) : पुरोगामी विद्यार्थी संघटना, विटा

४. क्रांतिसिंह नाना पाटील विशेषांक (१९८१): पुतळा समिती फलटण

५. क्रांतिसिंह नाना पाटील वसतीगृह, (१९७५) : सांगली स्मरणिका

### अप्रकाशित शोध प्रबंध


१. Ayyer S.A. (1981) : *'The Indian Idepen-dence Movement in East Asia'* The Rock Publication

२. Chousalkar Ashok (1990) : *'Indian Idea of Political Residence'* Ajanta Publication. Delhi

३. Grover Virender (Ed) (1998): *'Subhashchandra Bose : A Biography of Vision and Ideas'* Deep and Deep Publication

४. जाधव दिलीप शामराव (जून २०००) : *'क्रांतीवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे राजकीय सामाजिक योगदान: एक अभ्यास'* शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (एम.फिल. शोधप्रबंध)

५. निकम अ.हि. (जून २००१) : *'ग्रामीण भागाच्या विकासासाठी सरकारी योगदान'* (सहकारी पा. पु. संस्था, सातारा) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (एम.फिल. शोधप्रबंध)

६. पाटील एन.एम. (जून १९९६): *'डॉ.रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे राजकीय नेतृत्त्व एक अभ्यास'* शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (एम.फिल. शोधप्रबंध)


### कोश


१. राज्यशास्त्र कोश

२. मराठी विश्वकोश

# नागनाथ अण्णा नायकवडी यांचा जीवन परिचय

| | | |
|---|---|---|
| नाव | : | नागनाथ रामचंद्र नायकवडी |
| आदरार्थी नाव | : | नागनाथअण्णा |
| जन्म | : | १५ जुलै १९२२ |
| वडील | : | रामचंद्र गणपती नायकवडी (शेतकरी) |
| आई | : | लक्ष्मीबाई |
| शिक्षण | : | मॅट्रिकपर्यंत. |
| १९३० | : | क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभांना उपस्थिती. |
| मे १९३९ | : | कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट. शिराळ्यातील दुर्गम भागात व्हॉलंटरी शाळा सुरू. |
| १९४० | : | कामेरीत पहिली विद्यार्थी परिषद. |
| ऑगस्ट १९४२ | : | काँग्रेस अधिवेशनात विद्यार्थी कार्यकर्ता. भगतसिंग मंडळात सहभाग. |
| ऑगस्ट १९४३ | : | पणुंब्रे येथे प्रतीसरकारची स्थापना. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी मंडळाचे सदस्य. |
| ऑक्टोबर १९४३ | : | सागाव (सांगली) येथील पोलीस चौकीतून बंदुका पळवल्या. पोलिसांकडून पाठलाग; पण पळून जाण्यात यशस्वी. |
| १४ एप्रिल १९४४ | : | देशभर गाजलेला चिमठाण्याचा (जि. धुळे) खजिना लुटीत सहभाग. |
| २९ जुलै १९४४ | : | देशद्रोही खबऱ्यांनी फितुरी केल्यानं वाळव्यात अटक. इस्लामपूर तुरुंगात, पुढे सातारा मध्यवर्ती तुरुंगात. |
| १० सप्टेंबर | : | तुरुंगाच्या तटावरून उडी मारून स्वत:ची सुटका करून घेतली. |
| २५ फेब्रुवारी १९४६ | : | सोनबडे आणि मनदूर गावांतील ओढ्यात ब्रिटिश पोलिसांसोबत सशस्त्र चकमक. क्रांतिवीर किसन अहिर व नानकसिंग चकमकीत हुतात्मा झाले. |
| १९४६ | : | एस. एम. जोशी यांच्याकडून समाजवादी पक्षात येण्याचे आवाहन. राष्ट्रीय नेते जयप्रकाश नारायण अण्णांना भेटण्यासाठी वाळव्यात आले. महार वतनातून येणारी गुलामी संपविण्यासाठी आणि 'वतन मुक्ती' लढा संघटित करण्यासाठी ८० गावांत समित्या स्थापन. संत गाडगे महाराजांच्या अध्यक्षतेखाली सातारा येथे धननीच्या बागेत लोकवर्गणीतून जमा केलेला एक लाख रुपयांचा निधी रयत शिक्षण संस्थेला सुपूर्द. |
| १९४८ | : | स्वातंत्र्यानंतरही चळवळ सुरू ठेवण्याच्या निर्धाराचा मोरारजी सरकारला राग. किर्लोस्कर कंपनीसमोर सभेत अटक. सशस्त्र मोर्चामुळे अण्णांना तुरुंगातून सोडावे लागले. |
| १९४८ | : | हुतात्मा स्मारक म्हणून वाळवा येथे किसान शिक्षण संस्था व हुतात्मा किसन अहिर विद्यालय, हुतात्मा नानकसिंग वसतिगृह स्थापन. भारतीय कम्युनिस्ट पक्षात घेतल्याची व महाराष्ट्र कार्यकारिणीवर निवड झाल्याची तार. |
| १३ फेब्रुवारी १९५० | : | सावंतपूर (ता. तासगाव) येथील यशवंत गोविंद कदम यांच्या सुकन्या कुसुमताई यांच्याशी सत्यशोधक पद्धतीने कोल्हापूर येथे लग्न. कुसुमताईंचा प्रत्येक चळवळीत सहभाग. |
| १९५२ | : | कामगार किसान पक्ष आणि डावा समाजवादी पक्ष यांच्या आघाडीतर्फे विधानसभा निवडणुकीत वाळवा मतदारसंघातून उमेदवारी. |
| १०५२ | : | जुने खेड (ता. वाळवा) येथे लेव्हीविरुद्ध आंदोलन. |
| १९५६-५७ | : | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत पुढाकार. |
| १९५७ | : | संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे विधानसभा निवडणुकीत विजयी. १९५७ ते ६२ या काळात आमदार. |
| १९७२ ते ७५ | : | किसान लिफ्ट इरिगेशन योजनेचे काम, नागठाणे येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा. आधुनिक शेतीसाठी ट्रॅक्टर खरेदी. पारधी समाजाचे शिक्षण व पुनर्वसनासाठी प्रयत्न. |
| १९८१ | : | तब्बल आठ वर्षांच्या संघर्षानंतर २६ मार्चला हुतात्मा किसन अहिर सरकारी साखर कारखान्याला मान्यता. |
| १९८४ | : | हुतात्मा कारखान्याची अकरा महिन्यांत उभारणी. २९ जानेवारी १९८४ रोजी पहिला गळीत हंगाम. |


| | | |
|---|---|---|
| १९८५ | : | वाळवा मतदारसंघातून हुतात्मा चळवळीचे उमेदवार म्हणून विधानसभेवर विजयी. |
| १९८५ | : | ऐतवडे बुद्रुक येथे शेतमजूर, कष्टकऱ्यांची भव्य परिषद. पन्नास हजार लोकांची उपस्थिती. |
| १९८६ | : | वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना. |
| १९८८ | : | कोयना धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना. |
| १९८९ | : | वाळवा येथे तिसरे अखिल भारतीय दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलन. कुसुमताईंसमवेत रशिया दौरा. |
| १९९० | : | साखर कारखाना कार्यक्षेत्र दुरुस्तीसाठी चळवळ. |
| १९९१ | : | कऱ्हाड मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली. पराभूत. |
| १९९३ | : | बाबरी मशीद पाडणाऱ्या जातीयवादी शक्तींचा विरोध म्हणून राष्ट्रीय एकात्मतेची वाळवा ते हुतात्मानगर (ता. शिराळा) अशी ८० किलोमीटरची मानवी साखळी. एक हजार सभा घेण्याला सुरुवात. |
| १९९३ | : | समान पाणीवाटप होऊन दुष्काळ कायमचा हटविण्याची मागणी घेऊन चळवळीला सुरुवात. आटपाडी तालुक्यात भव्य पाणी परिषद. लातूर, किल्लारी, औसा येथील भूकंपग्रस्तांना मदतीचा हात. १०८ मुले दत्तक घेऊन हुतात्मा साखर कारखान्यातर्फे पालन, पोषण व पदवीपर्यंत शिक्षणाची जबाबदारी. |
| १९९४ | : | पुणे विद्यापीठाला राजर्षी शाहू महाराजांचे नाव देण्यासाठी चळवळीत पुढाकार. मुंबईत सचिवालयावर मोर्चा. |
| १९९५ | : | आटपाडी तालुक्यात साराबंदीची चळवळ. आटपाडीत पाणी परिषद, क्रांतिकारक विद्यार्थी संघटनेची स्थापना. शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी स्त्री संघटना परिषद स्थापन. |
| १९९६ | : | महाराष्ट्र राज्य धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संग्राम संघटनेच्या अध्यक्षपदी निवड. दहा हजार लोकांचा मंत्रालयावर मोर्चा. कऱ्हाड लोकसभा मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवली. पराभूत झाले. |
| १९९९ | : | दुष्काळग्रस्त व धरणग्रस्तांचा शिवाजी पार्क ते आझाद मैदान असा चौदा किलोमीटरचा मोर्चा. |
| २६ फेब्रुवारी २००० | : | दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्घाटक. संमेलनात सक्रिय सहभाग. |
| २६ मार्च २००० | : | वाळवा येथे साखर कामगार, ऊस शेतकरी, धरणग्रस्त आणि दुष्काळग्रस्तांची भव्य परिषद. मे, जून, ऑगस्ट महिन्यांत तेरा दुष्काळी तालुक्यांतील शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा. |
| २० ते २८ डिसेंबर २००० | : | वारणा अभयारण्यग्रस्तांचा वारणा धरणाच्या भिंतीवर ऐतिहासिक लढा, सरकारला उसनवार म्हणून पाणी भत्त्यापोटी हुतात्मा साखर कारखान्याकडून आठ लाख रुपये दिले. |
| २००१ | : | माधवनगर कॉटन मिल कामगारांच्या लढ्यात सहभाग |
| २००१ | : | सहकारी साखर कारखान्यांवर लादलेल्या आयकराच्या विरोधासाठी केंद्रीय मंत्र्यांना सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांत जाहीर कार्यक्रमांना बंदी. |
| १४ मे २००१ | : | क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी ऊर्फ 'क्रांतिवीरनगर' नावाने नव्या उरमोडी धरणग्रस्त गावाचं नामकरण. |
| मे २००४ | : | सांगली मतदारसंघातून १४ व्या लोकसभेची निवडणूक लढविली; मात्र अपयश आले. |
| जुलै २००४ | : | आटपाडीत पाणी परिषद. |
| १५ जुलै २००७ | : | ८६व्या वर्षात पदार्पण करताना जयवंत अहिर यांनी लिहिलेल्या अण्णांवरील चरित्र पुस्तकाचे माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांच्या हस्ते प्रकाशन. |
| जुलै २००५ | : | आटपाडीत पाणी परिषद. |
| जुलै २००६ | : | आडपाडीत पाणी परिषद. |
| मे २००४ | : | अण्णांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही पदवी देवून सन्मानित केले. |
| जुलै २००७ | : | आटपाडीत पाणी परिषद. |

| | | |
|---|---|---|
| फेब्रुवारी २००८ | : | हुतात्मा किसन अहिर यांच्या स्मृतिदिनी कारखाना कार्यस्थळावर हुतात्मा किसन अहिर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते अनावरण. |
| जुलै २००९ | : | आटपाडीत पाणी परिषद. |
| फेब्रुवारी २००९ | : | हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते अनावरण. प्रमुख उपस्थिती केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार. |
| जुलै २०१० | : | आटपाडीत पाणी परिषद. |
| २२ मे २०११ | : | हुतात्मा बाबूराव विद्यालय पडवळवाडी (ता. वाळवा) येथील विद्यालयाच्या भूमिपूजन कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती.<br>हा सार्वजनिक क्षेत्रातील शेवटचा कार्यक्रम ठरला. |
| २२ मार्च २०१२ | : | मुंबई येथे निधन. |


# पुरस्कार

| | | |
|---|---|---|
| १९९३ | : | नेमगोंडादादा पाटील जनसेवा पुरस्कार (सांगली) |
| १९८८ | : | डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील समाजसेवा पुरस्कार (रुकडी) |
| १९९८ | : | राजर्षी शाहू महाराज पुरस्कार (पुणे) |
| १९९९ | : | फुले, आंबेडकर सामाजिक कृतज्ञता पुरस्कार (खटाव) |
| १९९९ | : | कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार (नाशिक) |
| २००० | : | नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार (विडणी, फलटण) |
| २००० | : | अरिहंत पुरस्कार (निपाणी) |
| २००१ | : | शाहू पुरस्कार (समस्त धनगर समाज) |
| २००१ | : | क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार (विटा) |
| २००२ | : | हरिश्चंद्र-तारामती गौरव पुरस्कार (विटा) |
| २००२ | : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार (बेळगाव) |
| २००२ | : | भाई माधवराव बागल पुरस्कार (कोल्हापूर) |
| २००२ | : | कॉ. व्ही. एन. पाटील स्मृती जीवनगौरव पुरस्कार |
| २००२ | : | रिपब्लिकन मित्र पुरस्कार (कोल्हापूर) |
| २००२ | : | लोकशाहीर फरांदे पुरस्कार (सातारा) |
| २००२ | : | कै. लक्ष्मीबाई मगर भूमिपुत्र पुरस्कार (लातूर) |
| २००३ | : | भगवान नेमीनाथ पुरस्कार (कोल्हापूर) |
| २००३ | : | महाराष्ट्र गौरव पुरस्कार (बेळगाव) |
| २००३ | : | समाजभूषण पुरस्कार (कागल) |
| २००४ | : | चिकोत्राभूषण पुरस्कार (पुणे) |
| २००५ | : | फुले, शाहू, आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार (पिंपरी-चिंचवड) |
| २००६ | : | आद्य क्रांतिवीर उमाजीराव नाईक पुरस्कार (राज्य शासन) |
| २००६ | : | एस. आर. पाटील सहकार प्रेरणा पुरस्कार (कोल्हापूर) |
| २००६ | : | शाहू महाराज पुरस्कार (कोल्हापूर) |
| २००६ | : | जैन फाउंडेशनचा प्रथम राष्ट्रीय पुरस्कार (सांगली) |
| २००७ | : | दादासाहेब साखळकर स्मृती सामाजिक कृतज्ञता पुरस्कार |
| २००७ | : | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाचा आर्यभूषण पुरस्कार |
| २००७ | : | महाराष्ट्र पत्रकार संघाचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार |
| २००८ | : | शिवाजी विद्यापीठाची 'डी. लिट.' |
| २००९ | : | पद्मभूषण पुरस्कार (भारत सरकार) |
| २०१० | : | महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार |
| २०१२ | : | रयत माउली पुरस्कार |

# सांगली जिल्हा



तालुका/महालचे ठिकाण ▲
तालुका/महालची हद्द ----
स्वातंत्र्य-सैनिक हुतात्मा स्मारक •
उत्तर
आटपाडी
विटे
खानापूर
सातारा जिल्हा
रत्नागिरी जिल्हा
सोलापूर जिल्हा
आरळे
कापूसखेड
इस्लामपूर
किर्लोस्करवाडी
पलूस
शिराळे
वाळवे
तासगाव
पडवळवाडी
बिळाशी
कामेरी
कवठेमहांकाळ
जत
कोल्हापूर जिल्हा
सांगली
मालगाव
मिरज
विजापूर जिल्हा
बेळगाव जिल्हा

MAHARASHTRA
STATE
N
सातारा
सांगली

# सांगली जिल्ह्यातील हुतात्मे

| | |
|---|---|
| १. अण्णासाहेब युगमेंद्राप्पा पत्रावळे | सांगली |
| २. केशवराव रामकृष्ण तळवलकर | आष्टा |
| ३. रामचंद्र कृष्णा सुतार | मालगाव |
| ४. शांताराम अनंत गुमास्ते | खानापूर |
| ५. सौ. सुलोचना रामचंद्र जोशी | आरळे |
| ६. अण्णा भरमा वडार | पलूस |
| ७. बाबूराव धोंडी कोकाटे | पडवळवाडी |
| ८. प्रतापराव लक्ष्मण पाटील | व्याकूड (जि. बेळगाव) |
| ९. किसन आत्मा अहिर | वाळवे |
| १०. शंकर कृष्णा जोशी | ऐनापूर (जि. बेळगाव) |
| ११. उमाशंकर रेवाशंकर पंडया | किर्लोस्करवाडी |
| १२. विष्णु भाऊ बारपटे | कामेरी |
| १३. धोंडी संतु कुंभार | मांगरुळ |
| १४. मारुती ज्ञानू पाटील | बिळाशी |
| १५. बाबुराव जाधव | शहापूर (जि. बेळगाव) |
| १६. चांदसाहेब बुवाशहा पटवेगार | आरळा |
| १७. शंकर भाऊ चांभार | मांगरुळ |
| १८. नानकसिंग (मूळ लाहोर) | सांगली |
| १९. शंकर बाळा खुडे (कापूसखेड) | कापूसखेड |

❋ ❋

**Rewards.**

Grant of --- for the arrest or for information leading to the arrest of certain absconders in the Satara District.

GOVERNMENT OF BOMBAY,
Home Department (Political).
Resolution No. S.D.V/-31,
Bombay Castle, 2nd May 1944.

Read Government Resolution, Home Department (Political), No. S.D.V/-7023, dated 4th April, 1944.

Government Express Letter No. S.D.V/-7024, dated 4th April 1944, to the District Superintendent of Police, Satara.

Letter from the District Superintendent of Police, Satara No. C/1695, dated 25th April, 1944.

**RESOLUTION** :- Government is pleased to place an amount of Rs. 34,000 at the disposal of the District Superintendent of Police, Satara, for payment of rewards as detailed below to any person, not being a Police Officer, who gives information leading to the arrest of the following 23 absconders.

| Name of absconder. | Amount of Reward. Rs. |
|---|---|
| 15. Nagnath [illegible] Walwa. | 500 |

OFFICE OF THE POLICE SANGLI

2. The Inspector General of Police, Province of ~~[illegible]~~ Bombay, should be requested to meet the charge from the grants at his dispols under the head "29-Police".

By order of the Governer of Bombay,

K.A. Panthaki,
for Secretary to the Government of Bombay,
Home Department.

To,
The District ~~[illegible]~~ Superintendent of Police, Satara.

True Copy
(S. L. Mane)
Supdt. of Police
Sangli

------

No. 6/1891
Office of the Distt.Supdtt.of Police,
Satara, 10th May, 1944.

Copies forwarded to all S.Is. for information and necessary action.

Sd/-
Distt.Supdtt. of Police,
Satara.

Copy w.os. to :-
1. All S.D.P.Os.
2. Addl. A.S.P.? Karad.
3. Commandant, C.P.F., Karad.

Copy to :-
1. All S.Is. of the Combined Police Force.
2. S.D.P.Is.
3. P.A. Satara.

CONFIDENTIAL.

No. C/1946.
Office of the Distt.Supdt.of Police,
Satara, 17th May, 1944.

CIRCULAR:

Now that the special dacoit police have been withdrawn to Satara, Officers must not conclude that the operations have seased and that there is nothing more to be done. As a matter of fact the object for which they were appointed has been a complete failure in that very few political absconding criminals have -- been rounded up. Hence the problems facing the Satara Police remains resolved.

2/- The object underlying the withdrawal of the special -- police is merely a ruse to tempty these absconders to return to the scene of their activities.

3/- All Officers should, therefore, remain on the qui vive to pick up information regarding the movemenrs of the absconders should an officer get reliable information that any of them is lurking in his jurisdiction and that he can deal with them -- himself he should take such armed and unarmed police as are -- available & capable of overcoming any opposition offered and -- capture or shoot them. If has information leads him to believe that he can't deal with the absconders himself, information -- should be sent immediately to the Additional A.S.P. Satara by the quickest means available by both express telegram and by xxx special man. The Addl.A.S.P will then proceed to the place with a party of special police and round up the gang.

4/- All officers must understand and make their men under--stand that once contact has been made with any absconder gang, the D.S.P. will tolerate no xx excuse for losing touch and will -- expect the capture dio or dead of the gang complete or at least as many of them as there are policemen in the attacking party i.e. one absconder x captured for every policeman present.

5/- The list of individuals concerning whom information is required is attached. An additional list will follow. Some names appear twice and possibly oftener , so should any arrest be made the officer should go through the list to see at who places the absconder is wanted.

O.C. x sihned by
D.S.P.

Sd/-xxx
for Distt. Supdtt. of Police, Satara.

To

The Addl. A.S.P. for information & note.
S.D.P.Os., W.D., E.D.(I & II), for information and to note-- that they must also get information themselves if possible, and at the same time keep all their Inspecteers and Sub--Inspectors constantly reminded of their dUties in this matter.
They should now return to mormal working & especially to the visitation immediately of all serious crime.
The Commandant, Combined Police Forces with a request that the forces under hXm should be similarly instructed.
The Sub-Divl. Police Inspectors. } for note and ne-
All Sub-Inspectors i/c of Police Stations. } cessary action.

| Sr. No. | Name | Village | Date of abscond-ing. | Secs. for which wanted. | Evidence or not. | Gang of |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Police Station Islampur (Political)** | | | | | |
| 16 | Nagnath Ramchandra Naikwadi | Walwa | Aug'42 | 148,149, 395,398, IPC.126 I.Rlys. Act. | No. | Kundal |

......

( T R U E C O P Y )

(A. L. Mane)
for Supdt. of Police
Sangli

गावचे भाग ४ था या बुकातील ता.११-७-१९४४ चे उतारा आहे

---

जगन्नाथ रामचंद्र नायकवडी, बापु होत, धामगौंडा पाटील व इतर दोन यांना पोलीसांनी छापा घालून येथे पकडले. त्यावेळी त्यांचेकडे पिस्तुले वगैरे मिळून आली. त्याचा पंचनामा करणेस सदाशिव वामन देशपांडे व इतर इसमास बोलाविले. त्यावरुन गावातील १)नारायण आबा कदम २)संडू सखाराम शेळके,३)कृष्णा आत्मा माहीर,४)किसन [illegible] जाधव,५)सखा तुका चौरपडे,६)पांडु गणु पाटील,७)दिना हिंदू नायकवडी ८)मारुती तातोबा गायकवाड वगैरे २०-२२ लोकांनी त्यास पोलीसांना मदत केलेबद्दल गावाबाहेर नेवून त्याचा उजवा हात तोडला व डावे पायास जबर जखम केली. सदर कामी सदर सदाशिव दत्तु यांनी व रामा बाळा थोरात यांनी पोलीसांना बातमी दिली म्हणून संशय येवून हे कृत्य केल्याचे समजते. सदर सदाशिव याचे खोटे अर्ज करण्याची सवय होती त्यामुळेही त्यास वरील लोकांनी मारल्याचे असावे असे वाटते. सर्व आरोपी फरारी असुन त्यांना गावातील इनामदार, गुंड नारायण अनंत देशपांडे, नाना परीट, कृष्णा कदम, ज्ञानु कदम, सैदी मुसलमान, आत्मा बापी, शंकर महाजन, तातोबा रामा शेळके, विश्वनाथ सदाशिव देशपांडे, देवाप्पा मगदुम, जिन्नु पाटील, मरगा बाबाजी मगदुम, बापुराव आष्टेकर (राष्ट्रोपदार) विनायक पंढरीनाथ, रामु माहीर, शंकर परीट, बापु पारीसा, बाळू आप्पा, मिलबडे मास्तर, दादु थोरात (मास्तर) मदत करीत असल्याचे मालुम येते. पोलीस पाटील भिवून काम करीत असुन त्याचे गावात वजन नाही. तो [illegible] फरारीना पण सामील आहे. संडेराव थोरात सरकारचे बाजूचे असल्याचा बहाणा करणारा पण तेही भितीमुळे कॉंग्रेस बंडखो-यांना सामील असल्याचे समजते. सदाशिव वामन यांचा हात तोडल्यामुळे लोक भयभीत झाल्याचे दिसून येते. पुरावा देणेस कोणी पुढे येत नाही.

सही इंग्रजी
पोलीस फौजदार आष्टा


खरी नक्कल आहे


पोलीस फौजदार, आष्टा

True copy


Vijaysingh B. Yadav
Special Executive Magistrate
KOLHAPUR

SPECIAL EXECUTIVE
विशेष कार्यकारी दंडाधिकारी


नागनाथ नायकवडी



स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य लढ्या बाबत चर्चा करताना मा. नागनाथ अण्णा नागकवडी व त्याचे सहकारी



स्वातंत्र्य सैनिकांचा फौजी ट्रेनिंग कॅम्प ढगेवाडी – नोव्हेंबर १९४५



हुतात्मा किसन अहिर यांच्या पादुकावर सोनवडे येथे फुले वाहताना क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी, मा. चामुंडराय, स्वा. सै. खंडू शेळके व जयवंत अहिर




कृष्णा खोरे पाणी परिषद २१ मे १९९७ क्रांतीवीर नागनाथ अण्णा, मा. आर. आर. पाटील मा. गणपतराव देशमुख, मा.निळू फुले व लक्ष्मणराव ढोबळे.



शेतमजूर, कष्टकरी – शेतकरी संघटनेचे नेतृत्व करताना पोलिस लाठीमारास प्रतिकार करत असताना. मा. नागनाथ अण्णा नायकवडी दि. १९ ऑगस्ट २००१




शेतमजूर, कष्टकरी – शेतकरी संघटनेचा मोर्चा त्यात सहभागी मा. नागनाथ अण्णा नायकवडी सन. २००४



हुतात्मा किसन अहिर सह.
साखर कारखाना लि., वाळवा.



क्रांतिसिंह नाना पाटील
महाविद्यालय, वाळवा.



जिजामाता मुलींचे विद्यालय,
वाळवा.



मा. राष्ट्रपती प्रतिभा पाटील, वाळवा येथे नागनाथ अण्णा नायकवडी यांना भेटवस्तू देत असताना.

मा. राष्ट्रपती प्रतिभा पाटील, मा. नागनाथ नायकवडी यांना पद्मभुषण पुरस्कार देत असताना.





मा. पंतप्रधान मनमोहनसिंग हे नागनाथअण्णा नायकवडी यांचे अभिनंदन करताना.